


कुलाब्याची दांडी

ना. सी. फडके

काहीं कथासंग्रह

झुंज
म. गो. पाठक

तिळा उघड
शं. ना. नवरे

विवाहानंतर
मालती दांडेकर

मामाचा वाडा
श्री. ज. जोशी

बंडू
गंगाधर गाडगीळ

ग्यानबाची मेख
पद्माकर डावरे

भारूड
वसंत सबनीस

अडाण्याचा गाडा
वि. आ. बुवा

अकरावा गडी
अ. वा. वर्टी

आकाशाला आलं फूल
गो. नी. दांडेकर

सुरस आणि चमत्कारिक
शांता शेळके

पोटिमा
माझं नांव रमाकांत वालावलकर
द. पां. खांबेटे

कुलाब्याची दांडी

नारायण सीताराम फडके

किंमत साडेसात रुपये

आवृत्ति चवथी
जानेवारी १९६२

मुद्रक – वि. ग. माटे, विश्वकर्मा मुद्रणालय, ३९५ सदाशिव, टिळक रोड, पुणें २.
प्रकाशक – केशव विष्णु कोठावळे, मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगांव नाका, मुंबई ४.

कुलाब्याची दांडी

प्रकरण पहिलें

रहित झालेलें वनभोजन

१ माझा स्वतःचा कांहीं ज्योतिषावर विश्वास नाहीं. पण झालेल्या गोष्टींकडे मागें वळून पाहिलें, कीं आमच्या बाबांचें भविष्य खरें ठरलें असें कबूल करणें भाग पडतें. माझी इंटरमीजिएटची परीक्षा पास होऊन मी लवकरच बी. ए. च्या अभ्यासासाठीं पुण्यास जाणार म्हणून मुंबईच्या दुकानाचें काम दिवाणजींवर सोपवून बाबा जेव्हां वृंदावनास पांच सहा दिवस आले होते त्याच वेळीं एकदां ते मला म्हणाले होते, कीं " जगदीश, तुझी ही तिसरी परीक्षा उत्तम प्रकारें पार पडली यानें मला फारच आनंद झाला. आपल्यासारख्या श्रीमंत माणसांना देखील परीक्षा देतां येतात ही गोष्ट सिद्ध करावयाची झाल्यास आतां तुझ्याकडे मला अभिमानानें बोट दाखवितां येईल. पण एक मात्र मला काळजी वाटते. तुझ्या पत्रिकेवरून असं दिसतं, कीं पुढचं दीड वर्ष तुला फार वाईट आहे; तेव्हां आतां परत कॉलेजांत गेल्यावर जरा नीट काळजीनं वाग. "

त्या वेळीं बाबांचे ते शब्द ऐकून मला मनांतल्या मनांत हंसूं आलें. परंतु, माझ्या चरित्रांतील त्या दीड वर्षाच्या भागाचा एकंदर विचित्र इतिहास जेव्हां जेव्हां मनांत येतो तेव्हां तेव्हां त्या वेळच्या त्या माझ्या हंसण्याचेंच मला हंसूं येतें. गोष्टी झाल्याच मुळीं तशा. त्या दीड वर्षाच्या हकीगतीचा विचार करीत बसलों, कीं माझ्याच का आयुष्यांतील ते दिवस अशी मलाच कित्येक वेळां शंका येते. त्या दिवसांचा अंत माझ्या विवाहांत होऊन त्यांचा माझ्या परम प्रिय पत्नीशीं कायमचा संबंध जडलेला असल्यामुळें त्यांच्या सत्यत्वाविषयीं मला फार वेळ शंका घेतां येत नाहीं.

तिला पाहिली, कीं तिच्या मागें ते दिवस उभे असल्यासारखें मला वाटतें. मी चितारी असतों आणि माझ्या प्रिय पत्नीचें यथातथ्य चित्र मला काढावयाचें असतें, तर त्या दिवसांचे रंग फांसून मीं चित्राची पार्श्वभूमि तयार केली असती. आणि तसलें चित्र नाहीं तर निदान शब्दचित्र तरी काढून आपल्याच आयुष्यांतील एका भागाचें दृश्य दुरून पाहण्याचें सौख्य अनुभवतां आलें तर पहावें म्हणूनच मीं लेखणी हातीं घेतली आहे.

१९१४ सालच्या जानेवारी महिन्यांत मीं कॉलेजांत येऊन बी. ए. च्या वर्गांत नांव दाखल केलें, आणि—

पण, मला वाटतें त्या सबंध दीड वर्षाच्या हकीगतीचा पसारा वाचकांपुढें मांडण्यापेक्षां त्यांतील शेवटच्या कांहीं महिन्यांतील गोष्टी सांगणेंच अधिक बरें !—हो, त्याच दिवसापासून प्रारंभ करतों. कारण, त्याच दिवसाचा ठसा माझ्या मनावर अतिशय उमटलेला आहे. तो दिवस मी कधींहि विसरणार नाहीं.

ती १९१५ च्या जानेवारीची पहिली तारीख होती. आम्हां हिंदूंच्या कालगणनेच्या पद्धतीप्रमाणें त्या दिवसाला कांहींच महत्त्व नव्हतें. पण कॉलेजांतील फॅशनेबल मुलांचा मी पुढारी. मला त्या पद्धतीपेक्षां इंग्रजी कालगणनाच अधिक प्रिय होती. नव्या वर्षाचा नवा दिवस तो ! आमच्या चैनीच्या समुद्राला त्या दिवशीं भरती आली तर त्यांत नवल कसचें ? शिवाय, तो दिवस मला प्रिय वाटण्यास आणखीहि एक कारण होतें. माणिक व मी आज संध्याकाळीं एम्प्रेस गार्डनमध्यें वनभोजनास जाणार होतों. आमचा स्नेह जमल्याला नाहीं म्हटलें तरी पांच महिने होऊन गेले होते, व तेवढ्या अवधींत आम्ही एकमेकांकडे किती वेळां आलों गेलों असूं, किती नाटकें पाहिलीं असतील, किती वेळां 'बोटिंग' (नौकाविहार) केलें असेल त्याला गणतीच नाहीं. पण आमच्या बरोबर बाळासाहेब म्हणा, आबासाहेब म्हणा किंवा माणिकची थोरली बहीण मालतीबाई म्हणा, तिसरें कोणी तरी असावयाचेंच. आणि अशा वेळीं 'दोघांत तिसरा आला कीं गर्दी वाटूं लागते,' या इंग्रजी म्हणीचा मला, व माणिकला नेहमी प्रत्यय येत असे. आज मात्र मी अशा कांहीं कुशलतेनें एकंदर गोष्टी जुळवून आणल्या होत्या, कीं वनभोजनाच्या आमच्या कार्यक्रमांत तिसऱ्या कोणाचीच गर्दी व्हावयाची नव्हती. मी आणि माणिक ! माणिक आणि मी ! तिसरें कोणी नाहीं !

त्या एकांतमय वनभोजनाची कल्पनाच मला इतकी रम्य वाटत होती, [illegible] आदल्या रात्रीं मला काडीइतकीदेखील झोंप आली नाहीं. अथांग [illegible] एकच लहानशी नौका तरंगत असावी त्याप्रमाणें मी आणि माणिक [illegible]जनाच्या निमित्तानें अथांग चांदण्याच्या पृष्ठभागावर विहार करणार [illegible] माझी झोंप पार नाहींशीं झाली. त्या एकांताच्या अवधींत आज [illegible] दिवस दडपून ठेवलेले माझ्या प्रेमाचे बोल कोणत्या रूपानें प्रगट [illegible], त्यांचा माणिकवर काय परिणाम होईल, माझ्या अदमासाप्रमाणें [illegible] वागेल, कीं माझ्या सर्व आशा ती मानेच्या एकाच झटक्यानें किंवा [illegible] दर्शविणाऱ्या एकाच कटाक्षानें उन्मळून टाकील, असे नानाप्रकारचे विचार, विकार व संशय त्या रात्रीं माझ्या मनांत पुनःपुन्हा उत्पन्न होत, [illegible] झाल्यासारखे वाटत, पण पुन्हा आपला खेळ सुरू करीत.

[illegible], कॉलेजच्या पहाऱ्यावर पांचाचे ठोके पडलेले ऐकून मी अंगावरचें [illegible] फेकून दिलें, उठलों व चूळ भरावयासाठीं खिडकींत गेलों. गार [illegible] झुळुक अंगावरून गेली. बाहेर स्फटिकासारखें शुभ्र चांदणें पडलेलें [illegible]. कॉलेजच्या आवारांतील वेलींवरील अर्धविकसित फुलांचा मधुर वास [illegible]. समोरच्या पिंपळावरील पक्षांची किलबिल ऐकूं आली. लांब कोठें [illegible] एका झोंपड्यांत कोणी स्त्री गाणें म्हणून दळत होती तिच्या गाण्याचा [illegible] आवाज कानावर आला. रात्रभर ज्या प्रणयविचारांनीं माझ्या मनांत [illegible] उडवून दिला होता ते क्षणभर एकाएकीं लुप्त झाले. त्या पहांटेच्या [illegible] पहात मी तटस्थ उभा राहिलों. आम्हां फॅशनेबल विद्यार्थ्यांमध्यें [illegible] उठण्याबद्दल अहमहमिका असे, व सर्वांपेक्षां अधिक उशिरां उठण्या-[illegible] माझी कीर्ति होती. पहांटेच्या प्रहरीं सृष्टीचें स्वरूप कसें असतें याची [illegible] कल्पनादेखील नव्हती. यामुळें अगदीं अपरिचित अशी एखादी सुंदर [illegible] पडली, कीं मनुष्याची जी स्थिति होते ती माझी त्या वेळीं झाली.

[illegible] आचार्यांच्या संस्कारानें मूळ स्वभाव कसा जाईल? उठल्याबरोबर [illegible] तयार करून ठेवलेला चहाचा पेला तोंडाला लावावयाची मला [illegible] संवय असल्यामुळें त्या सृष्टिसौंदर्याचा माझ्या मनावर झालेला [illegible] अल्पावधींत बोथट होऊन मला चहाची आठवण झाली. पण चहा [illegible] कसा? तुकाराम—माझा खासगी गडी—आठ वाजल्याखेरीज येऊन

चहा तयार करणें शक्यच नव्हतें. चहा बनवावा तर दूध नव्हतें. दुसऱ्या एखाद्या विद्यार्थ्याकडून दूध आणावें असा विचार करून मी खोलीबाहेर पडलों. बाळासाहेबाच्या खोलीचें दार दहा पंधरा वेळां ठोठावलें तरी त्यानें ओ दिली नाहीं. आबासाहेबाच्या खोलीच्या दाराशीं तोच प्रकार झाला. त्यांत आश्चर्य नव्हतें म्हणा. दोघेहि सरदारपुत्र होते. ते कर्जबाजारी सरदारांचे मुलगे असले तरी श्रीमंती आळसाची व ऐदीपणाची संपत्ति त्यांनीं याच वयांत कल्पनेबाहेर कमाविली होती. दुसऱ्या एकदोघा मित्रांच्या खोल्यांवर मी हल्ला केला. ते जागे झाले, पण दूधच नव्हतें. मी इतक्या पहाटे उठलेला पाहून दोघांनाहि अत्यंत आश्चर्य वाटलें. एक म्हणाला, " जगदीश, हें रे काय ? आज सूर्य पश्चिमेला उगवला कीं काय ? " दुसरा म्हणाला, " जगदीश, आज सूर्याच्याऐवजीं तूं उगवलास होय ? मला वाटतं आज आतां सूर्य उगवणारच नाहीं ! " त्याच्या चेष्टेचा मला विषाद वाटला नाहीं. अर्धवट हंसत मी खोलीकडे आलों.

मी खोलीच्या दाराशीं यावयास आणि शेजारच्या खोलींतून राधाकान्त बाहेर यावयास एकच गांठ पडली. कबीराच्या दोहऱ्यांतील एकच चरण तो मोठ्या प्रेमानें आपल्या मनाशीं हलक्या पण मधुर स्वरांत म्हणत होता. मला पाहतांच दोहऱ्याचा चरण पुरा न करतां त्यानें विचारलें,

" कोण, जगदीश ? "

राधाकान्त आमच्या वर्गांतील सर्वोत्तम विद्यार्थी होता. तो यंदा बी. ए. च्या परीक्षेंत पहिला येणार याबद्दल सर्वांना खात्री वाटत होती. तो अत्यंत बुद्धिमान्, अत्यंत अभ्यासी व नियमित असे. तो फारसा कोणाशीं मिसळत नसे; पण काय कारण असेल तें असो, त्याच्या व माझ्या अभ्यास-क्रमांत आणि दैनिक आचरणांत अपरिमित अंतर असूनहि त्याचें व माझें पुष्कळ जमत असे. मला राधाकान्ताविषयीं आदर वाटे व तोहि माझ्याविषयीं बरीच आस्था दाखवी. मी म्हटलें,

" होय. रोज चार वाजतां अभ्यासाला बसण्याचा तुमचा नियम आज मोडला वाटतं ? "

" छे ! " राधाकान्तानें दाराच्या कुलपांत किल्ली फिरवीत म्हटलें, " रोज चार ते पांच अभ्यास करून थोडं हिंडून येण्याचा माझा परिपाठ

आहे. आतांच पुस्तक मिटून बाहेर पडलों. आज हवा मोठी सुंदर पडली आहे. येतां कां बाहेर फिरायला ? ”

दुसऱ्या कोणत्याहि विद्यार्थ्यानें मला हा प्रश्न विचारला असता तर मी साफ ‘ नाहीं ’ म्हणून उत्तर दिलें असतें. वास्तविक त्या वेळीं कांहींहि करून चहा मिळविण्याची माझ्या मनाची इच्छा होती. पण राधाकान्तानें प्रश्न करतांच ‘ हो चला ’ असे शब्द माझ्या तोंडून निघून गेले, व मी त्याच्याबरोबर चालूं लागलों.

आम्ही नदीपर्यंत चालत गेलों व तेथें पोंचल्यावर पूर्वेकडे तोंड करून एका शिलाखंडावर बसलों. तेथील सृष्टिशोभा पाहून मला फारच आनंद वाटला. राधाकान्त तर एखाद्या चित्राप्रमाणें नदीच्या पात्राकडे पाहात बसला होता. थोड्या वेळानें तो अर्धवट मनाशीं व अर्धवट मोठ्यानें म्हणाला,

“ अहाहा ! नदीची शोभा पाह्यची असेल तर प्रयागला जाऊन गंगा-यमुनेच्या संगमतीर्थावर जाऊन बसावं ! या वेळीं माझ्या डोळ्यांना हा देखावा दिसण्याऐवजीं ज्या ठिकाणीं माझीं पंधरा वर्षे गेलीं तो प्रयागचा पवित्र नदीकांठ माझ्या डोळ्यांपुढें उभा राहात आहे. ती पहांटेची सुरम्य वेळ, दोन दिशांनीं वाहत येणारे ते गंगायमुनांचे भिन्नरंगी प्रवाह, तें विस्तीर्ण शुभ्र वाळवंट, भक्तिभावानं प्रवाहांत बुडी घेणारे ते स्त्रीपुरुष – जगदीश, काय सांगूं तुम्हांला ! प्रयागांतील गंगायमुनांच्या संगमाचं सौंदर्य ज्यानं पाहिलं नाहीं तो अभागी ! ”

या बोलण्यावर काय उत्तर द्यावें हेंच मला समजेना. मीं उत्तर द्यावें अशी राधाकान्ताचीहि अपेक्षा दिसली नाहीं. कारण, तो आपलें बोलणें संपवून पुन्हां नदीच्या पात्राकडे एकाग्र दृष्टीनें पाहूं लागला.

राधाकान्त हा अलाहाबाद येथील एका गृहस्थाचा एकुलता एक मुलगा. मुंबई युनिव्हर्सिटीचें शिक्षण चांगलें म्हणून त्याच्या वडिलांनीं त्याला मुद्दाम पुण्यास पाठविलेला. तो पुष्कळ वेळां अहमदाबादचें वर्णन करी व त्याच्या तोंडचें तें वर्णन ऐकून मला नेहमीं आनंद होत असे.. या वेळींहि त्याच्या तोंडचें प्रयागतीर्थाचें वर्णन ऐकून माझी वृत्ति क्षणभर गंभीर झाली.

कांहीं वेळानें आम्ही उठून परत निघालों. राधाकान्ताची गंभीर वृत्ति अजूनहि पुरती मावळली नव्हती. त्यानें मला प्रश्न केला,

“ जगदीश, निर्मळ सृष्टिसौंदर्याचा मधुर देखावा दृष्टीस पडला, कीं आपल्या मनांत काव्याबरोबरच तत्त्वज्ञानाचीहि उत्पत्ति झाली पाहिजे असं नाहीं का तुम्हांला वाटत ? ”

मला त्याचा प्रश्न नीटसा समजला नाहीं आणि त्या प्रश्नाला उत्तर काय द्यावें हेंहि सुचलें नाहीं. तो निर्गुण काव्याविषयीं चिकित्सा करीत होता, पण मी माझ्या चालत्या बोलत्या काव्याचा – माणिकचा – विचार करण्यांत गढून गेलों होतों. मला प्रश्न करून त्यानें जेव्हां मजकडे पाहिलें तेव्हां मी माझ्या विचारांतून जागृत झालों, व माझें त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष नव्हतें असें दाखविण्यासाठीं म्हटलें,

“ हो. ”

राधाकान्त पुढें म्हणाला, “ अप्रतिम सृष्टिशोभा पाहून मनुष्याच्या प्रतिभेला वाचा फुटते त्याच वेळीं त्या शोभेचा कोणी तरी सर्वशक्तिमान कर्ता असला पाहिजे असा प्रत्यय त्याच्या बुद्धीला येतो. ईश्वराचं अस्तित्व मनाला पटलं, कीं आपलं हें आयुष्य वाटेल तसं वायां घालविण्याची मोकळीक आपल्याला नाहीं असं मनुष्याचं मन त्याला सांगतं.”

राधाकान्त एकदम क्षणभर थबकला, व किंचित् विचार करून त्यानें मला विचारलें, “ जगदीश, तुमचा अभ्यास कसा काय चालला आहे ? ”

काव्य, तत्त्वज्ञान, ईश्वर वगैरे गंभीर विषयासंबंधीं बोलतां बोलतां एकदम अगदीं व्यावहारिक प्रश्न त्याच्या तोंडून निघालेला पाहून मी जरा चमकलों. पण लगेच, आयुष्य वायां घालविण्याच्या गोष्टीवरून त्याला माझ्या अभ्यासाचा प्रश्न सुचला असावा हें माझ्या लक्षांत आलें. त्याच्या मनानें जोडलेला हा संबंध मला फारसा सुखदायक नव्हता. पण गेल्या वर्षभर मीं मुळीं आयुष्य वायां घालविलेंच होतें, तेव्हा राधाकान्ताला दोष देण्यास जागाच नव्हती. मागच्या सबंध वर्षांत मीं पुस्तकाला स्पर्श केला नव्हता; व माणिकची ओळख झाल्यापासून तर माझी विद्यार्थिदशा मीं पूर्णपणें टाकून दिली होती. माझ्या व माणिकच्या प्रणयपूर्ण वृत्ति कॉलेजांतील प्रत्येक विद्यार्थ्याला माहीत होत्या. बाबांनाहि त्या गोष्टी कळल्या असाव्या असा मला एकदोनदां संशय आला होता. पण मी इतका वेडावून गेलों होतों, कीं माणिकच्या नादांत मला अभ्यासाची कांहीं किंमत वाटेनाशी झाली होती.

इतकेंच नव्हे, तर माझे निवडक श्रीमंत मित्र जमले, कीं मी यंदां परीक्षेला बसणार नाहीं याबद्दल ते माझी वाहवा करीत व माणिकविषयींच्या माझ्या प्रणयपराक्रमांची स्तुति करीत. राधाकान्त मात्र एखादे वेळीं मला उपदेशाचा अंकुश टोंचीत असे. पण मदोन्मत्त झालेल्या हत्तीला अंकुशाची एखादी टोंच थोडीच ताळ्यावर आणणार आहे !

आत्तांचा राधाकान्ताचा प्रश्न ऐकून व त्यानें आपली तीक्ष्ण दृष्टि माझ्याकडे रोखलेली पाहून मीं म्हटलें,

" राधाकान्त, तुम्हांला साऱ्या गोष्टी माहीतच आहेत. यंदां माझी परीक्षा पास होणं अशक्य आहे. माणिकशीं विवाह झाल्याखेरीज माझं मन अभ्यासावर स्थिरावणं शक्य नाहीं. "

माझ्याकडे पाहून किंचित् हंसत राधाकान्त म्हणाला, " हंः ! तें खरं. मीं तुमची पत्रिका पाहिल्यापासून मला असंच वाटूं लागलं आहे. तुमची परीक्षा यंदा पास होणार नाहीं हें तुमची पत्रिका स्पष्ट सांगत आहे. पण तुमच्या पत्रिकेवरून माझी अशीहि खात्री आहे, कीं तुमचं माणिकशीं लग्न होणं शक्य नाहीं. "

मला हें त्याचें बोलणें बिलकुल रुचलें नाहीं. मी एकदम आवेशानें म्हटलें,

" हंः ! आग लावा तुमच्या ज्योतिषाला ! मीं त्या दिवशीं तुम्हांला पत्रिका दाखविली हीच चूक झाली. पाहूं आतां पत्रिका खोटी ठरते का–"

बोलण्याच्या आवेगांत तें वाक्य तसेंच अपूर्ण राहिलें, व मीं माणिकविषयीं विचार करूं लागलों.

२

चहा पितां पितां वनभोजनासाठीं काय काय पदार्थ बाजारांतून आणावयाचे तें मी तुकाराम गड्याला सांगत होतों. मी आणि माणिक अशीं दोघेंच वनभोजनास एकटीं जाणार हें त्याला कळूं नये म्हणून तीन चार माणसांस लागतील इतक्या जिनसा मीं त्याला आणावयास सांगितल्या.

सामानाची यादी घेऊन तुकाराम गेल्यावर मीं आपला आवडीचा चिरूट पेटविला, व रोजची टेनिस खेळण्याची वेळ झाली म्हणून टेनिस खेळावयाच्या वेळची विजार खुंटीवरून काढली. इतक्यांत बाळासाहेब, आबासाहेब

व त्यांचे एक स्नेही ऐटीनें बूट वाजवीत आणि " जगदीश, अरे जगदीश!" असा ओरडा करीत खोलींत शिरले.

बाळासाहेब, आबासाहेब, आणि मी, असें आमचें त्रिकूट साऱ्या कॉलेजांत विख्यात होतें. गतवर्षीं ते दोघे कॉलेजच्या वसतिगृहांत राहावयास आल्यापासून माझी त्यांची दोस्ती जमली होती, व माझ्या उनाड आयुष्याला तेव्हांपासून प्रारंभ झाला होता. त्या दोघांचे बाप सरदार होते. परंतु प्रत्येकाला लाखाच्या वर कर्ज असल्याचें मीं दोन तीन ठिकाणीं ऐकलें होतें. त्यांना अभ्यास ही वस्तु कशी ती माहीत नव्हती. बापाकडून महिन्याच्या महिन्याला येणारे दोनशें रुपये त्यांच्या हातून केव्हांच नाहींसे होत; व मग माझ्यासारख्या स्नेह्यांजवळ उसने पैसे काढून ते कसाबसा महिना काढीत. एक वर्षाच्या सहवासानें माझ्या मनांत त्यांच्याविषयीं स्नेह वाढण्याऐवजीं कमी झाला होता. पण माझी व माणिकची मूळ ओळख व्हावयास ते दोघे कारणीभूत झाले होते म्हणून मीं त्यांचा स्नेह वरवर कायम ठेविला होता. शिवाय मला अशा कांहीं आयुष्यक्रमाची चटक लागलेली होती, कीं त्यांत असल्या चार गाढवांची संगति जोडल्याखेरीज गत्यंतर नव्हतें. माझें व माणिकचें प्रेम जमत चाललेलें पाहून मात्र अलीकडे ते दोघेहि माझा द्वेष करीत असावेत अशी शंका मला येऊं लागली होती. पण तो द्वेष उघड दाखविणें त्यांना सोईस्कर नव्हतें. कारण, अडचणीच्या वेळीं त्यांना पैसे पुरविणारा मी त्यांचा सावकार! माझी नाखुषी संपादून त्यांचें कसें चालणार?

" जगदीश, किती उशीर केलास!" डोळ्यावरचा चष्मा हातांत घेऊन हातरुमालानें पुशीत बाळासाहेब म्हणाला.

" काल माणिकबरोबर नाटकाला गेला असेल, तेव्हां उठायला नऊ वाजले झालं!" आबासाहेब कुचेष्टेने म्हणाला.

त्या दोघांत आबासाहेब जरा कुचक्या स्वभावाचा होता. त्याच्या बोलण्यांतील कुत्सितपणा सहन न होऊन मीं म्हटलें,

" अकलेच्या कांद्या, काल नाटकाचा वार तरी होता का?"

यावर कोणीच कांहीं बोललें नाहीं. मीं विजार घातली, बूट चढविला, केंस विंचरून साफ केले, आणि हातरुमालानें तोंड पुशीत म्हटलें, " हं चला. झाली माझी तयारी."

आबासाहेब एकदम माझ्याजवळ आला, रुमालाकडे त्यानें निरखून पाहिलें, व तोंडांतील सिगारेट डाव्या हातांत घेऊन धुराचा फवारा सोडीत त्यानें म्हटलें,

" जगदीश, हा बायकी हातरुमाल आहे ! "

" हो, मग ? " किंचित् त्रासून मीं म्हटलें, " तुला त्यांत मोठंसं आश्चर्य काय वाटलं ? हा माणिकचा हातरुमाल माझ्याजवळ राहिला आहे. "

" अस्सं ! " इतकेंच बोलून त्यानें बाळासाहेबाकडे पाहून डोळे मिचकावले, बाळासाहेबानेंहि नेत्रपल्लवींत त्याला उत्तर दिलें.

त्यांच्या नेत्रपल्लवीकडे लक्ष न देतां मीं आपली टेनिस खेळण्याची रॅकेट हातांत घेतली व ' Come along ' असें म्हणून निघालों. आम्ही चौघे गोलीच्या बाहेर पडून डौलानें टेनिसच्या रॅकेटी हालवीत चाललों होतों, इतक्यांत समोरून ' जे. जी. पटवर्धन कोण आहेत ? ' असें ओरडत तारवाला आला. त्याला आम्हीं थांबविला, व मीं त्याच्या हातची तार घेऊन त्याच्या कागदावर सही केली. पण तो निघून न जातां बक्षिसाच्या आशेनें तसाच उभा राहिला. तारेंत मजकूर होता :—

" बाबासाहेब फार आजारी आहेत, ताबडतोब निघून या.

दिवाणजी "

तार वाचून मी क्षणभर स्तब्धच झालों. नंतर तारेची घडी करीत मीं त्रासिक मुद्रेनें वर पाहिलें. माझ्याकडे पाहतांच थांबलेल्या तारवाल्यानें आपला मार्ग सुधारला. बाळासाहेब जवळ येऊन म्हणाला, " काय आहे रे ? "

तार त्याच्या हातीं न देतां खालचा ओंठ दांतांनीं चावून मीं म्हटलें, " कांहीं नाहीं. बाबा आजारी आहेत. मला ताबडतोब बोलावलं आहे. "

" असं ? " बाळासाहेब व आबासाहेब दोघेहि सहानुभूतिपूर्ण रीतीनें उद्गारले.

इतक्या वेळांत तारेचा परिणाम माझ्या मनावर बराच झाला होता. डाव्या हातांतील चिरूट फरशीवर फेंकून देऊन मीं म्हटलें, " हं ! सारा घोटाळा झाला ! "

ते तिघेहि माझ्याकडे विस्मयानें पाहात उभे होते. त्यांचे विस्मित चेहेरे पाहून माझ्या लक्षांत आलें, की माझ्या कोणत्या योजनेंत घोटाळा झाला

हें त्यांना समजणें शक्य नव्हतें. वास्तविक ते शब्दच मी मोठ्यानें उच्चारावयास नको होते. तार खिशांत घालीत मीं म्हटलें, " बाळासाहेब, आतां टेनिस खेळणं शक्य नाहीं. मला आधीं तडक गांवांत गेलं पाहिजे ! "

त्यांना कांहीं प्रश्न विचारावयास मीं सवडच ठेवली नाहीं. मी घाईघाईनें खोलींत परत आलों, टेनिसची रॅकेट फेंकून दिली, डोक्यावरची साहेबी टोपी काढून साधी टोपी घातली, बूट बदलला आणि अर्धवट धांवत कॉलेजच्या आवाराबाहेर पडलों. सुदैवानें एक रिकामा तांगा रस्त्यानें जात होता. त्यांत एकदम बसून मी तांगेवाल्याला हुकूम केला;

" चल हांकल. रविवार पेठेंत जायचं आहे. "

इतका वेळ मीं मनाशीं विचार असा मुळींच केला नव्हता. तार वाचल्याबरोबर जें मनांत आलें त्याप्रमाणें माणिकची गांठ घ्यावयासाठीं ताबडतोब निघालों. पण आतां तांगा चालू झाल्यावर माझे विचारहि सुरू झाले. बाबा फार आजारी आहेत हें मनांत येऊन पोटांत कालवाकालव झाली. बाबांचें माझ्यावर अतोनात प्रेम होतें, व गेल्या वर्षांत अभ्यासाच्या दृष्टीनें मी जरी मूर्ख बनलों होतों तरी बाबांच्याविषयींचें माझें प्रेम रतिभरहि कमी झालें नव्हतें. परवांच्या नाताळांत बाबांचें पत्र आलें असूनहि माणिकच्या सहवासांत अंतर पडूं नये म्हणून त्यांना व आईला भेटण्यासाठीं मी वृंदावनास गेलों नाहीं हें खरें. पण, आतांची तार वाचल्याबरोबर प्रणयाचें पटल माझ्या पितृभक्तीवरून दूर झालें कीं काय कोण जाणे ! मला कधींहि रडूं येत नाहीं असें मी नेहमीं म्हणत असूनहि आतां तांग्यांतल्या तांग्यांत बाबांची आठवण होऊन माझ्या डोळ्यांत अश्रु आले. बाबांच्या दुखण्याविषयींच्या भावनेचा पहिला उमाळा नाहींसा झाल्यावर माझें मन जरा शांत झालें. मग मला असेंहि वाटू लागलें, कीं नुसत्या तारेवरून घाबरून जाण्याचें कांहीं तितकें कारण नाहीं. बाबांचा स्वभाव उतावळा व अधीर आहे हें मनांत येतांच माझ्या मनाची मी अशी समजूत करूं लागलों, कीं ते कधींच आजारी पडत नाहींत; त्यामुळें थोडासा ताप आल्याबरोबर मला तार करण्याविषयीं त्यांनीं दिवाणजीस हुकूम सोडला असेल. ही कल्पना मनांत आल्याबरोबर बाबांच्या प्रकृतीविषयीं फार काळजी करण्याचें कारण नाहीं असें मी मनाशीं ठरविलें, व माझे विचार माणिकडे ताबडतोब वळले. आज मी व ती

वनभोजनाला जाणार होतों ! माणिकचें माझ्यावर प्रेम आहे किंवा नाहीं तें मी आज अजमावून पाहणार होतों ! माणिकशीं असें बोलावयाचें, तसें वागावयाचें, तिला हें विचारावयाचें, तें सांगावयाचें असे हजार बेत मीं मनाशीं करून ठेवले होते. वनभोजनाचा योग मीं मोठ्या कुशलतेनें जुळवून आणला होता. एकट्या माणिकची गांठ घेण्याची पर्वणी किती तरी अड-चणींच्या वळणांनीं वळून आलेली होती ! आणि इतकें असून बाबांच्या तारेनें या सगळ्यावर विरजण घातलें ! हें मनांत येऊन या विलक्षण योगायोगाविषयीं मला अत्यंत आश्चर्य वाटलें. इतक्यांत राधाकान्ताच्या तोंडच्या सकाळच्या शब्दांची मला आठवण झाली, ' तुमचं माणिकशीं लग्न लागणं शक्य नाहीं ! '

त्या शब्दांच्या स्मरणानें मला फारच विव्हल केलें. त्या साऱ्या गोष्टी डोक्याबाहेर घालविण्याच्या हेतूनें मीं स्वतःशींच म्हटलें, 'हंः ! कांहीं तरी !'

इतकें म्हणून मीं खिशांतील चिरूट काढून पेटविला. इतक्या वेळांत तांगा माणिकच्या घराजवळ आला होता. मीं तांगेवाल्याला सांगितलें " ए, त्या हिरव्या घरापाशीं उभा कर. "

तांग्यांतून खालीं उडी टाकून घराच्या दाराजवळचें घंटेचें बटन मीं दाबलें. दोनदां तीनदां बटन दाबलें तरी कांहींच उत्तर आलें नाहीं तेव्हां माझं आधींच त्रासलेलें मन अधिकच त्रासून जाऊन मीं बटनावर जें बोट ठेवलें तें दूर केलेंच नाहीं. शेवटीं आंतून कोणी तरी घाईघाईनें धांवत " होय, होय ! आलें, आलें ! " असें ओरडल्याचें घंटेच्या आवाजांत मला अर्धवट ऐकूं आलें तेव्हां मीं हात बाजूला केला. कोणी तरी धांवत धांवत दाराशीं येऊन कडी काढीत विचारलें, " कोण आहे ? "

आतां मीं आवाज ओळखला. माणिकच दाराशीं आली होती यांत संशय राहिला नाहीं. दार उघडतां उघडतां ती म्हणाली,

" कोण तें ?—"

इतक्यांत दार उघडलें जाऊन तिची व माझी दृष्टादृष्ट झाली. मला पाहतांच दारावरील डावा हात मागें घेत व उजव्या हातानें पदर सांवरीत माणिक म्हणाली, " इश्श ! "

त्या तिच्या एकाच उद्गारांत माझा स्वर्गसुखाचा आनंद कोंदटल्यासारखें

मला त्या वेळीं वाटलें. मी आंत प्रवेश केला व दार लावतां लावतां विचारिलें, "आज घरांत शुकशुकाट कसा ? डॉक्टरीणबाई कुठं गेल्या आहेत ?"

"पण ही घंटा वाजविण्याची रीत कां झाली ?" रागाच्या खोट्या आविर्भावानें माझ्याकडे पाहात माणिक म्हणाली, "ताई कांहीं जरूरीच्या कामाकरितां खडकीस एका मैत्रिणीकडे गेली आहे. बाळू गड्यालाहि तिनं नेलं आहे. त्यामुळं घरांत मी एकटीच आहे. ताई जेवायला येणार आहे परत."

"अस्सं" हातरुमालानें कपाळ पुशीत मीं म्हटलें. माणिक दृष्टीस पडतांच माझी पहिली खिन्नता बऱ्याच अंशीं नाहींशी झाली होती हें खरें; पण माझ्या नेहमींच्या उल्हसित वृत्तींत मीं नाहीं, हें ओळखण्याइतकी अस्वस्थतेची छटा माझ्या चेहऱ्यावर माणिकला दिसली असली पाहिजे. कारण, माझ्याकडे पाहात तिनें किंचित् गंभीरपणानें विचारलें,

"या वेळेस इतक्या घाईत इकडे यायचं काय कारण ?"

खिशांतील तारेचा कागद बाहेर काढीत मीं म्हटलें,

"ही तार वाच. वर चल. मी तुला सारं सांगतों."

माडीवर माणिकच्या खोलींत आम्ही गेलों. खोलीचा एकंदर देखावा असा होता, कीं तो पाहून माणिकच्या श्रीमंती चोचल्यांची, तिच्या विलासी स्वभावाची, आणि अव्यवस्थितपणाची कोणालाहि पूर्ण साक्ष पटली असती. दारासमोर एक बाजाची पेटी होती; पण ती नीट व्यवस्थितपणें बंद करून ठेवलेली नसून तशीच निष्काळजीपणानें उघडी टाकलेली होती; इतकेंच नव्हे तर तिच्यावर अर्धवट मिटलेलीं अर्धवट उघडीं अशीं तीन चार पुस्तकें पडलेलीं होती. पेटीच्या डाव्या अंगाला एक सुंदर कॅलेंडर खिळ्याला लावलेलें होतें; परंतु नव्या वर्षाचा पहिला दिवस आज उगवला तरी त्या जुन्या वर्षाच्या कॅलेंडरमधील डिसेंबर महिन्याची १० वी तारीखदेखील फाडलेली नव्हती. माणिकचें लिहावयाचें टेबल चांगलें लांबरुंद आणि नक्षीकामानें शृंगारलेलें होतें; परंतु, पांच सहा पुस्तकें, एक दोन केंसाच्या तेलाच्या बाटल्या, उताणा टाकून दिलेला आरसा व त्याच्यावर पडलेला कंगवा, कोणा मैत्रिणीला म्हणून लिहावयास घेतलेलें परंतु अर्धवट लिहून ठेऊन दिलेलें पत्र व त्याच्या बाजूस टाकलेलें फाऊन्टन पेन, आणि नव्या वर्षाचें फॅशनेबल

कॅलेंडर, पायमोजे, हातरुमाल वगैरे नुकतेंच केव्हां तरी बाजारांतून आणलेलें किरकोळ सामान, या सर्वांची त्या टेबलावर इतकी गर्दी झाली होती, कीं त्या टेबलाला लहानशा लिलावाच्या दुकानाचें स्वरूप प्राप्त झालें होतें. मला त्या अव्यवस्थेचें आश्चर्य वाटणें शक्य नव्हतें. कारण तिच्याविषयींच्या प्रेमानें मी इतका आंधळा झालों होतों, कीं तिचे अवगुणहि मला परमप्रिय वाटत असत. माणिकच्या अंगचे दोष मला कळत नव्हते असें नव्हे. पण माझें त्या दोषांवरहि प्रेम होतें. वाचकांना माझें हें म्हणणें कदाचित् खरें वाटणार नाहीं. पण 'जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे!' याहून अधिक मी तरी काय सांगणार?

आम्ही खोलींत आल्यावर माणिक एका कोचावर बसली, आणि मी तिच्यासमोर दुसऱ्या कोचावर बसलों. मी तिच्या हातांत तारेचा कागद दिल्याबरोबर तिनें तो झटदिशीं उलगडला व डोळ्यापुढें धरला. माझी त्या वेळची मनःस्थिति खिन्नतेनें व निराशेच्या असंख्य अस्पष्ट विचारांनीं जड झालेली होती. परंतु, तशा मनःस्थितींत असूनहि माणिकच्या मोहकपणाकडे माझें लक्ष गेल्यावांचून राहिलें नाहीं. कोचावर बसण्याची तिची ऐट एखाद्या चितान्यानें पाहून ठेवण्यासारखी होती. पूर्वेकडच्या खिडकींतून आलेलीं सूर्यकिरणें तिच्या डाव्या डोळ्यावर पडून तो डोळा चमकत होता. तिच्या केसावरहि थोडेसें उन्ह पडलें होतें व त्या उन्हांत त्या केसाचा रंग बहारीचा वाटत होता. तारेच्या कागदाकडे तिचें सर्व चित्त लागल्यामुळें तिच्या भुंवया किंचित् वक्र झाल्या होत्या. माणिक अत्यंत रूपवती होती असें नव्हे; पण तिच्या साध्या रूपांत व काळ्यासावळ्या रंगांत एक प्रकारची अवर्णनीय ऐट होती हें खास. या वेळीं तिची ती ऐटदार मूर्ति पाहून क्षणभर तिच्याकडे तटस्थ वृत्तीनें मी पाहातच राहिलों. माणिकला तार वाचावयाला एक मिनिट-देखील लागलें नसेल; पण तितक्या अवधींत मी तिची मूर्ति इतक्या तन्मयतेनें डोळ्यांत सांठविली, कीं आत्तां या घटकेलासुद्धां त्या वेळचें तिचें चित्र माझ्या दृष्टीपुढें दिसत आहे.

ज्या हातांत तार होती तो हात आपल्या मांडीवर टाकून माणिक म्हणाली, "—च! काय बाई तरी! मग आतां कसं करणार!"

ती जेव्हां मान वर करून बोलली तेव्हां माझी व तिची दृष्टादृष्ट झाली, व मी तिच्या शब्दांनीं थोडासा दचकल्यासारखा झालों. कपाळाला आंठ्या

घालून मी म्हटलें, " मी अगदीं चिडून गेलों आहे. काय करावं कांहीं सुचतच नाहीं. "

" पण तार तर ही अशी आहे—"

" आमचे बाबा जरा घाबरट आहेत. कुठें थोडासा ताप आला असेल अन् मला तार करविली असेल ! "

कांहीं वेळ माणिक कांहींच बोलली नाहीं. माझें बोलणें तिला थोडें विचित्र वाटलें असावें. उजव्या कानाचें मोत्याचें कुडें उजव्या हातानें फिरवीत ती म्हणाली,

" पण ' फार आजारी ' असे शब्द आहेत तारेंत— "

" हं ! म्हणूनच काळजी वाटते आहे. "

दोन दोन शब्दांचींच वाक्यें आमच्या तोंडून बाहेर पडत आहेत हें पाहून मला कसेंसेंच वाटलें असावेसें तिच्या चेहऱ्यावरून मला दिसत होतें. बोलण्याला निराळें वळण द्यावयाचा विचार करून मी आपलें कोचावरचें आसन किंचित बदललें व म्हटलें,

" मग ? काय करावं बरं ? तूं सांगशील तसं मी करीन. "

" इश्श, मी काय सांगणार ! "

" खरंच ! तुला विचारून काय तें करायचं अशा विचारानं तर तार मिळाल्याबरोबर इकडे आलों. "

" वृंदावनाला जावं हें चांगलं. " माणिक म्हणाली.

" वृंदावनाला गेलं पाहिजे हें मलासुद्धां कळतं, पण तें वळत नाहीं ! "

" म्हणजे ? "

" पुण्यांतून माझा पायच निघत नाहीं. आजचं आपलं वनभोजन ठरल्याप्रमाणें आटपूं. अन् उद्यां मी वृंदावनाला जाईन. "

माझ्या शब्दांचा गर्भित अर्थ माणिकला कळला नाहीं असें कसें म्हणतां येईल ? त्या अर्थामुळें तिच्या गालावर थोडासा रक्तवर्ण चढलेलादेखील मला स्पष्ट दिसला. पण आपण तो अर्थ जाणला असें न दाखवितां माणिक म्हणाली,

" अशी तांतडीची तार आल्यावर दिरंगाई करणं चांगलं नाहीं. वनभोजनाचं काय ? परत आल्यावर पुन्हां आपण बेत करूं. "

" पण, तुझ्यावांचून मी चार दिवस कसे काढावे ? " मीं एकदम आवेशानें विचारलें. माझ्या तोंडचे ते शब्द ऐकून माझें मलाच थोडेंसें आश्चर्य वाटलें. असें कांहीं बोलण्याचा माझा विचार मुळींच नव्हता. ते शब्द माझ्या तोंडावाटें कसें निघाले कोण जाणे ! माणिकला तर ते शब्द अगदींच अनपेक्षित होते. ते ऐकून तिनें मान खालीं घातली, आणि डाव्या मनगटावरील घड्याळाची सोनेरी सांखळी नखानें खरडण्यास सुरुवात केली.

कांहीं वेळ आम्ही दोघेहि स्तब्ध होतों. मग मी म्हटलें,

" वृंदावनास ताबडतोब गेलं पाहिजे हें तर खरंच; अन् मी जाणार हेंहि खास. वनभोजनाचं काय मोठं! त्याबद्दल मला कांहीं इतकं वाईट वाटत नाहीं. पण तुला सोडून जाणं माझ्या जिवावर आलं आहे. मला तूं वाटलं तर वेडा म्हण—"

" असं काय बोलावं बरं ! " माणिकनें एकदम वर मान करून मजकडे तिरप्या नजरेनें पाहात म्हटलें.

" मनांतल्या मनांत तूं मला वेडा ठरविलाच असशील– "

" इश्श ! "

" मग माझं म्हणणं कबूल कर. "

" काय तें ! "

" तूं माझ्याबरोबर वृंदावनाला चल. " मी म्हटलें.

आश्चर्यपूर्ण दृष्टीनें माणिक मजकडे पाहात राहिली. आज माझ्या बोलण्याला काडीमात्र ताळतंत्र राहिला नाहींसें तिला वाटलें. ती म्हणाली,

" ताईची प्रकृति सध्यां चांगली नाहीं. तिला असं कांहीं विचारणं मला शोभेल कां ? "

तिचें म्हणणें खरें होतें. ती या वेळीं वृंदावनाला येणें अशक्य होतें. पण शक्याशक्यतेचा विचार करून मी थोडाच बोलत होतों ! तिच्या उत्तरानें मला वस्तुस्थितीची शुद्धि परत आणून दिली. कांहीं झालें तरी आजचें वनभोजन रहित करावे लागणार, इतकेंच नव्हे तर, माणिकच्या विरहांत कांहीं दिवस काढावे लागणार हें मला आतां स्पष्टपणें कळलें. तिच्या विरहाची कल्पना मला असह्य वाटली. मी एकदम पुढें वांकून तिचे दोन्ही

हात झटकन् आपल्या हातांत धरले, त्या हातांचें चुंबन घेतलें, व त्या हातांनीं मी आपलें तोंड झांकीत म्हटलें,

" माणिक, मला विसरणार नाहींस ना ? "

माणिक कांहींच बोलली नाहीं. पण तिचे दोन्ही हात थरथर कांपत होते. जरा वेळानें ती गद्गदित स्वरानें म्हणाली,

" ही भलती शंका कशाला— "

आजपर्यंत मी माणिकच्या अंगाला अशा प्रकारें स्पर्श कधींच केला नव्हता. त्या चुंबनानुभवानें माझ्याहि अंगावर रोमांच उभे राहिले व माझे तळहात घामाने डवडवले. माणिककडे पहात मीं पुन्हां म्हटलें,

" खचित विसरणार नाहींस ना ? "

" खचित नाहीं. "

तिचे शब्द ऐकून मीं पुन्हां तिचे लुसलुसीत हात घट्ट दाबले आणि खालीं वाकून एक, दोन, तीन वेळां त्यांचें चुंबन घेतलें. इतक्यांत – घणणणण !

कोणी तरी दारावरचें बटण दाबलें. माणिक दचकून उठत म्हणाली,

" ताई आली वाटतं. "

माणिकच्या घरून कॉलेजवर परत यावयास मला फार उशीर झाला. त्यामुळें घरीं जावयाची परवानगी कॉलेजच्या प्रिन्सिपालना विचारून, क्लबांत जेवून, मी गेल्यानंतर व्हावयास पाहिजे होतीं अशीं दोन तीन कामें तुकारामाला समजावून देऊन, थोडीशी बांधाबांध करतों न करतों तोंच दोन वाजावयास आले. गाडी तीन वाजतांची होती. माझी वळकटी बांधीत असलेल्या तुकारामाला मी म्हटलें,

" तुकाराम, जरा जलदी कर अं. "

इतक्यांत माझ्या खोलीच्या दारावर कोणी तरी टकटक केलें. मी उठून दार उघडलें तों राधाकान्त दाराशीं उभा. आंत येत येत त्यानें विचारलें, " काय, गांवाला जातां म्हणे ? "

" हो वृंदावनाला जातों. वडील फार आजारी असल्याबद्दल सकाळीं तार आली. " मी खुलासा केला. मग टेबलावरील चिरूट उचलून मी

तोंडांत धरला आणि काड्याची पेटी उघडून तिच्यांतील काडी बाहेर काढीत तुकारामाकडे वळून म्हटलें, " हं. झाली वळकटी ? ठीक आहे. आतां पळ, तांगा आण लवकर. "

" तांगा नको. तांगा मी घेऊन आलों आहे. " राधाकान्त म्हणाला.

" म्हणजे ? " ओढलेली काडी चिरूटाला न लावतां तशीच हातांत धरून मी आश्चर्यानें विचारलें. मला तार आल्याचेंहि मीं ज्या राधाकान्तास पूर्वी सांगितलें नव्हतें त्यानें अगदीं ऐन वेळीं माझ्यासाठीं तांगा आणून तयार ठेवावा याचें मला अत्यंत आश्चर्य वाटलें.

राधाकान्त म्हणाला, " आमचा तास संपून मी मघांशीं वर्गाबाहेर पडलों तेव्हां बाळासाहेबानं सहज तुमच्या तारेची व तुम्ही आतां जात असल्याची बातमी मला सांगितली. सुदैवानं त्याच वेळीं रस्त्यानं एक तांगा जात होता. मीं त्याला लगेच पकडला. म्हटलं तुम्ही अजून गेलां नसलांत तर आपल्या दोघांच्याही उपयोगीं पडेल. गेलां असतात तर तुमची भेट घ्यायला स्टेशनवर मी येणारच होतों. "

त्याची माझ्याविषयींची ही सहानुभूति पाहून मला त्याच्याविषयीं आदर वाटला. बाळासाहेब व आबासाहेब यांचा माझा इतका स्नेह, पण मला तार आलेली त्यांना माहीत असूनहि त्यांनीं मला कोणत्याहि प्रकारें मदत केली नाहीं. उलट, राधाकान्ताचा व माझा विशेष स्नेह नसतांना त्याची ही वृत्ति पाहून मी विचार करूं लागलों. कृत्रिम व अकृत्रिम स्नेहांतील फरक क्षणार्धांत माझ्या डोळ्यापुढें स्पष्ट झाल्यासारखें मला वाटलें.

वाटेनें राधाकान्तानें मला विचारलें, " तुमच्या वडिलांचं तुमच्यावर अतिशय प्रेम असेल ? "

मीं म्हटलें, " हो. "

राधाकान्त उसासा टाकून अर्धवट आपल्याशींच म्हणाला, " पितृप्रेमाची चव चाखण्याचं थोड्यांच्या नशीबीं असतं ! वडील आजारी पडले म्हणून तुम्ही वास्तविक दुःखी कष्टी मनानं इथून जात आहां; पण एखाद्या कवीच्या दृष्टीला तुमचं हें जाणं एखाद्या सुखसोहळ्याप्रमाणें वाटेल."

त्याच्या बोलण्यानं माझ्या हृदयाला पीळ बसल्यासारखें झालें. कारण, तें बोलणें वरवर दिसावयास जितकें विचित्र होतें तितकेंच तें करुणरसानें ओथंबलेलें

होतें. कांहीं वेळ आम्ही दोघेहि स्तब्ध होतों, मग मध्येंच राधाकान्त म्हणाला,

" जगदीश, आईबापांचं सौख्य मिळायला पूर्वजन्मींचं मोठं पुण्य लागतं बरं ! आईबापांना कधीं नाखूष करूं नका. "

कांहीं वेळानें आमचा तांगा स्टेशनच्या आवारांत शिरला. राधाकान्तानें हमाल बोलविला. मी चटकन् पुढें होऊन माझें वृंदावनापर्यंतचें सेकंड क्लासचें तिकिट व राधाकान्ताचें प्लॅटफॉर्म तिकिट काढलें. तांग्यांतून उतरल्यापासून मी कावराबावरा होऊन सभोंवार पाहात होतों. कारण, मला स्टेशनवर भेटावयास येण्याचें माणिकनें कबूल केलें होतें. बारक्याशा खिडकींतून तिकिटें घेतांनाहि मी इकडे तिकडे पाहात होतों. एक स्त्री तांग्यांतून उतरली. मला वाटलें ती माणिकच आहे. कशींबशीं तिकिटें उचलून मी धांवलों. पण ती माणिक नसून एक काळी कुळकुळीत खप्पड तोंडाची नटवी बाई होती ! मी थबकलों. इतक्या घाणेरड्या स्त्रीवर माझ्या प्रिय माणिकचा आरोप केल्याबद्दल माझ्या मनाला कसेसेंच वाटलें. इतक्यांत तिकिटें देणारा माणूस खिडकींतून ओरडला,

" अहो मिस्टर, तुमचे पैसे परत घ्यायचे नाहींत कां ? "

तें ऐकून मी शरमलों. माणिकच्या दर्शनासाठीं उतावीळ झालेल्या माझ्या मनाला पैशाचीहि शुद्ध राहिली नाहीं हें पाहून माझें मला हंसूंहि आलें. तिकिटाच्या खिडकींतून मी पैसे उचलले, आणि राधाकान्ताबरोबर प्लॅटफॉर्मवर जाऊन, एक चांगलासा डबा पाहून सामान ठेवलें. प्लॅटफॉर्मच्या दाराकडे माझी दृष्टि सारखी लागून राहिली होती. डब्याशेजारीं उभा राहून राधाकान्ताशीं मी कांहीं तरी बोलत होतों खरा; पण माझें लक्ष त्या बोलण्यांत मुळींच नव्हतें. माणिक अजून कां आली नाहीं ? गाडी सुटावयास आतां अवघीं दहा मिनिटें उरलीं होतीं !

माझी दृष्टि सारखी दाराकडे आहे हें राधाकान्ताच्या ध्यानांत आल्यावांचून राहिलें नाहीं. त्यानें विचारलें, " कोणाची वाट पाहात आहां कीं काय ? कोणी येणार आहे का काय ? "

" हं ! माणिक येणार आहे—आलीच— "

माणिक आलेली पाहतांच मी पुढें झालों. माणिक एकटी नव्हती. मालतीबाई तिच्याबरोबर होत्या, आणि एका गृहस्थांच्या हातांत हात घालून त्या

चालत होत्या. हे गृहस्थ डॉक्टर होते. त्यांच्या अंगाचा वर्ण शुभ्रवर्णापासून बऱ्याच अंतरावर होता, त्यांचें नाक बसकें होतें, डोळे बटबटीत होते, शरीर स्थूल असून डोक्याला टक्कल होतें व मिशा काढलेल्या होत्या. या डॉक्टराविषयीं माझें अगदीं वाईट मत होतें, व गांवांतहि डॉक्टर शामराव यांचें नांव काढल्यावर डोळे न मिचकवणारे लोक थोडेच मिळाले असते. डॉक्टर शामरावसारख्याच आणखी तीन चार डॉक्टरांबरोबर मिस् मालतीबाई नेहमीं हिंडत, व तें पाहून लोक नानाप्रकारचे तर्ककुतर्क करीत. आणि गेल्या चार पांच महिन्यांत डॉ. मालतीबाईच्या घरीं जाऊन मलाहि ते तर्ककुतर्क खरे वाटूं लागले होते. अशा घरांत माणिकनें राहूं नये असें मला फार वाटे. पण मी काय करणार ?

मला पाहतांच डॉ. शामराव म्हणाले, " हॅलो ! जगदीश, घरीं चाललांत म्हणे ! "

" हो. वडील आजारी आहेत ! " त्यांना कसेंबसें उत्तर देऊन मीं माणिकला डोळ्यांनें खुणविलें व तिच्याबरोबर डब्यापर्यंत आलों. राधाकान्ता-कडे हात करून मीं माणिकला म्हटलें,

" हे आमच्या कॉलेजांतले सर्वोत्तम विद्यार्थी – राधाकान्त. "

माणिकनें त्याच्याकडे पाहून मंदस्मित केलें. तिच्याकडे हात दाखवीत मी राधाकान्तास म्हटलें, " माणिकबाई जोशी. "

राधाकान्तनेंहि तिच्याकडे पाहून मंदाहास्य केलें.

मोठ्या खुबीने मी व माणिक सर्वांना मागें टाकून जरा पुढें गेलों. आम्ही दोघें एकटीच आहोंत हें पाहून मी माणिकला हळूंच म्हटलें,

" माणिक, मला विसरूं नकोस. "

" पण पोंचल्यावर सविस्तर पत्र येऊं द्या. " माणिक हलक्या स्वरांत मला म्हणाली. ती या वेळीं फार मोहक दिसत होती. शुभ्र पोलक्याच्या बाहींतून लाडिकपणानें बाहेर आलेला तिचा काळा सांवळा हात सारखा पहात रहावेसें मला वाटलें. तिनें कसला तरी सेंट पोलक्यावर शिंपडला होता त्याचा वास सारखा येत होता. चटकन् तिच्या हाताला मीं आपल्या हातानें स्पर्श करून म्हटलें, " तूंहि पत्र पाठव. "

इतक्यांत घंटा वाजली. आम्ही झटकन् डब्यापर्यंत आलों. मी आंत

शिरलों व खिडकींतून वांकलों. माणिक खिडकीशीं उभी होती. राधाकान्त, मालतीबाई, शामराव जरा अंतरावर होतीं. राधाकान्त माणिककडे निरखून पाहात होता. ते दिसतांच माझ्या मनांत आलें, ' ज्या आम्हां दोघांचा विवाह होणें शक्य नाहीं असें भविष्य यानें केलें आहे, त्या आमच्या परस्पर दृष्टि-क्षेपांतील प्रेम पाहून त्या भविष्यावरचा त्याचा विश्वास तर नाहींसा होत नसेल ! '

इतक्यांत मी ज्या खिडकीच्या कठड्यावर रेललों होतों त्यावर आपला उजवा हात ठेवून माणिकनें विचारलें,

" पण चार दिवसांनीं खास परत येणार ना ? "

तिच्या हाताचा माझ्या छातीला सहज स्पर्श झाला. तें कोणाला दिसलें कीं काय हें पाहात मीं माणिकला म्हटलें,

" अगदी खास ! "

" हॅलो ! बाळासाहेब अन् आबासाहेब आले ! " डॉ. शामराव मध्येंच ओरडले.

मीं मान वर करून पाहिलें तों ते दोघे खरोखरच दारांतून घाईघाईनें आंत आले. त्यांनीं मला पाहतांच आपआपले रुमाल हवेंत उडविले. माणिक दिसल्याबरोबर तिलाहि त्यांनीं तसलीच ताजीम दिली. डब्याजवळ येऊन दोघेहि म्हणाले,

" जगदीश, उशीर झाला, माफ कर अं ! केव्हां येणार ? "

" येईन लवकरच. " विकारशून्य आवाजानें मीं उत्तर दिलें. त्यांचें येणें मला विशेषसें आवडलें नाहीं. शिवाय, आल्याबरोबर ते दोघेजण माणिकच्या दोन्ही बाजूस उभे राहिले, व आतांपर्यंत राधाकान्त वगैरे मंडळींनीं सुज्ञपणानें आम्हां दोघांना मिळूं दिलेल्या गर्दीतील एकांताचा त्यांनीं पुरा भंग केला हें पाहून मी फारच चिडलों.

शेवटची घंटा वाजली, गार्डानं आपली शिटी फुंकली, एंजिननें शिटी फुंकली, आणि आमची गाडी चालू झाली. सर्व मंडळीकडे पाहात, पण विशेषतः माणिकला उद्देशून मीं म्हटलें,

" बरं ! "

निमिषार्धांत गाडी बरीच दूर गेली. मी खिडकींतून अधिकाधिक वांकून

माणिकची हालती मूर्ति पाहण्याचा प्रयत्न करीत होतों. ती मला पाठमोरी दिसत होती. दोन्ही बाजूला बाळासाहेब व आबासाहेब होते. त्यांचें कांहीं तरी बोलणें होऊन माणिकनें मोठ्यानें हंसून वर मान केली व आबासाहेबा-कडे पाहिलें; इतकें मला दिसल.

लगेच आमच्या गाडीनें वळण घेतलें व प्लॅटफॉर्मवरील देखावा माझ्या पूर्ण दृष्टिआड झाला. प्लॅटफॉर्मवरील तें शेवटचें दृश्य माझ्या मनाला विशेष रुचलें नाहीं. मीं एक सुस्कारा सोडून खिडकींतून अंग काढलें व बांकावर बसलों, चिरूट काढून पेटविला व तोंडांत धरीत म्हटलें,

'हंः ! शेवटीं वनभोजन राह्यलंच !'

प्रकरण दुसरें

बारा वर्षांनीं भेट

१ खरें म्हटलें असतां स्वभावतः प्रवास मला फार प्रिय असे; पण आजचा प्रवास मला अनेक कारणांनीं क्लेशदायक होत होता. पहिली गोष्ट म्हणजे प्रवासच काय, पण कोणतीहि गोष्ट एकट्यानें करणें मला कधींच रुचत नसे. नाटक पाहावयाचें असलें, एखाद्या इंग्लिश हॉटेलांत जावयाचें असलें, किंवा एखाद्या गांवाची सफर करावयाची असली तरी ती एकट्याएकट्यानें करण्यांत मला कधींच मौज वाटली नाहीं. मला नेहमीं कोणीतरी बरोबर लागत असे, व त्यामुळें ज्याची माझी फारशी मैत्री नाहीं अशाहि एखाद्या ओळखीच्या विद्यार्थ्याला घेऊन मी कधीं कधीं एखाद्या ठिकाणीं जात असे. बाळासाहेब, आबासाहेब वगैरे मूर्खांच्या संगतीच्या भोंवऱ्यांत माझ्या या स्वभावामुळेंच मी सांपडलों असें म्हणावयास हरकत नाहीं. तें कसेंहि असो म्हणा; पण त्या दिवशींचा तो एकलकोंडा प्रवास मला तापदायक होणें साहजिक होतें. शिवाय त्या वेळीं माझी मनःस्थिति अशी होती, कीं प्रवासाचा आनंद मला वाटणें शक्य नव्हतें. बाबांच्या दुखण्याविषयींची काळजी, माणिकच्या प्रेमाविषयींचे तर्क, राधाकान्ताच्या वागणुकीविषयींचें नवल, बाळासाहेब व आबासाहेब यांच्या असूयेविषयीं किंचित् चिंता व स्वतःच्या भावी आयुष्याविषयीं अस्पष्ट अपेक्षा, यांच्या उभ्या आडव्या धाग्यांनीं माझ्या विचाराचा पट त्यावेळीं विणला जात होता; व त्यामुळें प्रवासाच्या रम्य सुखाकडे माझें लक्ष लागणें संभवनीयच नव्हतें. शिवाय, गाडींतली गर्दी ! नाताळच्या सुटीमुळें आमच्या सेकंड क्लासच्या डब्यांतदेखील पुष्कळ गर्दी होती. माझ्या समोरच्या बाकावर एक युरोपियन वृद्ध गृहस्थ बसला होता. तो लोणावळ्यास उतरला, आणि

एक शीख शिपाई तेथें येऊन बसला. हा पलटणींतील इसम होता. त्याच्याबरोबर बंदूक, दोन तीन मोठाल्या पिशव्या, तरवार, वगैरे बरेंचसें सामान होतें. त्याची शरीरयष्टि अशी ऐटबाज होती, कीं पाहाणाराची दृष्टि क्षणभर त्याच्याकडे आपोआप खिळून राहावी. आपलें सामान घाईघाईनें चढवितांना त्याचा धक्का मला लागल्याबरोबर त्यानें आपल्या मधुर हिंदुस्तानींत मला म्हटलें,

" माफ करा हं महाराज. "

त्याचा सभ्यपणा पाहून मला आश्चर्य व समाधान वाटलें. तो आपल्या जागीं बसल्यावर जरा वेळानें मीं त्याला मोडक्या तोडक्या हिंदुस्थानीत विचारलें, " तुम्ही कुठें चाललांत? "

" फ्रान्समध्यें. "

" लढाईवर कीं काय ? "

" होय साहेब. हातावर शीर घेऊन निघालों आहे. "

" ईश्वर तुम्हांला सुखरूप परत आणील. " मीं म्हटलें. " फ्रान्समध्यें कुठें लढाई जुंपली आहे ? "

" आम्हांला ती चवकशी काय करावयाची साहेब ? " तो प्रसन्न मुद्रेनें हंसत किंचित् विनोदानें म्हणाला; " हुकूम होईल तिथं उभं राह्यचं, सांगतील तेव्हां गोळी झाडायची, अन् सांगतील तेव्हां कूच करायचं, एवढं आम्हांला माहीत. आमची शिलेदारी म्हणजे सुळावरची पोळी आहे साहेब ! "

" हो, खरंच. " असें म्हणून इंग्रज सरकारच्या त्या इमानी नोकराच्या जीवनक्रमाची व माझ्या स्वतःच्या आयुष्याची मी मनाशीं तुलना करूं लागलों. त्याचें तें भव्य कपाळ, सरळ तरतरींत नाक, काळेभोर खूप वाढलेले केंस, पाणीदार विशाल डोळे, आणि हंसतमुख चेहरा पाहून असा उमदा हिंदी शिपाई हजारों कोसावर जाऊन जर्मन तोफखान्याच्या माऱ्यापुढें उभा राहावा ही कल्पना माझ्या मनाला कशीशीच वाटली. त्याच्याशीं चार गोड शब्द बोलण्यापलीकडे आपण आपली सहानुभूति व्यक्त करावी असा विचार मनांत येऊन खिशांतील एक चिरुट काढून त्याजपुढें करून मीं म्हटलें,

" घ्या. उत्तमपैकीं आहे. "

" माफ करा साहेब " हातानें नको अशी खूण करीत तो म्हणाला, " मी धूम्रपान करीत नाहीं. "

" तंबाखू मुळींच ओढीत नाहीं ? " त्याच्या त्या कृतीचें अत्यंत आश्चर्य वाटून मीं विचारलें.

" नाहीं. तंबाखू ओढणं आमच्या धर्माविरुद्ध आहे. " त्यानें किंचित् अभिमानानें उत्तर दिलें, " खरा शीख आपले केंस कधीं काढीत नाहीं अन् तंबाखूला शिवत नाहीं. "

" अस्सं ! "

आमची गाडी या वेळीं घाटांतून चालली असल्यामुळें डब्यांत फक्त विजेच्या दिव्याचा उजेड होता. त्या शीख शिपायाच्या उत्तरानें मी आश्चर्यचकित झालों, व अर्धवट उजेडांत चमकणाऱ्या त्याच्या हास्यवदन तोंडाकडे कांहीं वेळ पाहात राहिलों. सर्व नीतिनिर्बंध झुगारून चैन करणारा रक्तमुखी युरोपियन सोल्जर कोणीकडे, आणि आमचा हा धर्मभीरु हास्यवदन शीख शिपाईगडी कोणीकडे ! पहिल्याची क्षात्रवृत्ति म्हणजे शुद्ध मारेकऱ्याचा आडदांडपणा ! त्या शीख लढवय्याची क्षात्रवृत्ति धीरोदात्त खरी ! त्याच्या त्या गंभीर परंतु हंसऱ्या चेहऱ्याकडे पाहून मला वाटलें, याचें प्रेम कोणत्या स्त्रीवर असेल बरें ? याचे आईबाप कोठें असतील ? याचीं मुलेंबाळें कोठें असतील ! अरेरे, बिचारा सर्वांना सोडून आपला जीव खाईत घालावयास निघाला आहे !

इतक्यांत बोगदा संपून गाडींत एकदम उजेड झाला व मी आपल्या विचारमालिकेंतून जागा झालों. त्या शीख शिपायानें चिरूट नको म्हटलें तेव्हां त्याचें दुसरें कांहीं आदरातिथ्य करावें अशा उद्देशानें व मलाहि आतां फराळाच्या डब्यांत जाऊन चहा प्यावासें वाटत होतें म्हणून मी त्याला विचारलें,

" चला, थोडा चहा, बिस्किटें, पाव वगैरे कांहीं फराळ करूं या. गाडीतील चहा करणारे मोठे कुशल आहेत. तुम्हांला इथला पाव, केक व लोणी फार आवडेल, चला. "

" चहा प्यायला ? " त्यानें हंसत विचारलें.

" हूं. "

" भाईजी, " दिलगिरीची मुद्रा करून त्यानें म्हटलें, " तुम्ही मला विचारावें अन् मीं नाहीं म्हणावें हें माझ्या जीवावर येतें. पण माझा नाइलाज आहे. महारमांगाच्या हातचा चहापाणी आम्ही कधीं घेत नाहीं. धर्मापुढें सभ्यपणा सोडावा लागून तुम्हांला नाहीं म्हणावें लागत आहे. माफ करा ! "

त्याच्या धर्मपालनाचा हा दुसरा पुरावा पाहून मला अत्यंत आश्चर्य वाटलें. आम्ही कॉलेजांतील विद्यार्थी वाटेल तसे धर्मबाह्य वागतों याबद्दल एका वृद्ध गृहस्थांशीं बोलतांना मीं त्यांना म्हटलें होतें कीं, " कॉलेजांत राहावयाचें म्हटलें कीं, धर्म थोडासा सोडलाच पाहिजे. " यावर त्यांनीं मला उत्तर दिलें होतें कीं, " ज्याला धर्म पाळायचा आहे त्याला त्याची अडचण कुठेंच व्हायची नाहीं. अन् ज्याला धर्म सोडायचा आहे त्याला तो सोडायला हजार निमित्तं सांपडतील. " त्या वृद्ध गृहस्थाचे ते शब्द मला या वेळीं आठवले. कॉलेजांतील क्षुद्र अडचणींची सबब काढून धर्मबाह्य वागणारे आम्ही चैनीला लालचावलेले विद्यार्थी आणि मुलुखगिरीच्या आयुष्याच्या गडबडींत आपला धर्म हृदयाशीं घट्ट धरून चालणारे हे दिलदार वीर—यापैकीं शहाणा कोण ? त्या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण होतें. मीं त्याला विचारलें,

" लढाई चालू असली म्हणजे तुमचे नेमधर्म कसे चालतात ? "

" भाईजी, गुरूंची कृपा म्हणून आमचा धर्म पाळून आम्ही नोकरी करतों. पण धर्म बुडूं लागला तर आम्ही नोकरीवर लाथ मारूं ! "

चहाचा विचार क्षणभर माझ्या डोक्यांतून नाहींसा झाला. हिंदुस्थानच्या लोकांची धर्मश्रद्धा विलक्षण तीव्र आहे असें मी आजपर्यंत नुसतें पुस्तकांत व वर्तमानपत्रांत वाचीत आलों होतों. त्या विधानाची साक्ष आमच्या घरीं किंवा कॉलेजांत फारशी मिळण्यासारखी नव्हती. कारण, घरीं आईची पूजाअर्चा वगैरे गडबड चालत असली तरी एकंदर थाट सुधारकीच होता. आणि कॉलेजांत तर काय, विचारावयासच नको होतें ! त्या शीख शिपायाच्या भाषणानें मात्र हिंदूंच्या धर्मश्रद्धेची तीव्रता माझ्या चांगलीच प्रत्ययाला आली. मीं आपल्या जागेवर मागें अंग टाकून रेलून बसलों, आणि समोरच्या शीख योद्धयाकडे निश्चल दृष्टिनें पाहात राहिलों.

इतक्यांत गाडीचा कंडक्टर तिकिटें तपासावयास आला. 'Tickets please " असा त्याचा घोगरा आवाज मला ऐकूं आला, पण तो जवळ आल्यावर खिशांतून तिकीट काढून देतां येईल अशा विचारानें मी जागच्या जागीं पडून राहिलों. आमच्या शीख शिपायाची मात्र अगदीं तारांबळ उडाली. त्यानें भराभरा आपल्या कोटाच्या गुंड्या काढल्या, एक दोन खिसे चांचपले, आणि शेवटीं एका खिशांतून आपला पास काढून पुढें धरला. कंडक्टर अजून दूर होता, पण यानें आपला पास त्याच्या पाहणीसाठीं अगदीं जय्यत तयार ठेवला होता. जणूं काय, त्या कंडक्टरचा क्षणभर देखील खोळंबा होता कामा नये असें त्याला वाटत होतें. शेवटीं, कंडक्टर जवळ आला, व त्यानें तो पास पाहतां पाहतां कपाळाला आंठ्या घालून खेंसकून विचारलें,

" किदरसे आये ? "

मला त्या साहेबाच्या खेंकसण्याचा इतका राग आला, कीं मला वाटलें हा मानी शीख शिपाई त्याला एक ठोसादेखील मारील. पण तसें कांहींच झालें नाहीं. उलट, अत्यंत अदबीनें त्यानें उत्तर दिलें, " पूनेसे, साब. "

" तुम किदर नौकरी है ! "

" ट्वेन्टीएट्थ सीख डिव्हिजनमें, साब. "

" अच्छा. " असें म्हणून त्या साहेबानें त्याच्या अंगावर पास फेंकून दिला. मला त्याच्या अरेरावी ऐटीचा अतिशय राग आला. त्या शीख शिपायानें त्याची गुर्मी सहन करून त्याला " साब " म्हटलेलें पाहून मी अगदीं थक्क होऊन गेलों. कोठला साधा साहेब, आणि हा शीख योद्धा त्याची मनधरणी करतो ! त्या साहेबाशीं बोलतांना त्याचा ताठरपणा नाहींसा झाला होता. धर्मपालनाच्या बाबतींत वज्राहून कठीण असणारा तो शूर पुरुष साहेबापुढें मेणाहून मऊ झाल्याचें दृश्य पाहून माझ्या मनांत अनेक विचारतरंग उत्पन्न झाले.

त्या तिकीटवाल्या साहेबानें मजकडे पाहून म्हटलें " Ticket please ! " मी मागें बाकाच्या पाठीला रेलून पडलों होतों तसाच पडून राहिलों, तोंडांत चिरूट धरला होता तोहि काढला नाहीं, चेहऱ्यावर पूर्ण बेफिकीरी दाखविली व सावकाश खिशांतील तिकीट काढून नुसतें वांकडें केलें. माझी एकंदर

वृत्ति पाहून साहेब चमकला. त्या शीख शिपायाच्या चेहऱ्यावरहि आश्चर्य दिसलें. " मी तुला क्षुद्र लेखतों " असें माझ्या चेहऱ्यावर त्या साहेबाला दाखविण्यांत माझ्याकडून अतिरेक झाला असावा. माझ्याकडे डोळे वटारून पाहून त्यानें म्हटलें, " अच्छा ", व आपला मार्ग सुधारला.

कांहीं वेळ त्या एकंदर प्रकारचा माझ्या मनावर परिणाम होऊन मी स्वस्थ पडलों. माझ्या मनांत विचार असा कांहींच चालला नव्हता. पण कांहीं तरी मनाला बोंचल्यासारखें होत होतें. जरा वेळानें माझा चिरूट संपला, तेव्हां उरलेला तुकडा मीं गाडीबाहेर फेंकून दिला. एक सुस्कारा सोडून मी उठलों, कोटाच्या बाह्यांवरील केर झटकला, आणि फराळाच्या डब्यांत जाऊन चहा मागविला.

२

चहा पितां पितां मीं मनाशीं ठरवून टाकलें, कीं आतां वृंदावनास गेल्यानंतर माणिकविषयींच्या साऱ्या गोष्टी बाबांना मोकळ्या मनानें सांगून टाकावयाच्या. माझा व माणिकचा स्नेहसंबंध बाबांना मुळींच माहीत नव्हता असें नाहीं. मालती-बाईच्या घरीं मी वारंवार जातों वगैरे हकीकत त्यांना कळलेलीच होती. शिवाय, विलासगड संस्थानांत माणिकचे वडील बॅरिस्टर होते. त्यांची व बाबांची ओळखहि होती. त्यामुळें माणिक पुण्यास बहिणीच्या घरीं राहावयास आल्याचेंहि त्यांना माहीत होतें. पण या गोष्टी विशेष महत्त्वाच्या नव्हत्या. माझा अभ्यास उत्तम नाहीं तरीं साधारण बरा चालला आहे अशा समजुतींत बाबा होते. आतां लवकरच जगदीशची परीक्षा पास होईल, आणि मग त्याचें लग्न करून घेतां येईल, असें त्यांचें व आईचें माझ्यादेखत पुष्कळ वेळां बोलणें होत असे. तसें त्यांचें बोलणें निघालें, कीं मी गप्प बसत असें. पण त्यांच्या त्या दोन्ही अपेक्षा मी खोट्या ठरविणार असें आतां मला स्पष्ट दिसूं लागलें होतें. यंदां माझी परीक्षा पास होणें अगदीं अशक्य होतें. कारण गेल्या सबंध वर्षांत वेडीवांकडी चैन, उनाडपणा आणि पैशाची उधळपट्टी यांखेरीज मी कांहींच केलें नव्हतें. कॉलेजांत श्रीमंत विद्यार्थी राहावयास गेल्याचे सुपरिणाम व दुष्परिणाम दोन्हीहि होणें सारखेंच संभवनीय असतें. राधाकान्तानें कॉलेजपासून आपला पूर्ण फायदा

करून घेतला होता, आणि मीं आपलें सर्वस्वी नव्हे तरी बऱ्याच अंशीं नुकसान करून घेतलें होतें. या सर्व गोष्टी मला आतांशा कळूं लागल्या होत्या. पण उतू गेलेल्या दुधाचा शोक करीत बसून काय उपयोग ? आतां त्यांतल्या त्यांत शहाणपणाचा मार्ग एवढाच उरला होता, कीं शक्य तितक्या लवकर बाबांना एकदां सर्व स्थिति सांगून टाकावयाची. म्हणूनच हे सर्व विचार मनांत येऊन चहाचा कप खालीं ठेवीत व हातरुमालानें तोंड पुशीत मीं म्हटलें,

" बाबांना सगळं सांगितलं पाहिजे. "

केटलींतून आणखी चहा कपांत ओतीत मी मनाशीं विचार करूं लागलों, कीं सगळ्या गोष्टी बाबांना सांगावयाच्या म्हणजे माणिकची गोष्ट त्यांना सांगितलीच पाहिजे. पण, ती गोष्ट आपण स्वतः बाबांना सांगावयाची कशी ?—

या प्रश्नापाशीं माझ्या विचाराचें घोडें अडलें, तें कांहीं केल्या पुढें जाईना. पुनःपुन्हां त्या प्रश्नाचाच उच्चार मी आपल्या मनाशीं करीत होतों. माणिकची गोष्ट बाबांना सांगावयाची कशी ?—

शून्य मनानें मीं डाव्या हातानें टेबलावरील केकचा तुकडा उचलला आणि उजव्या हातांतील सुरीनें त्याला लोणी फांसूं लागलों. माझ्यासमोर एक वेटर हातांत फडकें घेऊन उभा होता. त्याच्याकडे माझी दृष्टि सहज गेली. तो माझ्या डाव्या हाताकडे पाहून हंसत होता. त्याचें हंसणें मला कळेना. तो अजूनहि हंसतच होता. मीं आपल्या डाव्या हातांतील केक वर उचलून पाहिली तों—

—च ! तो केकचा तुकडा नसून चिरूटचा तुकडा होता, आणि त्यालाच मीं शून्य मनानें लोणी फांसलें होतें !

माझें मलाच हंसूं आलें. मी आपल्या विचारांत इतका गढलों असेन अशी मला कल्पनाच नव्हती. पुन्हां मी विचार करूं लागलों कीं माणिकशीं विवाह करण्याची इच्छा बाबांना सांगावयाची ती कशी ? तसें म्हटलें तर बाबा बरेचसे सुधारकी मताचे होते, व मी आपली स्वतःची बायको निवडून पसंत केली तर त्याबद्दल त्यांचा माझ्यावर राग होण्याचा फारसा संभव नव्हता. पण त्याचा काय नियम ? गेल्या वर्षभर मी आपल्या अभ्यासाचें मातेरें केलें आणि त्या उनाडकीच्या आयुष्यांतच माझ्या व माणिकच्या

प्रेमाचा उगम झाला, या दोन्ही गोष्टी बाबांना एकदम कळल्या म्हणजे माझ्या व माणिकच्या संबंधाविषयी त्यांचें मत वाईट होण्याची भीति होती. मीं आपला अभ्यास उत्तम प्रकारें संभाळून एखाद्या मुलीचें प्रेम संपादन केलें असतें तर तें बाबांच्या मनाला पटलें असतें. पण माणिकच्या प्रेमाची आणि माझ्या उधळेपणाची गांठ बसली होती, व तें बाबांना रुचणार नाहीं अशी मला पुनःपुन्हां शंका येई. मग बाबांची संमति कशी मिळवायची—कां त्यांना इतक्यांत कांहींच सांगूं नये?—

मनाचा कांहींच निश्चय होईना. पुन्हां मनांत आलें, कीं वृंदावनास बाबांना प्रत्यक्ष तोंडानें सर्व गोष्टी सांगण्यापेक्षां परत पुण्यास गेल्यावर सर्व हकीगतीचें पत्र लिहावें. पत्र लिहिण्यांत मनाचा मोकळेपणा ठेवतां येतो; आणि वडील माणसाशीं बोलतांना मनावर जें एक दडपण असल्यासारखें वाटतें तें पत्र लिहिण्याच्या वेळीं नसतें. पत्रांत सगळ्याच गोष्टी खुलासेवार लिहितां येतील असें मला वाटूं लागलें. पण पुन्हां असा विचार आला, कीं पत्र लिहिण्यांत एक प्रकारचा भेकडपणा होणार नाहीं का! तोंडानें सांगण्यास शरम वाटते म्हणूनच पत्राचा मार्ग स्वीकारावयाचा ना? मग त्यांत एक प्रकारचा नैतिक भित्रेपणा नाहीं का? बाबांना तर असल्या भित्रेपणाचा मनस्वी राग येत असे. अर्थात् माझें पत्र लिहिणें त्यांना फारसें पसंत पडण्याचा संभव नव्हता.—मग काय करावें?

मी माझ्या अनिश्चित विचारांत हेलकावे खात किती तरी वेळ तसाच बसलों होतों. गाडी खूप वेगानें चालली होती. खिडकींतून बाहेर पाहिलें, कीं झाडेंझुडपें भराभर मागें पडत असलेलीं दिसत होतीं. माथेरानचा डोंगर दूर अंतरावर, आणि सपाटीवरची वाळलेल्या गवतानें झांकलेली धांवती जमीन जवळ, असा देखावा सारखा दृष्टीसमोर होता. मध्येंच एखादी पाणथळ संध्याकाळच्या तिरप्या किरणांनीं चमके, आणि पाणथळीवर उभीं राहिलेलीं जनावरें आगगाडीच्या धडधडाटाला भिऊन शेंपट्या उभारून पळून जात. पाणी भरणाऱ्या मावळिणी आपलीं अर्धवट पाण्यांत बुडालेलीं मडकीं तशींच ठेवून गाडीकडे हसणाऱ्या नजरेनें पाहात, व त्यांच्याबरोबर पाण्यावर आलेलीं त्यांचीं उघडीं, काळींसावळीं मुलें गाडी पाहून आनंदानें नाचत व आरोळ्या मारून हातवारे करीत. त्यांचा तो किलकिलाट मोठा

मनोरम वाटे. मनांतील विचार आपोआप थांबून मी कांहीं वेळ त्या सुंदर देखाव्याकडेच पाहात बसलों. खिडकीच्या कठड्यावर डावा हात ठेवून त्याच्यावर डोकें टेंकून मी एकीकडे माझ्या आवडत्या चिरूटाचें धूम्रपान करीत होतों, आणि एकीकडे बाहेरच्या सृष्टिशोभेची धांवपळ पाहात होतों.

असा किती वेळ गेला कोण जाणे, पण मी आपल्या तंद्रींतून जों जागा झालों तों स्टेशनच्या आवारांत गाडी आली म्हणजे रूळ बदलून जो खड-खडाट होतो तो मला ऐकूं आला व शिवाय, " कल्याण ! " " कल्याण ! " अशा पोर्टरांच्या आरोळ्याहि कानावर आल्या. मी एकदम घाईनें उठलों. कारण, वृंदावनास जातांना कल्याणवर गाडी बदलावी लागत असे.

हमालाकडून सामान खालीं काढवून मी उतरलों. पलीकडच्या प्लॅट-फॉर्मवर वृंदावनची गाडी उभी होती तिकडे मी हमालाला घेऊन गेलों. एक सेकंड क्लासचा डबा साधारण रिकामा दिसला त्यांत पाहिलें तों एक वयस्कर बाई व एक तरुण मुलगी आपली पेटी बांकाखालीं सरकवीत होत्या. त्या ओणव्या व पाठमोऱ्या असल्यामुळें त्यांचे चेहरे मला दिसले नाहींत. त्या कोण आहेत हें समजून घेण्याची मला विशेष इच्छा नसल्यामुळें मी त्यांच्याकडे लक्ष न देतां आपलें सामान ठेवलें, हमालाला पैसे दिले, आणि गाडी सुटावयास थोडा अवकाश असल्यामुळें डब्याखालीं उतरून प्लॅटफॉर्मवर येरझारा घालूं लागलों. माझ्या दोन तीन येरझारा होऊन हळुहळू पावलें टाकीत उजवा हात विजारीच्या खिशांत ठेवून डाव्या हातांत चिरुट धरून मी डब्यापाशीं आलों तों डब्यांतील तरुण मुलीनें खिडकीबाहेर तोंड काढलें, व प्लॅटफॉर्मच्या दोन्ही दिशांकडे चवकस नजरेनें पाहात आंतील स्त्रीस उद्देशून म्हटलें,

" आई, अजून अण्णा दिसत नाहींत ग कुठें ! "

तिच्या चेहऱ्याकडे मीं ओझरतेंच पाहिलें, पण तेवढ्या पाहण्यानेंच तिच्या सौंदर्याची पुरती साक्ष पटण्यासारखी होती. तिचा वाटोळा चेहरा अस्तो-न्मुख सूर्याच्या तांबूस प्रकाशांत विलक्षण मनोहर दिसला. शोधक दृष्टीनें इकडे तिकडे हलणारे तिचे ते डोळे, तोंड उघडतांच दिसलेली तिची दंत-पंक्ति, किंचित् अस्ताव्यस्त झालेले तिचे केंस, आणि खिडकीबाहेर आलेले

तिचे दोन्ही शुभ्र कांतिपूर्ण हात, हें दृश्य एका तिरप्या नजरेंतच मला पूर्णपणें दिसलें. पण तिच्या सौंदर्यानें चकित होण्यापेक्षां तिचा चेहरा आपल्या ओळखीचा असावा या अंधुक कल्पनेनेंच माझी अधिक चलबिचल झाली. मला पुनःपुन्हां वाटलें, कीं त्या तरुण मुलीला पूर्वीं आपण कोठें तरी पुष्कळशीं पाहिली असली पाहिजे. एवढी नुसती शंका आली, पण नक्की कांहींच आठवेना. पुनः तिच्याकडे पाहावें म्हणजे कांहीं तरी आठवेल असें वाटलें; पण पुन्हा वळून पाहणें कदाचित् बरें दिसणार नाहीं अशी शंका मनांत आली. पण मन स्वस्थ राहीना, म्हणून शेवटीं बेतानें वर पाहिलेंच. मी वर पाहावयास आणि तिनें माझ्याकडे पाहावयास एकच गांठ पडली. इतक्यांत पश्चिमेकडून वाऱ्याची झुळूक येऊन तिचे केस तिच्या तोंडावर आले, व ते दूर करण्याच्या निमित्तानें तिनें तोंड वळविलें. या वेळीं तिचा चेहरा मला अधिक स्पष्टपणें दिसला. तिला पूर्वीं कोठेंतरी पुष्कळ पाहिली असल्याचा संशय अधिक दृढ झाला, पण निश्चित कोणत्याहि गोष्टीची आठवण मात्र मला होईना. त्यांतल्या त्यांत अधिक आश्चर्याची गोष्ट मला वाटली ती ही, कीं माझ्याकडे तिनें ज्या वेळीं पाहिलें त्या वेळीं माझा चेहरा ओळखीचा असल्याचा संशय तिच्याहि मनांत आला असावा असें दर्शविणारी एक छटा तिच्या चेहऱ्यावर क्षणार्धांत येऊन गेलेली मला स्पष्ट दिसली. तिनेंहि मला अंधुकपणें ओळखलें कीं काय? कोण बरें ही?—असा विचार करीत चिरूट ओढीत मी प्लॅटफॉर्मच्या टोंकापर्यंत गेलों आणि परत फिरलों. मी डब्याजवळ जातों तों "आई, अण्णा चहा घेऊन आले" असे तिचे शब्द मीं ऐकले, व ती ज्या गृहस्थांस अण्णा म्हणत होती ते गृहस्थ आतां लवकरच डब्यांत येतील व आपल्याला पाहावयास मिळून आपल्या संशयाचा कदाचित् कांहीं निकाल लागेल अशा अपेक्षेनें मी डब्याच्या दाराजवळ उभा राहिलों. इतक्यांत समोरून एक वयस्कर गृहस्थ डब्याकडे येतांना मला दिसले. ते साधारण मध्यम उंचीचे होते. त्यांच्या अंगांत फक्त एक सद्रा व जाकीट असून त्यांनीं काखेंत रेशीमकाठी उपरण्याची घडी घेतलेली होती. जाकीटाच्या खालच्या बटणाच्या भोंकांतून घड्याळाचा छेडा आडवा सरकविलेला दिसत होता. पायांत बूट, पायमोजे होते व धोतराचा काचा मारलेला होता. डोक्याला कांहींच नव्हतें, त्यामुळें डोक्याचें टक्कल स्पष्ट

दिसत होतें. त्यांच्या मागोमाग एक ब्राह्मणाचा पोऱ्या हातांत केटली आणि पितळेच्या कपबशा घेऊन जलदीनें चालत होता.

ते गृहस्थ कोण हें ओळखण्यास मला फार वेळ लागला नाहीं. साधारण ते माझ्यापासून दहा पावलांच्या अंतरावर असतांनाच मी त्यांना ओळखलें. त्यांचें लक्ष मात्र माझ्याकडे नव्हतें. त्यांना ओळखतांच मीं हातांतला चिरूट चटकन् फेंकून दिला, पुढें झालों आणि खालीं वाकून नमस्कार करीत म्हटलें, " काका, नमस्कार. "

मी नमस्कार करतांच ते थबकले व मीं वर मान केल्यावर माझ्याकडे पाहातांच ते आनंदानें व आश्चर्यानें उद्गारले,

" कोण ! अरे, जगदीश ! वाहवा ! "

आश्चर्याचा पहिला आवेग ओसरल्याबरोबर त्यांनीं माझ्या पाठीवरून प्रेमानें हात फिरविला व म्हटलें,

" जगदीश, आतां तूं चांगलाच मोठा दिसूं लागलास रे ! वृंदावन सोडून आज आम्हांला बारा वर्षें झालीं. इतक्या दिवसांनीं तुला पाहून मोठा आनंद झाला. खुशाल आहेस ? वृंदावनासच का येतो आहेस ? कॉलेजला सुटी का झाली ? गोविंदरावाच्या पत्रावरून मला तुझी बातमी कळते, यंदां बी. ए. ला बसणार आहेस ना ? अभ्यास जोरांत असेल ! छान, छान ! ये, ये, डब्यांत ये, चहा आणला आहे. पिऊं सगळे मिळून. "

काकांचा तो प्रश्नांचा भडिमार ऐकून माझी खात्री झाली, कीं बारा वर्षांपूर्वीं ते वृंदावनास असतांना आमच्या लहानपणीं त्यांच्या ज्या उत्साही स्वभावाचा अनुभव आम्हांला येत असे, तोच अजूनहि कायम आहे. काका व आमचे बाबा अत्यंत जिवलग स्नेही, व म्हणूनच त्यांना लहानपणीं मी काका म्हणूं लागलों. वृंदावनास त्यांची थोडी शेती व सावकारी होती. मी आठ वर्षांचा होईपर्यंत ते वृंदावनास होते. पण पुढें ते एकदम विलासगडला गेले व तेथें त्यांनीं एक गिरणी काढली. तिकडे गेल्यापासून आज बारा वर्षांत ते इकडे आले नव्हते. बाबांनीं त्यांना पुष्कळ वेळां अगदीं आग्रहानें बोलाविलें होतें, पण दर वेळेस कांहींना कांहींतरी अडचण निघून त्यांचें येणें रहित झालें होतें. एकदां आम्हीच सगळीं त्यांच्या घरीं जावयास निघालों होतों. पण अगदीं आयत्या वेळीं बाबांच्या मुंबईच्या दुकानांत

कांहीं घोटाळा झाला व आमचें जाणें झालें नाहीं. लहानपणीं ज्या काकांच्या घरीं मी बागडलों, व प्रसंगविशेषीं त्यांच्या अंगाखांद्यावरहि खेळलों ते आज इतक्या वर्षांनीं भेटल्यामुळें मला फार आनंद झाला.

माझ्यासह डब्यांत शिरतां शिरतां काका म्हणाले, " अग, हा पाहिलास कां कोण तो ! "

हे शब्द ऐकून काकूंनीं माझ्याकडे निरखून पाहिलें व आश्चर्यानें हंसत म्हटलें, " कोण, जगदीश ! अरे, अगदीं पुरता साहेब बनला आहेस कीं ! "

मी वांकून काकूंना नमस्कार केला, व त्यांनीं आशीर्वाद देऊन विचारलें, " जगदीश, आतां लग्न केव्हां करणार आहेस ? "

माझ्या मनांतील कोणत्या नाजूक विचारांना काकूंनीं आपल्या प्रश्नानें स्पर्श केला तें त्यांना काय माहीत ? मला कसेंसेंच वाटलें. कांहींच न बोलतां मी फक्त हंसलों. इतक्यांत मघांच्या त्या तरुण मुलीकडे—ती कोण तें इतक्या वेळांत माझ्या ध्यानांत पूर्णपणें आलें होतें-माझें लक्ष वेधीत काकांनीं विचारलें,

" अन् हिला ओळखलीस कां जगदीश ? "

" हो तर ! " असें म्हणत तिच्याकडे पाहून मी किंचित् हंसलों. शांताहि मंद स्मित करून काकांकडे पाहूं लागली.

काकांची मुलगी शांताच ती ! तिला ओळखल्यानंतर क्षणभर मी चकित झालों. लहानपणीं ज्या शांताशीं मी लपंडाव वगैरे खेळ खेळलों, जिच्याशीं अनेक वेळां खेळतां खेळतां भांडून काकांच्या किंवा बाबांच्यापर्यंत तिनें माझी कागाळी नेल्याबद्दल मी थोडा फार वेळ अबोला धरला, जिनें आपल्या गोड शब्दांनीं मला तो अबोला सोडावयास लाविलें, जी माझ्या ताटांत कित्येक वेळां जेवली व जिच्याशीं मी आपले लहानपणचे भावी आयुष्याचे भोळे भाबडे बेत मोकळ्या मनानें सांगितले, ती लहानशी परकर नेसून इकडे तिकडे धांवणारी शांताच कां ही ! बारा वर्षांत तिच्यांत किती फरक पडला होता ! मुलींनीं तारुण्यांत प्रवेश केला, कीं त्यांचें रूप एकदम पालटतें, आणि शांताला आज मीं कित्येक वर्षांत पाहिलेली नव्हती. मग, आज मीं तिला पाहिल्याबरोबर मघांशींच ओळखलें नाहीं यांत कांहीं आश्चर्य नव्हतें. बारा वर्षांत ती भेटलेली नसल्यामुळें तिच्याशीं बोलण्यासहि

माझें मन कचरूं लागलें. शेवटीं, कांहीं तरी बोललेंच पाहिजे म्हणून हंसत हंसत मी विचारलें, " काय, बरं आहे ना ?"

क्षणभर माझ्याकडे पाहून लगेच दुसरीकडे दृष्टि वळवीत शांता म्हणाली, " बरं आहे."

आमच्या शब्दांतील परकेपणाची छटा मला कशीशीच वाटली. तो परकेपणा शांताच्याहि ध्यानांत आला असावा.

इतका वेळ चहावाल्या पोऱ्याकडे कोणाचेंच लक्ष राहिलें नव्हतें. त्याच्याकडे पाहून काका म्हणाले, " अरे तुझा चहा तसाच राहिला ! चल आटप, ओत चार कप. काय जगदीश, चहा घेणार ना आमच्याबरोबर ?'

मी संमति द्यावयाच्या अगोदरच काकू हंसत म्हणाल्या,

" चहा ? अन् जगदीशला नको असणार का ? चहाच्या पेल्यासाठीं रोज सकाळीं जगदीश आपल्या घरीं यायचा, अन् तें पाहून मोठेपणीं जगदीश चहाचा मळेवाला होणार असं आपण म्हणायचं असें, आठवत नाहीं का ? अन् आतां तर काय, तो पुरा साहेब बनलेला दिसतो आहे !"

हें ऐकून काका मोठ्यानें हंसले, शांताहि गालांतल्या गालांत हंसली, आणि आम्हीं सर्वांनीं चहाचे पेले तोंडाला लावले.

" काय, कसा काय आहे चहा ?" चहाचे एक दोन घोट घेऊन काकांनीं काकूंना विचारलें. " तुमच्यासाठीं खटपट करून मुद्दाम ब्राह्मणी चहा घेऊन आलों. बरा आहे कां ?"

" एकच चहा माझ्या पसंतीला उतरतो हें माहीत असून उगीच कां विचारायचं ? त्या चहाखेरीज बाकीचे चहा सारखेच !" पतीकडे पाहात काकूंनीं उत्तर दिलें.

मला त्यांचें तें बोलणें समजलें नाहीं हें पाहून काका चहावाल्याला पैसे देत म्हणाले, " जगदीश, तुझ्या काकूला आपल्या मुलीविषयीं भलताच अभिमान आहे. शांतानं केलेला चहा तेवढा तिला पसंत असतो. बाकी कुठलाहि चहा तिच्या पसंतीस उतरत नाहीं. तसंच शांतासारखी सुग्रण स्वयंपाक करणारी दुसरी मुलगी मिळायची नाहीं असं तिला वाटतं. शांतासारखी संस्कृत शिकलेली, शांतासारखी सुंदर अक्षर काढणारी, शांतासारखी

मर्यादशील—सारांश, आपल्या मुलीसारखी रूपगुणसंपन्न मुलगी कुठेंहि नसेल असा हिला अभिमान आहे. ”

“ माझ्या लेकीचा मी नाहीं अभिमान बाळगला तर दुसरं कोण बाळगील ? खरं कनी जगदीश ? ” काकूंनीं माझ्याकडे पाहून हंसत म्हटलें. काकूंच्या अभिमानाबद्दल काकांनीं वरवर नापसंती दर्शविली तरी त्यांनाहि आपल्या मुलीबद्दल तितकाच अभिमान वाटत असला पाहिजे असें त्यांच्या मुद्रेवरून आणि बोलण्याच्या पद्धतीवरून कोणीहि सहज ओळखलें असतें. इतक्यांत शांता म्हणाली,

“ अण्णा, सुपारी पाहिजे कां ? ”

“ दे, चिकणी असली तर दे. ”

“ हो. तुमच्यासाठीं मुद्दाम मीं वर ठेवली आहे. ” असें म्हणून शांतानें पोलक्याच्या खिशांतून थोडी सुपारी, एक वेलदोडा व एक लवंग काढून बापाच्या हातावर ठेविली. तिच्या गुणवर्णनाचा विषय बदलण्यासाठीं तिनें सुपारीची गोष्ट काढली, हा तिचा चतुरपणा माझ्या ध्यानांत आल्यावांचून राहिला नाहीं; व माणिक नेहमीं आत्मस्तुतीला भुकेलेली असे तें मनांत येऊन निमिषार्धांत तिच्या व शांताच्या स्वभावाची माझ्या मनानें तुलनाहि केली. “ पाहिजे का सुपारी ? ” असें शांतानें मला विचारलें, तेव्हां त्या तुलनेच्या विचारांतून मी जागा झालों आणि हंसत ‘ हो ’ म्हणून हात पुढें केला. शांता माझ्या हातावर सुपारी ठेवीत असतां मी तिच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिलें. तिनें आपल्या केंसाच्या मधोमध भांग पाडला होता. तें पाहून माझ्या मनांत आलें, माणिक आपला भांग डाव्या बाजूला तिरपा काढते ! शांताच्या कपाळीं किती मोठें कुंकू होतें. माणिक येवढेसें कुंकू लावते ! माझ्या मनानें चालविलेली ही तुलना मला पसंत पडली नाहीं. मीं शांताकडे पाहात म्हटलें,

“ पुरे, पुरे. किती दिलीस ही सुपारी ! ”

तिच्याशीं एकेरी शब्दांत मी बोललों हें पाहून माझें मलाच कसेंसें वाटलें. ती आतां मोठी झाली होती, तिला अहो जाहो म्हटलें पाहिजे असें क्षणभर माझ्या मनांत आलें. लहानपणाची मोकळ्या मनाची भाषा कोणीकडे आणि मोठेपणची परकेपणाची कृत्रिम भाषा कोणीकडे ! माझे एकेरी शब्द शांताला

बरें वाटले किंवा नाहीं ते पाहण्यासाठीं मी तिच्या चेहऱ्याकडे दृष्टि वळविली—

इतक्यांत गाडीची शिटी झाली, आणि गाडी सुटली.

कांहीं वेळानें काका मला म्हणाले, " तूं गाडींत भेटशील अशी आम्हांला काडीमात्र कल्पना नव्हती. तूं पुण्यास असशील असा आमचा समज. तूं कसा अचानक भेटलास ? "

" वास्तविक मी पुण्यासच असायचा " मीं म्हटलें, " पण आज सकाळींच दिवाणजींची तार आली, कीं बाबा फार आजारी आहेत, ताबड-तोब निघून या. तेव्हां मी लगेच दुपारच्या गाडीनं निघालों. ही पाहा तार."

" कोण, गोविंदराव आजारी आहे ? " आश्चर्यानें काका उद्गारले.

" तुम्हांला माहीतच नाहीं ? "

" माहीत कुठून असणार ? परवां रात्रीं इकडे यायचा आमचा बेत एकाएकीं ठरला. कित्ती दिवस यायचं यायचं म्हणत होतों. पण गिरणीची व्यवस्था दुसऱ्यावर सोंपवायसारखी वेळच येईना. शेवटीं परवां योग आला, अन् मग ताबडतोब बेत ठरवला. काल सकाळीं विलासगडाहून निघालों, अन् निघतांना गोविंदरावाला तार केली. तो आजारी असेल अशी आम्हांला कल्पनाहि नाहीं. कारण तीन चार दिवसांपूर्वींच त्याच्याकडून खुशालीचं पत्र आलं होतं. कशानं आजारी आहे कोणास ठाऊक ! "

" तें कांहींच कळत नाहीं " मी तारेच्या कागदाकडे पाहात म्हटलें. " ताप आला असेल असं वाटतं. "

"पण भावजी कधीं आजारी पडायचे नाहींत !" काकू मध्येंच म्हणाल्या.

" म्हणूनच साध्या तापानंसुद्धां तो घाबरला असेल " काकांनीं तर्क केला. त्यांचा तर्क माझ्या तर्काशीं जुळलेला पाहून मला बरें वाटलें. सकाळीं माणिकशीं बोलतांना मीं हाच तर्क केला होता.

आमचें बोलणें चाललें असतां शांता एकीकडे तें ऐकत होती आणि एकीकडे लोंकरीचें कायसेंसें विणत होती. काकू तिला म्हणाल्या,

" ए मुली, आतां दिसेनासं होऊन दिवे लागले तरी तुझे हात थांबत नाहींत कां ? डोळे बिघडवून घेशील, दुसरं काय ! ठेव आतां तें सारं गुंडाळून. "

काकूंचें ते बोलणें ऐकून " बरं. ठेवतें. " असें म्हणून शांतानें मजकडे पाहिले व ती किंचित् हंसली. मी साहजिकपणेंच विचारलें,

" काय आहे तें ? "

" आपलं कांहींतरी ! " हंसत हंसत उत्तर देऊन तिनें सुया, लोकर, वगैरे सामान एका लहानशा पिशवींत ठेवून दिलें.

नंतर आम्ही सर्वजण साधारणपणें स्तब्धच होतों. आतां रात्र पडली होती. पौर्णिमेची रात्र असल्यामुळें चंद्राचें पूर्णबिंब पूर्वेकडे उगवून चांदणें पडलें होतें. झाडांच्या काळ्या आकृति, एंजिनांतून उडणाऱ्या ठिणग्या, उशीरां घरट्याकडे उडत जाणारे कांहीं पक्षी, गर्द झाडीच्या ठिकाणीं मधूनच चमकणारे काजवे, असा तो रात्रीच्या पहिल्या प्रहराचा देखावा पाहात मी खिडकींत स्वस्थ बसलों होतों. सोसाट्याचा वारा माझ्या अंगावरून वाहात होता, व त्याच्या झोतानें माझे केंस उडत होते. डाव्या हातानें केंस उलट करीत आणि त्या दांडग्या वाऱ्याचा उपभोग घेत माझ्या प्रियतम माणिकच्या विचारांत मी गुंग झालों होतों. पण माझे या वेळचे सारे विचार दुहेरी होते. एकटी माणिक माझ्या दृष्टीपुढें नव्हती. माणिक आणि शांता या दोघींचा मीं एकदम विचार करीत होतों. कां कोण जाणे, शांताला पाहिल्यापासून तिच्याशीं माणिकची तुलना करण्याकडे माझें मन सारखें ओढ घेत होतें. या वेळीं मीं माझ्या मनाला पुरतें मोकळें सोडलें, व त्याला तुलनेचें काम मनसोक्त करूं दिलें. ती तुलना अगदीं अस्पष्ट असल्यामुळें माझी मलाच ती नीटशी कळली नाहीं; पण त्यांत माझें मन गुंतलें होतें खास. समोर शांता बसली होती. तिच्या चेहऱ्याकडे मी मधून मधून सारखा पाहात होतों. सौंदर्याच्या दृष्टीनें पाहिलें तर माणिकपेक्षां शांता सुस्वरूप आहे असें कोणींहि म्हटलें असतें. एकदां माझ्या मनाला वाटे कीं शांता अधिक सुंदर आहे, पण लगेच दुसऱ्या क्षणीं मला वाटे, कीं माणिकच्या चेहऱ्यावर जी एक चंचलपणाची रम्य छटा नेहमीं नाचत असते ती शांताच्या चेहऱ्यावर नाहीं. शांता सुंदर होती, पण तिच्या चेहऱ्यावरचें सौंदर्य अत्यंत सभ्य, मंद आणि मृदु होतें; माणिक इतकी गौरवर्ण नव्हती, तिचे नाक डोळे अगदीं नीटस आणि रेखलेले नव्हते, पण तिच्या उतावळ्या, गडबड्या, बंडखोर आणि हलगर्जी स्वभावाचें जें एक मनोरम प्रतिबिंब तिच्या तोंडावर नेहमीं

चमके त्याच्याइतकी प्रिय गोष्ट मला या जगांत दुसरी कोणतीच नव्हती. शांताचा भारदस्तपणा आणि माणिकचा नाचरा चंचलपणा यांतील विरोध माझ्या मनापुढें हजार प्रकारांनीं उभा राहिला. शांताच्या बोलण्यानें, चालण्यानें, इतकेंच नव्हे, ती या वेळीं माझ्यासमोर ज्या रीतीनें बसली होती त्या बसण्याच्या रीतीनेंदेखील तो विरोध माझ्या डोळ्यांना दाखविला. पण, माणिकचे अवगुण मला पटले तरी त्यांच्याविषयींचें माझें वेडें प्रेम कमी झालें नाहीं. मीं मनाशीं म्हटलें, " माणिकचे अवगुण वजा केले तर तिच्यांतला गोडवा नाहींसाच होईल. मला नुसती माणिक नको, तिच्या अवगुणांसकटच ती मला पाहिजे आहे. माणिक ! नाचरी, गडबड्या स्वभावाची माणिक ! अशीच माणिक मला हवी ! माणिक, माणिक ! "

कल्याणपासून वृंदावनापर्यंत गाडी जावयास अवघा एक तास लागत असे. माझ्या विचारांच्या तंद्रींत तो तास केव्हांच निघून गेला. वृंदावन म्हणजे एक लहानसें स्टेशन होतें. तेथें गाडी थोडा वेळ उभी राहावयाची म्हणून स्टेशनच्या अलीकडचें फाटक गेल्याबरोबर काकांची गडबड सुरू झाली. शांताहि लगबगीनें उठली, आणि आपलें सामान आवरूं लागली. ती अर्धवट मला व अर्धवट काकांना उद्देशून म्हणाली,

" पण आमची तार पोंचून दिवाणजी येतील ना खास स्टेशनावर ? नाहीं तर—"

" छे ! दिवाणजी कधीं चुकायचे नाहींत अं ! " मीं म्हटलें.

इतक्यांत गाडी स्टेशनांत शिरून थांबली. दिवाणजी उभेच होते. मी त्यांना खूण करतांच ते डब्याजवळ आले, व त्यांनीं अगदीं वांकून काकांना नमस्कार केला. काकांनीं त्यांना विचारलें " कसं काय ? " दिवाणजींनीं हंसत उत्तर दिलें, " ठीक आहे आपल्या कृपेनं. " त्यांनीं दोन हमालांना काकांचें व माझें सामान काढावयास लाविलें. वृंदावन स्टेशनला प्लॅटफॉर्म नव्हता. त्यामुळें गाडींतून उतरतांना त्रास पडे. मी, काका आणि शांता पटापट उतरलों. काकूंना नीट उतरतां येईना. त्याबरोबर " आई, थांब तुला हात देतें " असें म्हणून शांता पुढें झाली. तिनें काकूंच्या हातांतील शाल, फराळाचा डबा, तांब्या वगैरे सामान झटकन् डाव्या हातांत घेतलें, आणि उजव्या हातानें काकूंना आधार दिला. तिची

ती तत्परता पाहून मला कौतुक वाटलें. माणिकनें असें कधींच केलें नसतें ! साऱ्या मुलखाची द्वाड ती ! तिनें हवें तर आपल्या हातांतील सामानच थोरल्या बहिणीच्या किंवा माझ्या हातांत देऊन स्वतःला मोकळे करून घेतलें असतें ! तिनें स्टेशनवर उतरल्याबरोबर इकडे तिकडे चार फेऱ्या घातल्या असत्या ! छे ! माणिकचा खटपणा कांहीं अवर्णनीय होता ! आणि म्हणूनच ती मला अत्यंत प्रिय होती !

दिवाणजींनीं शांताला विचारलें, " कां शांताबाई, ओळख आहे कां ?"

" साऱ्या वाटभर तुमचं नांव घोकीत आलें आहे !" तिनें उत्तर दिलें.

दिवाणजी काकूकडे वळून म्हणाले, " काकू, आतां शांताबाईंच्या लग्नाचे लाडू आम्हांला केव्हां खाऊं घालतां ?"

" तुम्ही लग्न जुळवा म्हणजे लाडवांना काय उशीर !" काकू हंसत हंसत म्हणाल्या.

दिवाणजींनीं माझ्याकडे व शांताकडे अर्थपूर्ण दृष्टीनें पाहून डोळे मिचकावले, आणि ते काकूंशीं कायसें बोलण्याच्या बेतांत होते, इतक्यांत काकांनीं त्यांना विचारलें, " ए लाडूवाल्या, आधीं गोविंदरावची प्रकृति कशी आहे सांग पाहूं. जगदीशला तुम्ही तार पाठविलीत तेव्हां तो बराच आजारी–"

" काकासाहेब " दिवाणजी हंसत म्हणाले, " आमच्या मालकांचा स्वभाव माहीत नाहीं का ? परवां दोन दिवस थंडी वाजून एकशें दोनपर्यंत ताप आला तेव्हां काल रात्रीं मला धाकट्या साहेबांना तार करायला हुकूम झाला. तार करायला निघालों तेव्हां ताप उतरलादेखील होता. पण म्हणाले, ' एकदां जगदीशला बोलावायचं ठरलं तें ठरलं. ' शिवाय, यंदा नाताळांत हे घरीं येऊन भेटले नव्हते. तेव्हां म्हणाले, ' कराच तार. येऊं दे त्याला. आज आतां तर अंथरुणावर बसून शास्त्रीबुवांच्याबरोबर बुद्धिबळाचा डाव खेळत आहेत ! "

" बरं, बरं. काळजी नाहींशी झाली " हंसत काका म्हणाले, " तुमच्या तारेनंहि चांगलं काम केलं. जगदीश आम्हांला अनायासानं भेटला. "

त्या तारेनें काकांचे चांगलें काम केलें असेल, पण तिनें माझें काम किती बिघडाविलें होतें याची त्यांना काय कल्पना ? माझी माणिक, माझे प्रेम,

मोठ्या सायासानें जमवून आणलेलें वनभोजन—या गोष्टी काकांना काय माहीत ? बाबांनीं मला विनाकारण तार करविली हें पाहून मी मात्र मनांतल्या मनांत अतिशय संतापलों. बाबांनीं आमचें वनभोजन विनाकारण बिनसविलें !—च् ! काय हें ?

हमालांनीं सारें सामान मोटारींत ठेवल्यावर दिवाणजी मला म्हणाले, " चलायचं साहेब. "

" चल आलों " आकाशांतील चंद्रबिंबावरची दृष्टि न हलवितां मी खिन्न स्वरानें म्हटलें. माझ्या मनाचा संताप अजून गेला नव्हता.

काका, काकू व दिवाणजी पुढें गेले तरी मी जागच्या जागींच उभा आहे असें पाहून शांता माझ्याजवळ आली. तिची चाहूल लागतांच मीं दृष्टि वळवून तिच्याकडे पाहिलें. तिनें हंसत मला विचारलें,

" कां ? डोकं बिकं दुखतय् कीं काय ? "

" छे, सहज आपला चंद्र पाहात उभा राहिलों झालं ! "

असें म्हणून मी झटक्न वळलों, आणि तिच्याबरोबर चालूं लागलों.

मोटारपाशीं सारी मंडळी उभी होती. मी जवळ गेल्यावर दिवाणजींनीं मला विचारलें, " काय साहेब, मोटार चालवायला बसणार काय ? "

" हो बसतों. " असें म्हणून मी मोटारमध्यें शिरलों व मागें वळून शांताला म्हटलें, " इथें पुढें बसण्यांत मौज आहे. म्हाताऱ्या माणसांना बसूं दे मागं. आपण दोघं इथें पुढें बसूं. "

शांता पुढें येऊन माझ्याजवळ बसली, मोटार सुरू करण्याचें बटन मी दाबलें व पेट्रोल वाहूं लागून मोटार थडथडूं लागली. इतक्यांत एक म्हातारी भिकारीण मोटारजवळ आली. आणि फाटक्या वस्त्रानें झांकलेल्या आपल्या अंगाकडे बोट दाखवून काकुळत्या स्वरानें शांताला म्हणाली, " ताईसाहेब, थंडीनें म्हातारी मरते आहे. दिवसभर पोटांत कांहीं नाहीं. ताईसाहेब, मला म्हातारीला तांब्याचा पैसा दे, देव तुला सोन्याचा दील ग बया ! " शांतानें पोलक्याच्या खिशांतून पैसा म्हणून बाहेर काढला तों ती अधेली होती. क्षणार्धापर्यंत ती थोडीशीं घोंटाळली, पण लगेच तिनें ती अधेली म्हातारीच्या हातावर ठेवली. चांदण्यांत अधेली चमकली व म्हातारीला अत्यानंद होऊन

तिनें शांताला आशीर्वाद दिला, " तुझा मुलगा म्हातारा होईल बया, तुला बुरगुंडा होईल ! "

दिवाणजी मोठ्यांदा हंसून म्हणाले, " अजून लग्नालाहि पत्ता नाहीं अन् हिनं शांताबाईला म्हाताऱ्या मुलाचा आशीर्वाद पार देऊन टाकला ! "

मी शांताला विचारलें, " अधेली दिली ? "

" हो. " हंसत शांता म्हणाली, " तिच्या नशिबानं माझ्या खिशांतून मुळीं अधेलीच निघाली. तिचं नशीब शिकंदर ! "

" बरं, आतां सोडूं मोटार ? "

" हो. चला. "

" ठीक, " असें म्हणून मीं रबराचा फुगा दाबला, व मोटार सोडली. पों, पों ! पों, पों !

मोटारच्या शिंगाचा आवाज त्या शांत वेळीं केवढ्यानें तरी होऊन " भुर्र्र्र ! " असा धांवत्या मोटारचा आवाज सुरू झाला.

चांदण्याच्या वेळीं भर वेगानें मोटारमधून जाण्याचें सौख्य कांहीं अवर्णनीय आहे. त्यांतल्या त्यांत स्वतः मोटार चालवीत असतां त्या सौख्यांत जी भर पडते ती विशेष असते. पूर्व दिशेकडेंच आमचा रस्ता असल्यामुळें आम्हांला चंद्राचें प्रफुल्लित बिंब सारखें समोर दिसत होतें. गार वारा जोरानें अंगावरून वाहात होता. मध्येंच एखादी बागाइतीची जागा आली, कीं वारा अधिकच गार असल्यासारखें वाटे. शांता माझ्याजवळ बसली होती. तिच्या लुगड्याचा पदर वाऱ्याच्या झोतानें एक दोनदां उडून माझ्या डाव्या कानापर्यंत येऊन फडफडला. तें पाहून मीं म्हटलें, " आज एकंदरींत वारं जरा जास्तच सुटलेलं दिसताहे. "

शांता व मीं मधून मधून बोलत होतों, पण हवापाण्याच्या व इतर किरकोळ प्रश्नांपलीकडे आमचें बोलणें गेलें नाहीं. मी तिला मध्येंच विचारलें, " कशी काय आहे आमची मोटार ? "

" छान आहे. "

" अन् मोटार हांकणारा कसा आहे ? "

" तो तर फारच छान् आहे ! " ती हंसत म्हणाली, व स्वस्थ राहिली.

अशा वेळीं माणिक माझ्या शेजारीं असती तर तिनें हजार प्रश्न विचा-

रून मला भंडावून सोडलें असतें. मोटार केवढ्याची आहे? मोटार कोणत्या कंपनीची आहे? मोटार चालविणें अवघड आहे कीं सोपें आहे? मोटार चालवावयाचें किती दिवसांत शिकतां येईल?—एक ना दोन, प्रश्नांवर प्रश्न विचारून तिनें मला सारखें बोलावयास लाविलें असतें! तीं क्षणभर-देखील स्वस्थ बसली नसती! चंद्रखंडाकडे पाहात मीं मनाशीं म्हटलें, "गडबड्या स्वभावाची माणिक! माणिक, या वेळीं तूं पुण्यांत काय करीत असशील? माझी तुला आठवण होत असेल कां?"

३

त्या दिवशीं रात्रीं जेवणें झाल्यानंतर आमच्या दिवाणखान्यांत लहानशी सभाच भरली होती असें म्हणावयास हरकत नाहीं. बाबा थोडेसे आजारी म्हणून एका रुंद कोचावर त्यांचें अंथरूण घातलें होतें, व दोन तीन उशा डोक्याखालीं घेऊन ते त्या अंथरुणावर पडले होते. शेजारीं एका प्रशस्त आरामखुर्चीवर काका पडले होते. मी, शांता, आई आणि काकू खालीं गालिच्यावर बसलों होतों. पलीकडे जरा अंतरावर दिवाणजी होते. ते एकीकडे कांहीं हिशेबाच्या वह्या तपाशीत होते, व मधून मधून आमच्या संभाषणांत सामील होत होते. हजारों गोष्टी त्या वेळच्या बोलण्यांत निघाल्या. बाबा व काका यांच्यासारखे जिवलग मित्र आज कित्येक वर्षांनीं एकमेकांस भेटलेले, मग नाना प्रकारच्या चवकशा, आणि हकीगती एकानें कराव्या व दुसऱ्यानें सांगाव्या असें झालें असल्यास नवल तें काय? शिवाय बाबा व काका यांच्या गोष्टींत आई व काकू यांच्याहि गोष्टी मिसळत होत्या. मग बोलण्याला अंतच राहिला नसल्यास तें साहजिकच नव्हे काय? मी व शांता फारशीं बोलत नव्हतों. आमचीं मातापितरें परस्पर प्रेमानें ओथंबलेलीं जीं बोलणीं बोलत होतीं तीं जिवाचे कान करून ऐकण्यांतच आम्ही दोघेंहि तन्मय झालों होतों. आई, बाबा, काकू व काका एकमेकांचीं सुखदुःखें एकमेकांस खुल्या दिलानें सांगण्यांत आमचें सान्निध्यहि विसरलीं होतीं कीं काय कोण जाणे! पूर्वीं काका वृंदावनास राहत असतांना घडलेल्या अनेक गोष्टींची एकमेक एकमेकांस आठवण करून देत होते, मधून मधून थोडा फार विनोदहि चालला होता, आणि मधूनच पूर्वींच्या एखाद्या आठवणीनें सद्गदित होऊन आई व काकू

डोळ्याला पदर लावीत होत्या. त्या चौघांची एकमेकांविषयीं भक्ति पाहून मीहि एकदोनदां सद्गदित झालों.

बोलतां बोलतां माझ्याविषयी बोलणें निघून काकांनीं बाबांना विचारलें, " जगदीशची तब्येत तर चांगली दिसत आहे. यंदा तो बी. ए. होणार ना ? "

बाबा माझ्याकडे पाहात म्हणाले, " तुम्ही त्याला आज फार दिवसांनीं पाहात आहां म्हणून तुम्हांला त्याची तब्येत चांगली वाटते आहे. एक वर्षापूर्वी तो याहून चांगला होता. गेल्या वर्षांत तो बराच खराबला आहे. कां कोण जाणें ! "

बाबांचें म्हणणें खरें होतें. गेल्या वर्षी मूर्खपणानें खाण्यापिण्याच्या आणि जाग्रणाच्या चैनी करून मीं आपली प्रकृति खरोखरच बिघडवून घेतली होती. परंतु खरीं कारणें बाबांना फारशीं माहीत नसल्यामुळें माझी प्रकृति खालावल्याचें त्यांना आश्चर्य वाटणें साहजिक होतें.

बाबा पुढें म्हणाले, " परीक्षेचें म्हणाल तर तो ओळीनें तीन परीक्षा चांगला पास झाला, तेव्हां यंदांहि पास व्हावयाला कांहीं हरकत नाहीं. पण, त्याची पत्रिका पाहिली तर त्याला पांच सहा महिने वाईट आहेत. पाहूं काय होतें तें ! "

" तुमचं पत्रिकेचं वेड अजून गेलं नाहीं म्हणायचं ! " काका हंसत हंसत म्हणाले.

" भविष्य खोटं ठरून तें वेड आहे असं अजून सिद्ध झालं नाहीं म्हणून तें गेलं नाहीं ! " बाबांनींहि हंसत उत्तर दिलें.

" जगदीश, यंदां तूं पास होऊन तुझ्या बापाचं हें पत्रिकेचं वेड, वेड आहे असं पुरं सिद्ध कर रे ! " माझ्याकडे पाहून काका म्हणाले.

जरा वेळ कोणींच कांहीं बोललें नाहीं. नंतर किंचित् गंभीरपणानें काका बाबांना म्हणाले, " पण, गोविंदराव, एका बाबतींत तुमचं भविष्य खोटं ठरलेलं आहे. नाहीं कां ? "

" तें कोणत्या बाबतींत ? "

" आमचा रघुनाथ आम्हांला कायमचा अंतरला नाहीं, असं तुम्ही त्या वेळीं सांगितलं होतंत. पण, अजून त्याची भेट होण्याचं कांहींच चिन्ह दिसत

नाहीं ! " असें म्हणत डोळ्यांत एकदम उभे राहिलेले दोन अश्रु काकांनीं उपरण्याच्या पदरानें पुसले.

" अण्णा, रघुनाथाच्या भेटीविषयीं अजून निराश व्हायचं कारण नाहीं ! त्याच्या तुमच्या भेटीचा यंदां योग आहे असं मला वाटतं. हें वर्ष गेलं तर मात्र— "

" हं—! उगच वेडी आशा धरून बसायचं झालं ! "

रघुनाथाचा विषय निघतांच काकू व आई पदरानं डोळे पुसूं लागलेल्या मी पाहिल्या. मला रघुनाथाची फारशी आठवण नव्हती. माझ्या अगदीं लहानपणीं – त्या वेळीं शांता अगदीं तान्ही होती – काकांच्या घरीं जाऊन मी रघुनाथाशीं खेळत असें. एके दिवशीं तो आपल्या आत्याबाईबरोबर कोठल्याशा गांवीं गेला व त्यानंतर त्याचें दर्शनहि मला कधीं झालें नाहीं, वगैरे गोष्टी मला अंधुक अंधुक आठवत होत्या.

" आतां कुठली आमची त्याची गांठ पडते ! " काकू स्फुंदत म्हणाल्या, " देवाघरीं गेलेलीं माणसं का पुन्हा भेटत असतात ! " नंतर आईकडे वळून त्या म्हणाल्या, " बाई, आज आमचा रघुनाथ बरोबर तुमच्या जगदीशएवढा असावयाचा, नाहीं कां ? "

"हं—" एवढेंच म्हणून आईनें आपले डोळे पुसले व एक सुस्कारा सोडला.

" काय दैवाचा खेळ पाहा ! " भूतकालच्या गोष्टीची आठवण करीत काका अर्धवट स्वगत व अर्धवट मोठ्यांदा म्हणाले, " ताई आमच्या घरी आली काय, चार दिवस मुलाला घरीं नेते म्हणून हट्ट धरून बसली काय, गाडीचा अपघात झाला काय, अन् अपघातानंतर तिचं तेवढं प्रेत सांपडून आज पंधरा वर्षें झालीं तरी रघुनाथाचा पत्ता लागत नाहीं काय –हः ! प्रभू , प्रभू ! तुझ्या मनांत असेल तसं होईल बाबा ! आम्ही व्यर्थ काळजी वाहायची झालं ! "

शोकप्रद विषय निघाल्यामुळें सर्वजण बराच वेळ अगदीं स्तब्ध बसलीं. नंतर काकू सुस्कारा टाकून म्हणाल्या,

" हंः ! झाल्या गोष्टींपुढें काय इलाज आहे ? जगदीश हा आमचाच आहे असं आम्ही समजतों झालं ! "

" तुमचाच आहे बरं तो ! " आई गादीवरून म्हणाली, " जगदीश तुम्हांला देऊन टाकला आहे असं समजा. "

" पण, मला आणखी उलट मागणं मागायचं आहे ! "

" तें कोणतं ? "

" शांता तुम्हांला देऊन टाकली आहे असं समजा. "

" हो, हो. नाहीं कोण म्हणतं ? "

माझ्या छातींत धस्स् झालें. त्यांच्या बोलण्याचा अर्थ लक्षांत येऊन मीं शांताकडे पाहिलें. तिची दृष्टि खालीं वळलेली होती. " छे ! कांहीं तरीच ! " असें मोठ्यानें बोलावयास मीं तोंड उघडलें होतें – पण, तो प्रसंग तसा नव्हता. आवंढा गिळून मी गप्प बसलों.

प्रकरण तिसरें

नकळत ठेवलेली ठेव

१

बाबांचा ताप नाहींसा झाला होता. तेव्हां त्यांच्यासाठीं फार दिवस वृंदावनास राहावयाची गरज नव्हती. पण असें असूनहि दोनतीन दिवसांत मला परत पुण्यास जातां येईलसें दिसेना. " फार दिवसांनीं आपल्या भेटी झाल्या आहेत तेव्हां राहा आणखी चार पांच दिवस. मग रोज पंचवीस तास अभ्यास करून नुकसानभरपाई करतां येईल " असें काका सारखे म्हणत होते. मला माझ्या अभ्यासाची काळजी होती, कीं दुसरी कसली होती ते काकांना काय माहीत ? तें एक माझ्या हृदयालाच ठाऊक ! पण, परत पुण्यास जावयाची घाई करावयास मला अभ्यासाची सबब अगदीं सर्वांत सोयीची होती, आणि तिचा मीं शक्य तितका उपयोगहि केला. आईलाहि माझी सबब खरी वाटून ती काकांना म्हणाली, " जाऊं द्या झालं त्याला. उगच अभ्यास बुडवायला नको. येईल वाटलं तर पुन्हां पंधरा दिवसांनीं ! " तथापि काका कांहीं केल्या ऐकेनात. ते आईला म्हणाले, " काय जगदीशच्या अभ्यासाची ऐट सांगतां ? आम्हीं कधीं अभ्यास केले नाहींत, कां परीक्षेला बसलों नाहीं कां काय ? तें कांहीं नाहीं. जगदीश, इतक्यांत मी तुला जाऊं द्यायचा नाहीं. " काकांनीं इतकें म्हटल्यावर तेथें इलाजच नव्हता. बाबांच्या बोलण्याइतकेंच त्यांचें बोलणें मुकाट्यानें ऐकणें मला भाग होतें. माणिकच्या भेटीची उत्सुकता मनांतल्या मनांत दाबून कसेबसे चारपांच दिवस वृंदावनास कंठण्याच्या संकटाला तोंड द्यावयास मी तयार झालों. दुपारचा चहा झाल्या-नंतर मी मोठ्या युक्तीनें मंडळींतून निसटलों, धांवत आपल्या खोलींत गेलों, दाराला कडी लावली, आणि माणिकला पत्र लिहावयास बसलों. याच्या

अगोदरच पत्र लिहावयास पाहिजे होतें, व पत्राला इतका उशीर केल्याबद्दल परत पुण्यास गेल्यावर पहिल्याच भेटींत माणिक शेलक्या शब्दांचा भडिमार माझ्यावर कसा करणार त्याचें चित्र मला स्पष्ट दिसत होतें! आतां पत्र लिहिण्याच्या कामीं आणखी दिरंगाई करून चालण्यासारखें नव्हतें. एक उत्तम नोटपेपर घेऊन मीं पत्र लिहिण्यास प्रारंभ केला.

" माणिक, "

कागदावरचीं तीं अक्षरें वाचून माझें मलाच कसेंसें वाटलें. किती नीरस मायना लिहिला मीं! " माणिक "!—च्! अगदींच काव्यहीन प्रारंभ करून मी पत्र लिहीत होतों! माणिकला तर तो मायना मुळींच खपावयाचा नाहीं अशी माझी खात्री होती. माणिकविषयीं माझ्या हृदयांत जी भावनेची ऊर्मि होती तिचा एक लक्षांशदेखील या साध्या संबोधनानें परिस्फुट होत नव्हता. " जिवाच्या जिवलगे! " " हृदयाच्या देवते! " असा कांहीं तरी मायना मीं लिहावयास पाहिजे होता. पण, माणिकशीं लग्न होण्यापूर्वी अशा मायन्यांचा उपयोग करणें बरें नव्हे असा मनाशीं विचार करून मीं पहिला न खोडतां कायम ठेवला, व पुढें लिहावयास लागलों.

—" पत्र लिहावयास इतका उशीर केल्याबद्दल तुझा माझ्यावर राग झाला असेल. पण मी तरी काय करणार? दोन पैशाच्या कार्डा-वर नुसती सुखरूप पोंचल्याची बातमी तुला कळवायची असती तर आज सकाळीं मला कार्डावर दोन ओळी लिहून टाकतां आल्या असत्या; पण दोन ओळींचें कार्ड लिहिण्याबद्दलहि तूं रागावली असतीस. दोन रागांपैकीं कोणता तरी एक राग पतकरायचा; तेव्हां म्हटलं उशीर झाल्याबद्दलचाच राग पतकरणें बरें! कालपासून तुझी आठवण किती होत आहे म्हणून सांगूं! तुझी मूर्ति डोळ्यांपुढून हालतच नाहीं. काल आमची गाडी सुटल्याबरोबर स्टेशनवरून घरीं जाण्यासाठीं तूं परतलीस, पण मी डब्यांत खालीं न बसतां तुझ्याकडे पाहात खिडकींत तसाच उभे राहिलों होतों. आमची गाडी वळून तूं दिसेनाशी होईपर्यंत मी खालीं बसलों नाहीं. मला तूं वेडा म्हण वाटलं तर! पण तुला शक्य असतें तर तूंहि माझ्याकडे पाहात

राहिली असतीस हें मला माहीत नाहीं कीं काय? पण माणिक, तुला खरं सांगूं? स्टेशनवर बाळासाहेब आणि आबासाहेब एकदम आले; त्यांनीं तुला घेरलं; आणि तूं त्यांच्याबरोबर घरीं गेलीस ही गोष्ट मला कांहीं आवडली नाहीं. कां कोणास ठाऊक! खरं म्हणशील तर त्या दोघांचे स्वभाव; आणि त्यांचं एकंदर वागणं मला आतांशीं अगदीं नापसंत वाटूं लागलं आहे. गेल्या वर्षभर त्यांचे आमचे गळ्यांत गळे होते, व अजूनहि वर वर दिसावयास आहेत, हें खरें. पण, मला अलीकडे त्यांच्या सहवासाचा वीट आला आहे. ते उमद्या अंतःकरणाचे लोक नाहींत. तूं त्यांची संगति टाळशील तर बरं. ही गोष्ट असूयेच्या भावनेनं मी बोलत आहें असं समजूं नकोस अं! नाहीं तर म्हणशील, कीं लग्न झालं नाहीं तोंच यांचा सासुरवास सुरू झाला! लग्न झाल्यानंतरहि ती गोष्ट माझ्या हातून व्हायची नाहीं, मग आज तर काय गोष्टच निराळी आहे. उलट, लग्नानंतर तुझ्या सासुरवासांतच मला राहावं लागेल. मी आनंदानं राहीन म्हणा—या घटकेला सुद्धां राहात आहें असं म्हणायला हरकत नाहीं. निदान, माझे स्नेहीसोबती माझी तशी थट्टा करतात, आणि ती मला निमूटपणानं सहन करावी लागते. तूं माझ्या हृदयाची देवता आहेस, मग तूं म्हणशील तसा मी नाचलों, किंवा मी नाचतों असं लोकांनीं म्हटलं तर त्यांत मला राग येण्यासारखं काय आहे? त्या टीकेनं मला एक प्रकारचं सौख्यच होतं—खरोखर सौख्यच होतं!

आमच्या बाबांना दोन तीन दिवस थंडी वाजून खूप ताप आला होता. आतां त्यांचं बरं आहे. मी उद्यांच पुण्यास यावयाला निघणार होतों. पण आमचे काका मला सोडीत नाहींत—हो, पण आमचे 'काका' कोण तें तुला मुळींच माहीत नसेल. ते आमच्या बाबांचे अगदीं जिवलग स्नेही आहेत. माझ्या लहानपणीं ते वृंदावनाला होते; पण पुढें ते विलासगडला गेले व तेथें त्यांनीं एक गिरणी काढली. ते आज कित्येक वर्षांनीं आमच्याकडे आले आहेत. काका व काकू मला सोडीत नाहींत, नाहीं तर तुझ्या भेटीला

मी धांवत आलों नसतों का? त्यांची मुलगी शांताहि त्यांच्याबरोबर आली आहे. ती व मी लहानपणीं एकत्र खेळलेलों. मी चार दिवस राहावें असा तिचाहि आग्रह! मग माझी येथून सुटका होणार कशी? शांता साधारण तुझ्याच वयाची आहे. मोठी पंडिताबाई झाली आहे ती! काल तिनें बाबांना किती उत्तम संस्कृत श्लोक म्हणून दाखविले! स्वरूपानं ती लहानपणापासूनच चांगली आहे म्हणा! ती इतक्या वर्षांनीं भेटलेली पाहून मला फार आनंद झाला. तिला या चार दिवसांत आमचे मळे, आमच्या बागा, साऱ्या गोष्टी मला दाखविल्या पाहिजेत. शिवाय — "

लिहितां लिहितां एक विचार माझ्या मनांत येऊन मी थोडासा दचकलों आणि थांबलों. शांताविषयीं मी एवढ्या मोकळ्या लेखणीनें लिहित होतों खरा; पण तें पत्र माणिकच्या हातीं पडावयाचें होतें हें मीं विसरलेंच होतों! माणिकचा स्वभाव पराकाष्ठेचा द्वाड आणि मत्सरी! तिच्याखेरीज दुसरीकडे कोठेंहि, अभ्यासांतदेखील माझं मन गुंतलेलं तिला खपत नसे. मग शांताच्या रूपगुणांची स्तुति माझ्या पत्रांतून वाचून तिला काय वाटेल? शांताविषयीं अधिक न लिहिलेलेंच बरें असें वाटून मीं तो ' शिवाय ' शब्द खोडून टाकला व ओघ बदलून पुढें लिहूं लागलों—

" बाकी, काकाकाकूंनीं कितीहि आग्रह केला तरी चार दिवसांच्या वर मी येथें राहात नाहीं. मला येथें काडीइतकें तरी चैन पडत आहे कां बरं! सारा जीव तुझ्याकडे लागलेला आहे. मी परत यावयास दिरंगाई केली म्हणून तूं माझ्यावर रागावणार नाहींस ना? बाकी, रागावलीस तर तें एका दृष्टीनें मला बरंच वाटेल. कारण, तुझं माझ्यावर प्रेम आहे हें तुझ्या रागावरून पुरं सिद्ध होईल. माणिक, तुझ्यावरच्या माझ्या प्रेमाचं मोजमाप मी तुला कोणत्या शब्दांनीं सांगूं? तुझ्यावांचून साऱ्या गोष्टी, हा संसारसुद्धां मला नीरस वाटतो. बाबांची संमति मिळवून तुझ्याशीं माझा विवाह झाल्याखेरीज मला कोणतीहि गोष्ट सुचणं शक्य नाहीं असं मीं तुला शंभरदां बोलूनदेखील दाखविलं आहे. बाबांची संमति मला मिळेल याबद्दल मला फारशी शंका वाटत नाहीं. तुझं माझ्यावर प्रेम आहे

कीं नाहीं, याबद्दल मात्र मन अनेक वेळां साशंक होतं. हें वाचून तूं कदाचित् रागावशील. कारण, काल सकाळीं तुझा निरोप घ्यावयास आलों असतांना मीं तुझ्या हाताचं चुंबन घेतलं त्या वेळच्या तुझ्या संमतीवरून मीं साऱ्या गोष्टी वास्तविक ओळखायला पाहिजेत असं तुला वाटेल. तें खरं; पण तुझ्या प्रेमाला मी खरोखरच पात्र आहें का असं माझ्या भित्र्या मनाला वाटतं त्याला इलाज नाहीं–"

इतक्यांत खालून बाबांनीं हांक मारली, "जगदीश ! जगदीश ! अरे जगदीश, तूं शांताला घेऊन गुऱ्हाळावर जातो आहेस ना ?"

"आलों, आलों." असें ओरडून पत्र पुरें करावयाचें मीं ठरविलें, व घाईघाईनें लिहिलें,

"असो. माझी प्रकृति चांगली आहे. माझा पत्ता मीं तुला सांगून ठेवलाच आहे. उलट उत्तर ताबडतोब येऊं दे. लहान पत्र लिहिलंस तर तुझ्यासारखाच मीहि रागावेन, लक्षांत ठेव. तुझ्या पत्राची चातकासारखी वाट पाहत आहे हें विसरूं नकोस.

सर्वस्वी तुझा,

जगदीश

२

गुऱ्हाळावर जावयाचें म्हणजे मोटारमधून जाणें शक्यच नव्हतें. म्हणून आम्ही घोड्याच्या गाडींतून – साधारण इंग्रजींत जिला 'डॉग कार्ट' म्हणतात तशीच ती होती – निघालों. मी घोडा हांकावयास बसलों व शांता माझ्या शेजारीं बसली. तिसरें कोणीच नव्हतें. मी बेफाम घोडा चालविणारा असें सर्वांच्या दृष्टीनें ठरलेलें होतें. म्हणून आम्ही निघतांना बाबा मला म्हणाले,

"जगदीश, जरा बेतानं घोडा जाऊं दे अं ! शांताला बरोबर नेतो आहेस, हें विसरूं नकोस."

"नाहीं." मीं हंसत उत्तर दिलें आणि लगाम उचलला. त्याबरोबर 'झेंड्या' वेगानें निघाला.

वाटेनें मी शांताला विचारलें, "विलासगडला अशी शेती बागायती आहे का ?"

" खुद्द विलासगडला नाहीं. पण आजूबाजूला खूप आहे म्हणतात. "

" एकसुद्धां दक्षिणी इसम तिकडे भेटत नाहीं ना ? "

" छे: ! " शांता हंसत म्हणाली, " असं कोण म्हणतं ? कांहीं दक्षिणी लोक तेथें कायमचे राहिले आहेत. जोशी नांवाचे एक बॅरिस्टरहि आहेत. झालं तर—"

" कोण मुकुंदराव जोशी कां ? " मीं एकदम उत्सुकतेनें विचारलें. माणिकच्या वडिलांचा शांता उल्लेख करीत होती असें मला वाटलें, व म्हणून मीं शांताला आवेशानें हा प्रश्न केला.

" हो, तेच. कां बरं ? " माझ्या प्रश्नांतील उत्सुकतेच्या आवेशानें चकित होऊन शांतानें विचारलें.

" त्यांची तुमची पुष्कळ ओळख असेल ! " मी पुढें विचारलें.

" खरं म्हटलं तर असायला पाहिजे, पण नाहीं. परदेशांत गेलेली दक्षिणी मंडळी या दृष्टीनं आमचा त्यांचा घरोबा असायचा आणि प्रथम प्रथम मीं त्यांच्या घरीं जातहि असें. माणिक नांवाची बॅरिस्टरांची एक मुलगी आहे तिच्याकडे माझें जाणें कधीं कधीं होई, व तीहि आमच्या घरीं मधून मधून येई. पण, अण्णांचं त्या बॅरिस्टरांच्याविषयीं आणि त्यांच्या एकंदर घराण्याविषयीं फार वाईट मत आहेसं दिसतं. त्यांनीं एक दिवस मला आणि आईला स्पष्ट बजावलं कीं, बॅरिस्टरांच्या घराशीं आपला कांहीं एक संबंध असता कामा नये. तेव्हांपासून आमचं जाणंयेणं अजिबात बंद झालं. मला वाटतं चांगली चार पांच वर्षे माणिकची अन् माझी भेट नाहीं. अण्णांचा——"

" माणिकचा स्वभाव कसा आहे ? " मीं मध्येंच विचारलें.

" माणिकचा ? " मी माणिकविषयीं विशेष चवकस बुद्धीनें प्रश्न कां करावा हें न कळल्यामुळें आश्चर्यपूर्ण नजरेनें माझ्याकडे पाहात शांता म्हणाली, " बरा आहे झालं ! "

तिनें ज्या रीतीनें ते शब्द उच्चारले आणि मान उडवून भुंवया वांकड्या केल्या त्यावरून माणिकविषयीं तिचें मत चांगलें नव्हतें असें मला स्पष्ट दिसलें. माझ्या मनाला तें बरें वाटलें नाहीं. शांताच्या त्या मुद्रेचा मला थोडासा रागहि आला, आणि तिच्याकडून अधिक खुलासा करून घेण्याची

अनिवार इच्छा माझ्या मनांत उत्पन्न झाली. पण त्या वेळीं शांताला माणिकविषयीं अधिक प्रश्न विचारणें शक्य नव्हतें. मीं विचारलेलेच प्रश्न अवास्तव वाटून शांताला आश्चर्य वाटूं लागलें असावें अशी मला शंका आली होती. तेव्हां आणखी प्रश्न विचारण्याची इच्छा मनांतल्या मनांत जिरविणें भाग होतें. मी थोडासा चिडलों, आणि कांहींच न बोलतां 'झेंड्या'ला उगीचच्या उगीच चाबकाचे दोन फटकारे लगावले. ज्या 'झेंड्या'ला चाबकाचा नुसता इशारा पुरेसा व्हावयाचा त्याला दोन जोराचे फटके मिळतांच त्यानें एकदम हिसका देऊन वायुवेगानें पळावयास आरंभ केला. त्याबरोबर मी थोडासा जागा झालों व लगाम ओढून धरला. अर्थातच हा एकंदर प्रकार शांताच्या ध्यानांत येणें शक्य नव्हतें. ती म्हणाली,

"माणिकला घरचं वळण मुळींच नाहीं अशी माझी समजूत आहे. ती फार प्रेमळ आहे. पण नटण्यामुरडण्यांतच तिचा सारा वेळ जायचा. चांगली संगति लागली तर सुधारेल. पण वाईट संगतीनें–"

तें वाक्य तसेंच अपुरें टाकून तिनें मला एकदम–

"ती हल्लीं पुण्यास आपल्या थोरल्या बहिणीकडे आहे म्हणे?" असें विचारलें.

"हं." मी उत्तर दिलें. पण त्या उत्तराकडे माझें मुळींच लक्ष नव्हतें. शांताच्या त्या बोलण्यानें माझ्या मनाची स्थिति फारच चमत्कारिक झाली. माणिक मला इतकी प्रिय होती कीं तिच्याविषयीं कोणीं कांहींहि सांगितलें तरी माझें तिच्यावरील प्रेम यत्किंचितहि कमी होणें शक्य नव्हतें. पण उलट शांताविषयीं मला इतका आदर होता, कीं तिचें बोलणें ताबडतोब विसरून जाणें मला अशक्यच होतें. मला कांहींच सुचेना. मनाच्या त्या विषण्ण आणि शून्य स्थितींत मीं किती वेळ गाडी चालविली कोण जाणे! माझ्या हातांत लगाम होता, आणि इमानी 'झेंड्या' निमूटपणें नीट रस्त्यानें गाडी ओढीत होता हें खरें. पण, गाडीघोड्याकडे माझें लक्ष मुळींच नव्हतें.

नंतर किती तरी वेळ आम्ही कोणीच कोणाशीं कांहीं बोललों नाहीं. माझ्या मनांत कांहीं तरी विचार चालला असावा असें वाटून जरा वेळानें शांतानें मला विचारलें,

"कसला एवढा विचार चालला आहे?"

तिचे शब्द ऐकतांच दचकून तिच्याकडे वळून हंसण्याचा खोटा आविर्भाव आणून मीं म्हटलें, " विचार ! छेः ! कांहींसुद्धां नाहीं. "

" मग इतका वेळ गप्प कां ? "

" सहज. "

" माझ्या बोलण्यांत कांहीं लागण्यासारखं होतं कीं काय ? " असें विचारून शांतानें माझ्याकडे क्षणभर दृष्टि लावून पाहिलें व माझी दृष्टि तिच्याशीं मिळतांच तिनें मान खालीं घातली. तिच्या आवाजांत, चेहऱ्यांत व बोलण्यांत असें कांहीं तरी होतें कीं, त्यामुळें माझी स्तब्धता तिच्या अंतःकरणाला बोचली असावी असें दिसलें. प्रेमाच्या माणसास करावा त्याप्रमाणें तिनें तो प्रश्न केला असें क्षणभर मला वाटलें. मीं तिला म्हटलें,

" छे, छे ! मुळींच नाहीं. तुझा आपला कांहीं तरीच तर्क ! "

आपल्या मनाची अस्वस्थता प्रगट न करतां कांहीं तरी बोलल्याखेरीज शांताला बरें वाटणार नाहीं असें मनांत येऊन मीं कांहीं वेळानें विचारलें,

" विलासगडला तूं कोणत्या शाळेंत जात होतीस ? "

" लहानपणीं एका शाळेंत मी जात होतें; पण गेल्या चार पांच वर्षांत मी कुठल्याच शाळेंत गेलें नाहीं. अण्णाच मला शिकवीत. "

" तुला हिंदुस्थानी चांगलं यायला लागलं असेल ? " मी कुतूहलपूर्ण स्वरानें विचारलें.

" अगदीं उत्तम. फारसीसुद्धां मी थोडं शिकलें आहे. "

" प्रेमासंबंधाची कविता फारसी भाषेंत खूप आहे ना ? " माझ्या मनांत माणिकच्या प्रेमाच्या कल्पना गोंधळ घालीत असल्यामुळें मी एकदम प्रश्न केला, आणि शांताकडे हंसत पाहिलें.

तो प्रश्न शांताला विचित्र वाटेल ही कल्पनाहि नव्हती. बहीणभावंडें मोकळेपणानें बोलतात तसें आमचें बोलणें चाललें असल्यामुळें प्रेमाच्या विषयासंबंधींदेखील आमचें बोलणें व्हावयास कांहीं हरकत नाही अशी माझ्या मनाची भावना होती. पण माझा अदमास अगदीं खोटा ठरला. शांतानें आपली दृष्टि एकदम खालीं वळविली, तिच्या गालावर लज्जेची आरक्तता चढली, तिच्या चेहऱ्यावर संभ्रमाची छटा दिसली, आणि डाव्या हाताच्या तर्जनीवर आपल्या पदराचें टोंक गुंडाळीत अस्पष्ट स्वरांत ती म्हणाली,

" इश्श ! कांहीं तरीच काय प्रश्न ! "

माझा प्रश्न थोडासा विचित्र होता हें खरें, पण त्या प्रश्नानें शांता इतकी गोंधळून जाईल असें मला वाटलें नव्हतें. तिचा तो संभ्रम पाहून मला जरा आश्चर्य वाटलें. दोन तरुण स्त्री-पुरुषांच्या संवादांत प्रेमाविषयींची चर्चा निर्विकारपणें चालणें जरा दुरापास्त असतें हें मला समजत नव्हतें असें नव्हे. पण, माझा व शांताचा जो घरोब्याचा स्नेहसंबंध आहे असें मला वाटत होतें त्या स्नेहाच्या भूमिकेवर उभें राहून प्रेमाचा विषय बोलल्यास शांताचा इतका गोंधळ उडून जावयाचें कारण नव्हतें. मग माझ्या प्रश्नानें शांता इतकी गडबडून कां गेली ? माझ्याकडे ती बहिणीच्या दृष्टीनें पाहात होती ना ? माझ्याविषयीं तिच्या मनांत बंधुप्रेमच होतें ना ? माझें बोलणें ती बहिणीच्याच वृत्तीनें ऐकत होती ना ? कां—

माझ्या मनांत एक विलक्षणच शंका आली ! शांता माझ्याशीं कांहीं निराळ्याच भावनेनें बोलत चालत होती कीं काय ? ती माझ्याकडे कांहीं वेगळ्याच दृष्टीनें पाहात होती की काय ?

'—च् ! भलतंच ! असं व्हायचं नाहीं. ' असें मनाशीं म्हणून मीं त्या शंकेला मनाबाहेर घालवून दिलें, आणि घोड्याला उद्देशून म्हटलें, " झेंड्या, बेट्या, बेतानं चाल. मी एकटा गाडींत बसलों नाहीं ! कुठें गाडी खड्ड्यांत घातलीस तर — हंः ! आस्ते बेटा. "

आतां मोठा रस्ता सोडून आमची गाडी कुंपणाच्या बाजूबाजूनें शेताच्या ढेंकळांतून चालली होती. तो शेतांतील ओबडधोबड बनावट रस्ता सारखा आणि स्वच्छ थोडाच असणार ! एक चाक खालीं एक चाक वर असें सारखें होत होतें. खडकाच्या एखाद्या मोठ्या टेंगळावरून चाक गेलें कीं मधूनच मोठा हिसका बसत होता. गाडीच्या चाकाखालीं ढेंकळांचा चूर होऊन काळी माती उधळत होती. कांहीं वेळानें मीं शांताकडे वळून म्हटलें, " तुला फार त्रास होत असेल, होय ना ? "

" त्रास कशाचा त्यांत ! " शांतानें मंद स्मित करीत उत्तर दिलें. आतां तिच्या चेहऱ्यावर नेहमींची शांत छटा पुन्हां परत आलेली दिसत होती. मघांची तिची गोंधळलेली वृत्ति नाहींशी झाली होती. ती पुढें म्हणाली,

" लहानपणीं या वाटेनें आपण कितीदां तरी आलों असूं ! गुऱ्हाळाचे

बैल हांकण्याचा आपण दोघांनींहि एकदां हट्ट धरला, व शेवटीं बैल हांकण्याची बाबांनीं परवानगी दिल्यावर आनंदून एकाच बैलाच्या पाठीवर आपण दोघे बसलों, आणि दांडगाई करतांना पडलों, तो प्रसंग मला अगदीं पक्का आठवतो. आहे का कांहीं आठवण ? ”

“ मलाहि ती गोष्ट चांगली आठवते. किती तरी वर्षे झालीं त्या गोष्टीला ! ” मी उद्गारलों.

“ किती तरी ! पण इतक्या दिवसांत माझी एकदांसुद्धां आठवण झाली नाहीं ना ? ”

“ असं कसं होईल ! ते लहानपणचे दिवस मला वारंवार आठवत असत. त्या दिवसांची आठवण झाली, कीं एखाद्या वेळीं तर असं वाटतं, कीं तो काळ आपल्याच आयुष्यांतील होता कीं एखाद्या कादंबरींतील वर्णनाचं तें स्मरण आहे ? तो लहान जगदीश अन् ती लहान शांता दूर अंतरावर कुठें तरी उभीं आहेत अन् त्यांच्याकडे एखाद्या चित्रांतल्या आकृतींकडे पाहावं त्याप्रमाणें आपण पाहात आहोंत असा मला अनेक वेळां भास होतो. त्या दिवसांची मला आठवण नसेल असं तुला कसं वाटतं ? ”

“ मग इतक्या वर्षांत एकदेखील पत्र धाडलं नाहीं तें ? ” तिनें चटकन् विचारलें.

तिचा प्रश्न बरोबर होता. आम्ही लहानपणीं एके ठिकाणीं इतके खेळलों असूनहि ती विलासगडला गेल्यापासून तिचा माझा स्नेह पार नाहींसा झाल्यासारखें झालें होतें. त्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर देणें शक्यच नव्हतें म्हणून मींच तिला उलट प्रश्न केला,

“ तूं तरी मला कधीं धाडलंस पत्र ? ”

“ पत्र लिहावयाचं माझ्या मनांत येई. पण वाटें उत्तर आलं तर बरं, नाहीं तर—” तिनें तें वाक्य पुरें केलें नाहीं. तितकें अपुरें वाक्य उच्चारतां उच्चारतांच तिचा चेहरा गोरामोरा झाला होता.

“ इतक्या वर्षांत तुझा माझा पत्रव्यवहार मुळींच झाला नाहीं हें मोठं आश्चर्य तर खरंच. पण तसं झालं खरं. ”

“ माणसं एकमेकांना विसरूं लागलीं कीं असंच व्हायचं ! ” शांता म्हणाली. तिच्या बोलण्यांत खोंच होती. मीं तिला प्रथम पत्र धाडावयास

पाहिजे होतें, व तिला इतक्या दिवसांत एकहि पत्र धाडलें नाहीं हा ती स्वतःचा एक प्रकारचा मोठा अपमान झाला असें समजत होती हें तिच्या बोलण्यावरून उघड होत होतें. माझी मुग्धता तिला इतकी कां लागली असावी कोण जाणे ! तिचा राग घालविण्याच्या हेतूनें मीं म्हटलें,

" बरं आतां मागच्या गोष्टी कशाला हव्यात ? यापुढें माझ्या हातून अशी चूक झाली नाहीं म्हणजे झालं ना ? मग तर तुझा राग जाईल ना ? "

" इश्श ! राग कसला आला आहे त्यांत ! अन् रागावण्याचा मला हक्क तरी काय आहे ? विलासगडला परत गेल्यावर वृंदावनची नुसतीं पत्रंच वाचण्याचं माझ्या नशिबांत असलं तर तीं पत्रं आलीं काय अन् न आलीं काय, मला सारखंच सुखदुःख वाटणार ! " असें ती म्हणाली. बोलतांना तिच्या आवाजांत कंप उत्पन्न झाला होता, व तिनें आपली खालीं वळविलेली दृष्टि मुळींदेखील वर उचलली नव्हती.

तिच्या वाक्यांचा अर्थ प्रथम माझ्या नीटसा ध्यानांत आला नाहीं; परंतु क्षणभरानें त्या वाक्यांतील सूक्ष्म अर्थ समजतांच मला कसेसेंच वाटलें. मीं माझ्या मनालाच विचारलें, ' शांता याच अर्थानं मला बोलली असेल का ? माझ्याविषयीं बंधुप्रेमापेक्षां अधिक कांहीं भावना हिच्या मनांत उत्पन्न झालेली आहे कीं काय ? ' हे प्रश्न माझ्या मनाला मघाशीं एक दोन वेळां सुचले होते, पण आतांच्या शांताच्या बोलण्यानें त्या प्रश्नाविषयीं माझें मन अधिक विचार करूं लागलें.

थोड्याच वेळांत अमाची गाडी गुन्हाळाच्या आवारांत शिरली. आम्ही येणार अशी गुन्हाळावरच्या लोकांना आधींच वर्दी गेली होती. तेव्हां म्हातारा महादू, त्याचा तरुण मुलगा सुभाना व इतर कांहीं कामकरी मंडळी आमच्या गाडीची वाट पाहातच आवाराच्या तोंडाशीं उभी होती. गाडी थांबतांच महादूनें पुढें होऊन घोड्याचा लगाम हातांत धरला, व त्याला उद्देशून,

" झेंड्या, धाप लागलीया ! साहेबांनीं लई दवडीत आणलंय् तुला जणूं ! " असें म्हणून माझ्याकडे हंसत पाहिलें.

महादूकडे पाहून मीं मंद हास्य केलें. तेवढीच त्या इमानी म्हाताऱ्याची अपेक्षा होती. कालपासून मला सर्वजण – एखादे वेळीं आइ व बाबादेखील

—' साहेब ' हा शब्द वापरीत असलेली पाहून व आतांहि महादूनें तोच शब्द उच्चारलेला ऐकून शांताला आश्चर्य वाटलें असावें असें तिच्या चर्येवरून मला दिसलें. म्हणून शांता खालीं उतरल्यावर मीं खालीं उतरत तिला म्हटलें,

" सगळ्या मंडळींनीं माझं नांव ' साहेब ' ठेवलेलं आहे. सगळ्या गडी-माणसांत माझं हेंच नांव पडून गेलं आहे."

" पोशाखावरून कीं काय ? " तिनें माझ्याकडे पाहात विचारलें.

" हो. असं दिसतंय ! " हंसत हंसत म्हणून मी महादूकडे वळलों व त्याला विचारलें, " काय महादबा, आम्हांला काय काय दाखवतां ? "

" पन श्यॆंताबाईनीं मला म्हाताऱ्याला वळखलं तरी का ? " महादूनें शांताकडे वळून हंसत विचारलें.

"हो, तर ! " शांता म्हणाली, " महादबा, तुमची ओळख मी कशी विसरेन बरं ! "

" न्हाई, अमी गरीब मानसं म्हून इच्यारलं ताईसाब ! " महादूनें आनंदून म्हटलें, " बरं साहेब, चला ! समदं दावतुं ताईसाहेबास्नी, मंग वखत व्हईल. जरा बिगी बिगी चालायला व्हांवं ! "

सुमारें अर्धापाऊण तास आम्ही हिंडत होतों. ऊंसाच्या मळ्यांतील चालणें तें ! त्यांतील त्रासापासून एक प्रकारचें सौख्य घ्यावयाचें असतें ! पुरुष पुरुष उंच वाढलेल्या ऊंसांच्या गर्दींतून रानवारा सोसाट्यानें आला, कीं सळसळ होणारा आवाज आमच्या पायाखालीं तुडविल्या जाणाऱ्या पाचोळ्याच्या आणि पेऱ्यांच्या आवाजाशीं मिसळला, कीं तो ऐकून मनाला एक प्रकारचा अवर्णनीय आनंद होत होता. कांहीं ठिकाणचा ऊंस कापून गुऱ्हाळावर नेलेला दिसत होता, कांहीं ठिकाणीं ऊंसाची कांपणी आणि गाड्या भरण्याची गर्दी चालली होती, आणि कांहीं ठिकाणीं ताडमाड वाढलेला ऊंस पुढें आपलीहि कांपणी होणार आहे हें मनांतदेखील न आणतां आनंदानें डुलत होता. ज्या ठिकाणीं ऊंसाची कांपणी चालली होती तेथें आम्ही कांहीं वेळ मौज पाहात थांबलों. कांपणी करणाऱ्या बाया हातांनीं कोयते चालवीत होत्या आणि तोंडानें कसलेसें गाणें म्हणत होत्या. चार पांच बायका नवें कडवें सांगत, आणि मग बाकीच्या साऱ्या बायका तें कडवें

म्हणत, असा क्रम चालला होता. गाणें कांहींसें शृंगारिकच होतें. डोक्यावर ऊंसाची मोळी घेऊन उभ्या राहिलेल्या तरुण मुलीला तिचा प्रियकर त्या मोळीचें मोल विचारण्याचें निमित्त करून आपल्या प्रणयी अंतःकरणांतील भाव उघड करून सांगत आहे, असा त्या गाण्याचा विषय होता. त्या गाण्याचीं दोन कडवीं ऐकून शांतानें चपापून माझ्याकडे पाहिलें. मी तिच्या-कडे पाहून किंचित् हंसलों. तिच्या तोंडावर लज्जेचा रक्तिमा चमकलेला मीं पाहिला. असलें गाणें पुढें ऐकत उभें राहणें न आवडून शांतानें चालावयास प्रारंभ केला, व मी, महादू व सुभानाहि मागोमाग निघालों. ज्या गाण्यांतील शृंगार शांताच्या मनाला उत्तान वाटला, तेंच गाणें त्या ऊंस कापणाऱ्या बाया खुशाल निर्विकारपणें घोळून घोळून म्हणत होत्या व तें आम्हांला बऱ्याच अंतरावर जाईपर्यंत ऐकूं येत होतें. आजूबाजूला कांहीं गाड्या भरल्या जात होत्या, व कांहीं नुकत्याच परत येऊन त्यांच्या जोकडाखालून मोकळे झालेले बैल आनंदून रवंथ करीत किंवा ऊंसाचा पाला खात उभे होते. तीन चार शिकारी कुत्रे इकडे तिकडे हिंडत होते. कामकरी स्त्री-पुरुषांची लहान लहान मुलें त्यांच्याबरोबर मळ्यावर आलीं होतीं. त्यांपैकीं कांहीं मातींत मस्ती करीत होतीं, कांहीं रडत होतीं. कांहीं आपल्या झिपऱ्या सांवरीत आणि शेंबूड पुशीत धांवत पळत होतीं. प्रत्येकाच्या हातांत ऊंस होता, आणि ऊंस नीट खातां न आल्यामुळें प्रत्येकाचें आधींच मातीनें शोभिवंत झालेलें अंग चिकट झालें होतें. किलकिलाट करणाऱ्या त्या पोरांचा घोळका मोठा पाहण्यासारखा होता !

गुऱ्हाळावरच्या देखाव्याची शोभा कांहीं वेगळीच होती. एका मागो-माग एक ऊंसाचे भारे मोकळे केले जात होते, ऊंसाचीं कांडीं भराभर छाटलीं जात होतीं, चरक फिरविणारे बैल आपल्या ठरीव वर्तुलाकृति मार्गांत फिरत होते, आणि चरकांतून बाहेर पडणारा रस काहिलींच्या जागेकडे चालला होता. आज कित्येक दिवस उत्कृष्ट खत खाऊन मथुरेच्या चोभ्या-प्रमाणें माजलेले ऊंस चरकाकडून पिळले जातांना मोठा आक्रोश करीत होते, व त्या आवाजापुढें दुसरें कांहींच ऐकूं येत नव्हतें. एकमेकाला सूचना करणाऱ्या कामकऱ्यांना मोठ्यांदां ओरडावें लागत होतें. बैलामागें फिरणारा गडी मधूनच गाण्याचा किंवा लावणीचा एखादा चरण हेल काढून म्हणत

होता, व मधून मधून बैलांचें काम पसंत न पडून ओबड धोबड असुडाच्या फटकाऱ्यानें त्यांना इशारा देत होता, किंवा त्यांची शेंपटी पिळीत होता. एकीकडे रसहीन झालेल्या चिपाडांचा खूप मोठा सांठलेला ढीग दिसत होता, आणि क्षणोक्षणीं त्यांत सारखी भरच पडत होती. याखेरीज भोंवतीं चहूं बाजूंना चिपाडें विखुरलेलीं होतीं, व त्यांच्या चिकटपणाची पर्वा न करतां कामकरी माणसें तीं खुशाल तुडवीत होतीं. शेतावरचीं भोळीभाबडीं राकट माणसें तीं, त्यांना त्या चिकटपणाचें आणि घाणीचें कांहींच वाटत नव्हतें. माझ्याच्यानें मात्र तेथें फार वेळ उभें राहवेना, म्हणून आम्ही तेथून पुढें गेलों.

चरकापासून थोड्याच अंतरावर काहिलींची जागा होती. भल्या मोठ्या चरावर चढविलेल्या काहिलींत रस कढत होता. चरांतील जाळ सारखा प्रदीप्त ठेवण्यासाठीं दोन तीन पोरें निकामी चोयट्यांच्या ढिगाऱ्यांतील चोयट्या काढून चरांत मधून मधून सारखीं फेंकीत होतीं. आम्ही तेथें गेलों तेव्हां एका काहिलींतील रस आटत आला होता. तेव्हां ती काहील खालीं उतरून ओतण्यासाठीं वीस पंचवीस कामकरी जमा झाले. काहिलीच्या दोन कड्यांतून एक भला मोठा वासा घालण्यांत आला, दहा बारा मजूर एका बाजूला व दहा बारा दुसऱ्या बाजूला उभे राहिले, व शेवटीं त्यांनीं मोठ्यांदां 'पुंडलीक वरदा हारिइट्टल' असा गजर करीत काहील चरावरून उतरून टाकली. बाकीच्या काहिलींतील रस अजून शिजतच होता. त्या रसाचा खदखदाट पाहून माझ्या मनांत आलें, कीं आपल्या अंगच्या रसाचें कढण करण्यासाठीं आपल्याच पिळवटलेल्या देहाची माणसानें आग भडकविलेली पाहून ऊंसाला काय वाटत असेल कोण जाणे! कांहीं वेळ आम्ही तेथें उभे राहिल्यावर महादू मला व शांताला उद्देशून म्हणाला,

"साहेब, आतां आपुन अन् श्येंताबाई वाइच पल्याडल्या झाडाखालीं दम घ्या. वर्दी आल्याबरबर म्यां तिथली जागा झाडून झटकून साप करून घेतली हय. आपून दोघं वाइच तथं ब्येका. मी अक्षी ताजा रस चरवीमंदी आनतों. शेर दोन शेर रस पिऊन वाइच इसावा घेतला, कीं लई ग्वाड वाटल पघा. हाः!"

"शेर दोन शेर रस?" मीं हंसून म्हटलें. "आम्ही शेर दोन शेर रस का पिणार आहोंत महादबा?"

यावर महादूहि हंसला आणि आपल्या मुलाकडे वळून त्यानें म्हटलें, " सुभान्या, ल्येका म्होरं हो, अन् साहेबास्नी तकडं न्ये पघूं ! अर बेट्या, माझ्या जनमूभर जशी म्यां बाबासायबाची चाकरी केली तशी तुला या सायबांची करायची हाये, ध्यानामंदी राहूं दे. अन् ह्ये बघ, साहेब जसं तुझं धनी तशा या श्र्येंताबाई तुझ्या मालकिणबाई व्हायाच्या हायता ! समजलांस ?" इतकें बोलून महादू मोठ्यानें मनापासून हंसला व मग माझ्याकडे वळून म्हणाला, " काय साहेब, माझ्या म्हाताऱ्याचं म्हननं खरं हाय ना ?"

काल रात्रीं आमच्या घरच्या मंडळींत जें बोलणें निघाल्यामुळें मी चपापलों होतों तेंच या म्हाताऱ्या नोकराच्या तोंडूनहि या वेळीं निघालेलें पाहून मला आश्चर्य वाटलें. शांताकडे वळलेली माझी दृष्टि मी दुसरीकडे फिरविली. मला कसेंसेंच वाटलें. मी गोंधळून गेलों. कांहींच न बोलतां झाडाच्या छायेंत जाण्यासाठीं मीं सुभान्याच्या मागोमाग चालूं लागलों.

आम्ही झाडाखालीं जाऊन बसल्यानंतर थोड्याच वेळानें महादू रसाची चरवी आणि दोन भांडीं घेऊन आला. चरवी व भांडीं आमच्यापुढें ठेवून तो म्हणाला, " साहेब, आपुन बसा वाइच इथं. मी अन् सुभान्या जाऊन घोडा जोडतों."

" बरं जा " असें मीं म्हटल्यावर दोघेहि तेथून गेले.

आतां संध्याकाळ जवळ आल्यामुळें सूर्य पश्चिम क्षितिजाकडे झुकला होता. त्याच्या प्रकाशांत तांबूस रंगाची छटा यावयास लागली होती. वारा बंधनांतून मोकळा झाल्याप्रमाणें जोरानें वाहात होता. वाऱ्यानें हेलकावे खाणाऱ्या वृक्षशाखांच्या झोंपाळ्यावर बसून चिमुकले पक्षी अस्तोन्मुख सूर्याकडे पाहून चिंव चिंव करीत होते. मधूनच वाऱ्याचा झोत आला, कीं मळ्यांतील काळ्या मातीबरोबर वाळलेल्या चिपाडांचा भुसा वर हवेंत उडून कांहीं वेळ त्या तांबूस सूर्यप्रकाशांत चकाकत होता.

त्या सुंदर देखाव्याची शोभा पाहात आणि ताज्या गोड रसाचें हलके हलके प्राशन करीत मी व शांता एकमेकांशीं बोलत होतों. मी शांताला म्हटलें, " आज संध्याकाळीं तूं व मी या ठिकाणीं रस पीत बसूं अशी तुला किंवा मला दोन दिवसांपूर्वीं काडीइतकी तरी कल्पना होती कां ?"

" आपल्या आयुष्यांतल्या बहुतेक गोष्टी अशाच योगायोगानें घडून येतात असं मला वाटतं. " शांता किंचित् गंभीरपणानें म्हणाली.

" मला नाहीं असं वाटत. " मीं तिचा सिद्धान्त खोडून काढण्याच्या हेतूनें म्हटलें.

" पुरुषांना कदाचित् तसं वाटायचं नाहीं. पण बायकांची गोष्ट निराळी आहे. त्यांना तसं वाटलं नाहीं तरच आश्चर्य आहे. "

" स्त्री-पुरुषांत हा भेद तुला काय म्हणून वाटतो ? " तिचें बोलणें न समजून मीं विचारलें.

" हा भेद आहे तर ! " आपल्या विचारांचा आग्रह धरून ती म्हणाली. " स्त्रीच्या आयुष्याचे धागे इतके लोकांच्या हातांत असतात कीं त्याची वीण कशी पडेल अन् कशी नाहीं तें कांहीं एक सांगतां यायचं नाहीं. मुली स्वतःच्या भावी आयुष्याविषयीं पुष्कळ गोष्टी आपल्या मनाशीं ठरवीत असता, पण त्याप्रमाणें— अगबाई, काय गेलं डोळ्यांत काय जणं ! "

शांता बोलत असतांना वाऱ्याचा सोसाटा येऊन माती व केर जोरानें उडाला, व तिच्या डोळ्यांत कांहीं तरी गेल्यामुळें तिनें दोन्ही डोळे मिटून हातांनीं झांकून धरले.

तिनें कांहीं वेळ डावा डोळा चोळून पाहिला; परंतु तो साफ होईना. तेव्हां मीं विचारलें, " फुंकर घालूं कां डोळ्यांत ? "

शांता कांहींच बोलली नाहीं. डाव्या हाताच्या मधल्या बोटानें ती डोळा सारखा चोळीत होती. तिच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा वाहूं लागलेल्या पाहून मीं म्हटलें, " थांब, चोळूं नकोस. मी फुंकर घालतों म्हणजे निघेल. "

असें म्हणून मी पुढें सरकलों आणि डावा हात तिच्या डोळ्याच्या वरच्या पापणीवर व उजवा खालच्या पापणीवर ठेऊन मीं तिचा डोळा उघडला. माझा स्पर्श होतांच तिचें सर्वांग थरारल्यासारखें मला वाटलें, आणि डोळ्यांत फुंकर घालण्यासाठीं मी जेव्हां तोंड पुढें केलें तेव्हां तिच्या दोन्ही डोळ्यांची दृष्टि माझ्या दृष्टीशीं भिडली व तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले. एकदां फुंकर घातल्याबरोबर " पुरे, पुरे " असें पुटपुटून तिनें आपलें मस्तक मागें घेतलें आणि " पण, डोळा साफ झाला का ? " असें

मी विचारतां " हो. झाला " असें म्हणून साफ न झालेला डोळा पुन्हां चोळण्यास प्रारंभ केला.

या एकंदर प्रकारानें मी फारच गोंधळून गेलों. माझ्या हाताच्या स्पर्शानें शांताच्या अंगावर रोमांच उभे राहावेत ही गोष्ट मला अत्यंत आश्चर्यकारक वाटली. काल रात्रीपासून लोकांच्या बोलण्यांत माझें व शांताचें जें नातें जोडलें जात होतें तेंच शांताच्याहि मनांत रुजलेलें होतें कीं काय? आज टांग्यांत बसलों असतांना व नंतरहि शांताच्या बोलण्याचालण्यांत तिच्या अंतःकरणांतील एका विशिष्ट भावनेची छटा उमटत असल्याचा मला जो तीन चार वेळां संशय आला होता तो खराच ठरू पाहात होता कीं काय? माझ्याविषयीं शांताच्या मनांत काय भावना होती? अरेरे, तें जर मला कळेल तर—अथवा, त्याविषयीं संशयाला विशेष जागा होती कोठें? झाल्या गोष्टीचा अर्थ काय कमी स्पष्ट होता?

३

आम्हांला मळ्यावरून निघावयास बरीच संध्याकाळ झाली. सूर्यास्त झाला होता आणि अस्तानंतरचा अंधुक उजेड काय तो आम्हांला वाट दाखवीत होता. आम्ही दोघेहि गाडींत बसल्यावर महादू मला म्हणाला,

" साहेब, गाडीला खंदील न्हाईत. घोडा लई अचपळ हये. वाइच जपूनश्यानी जाऊं द्या गाडी!"

" नेतों जपूनच. तूं काळजी करूं नकोस." मी म्हटलें आणि लगाम उचलून झेंड्याला इशारत दिली.

गाडी जरा संभाळून चालवावी लागत होती, तरी माझें आणि शांताचें बोलणें मधून मधून चाललेंच होतें. मीं शांताला विचारलें,

" आपल्या लहानपणीं उसाचा मळा इतका मोठा नव्हता; बाबांनीं अलीकडे उंसांत फार लक्ष घातलं आहे अन् गुऱ्हाळाची व्यवस्थाहि फार छान आहे, नाहीं?"

" एकंदर व्यवस्था मला फारच आवडली. काकांना एकंदरींत शेती बागायतीची फार हौस आहे."

" हं." एका खड्ड्याला वळसा घालून गाडी नेत मी म्हटलें.

" शेतवाडीवर राहणं तुम्हांला आवडतं का शहरांत राहणं आवडतं ?" शांतानें मला विचारलें.

" गेलीं पांच सहा वर्षें शहरांत राहून शहरांतल्या राहणीचीच मला पुरती चटक लागली आहे. " मीं किंचित् हंसून उत्तर दिलें. " मला जर कोणीं शेतवाडीवर राहून संसार करावयाला सांगितला तर तें माझ्या जिवावर येईल. वृंदावनास दहा पंधरा दिवस राहण्यांत मौज वाटते. पण शहर तें शहर ! तेथील मौज कांहीं निराळीच असणार ! "

" माझी रुचि निराळी आहे. " शांता म्हणाली. " शहरांतली राहणी माझ्या स्वभावाला विशेष पटत नाहीं. विलासगड खरं पाहिलं तर उत्तमां-तलं उत्तम शहर आहे. उत्तर हिंदुस्थानांतलीं सगळींच शहरं विलासी. पण त्यांतल्या त्यांत विलासगड नांवाप्रमाणेंच विलासांचें आगर आहे. तेथील कित्येक मंडळी अशी आहेत, कीं त्यांना बाहेर कुठेंहि एक दिवसभरसुद्धां चैन पडत नाहीं. पण मला त्या शहराचा कंटाळा आला होता. माझा जीव जसा कांहीं उबून गेला होता, अन् तेथून एकदांचा पाय काढण्यासाठीं आईमागं मी सारखा लकडा लावला होता. फार तर दहा पंधरा दिवस मजेखातर शहरांत जावं अन् कायमचं राहणं वृंदावनासारख्या एखाद्या शांत बागायतीच्या ठिकाणीं असावं असं मला नेहमीं वाटतं. शहरांतलीं ती कृत्रिम राहणी ! शहरांतल्या स्वातंत्र्यानं माणसाला काय काय चाळे सुचतील त्याचा कांहीं नेम नसतो. "

शांतानें तें शेवटचें वाक्य सहजासहजीं उच्चारलें होतें यांत संशय नाहीं; परंतु मला तें वाक्य थोडेसें बोचल्याखेरीज राहिलें नाहीं. माझ्या आयुष्याची घडी बिघडविण्यास शहरांतील स्वातंत्र्यच कारण झालें होतें. त्या स्वातंत्र्या-मुळेंच मीं आबासाहेब, बाळासाहेब वगैरे कुचकामाच्या माणसांची संगती धरली होती; आणि माझें व माणिकचें प्रेम माझ्या स्वतःच्या मनाला कितीहि पूज्य आणि पवित्र वाटत असलें तरी चार चौघांच्या दृष्टीनें त्या प्रेमाला ' शहरांतील स्वातंत्र्यानें सुचविलेले चाळे ' हेंच नांव मिळालें असतें. या सर्व गोष्टी निमिषार्धांत मनांत येऊन शांताचें साधें वाक्य मला शल्या-सारखें टोचलें. किंचित् काळपर्यंत मीं गप्प बसलों. परंतु, मनुष्यस्वभाव किती विचित्र आहे ! त्यानें मला स्वस्थ बसूं दिलें नाहीं. मला टोंचण्या-

सारखें वाक्य शांता बोलली तेव्हां आपणहि कांहीं तरी बोलून तिला दुखवावें असें मनांत येऊन मीं म्हटलें,

" तुला खेड्यावर राह्यची इतकी आवड आहे तर आतां एखादा खेडवळ नवराच मिळव म्हणजे झालं ! "

मला वाटलें होतें माझें वाक्य शांताला रुचणार नाहीं व ती कांहीं न बोलतां स्तब्ध राहील. परंतु तसें कांहीं झालें नाहीं, उलट, किंचित् गंभीर-पणानें ती म्हणाली,

" माझी आवड पुष्कळ आहे, पण माझ्या मनाजोगतं होण्याइतकं माझं दैव असलं पाहिजे ना ! "

मीं सोडलेला बाण माझ्यावरच उलटल्यासारखें मला वाटलें. मला उद्देशूनच शांता तें वाक्य बोलली कीं काय, असा मला संशय आला. पुढें बोलणें वाढविणें बरें नव्हे असा विचार करून मी स्वस्थ बसलों. शांताहि कांहीं बोलली नाहीं.

जरा वेळानें शांतानें विचारलें, " आतां पुण्यास केव्हां जाणार ? "

" खरं म्हटलं तर आजच जायची माझी इच्छा होती. पण काकांच्या आग्रहापुढं माझं कांहीं चालेना म्हणून राहावं लागलं. उद्यांचा दिवस राहून परवां जावं झालं. " मी म्हटलें. इतक्यांत शांताच्या दैवयोगावरील विश्वासाची थोडी थट्टा करावी असें मनांत येऊन मी पुढें म्हणालों, " बाकी, परवां जायचं असं मी आपल्या मनाशीं म्हणतों आहे इतकंच. योगायोग काय असेल तो खरा ! "

माझ्या वाक्यांतील चेष्टेची खोंच शांताच्या लक्षांत आल्यावांचून राहिली नाहीं. ती म्हणाली, " माझी चेष्टा चालली आहे हें मला समजतं. पण, खरोखरच योगायोगाचा प्रत्यय यायचाच असेल तर या बाबतींतसुद्धां येईल, अन् कांहीं तरी कारण घडून जाणं लांबणीवर पडेल. बाकी माझ्या— अगबाई हें काय ? "

आमचा झेंड्या धांवतां धांवतां एकदम चमकून उभा राहिला होता, व म्हणूनच शांताच्या तोंडून साश्चर्य भीतीचा तो उद्गार बाहेर पडला. आमची गाडी या वेळीं एका लहानशा नाल्याच्या पुलावर आलेली होती. चार पांच हातांवरचा रस्ता काय तो स्पष्ट दिसत होता. सूर्य पुरता मावळला असल्या-

मुळें आणि वद्य प्रतिपदेचा चंद्र उगवावयास अर्धी घटका अवकाश असल्या-मुळें झाडाझुडपांच्या काळ्या सांवळ्या सावल्याखेरीज दूर अंतरावर कांहींच दिसत नव्हतें. बाकी, असें असलें तरी रस्ता झेंड्याच्या पायाखालचा होता. उजेडांत नव्हे तर अंधारांतहि या रस्त्यानें झेंड्या हजारों वेळां गाडी घेऊन गेला आला होता. असें असल्यामुळें तो एकाएकीं बिचकून कां उभा राहिला, तें मला समजेना. मीं लगाम हिसकला आणि त्याला चुचकारून म्हटलें,

"कां रे झेंड्या, काय झालं?"

जणूं काय माझ्या प्रश्नाचा अर्थ समजून त्याला उत्तर द्यावयाच्या हेतूनें झेंड्या एकदां मोठ्यांदा फुरफुरला, त्यानें मानेला मोठा हिसडा दिला, आणि शेपटी जोरानें वर खालीं केली.

त्याच्या उत्तराचा अर्थ मला समजणें शक्य नव्हतें. एखाद्या झाडाच्या सांवलीला पाहून तो चमकला असेल, असें वाटून मीं पुन्हा एकदां लगामाला हिसका दिला व चुचकारून त्याला चालविण्याचा प्रयत्न केला. परंतु पुढें पाऊल टाकण्याची त्याची इच्छा नव्हती. मी त्याच्यावर करीत असलेल्या सक्तीविरुद्ध तक्रार म्हणून तो मोठ्यानें खिंकाळला, आणि पुढें जाण्याऐवजीं तीन चार पावलें खरडत मागें सरकला.

"उतरायला पाहिजे का?" भीतियुक्त स्वरानें शांतानें विचारलें. मला घोडा आवरतां येत नाहीं म्हणून शांतानें उतरावें ही गोष्ट मला पटणें शक्य नव्हतें. "छे! कांहीं नको!" असें शांताला म्हणून मी झेंड्याला,

"झेंड्या, चल!-- च् च्!"

असें जोरानें दरडाविलें आणि चाबकाचा एक फटकारा लगावून लगाम खेंचला. पण पुढें जावयाचें नाहीं असें झेंड्यानें साफ ठरविलें होतें असें दिसलें. मागें सरकावयाचेंहि त्यानें सोडून दिलें. तो जागच्या जागींच पुढचे दोन पाय उभारूं लागला. हें पाहून मी अधिकच चिडलों आणि रागारागानें तीन चार चाबकाचे फटके त्याच्या अंगावर जोरानें ओढले. ज्याला फार तर चाबकाचा एखादा इशारा कधीं काळीं मिळावयाचा, त्या झेंड्याला चाबकाचे चार फटके असह्य झाले. त्यानें एकदम गाडी भरवेगानें ओढली. मात्र रस्त्यानें सरळ जाण्याऐवजीं पुलाच्या भिंतींच्या बाजूला नाल्याकडे त्यानें धांव

घेतली. गाडी आतां पुलावरून जाणार असें वाटून मीं लगाम खूप खेंचला. पण, भडकलेल्या झेंड्यापुढें माझें काय चालणार ! आतां खालीं उडी टाकणेंहि अशक्य होतें. शक्तिसर्वस्व खर्चून मीं लगाम ओढून धरला. घट्ट धरून बसण्याविषयीं मीं शांताला बजावलें. ती फारच घाबरली. तिनें माझ्या कमरे-भोंवतीं घट्ट विळखा घातला, आणि मस्तक माझ्या डाव्या खांद्यावर ठेवलें. तिचे हात थरथर कांपत होते. भीतीनें तिनें अर्धस्फुट किंकाळी फोडली पण ती मलादेखील स्पष्ट ऐकूं आली नाहीं. निमिषार्धांत पुलाच्या भिंतीवर आमच्या गाडीचा आघात झाला.

धाड् ! धडाड् ! धडड ! खाड् ! खाड् !

टांग्याचा आघात आणि झेंड्याच्या टापांचा तो आवाज मला अस्पष्टपणें ऐकूं आला. आमची गाडी नाल्यांत जाऊन पडतांना माझ्या पोटांत धस्स् झालें. मी लगाम ओढला. पण लगाम तोडून झेंड्या मोकळा झाला होता. तो कोठें होता तें मला दिसलें नाहीं. त्यानें मोठ्यांदा केलेली खिंकाळी मात्र मी ऐकतों न ऐकतों इतक्यांत आमची गाडी पुरती कोसळली ! धडाड् ! धाड् ! धाड् !

४

त्या दिवशीची रात्र सर्वांनाच अतिशय काळजीची गेली. मला फारशी दुखापत झाली नव्हती. शांतालाहि कांहीं भयंकर दुखापत झाली होती असें नव्हे. परंतु, प्रत्यक्ष दुखापत नसली तरी स्त्रीस्वभावानुसार ती अतिशय भेदरून गेली होती. त्यामुळें तिला फरा ताप आला होता, व त्या तापाबद्दलच आम्हां सर्वांना काळजी वाटत होती. ती नीट शुद्धीवर नव्हती, व मधूनच कांहीं तरी बडबड करी. रात्रभर तिच्या मेंदूला कोणताहि शीण होऊं देतां कामा नये व तिचें मस्तक शक्य तितकें थंड ठेवलें पाहिजे, असें डॉक्टरांनीं बजावलें होतें.

मध्यरात्र उलटून गेल्यावर शांताचा थोडासा डोळा लागला. इतका वेळ आम्ही सर्वजण तिच्या अंथरुणाभोंवतीं जागत बसलों होतों. पण तिला किंचित् झोप लागलेली पाहून काका आणि बाबा उठून गेले. “ तुम्ही आतां जरा निजा ” असें मीं आईला आणि काकूंना म्हटलें. परंतु त्यांचा जीव कोठला स्वस्थ राहावयाला ? त्या दोघी तशाच ताटकळत तेथें बसल्या.

काकूंना मध्येंच एखादी डुलकी येई. आई मात्र काडवाती कीं कसल्याशा वाती करीत बसल्यामुळें सारखी जागी होती.

जरा वेळानें शांताच्या कपाळावरची कोलन वाटरची गार पट्टी सुकली असें वाटल्यावरून मी उठलों आणि दुसरा हातरुमाल घेऊन त्याची पट्टी तयार केली. नंतर हलकेंच शांताच्या कपाळावरची पहिली पट्टी मीं काढली व दुसरी ठेवण्याच्या बेतांत होतों, इतक्यांत—

ती जागी झाली. तिनें डोळे उघडले व मंद दृष्टीनें माझ्याकडे निरखून पाहिलें. तेवढ्या चार तासांच्याच आजारानें तिच्या तोंडावरची कांति नाहींशी झाली होती. तिच्या दृष्टींतील नेहमीची चमक लोपून तींत एक प्रकारचा विगलितपणा आला होता. घडी ठेवण्यांत गुंतलेला माझा हात धरण्याचा प्रयत्न करून माझ्याकडे करुण दृष्टीनें पाहात ती हलकेच म्हणाली,

" मी कदाचित् या दुखण्यांत मरूनहि जाईन...मीं एक अपराध केला होता...तुमची परवानगी न घेतां ...तुमच्या नकळत माझं हृदय मीं... तुमच्याजवळ ठेव म्हणून ठेवलं होतं...क्षमा करा...अं ! अग आई ! "

ते तिचे शब्द ऐकून मी स्तंभितच झालों. तिनें आपले डोळे मिटले. बोलण्याच्या त्रासामुळें तिचा वक्षप्रदेश जोरानें वर खालीं होत होता. तिच्या कपाळावर घडी ठेवून माझा हात जसाच्या तसाच त्या ठिकाणीं राहिला. शून्य दृष्टीनें आणि शून्य मनानें तिच्या सुकलेल्या चेहऱ्याकडे मी पाहात राहिलों.

"हं: ! " असें म्हणून मी एक सुस्कारा सोडला.

आईनें माझ्याकडे वळून मला विचारलें,

" कायरे जगदीश, शांता जागी झाली का काय? काय म्हणत होती? "

शांता काय म्हणत होती तें मी कसें सांगणार !

मी नुसतें म्हटलें " कांहीं नाहीं. "

आई पुन्हां वाती करूं लागली.

प्रकरण चवथें

प्रेमांत बिब्बा

१ शांताच्या दुखण्यामुळें माझें पुण्यास परत जाणें आणखी चार पांच दिवसांनीं लांबलें. एकीकडे पुण्यास जाऊन माणिकला भेटण्यासाठीं माझा जीव तळमळत होता, आणि दुसरीकडे शांता अशी आजारी असतांना कोणत्याहि सबबीवर पुण्यास जाणें चांगलें दिसणार नाहीं असें माझें मन मला शिकवीत होतें. प्रेमाच्या आकर्षणापेक्षां विवेकाची शिकवण बलिष्ठ ठरण्यासारखी त्या वेळची परिस्थिति असल्यामुळें मी वृंदावनासच आणखी पांच दिवस राहिलों. शांताच्या औषधपाण्याची व्यवस्था पाहण्याखेरीज वृंदावनास मला दुसरा कांहीं विशेष उद्योग नव्हता, आणि तिच्या दुखण्याचें भीतिदायक स्वरूप दुसऱ्या दिवसापासून बहुतांशीं नाहींसें झाल्यामुळें तिच्या शुश्रूषेंत फार वेळ घालविण्याची आवश्यकता उरलेली नव्हती. त्या पांच दिवसांत मीं माणिकला पांच लांबलचक पत्रें लिहिलीं. एके दिवशीं तर विरहदुःख शमविण्यासाठीं मीं लागोपाठ दोन पत्रें लिहिलीं. पण एकाच दिवसांत दोन प्रेमपत्रिका लिहिण्याची हौस कादंबरींतील नायकाला कितीहि शोभली तरी प्रत्यक्ष व्यवहारांत तिचें हंसें झाल्यावांचून राहणार नाहीं अशी शंका मनांत येऊन दुसरें पत्र पोस्टांत न टाकतां मीं फाडून टाकलें.

एका गोष्टीची मात्र माझ्या मनाला फार रुखरुख लागून राहिली होती. या आठ दिवसांत माणिककडून मला एकहि पत्र आलें नव्हतें ! माझें पहिलें पत्र पोंचल्यानंतर ताबडतोब पत्र लिहून माणिक आपल्या प्रेमाची अप्रत्यक्ष साक्ष पटवील अशी माझी कल्पना होती. माझ्या पत्राचें तिच्याकडून ताबडतोब उत्तर न आलेलें पाहून माझी बरीच निराशा झाली. पण, प्रेमाच्या

बाबतींत का होईना, एखादी गोष्ट अगदीं वेळच्या वेळीं माणिकनें केल्यावर तिच्या स्वभावांतील वैशिष्ट्य तें काय उरलें, असा विचार करून मी आपल्या मनाचें समाधान करून घेतलें. मात्र माझी तीन चार पत्रें गेल्या-नंतरहि जेव्हां माणिककडून पत्र आलें नाहीं तेव्हां माझ्या निराशेचें शमन करण्यासारखा कोणताच विचार मला सुचेना. रोज सकाळीं मोठ्या उत्सुकतेनें "दिवाणजी, माझें पत्र आहे का?" असें मीं विचारावयाचें व दिवाणजींनीं नुसती नकारार्थी मान हलवावयाची हा प्रकार तीन चार दिवस लागोपाठ झाल्यामुळें माझें मन इतकें अस्वस्थ झालें, कीं बाबांच्यादेखील ती गोष्ट लक्षांत आली, व त्यांनीं मला विचारलें,

"जगदीश, इतकी कोणाच्या पत्राची प्रतीक्षा करतो आहेस?"

"छे! आपलं सहज विचारलं एखाद्या स्नेह्याचं पत्र आलं असलं तर?" अंतःकरणांतील भावनांची गर्दी मोठ्या शिकस्तीनें लपवून मीं कसेंबसें उत्तर दिलें.

बाबा माझ्या नाटकी उत्तरानें फसले कीं नाहीं कोण जाणे! एकदा माझ्या मनांत आलें माणिक आजारी तर नसेल? पण तें विशेष शक्य दिसेना. कारण, मी ज्या दिवशीं पुण्याहून निघालों त्या दिवशीं तिची प्रकृति चांगली होती. माणिकची एकंदर तब्येत जरी अगदीं उत्तमांतील नव्हती तरी अगदीं पत्रदेखील न लिहिण्याइतकी ती एक दोन दिवसांत बिघडण्याचाहि फारसा संभव नव्हता. पण पुन्हा मनांत आलें, कीं त्याचा काय नियम? शांता नाहीं का एकाएकीं इतकी आजारी पडली? तसेंच कांहीं—पण तो विचार मला असह्य वाटला. पुन्हा एकदा वाटलें, कीं माणिक एखाद्या गांवाला तर गेली नसेल? पण त्याचीहि फारशी शक्यता नव्हती. कारण मी पुण्यास होतों तोंपर्यंत तिचा कांहीं बेत झालेला नव्हता. तथापि ती गांवाला गेलीच नसेल असें तरी निश्चित कसें म्हणावें अशी माझ्या मनांत शंका आली. डॉक्टर मालतीबाईंनीं एखाद्या सफरीचा बेत अवचित केला असला, आणि माणिक त्यांच्याबरोबर गेली असली तर?—

अशा प्रकारें माणिकच्या मूकवृत्तीचा खुलासा या मार्गानें नाहीं तर त्या मार्गानें आपला आपल्याशींच करण्यांत माझे दिवस गेले. शेवटीं माझा पुण्यास परत जाण्याचा दिवस उजाडला. सकाळीं चहा प्याल्यानंतर मी

थोडा फिरावयास गेलों. फिरत असतांनासुद्धां आतां परत गेल्याबरोबर आपण माणिकची भेट घेऊं, तिच्यावर असें रागावूं, तसें रुसूं, तिला असें बोलूं, तसें बोलूं, अशा प्रकारचे माणिकविषयींचेच विचार माझ्या मनांत घोळत होते. घरीं परत आलों तों ओसरीवरील बांकावर बाबा आणि काका बोलत बसले होते, आणि दिवाणजी नुकत्याच आलेल्या टपालाची निवड करीत होते. तें पाहतांच बाबा तेथें बसले होते त्याचें भान न राहून मीं दिवाणजींना पायऱ्या चढत चढत विचारलें.

" काय दिवाणजी, आज तरी माझं पत्र आहे का ? "

" हें एक दिसतंय् " असें म्हणून दिवाणजींनीं माझ्या हातांत एक लहानसें पाकिट दिलें.

पाकिटावरचें अक्षर माणिकचेंच होतें खास ! मी जो तडक निघालों तों जिन्याच्या दोन दोन पायऱ्या चढत खोलींत शिरलों, दाराला कडी लावली, आणि हातांतील फिरावयास जातांना घ्यावयाची काठी कोंपऱ्यांत फेंकून आरामखुर्चीवर अंग टाकीत मनाशी म्हटलें,

" माझी माणिक ! पत्र लिहिल्यावांचून ती राह्यची नाहीं ! "

पत्त्याचें अक्षर निष्काळजीपणानें खरडलेलें होतें. माणिकचा स्वभाव त्या अक्षरांत पूर्ण प्रतिबिंबित झाला होता असें मला वाटलें. पाकिटावरील अक्षर वाईट होतें, पण पाकीट अगदीं उत्तम कागदाचें आणि सुगंधयुक्त होतें. फॅशनच्या बाबतींत माणिक उणें पडूं द्यावयाची नाहीं ! मीं एकदोनदा त्या पाकिटाचा वास घेतला, आणि तीन चार वेळां त्याचें चुंबन घेऊन तें पाकीट हृदयाशीं धरलें. माझ्या हृदयदेवतेचें पत्र होतें तें ! तें मला किती प्रिय होतें त्याची वाचकांस यथातथ्य कल्पना आणून देणारे शब्दच भाषेच्या भांडारांत सांपडावयाचे नाहींत. अगदीं नाजूक हातानें पत्र फोडून मी वाचूं लागलों—

" सा. न. वि. वि.—"

काय ! सा. न. वि. वि. ! माणिकनें मला धाडलेल्या पत्राचा हा प्रारंभ ! मीं डोळे चोळून पुन्हा त्या अक्षरांकडे टवकारून पाहिलें. तींच अक्षरें होतीं. एकदम मस्तकावर प्रहार व्हावा त्याप्रमाणें माझा मेंदू बधिर झाला. शून्य मनानें खालील मजकुरावरून मीं कशीबशी दृष्टि फिरविली—

" आपलीं पत्राचीं सगळीं भेंडोळीं पोंचलीं. वृंदावनास जाऊन आपण काय करीत बसलां आहांत हें मला समजत का नाहीं? तुम्ही पुरुष असेच गळे कापणारे! माझा कापलांत इतका गळा पुरे. आतां आणखी खोट्या प्रेमाचं नाटक चालू ठेवण्याचा शीण तुम्हीहि घेऊं नका, अन् बघण्याचा शीण मलाहि देऊं नका! इतके दिवस मीं पत्र पाठविलें नाहीं त्याचं कारण तुमची करणी मला कळली होती हेंच.

माणिक "

तो मजकूर वाचून माझ्या मनाची काय स्थिति झाली असेल त्याची वाचकांनींच कल्पना करावी. माझें मन इतकें बावरून गेलें, कीं त्या वाक्यांचा अर्थ माझ्या ध्यानांत पुरता आला कीं नाहीं अशीहि शंका माझ्या मनांत क्षणभर येऊन गेली. एखाद्या श्वापदाला शिकाऱ्यानें भाल्यानें पुनःपुन्हा भोंसकावें त्याप्रमाणें त्या पत्रांतील प्रत्येक वाक्यानें माझें अंतःकरण घायाळ केलें. पत्रांतील मजकुराचा अभिप्राय मला समजला; पण माणिकनें असें पत्र मला लिहिण्यासारखें माझ्या हातून काय झालें त्याचा मला कांहीं केल्या उलगडा होईना. मीं तिचा गळा कापला? मीं खोट्या प्रेमाचें नाटक केलें? हीं वाक्यें माणिकनें मला काय म्हणून लिहावीं? पत्र पुनःपुन्हा वाचूनदेखील या प्रश्नांचें उत्तर मला सुचलें नाहीं. " वृंदावनास जाऊन आपण काय करीत बसलां आहांत तें मला समजत का नाहीं?" माणिकच्या या वाक्याचा अर्थ तरी काय? मीं वृंदावनास येऊन काय केलें? मी तिला घडिभर तरी विसरलों होतों काय? तिला पत्र धाडण्यांत यत्किंचित् तरी हेळसांड केली होती काय? मग तिनें असें कां लिहावें? येऊन जाऊन मी जास्त दिवस वृंदावनास राहिलों एवढाच काय तो माझा अपराध होता. पण मला कां राहावें लागलें तें मीं स्पष्टपणें आणि सविस्तरपणें माणिकला कळविलेंच होतें! असें असतांना तिनें या आपल्या पत्राचा आघात माझ्यावर काय म्हणून करावा?—

मला कांहींच सुचेना. हजारों अस्पष्ट कल्पना डोक्यांत उसळत होत्या. मस्तकाच्या शिरांतून रक्त इतकें आवेशानें वर चढत होतें, कीं त्याचा सळसळ असा आवाज कानांना स्पष्ट ऐकूं येत होता. डोळ्यांपुढें प्रकाशाच्या आडव्या

उभ्या रेषा नाचत होत्या आणि हातांतील पत्रावरील अक्षरें रेघोट्यांच्या गर्दीसारखी वाढत होतीं. तोंडाला कोरड पडली होती. एक अक्षर उच्चारण्या-इतकीदेखील शक्ति जिव्हेंत उरली नव्हती. थंडीच्या दिवसांत दाट धुकें पडून सारा प्रदेश दृष्टीला अगम्य व्हावा त्याप्रमाणें अनेक भावनांच्या दाट धुक्यांत माझ्या मनांतील कोणताच विचार माझा मलाच स्पष्ट कळेनासा झाला होता. मनाचें चक्र मात्र भयंकर वेगानें फिरत होतें, आणि चाकू-कात्रीला धार देणाऱ्या काबुली परदेशाच्या फिरत्या चाकांतून ज्याप्रमाणें लाखों ठिणग्या उडून अदृश्य होतात, तद्वत् असंख्य विचार उद्भवून विलीन होत होते.

कांहीं वेळानें मात्र एक कल्पना मनामध्यें अधिकाधिक स्पष्ट आणि दृढ होऊं लागली. बाळासाहेब व आबासाहेब यांनीं–विशेषतः आबासाहेबानें–माझ्याविषयीं कांहीं खोट्यानाट्या गोष्टी माणिकच्या मनांत भरवून तिचें मन माझ्याविषयीं कलुषित केलें असलें पाहिजे अशी मला शंका आली आणि मी जों जों अधिक विचार करूं लागलों तों तों हीच शंका मनाला जास्त पटूं लागली. माझें व माणिकचें प्रेम जमत चाललेलें पाहून त्या दोघांनाहि वैषम्य वाटत असलें पाहिजे हें आज कित्येक दिवसांपासून मीं ओळखून ठेविलें होतें. त्यांची असूयाबुद्धि केव्हां काय करील याचा नियम नाहीं, हेंहि मी जाणून होतों. पण, माणिकला सोडून मी आज पांच सहा महिन्यांत दूरच झालों नव्हतों तेव्हां त्यांना नुसतें हात चोळीत स्वस्थ बसावें लागलें होतें. माझ्या हजिरींत जें त्यांना करतां आलें नाहीं तें त्यांनीं माझ्या गैरहजिरींत साधून घेतलें असलें पाहिजे, असें आतां मला वाटूं लागलें. या विचारानें माणिकच्या पत्राचाहि उलगडा होऊं लागला, आणि तोच विचार माझ्या मनाला सर्व दृष्टीनें पटला. त्या विचारानें मला एक प्रकारचा धीर आल्यासारखें झालें. मीं मनाशीं म्हटलें—

“ आबासाहेबाच्या दुष्टाव्याला बळी पडून जर माणिकनं हें असलं पत्र लिहिलं असलं तर मला फारसं भिऊन जायचं कारण नाहीं. तिच्या मनांतला गैरसमज घालवायला मी पुरता समर्थ आहें. माणिकच्या भावनाप्रधान अन् चंचल स्वभावाचा फायदा घेऊन आबासाहेबानं तिच्या कानांत विष ओतलेलं दिसतंय्. पण हरकत नाहीं. आतां पुण्यास गेल्यावर तें विष उतरावयला कितीसा उशीर ? ”

अशा प्रकारें मीं माझ्या मनाला धीर दिला खरा; परंतु पुनःपुन्हा वाटे, कीं माणिक कितपत बिथरून गेली आहे कोण जाणे! माणिक म्हणजे विलक्षण तापट स्वभावाची मुलगी होती. तिची समजावणी करणें म्हणजे कांहीं सामान्य सोपी गोष्ट नव्हती. आणि शिवाय माझ्या मनांत वारंवार असेंहि येत होतें, कीं आबासाहेबाच्या नीचपणाखेरीज दुसरेंच कांहीं कारण घडलें असलें तर? मालतीबाईनींच माझ्याविरुद्ध माणिकला कांहीं सांगितलें असलें तर? किंवा, माझ्या पत्रांतील शांताविषयींच्या मजकुराचा माणिकनेंच कांहीं भलता विपर्यास करून घेतला असला तर? छे! असें व्हावयाचें नाहीं. माझ्या पत्रांत असा कांहींच मजकूर नव्हता. थांबा, काय बरें मीं लिहिलें होतें पत्रांत?

मीं माझीं सारीं पत्रें शब्दशः आठवून पाहिलीं. पण धड कांहींच आठवेना.

त्या मनःस्थितींत मी किती वेळ बसलों होतों कोण जाणे! पण, मी पुष्कळ वेळ बसलों असलों पाहिजे. कारण खोलीच्या दारावर थाप पडल्यामुळें मी माझ्या विचारांतून जों जागा झालों तो माझ्या खोलींतील घड्याळांत अकराचे ठोके पडले. दारावर थाप पुन्हां वाजली.

"साहेब, अंघोळीला येणार ना!"

आमच्या सदू ब्राह्मणाचा तो आवाज होता.

"काय रे सदू?" त्यानें काय म्हटलें तें ऐकावयास आलें असूनहि त्रासाच्या स्वरानें मीं विचारलें.

"अंघोळ करणार ना? पाणी उपसूं का?" त्यानें पुन्हा विचारलें.

"मला नाहीं करायची अंघोळ!" कपाळाला आंठ्या घालून मीं सांगितलें. सदू कांहींच न बोलतां निघून गेला.

जरा वेळ मी आरामखुर्चींत तसाच पडून राहिलों. सदूला दिलेल्या त्रासिक उत्तराचा माझा मलाच पश्चात्ताप वाटूं लागला. माझे त्रासिक शब्द ऐकून बिचाऱ्याला वाईट वाटलें असेल. त्याचा कांहींहि अपराध नसतांना त्याला मीं दुखविलें हें मनांत येऊन मला वाईट वाटलें. जगांत असेंच वड्याचें तेल वांग्यांवर निघत असतें!

मी उठलों आणि हलकेच जिना उतरून खालीं गेलों. माजघरांत काका,

बाबा, दिवाणजी आणि शांता पाटांवर बसलीं होतीं आणि आई ताटें मांडीत होती. मी माजघरांत शिरणार इतक्यांत माझ्याविषयींचेंच बोलणें चाललेलें माझ्या कांनीं आलें म्हणून मी तसाच थबकून उभा राहिलों.

" जगदीशला अंघोळ न करायला काय झालं ? " आईनें विचारलें.

" मला वाटतं त्यांचं डोकंबिकं खूब दुखत असावं." सदूनें उत्तर दिलें.

" पण, सकाळीं फिरायला गेला तेव्हां कांहींसुद्धां बोलला नाहीं माझ्या-जवळ. फिरून आल्यावर मात्र कुठें दिसला नाहीं ! "

" फिरून आल्यावर त्यांच्या नांवाचें एक पत्र मीं त्यांच्या हातीं दिलं. तें पत्र घेऊन घाईघाईनें ते वर गेले अन् पुन्हा कांहीं खालीं उतरले नाहींत ! " दिवाणजींनीं आपली माहिती सांगितली.

" पत्र ? ही पत्राची भानगड काय आहे ? " बाबा म्हणाले, " आज पांच सहा दिवस तो एका पत्राची सारखी वाट पाहतो आहे. तेंच तें पत्र असेल. दिवाणजी, कोणाचं पत्र होतं तें ? "

दिवाणजी थोडे घुटमळले व म्हणाले, " वरच्या अक्षरावरून एखाद्या स्त्रीचं पत्र असावंसं वाटलं मला ! "

" इश्श " आई म्हणाली.

" अरे काय तुम्ही तर्कवितर्क करीत बसलां रे ! " काका मध्येंच म्हणालें, " सहज पोराचं डोकंबिकं चढलं असेल अन् तो नसेल करीत अंघोळ. त्याच्यावर काय या तुमच्या कल्पना ! जा रे सदू, अन् बोलाव जगदीशला. म्हणावं पानं मांडलीं, चल."

पत्रामुळें माझें मनःस्वास्थ्य नाहींसें झाल्याची शंका बाबांना किंवा इतरांना यावी हें मला मुळींच इष्ट वाटण्यासारखें नव्हतें. म्हणून मी ताबडतोब आपली वृत्ति बदलली. सदूकडून पाणी उपसून घेऊन मी झटपट अंघोळहि केली, आणि नेहमीच्या आनंदी वृत्तीनें सगळें वाढप होण्याच्या आधींच पानावरहि येऊन बसलों. मी आज पुण्यास जाणार म्हणून आईनें श्रीखंड केलें होतें. त्याची व इतर पदार्थांची मीं पुष्कळ स्तुति केल्यामुळें आईच्या मुद्रेवरची माझ्याविषयींच्या चिंतेची छटा तर पार नाहींशी झालेली मला स्पष्टच दिसली. बाबांच्या व काकांच्या गप्पांतहि मी बराचसा सामील झाल्यामुळें त्यांच्या मनांतील संशयहि दूर झाले असावेतसे मला वाटलें.

माझा आनंदाचा आणि उल्हासाचा अभिनय वाजवीपेक्षां अधिक झाला कीं काय कोण जाणे ! कारण, शांतानें एकदोन वेळां माझ्याकडे कांहीं विचित्र दृष्टीनें पाहून मंद हास्य केलें. तें हास्य आणि ती दृष्टि पाहून मात्र माझ्या खोट्या आनंदाची ज्योत क्षणभर पार मालविल्यासारखी झाली. पण मीं मनाशीं म्हटलें, " अभिनय म्हटला, कीं तो वाजवीपेक्षां थोडासा अधिक असायचाच ! अगदीं धंदेवाईक नटांत तरी असा नट कुठें आहे, कीं त्याचा अभिनय अगदीं कांटेतोल राहील ! "

जेवण झाल्यावर मीं आईला म्हटलें, " आई, मला विडा खायचा आहे."

" अरे वा ! " आई आश्चर्य करून हंसत म्हणाली, " आज विडा खायची लहर कोठून लागली साहेबांची ! "

मी नुसता हंसलों. आईला आनंदित करण्यासाठीं विडा खाण्याची इच्छा मीं प्रदर्शित केली होती.

" मग वर जा कीं ! " आई पुढें म्हणाली, " आज सकाळीं पानमळ्यांतून आलेलीं ताजीं पानं स्वतःच्या डब्यांत भरून ठेवलीं आहेत. वर जाऊन– "

" छे " मी मध्येंच म्हटलें, " आम्हांला बाबांच्या डब्यांतलीं पानं नकोत. तुझा निराळा डबा खालीं असतो ना ? त्यांतल्या पानांचा विडा आम्हांला द्या. "

आईनें काकूंकडे पाहात म्हटलें, " पाहा हो हा द्वाडपणा. माझ्याच डब्यातलीं पानं याला पाहिजे आहेत ! शांता, तुझ्या अंथरुणाच्या उशाशीं मीं सकाळीं डबा ठेवला आहे. जा बाई, दे त्याला विडा करून ! "

मीं व शांता तिचें अंथरूण ज्या खोलींत होतें तेथें गेलों. तिनें डब्यांतून चार कळीदार पानें काढलीं आणि विडा करीत म्हटलें, " पण माझ्या विड्याला शहरांतल्या विड्याची चव नाहीं हो येणार ! "

तिच्या बोलण्यांतली खोंच मला कळली; पण मीं नुसतें हंसून म्हटलें, " हं ! चालेल नसली तरी ! "

विडा खातां खातां मीं म्हटलें, " आज जाणार मी पुण्यास. "

" ठीक. माझ्या दुखण्यामुळं चार पांच दिवस उगच राहावं लागलं ना ? "

" हं ! त्यांत काय मोठं ! "

कांहीं वेळानें तिनें मला विचारलें, " पत्र पाठविण्याचं वचन पाळणार कां ? "

" हो, वाः ! इतका का मी वचनाचा खोटा आहे ? "

" तसं नाहीं. पण आपलं म्हटलं–"

कोणत्या शब्दांनीं ती तें वाक्य पुरें करणार होती कोणास ठाऊक ! जरा ती स्तब्ध बसली. व नंतर ती अडखळत म्हणाली,

" मी एक गोष्ट विचारणार आहें. विचारूं का ? "

" हो. विचार कीं. "

" विचारूं ? राग नाहीं ना माझा यायचा ? "

" राग कसला त्यांत ? "

" विचारूं ? "

" अगदीं खुशाल. "

" आज सकाळीं कुठलं पत्र येऊन—"

" उंः ! कांहीं तरीच ? " तिचें वाक्य पुरें होऊं न देतांच मीं एकदम म्हटलें, " आमचे बाबा तर्क करणार, दिवाणजी त्यांत भर घालणार, अन् तुम्ही सगळीजणं ऐकणार ! सगळंच मुळीं हें ! "

तिनें माझ्याकडे कांहीं विचित्र दृष्टीनें निरखून पाहिलें. तिच्या भेदक दृष्टीच्या अंगीं माझ्या अंतःकरणांतील खळबळ पाहण्याची शक्ति असती तर ती पाहून तिला माझी कींव आली असती, कीं माझ्या उत्तराच्या धड-धडीत खोटेपणाचा तिला तिरस्कार वाटला असता कोण जाणे ! गुप्त विचार आणि विकार झांकून ठेवावयास अंतःकरणासारखी बंदिस्त संदूक ईश्वरानें मनुष्याला दिलेली नसती तर माझें आणि शांताचें त्या वेळचें भाषण कांहीं निराळ्याच प्रकारचें झालें असतें !

विषय बदलण्याच्या हेतूनें मीं कांहीं वेळानें म्हटलें,

" आतां तीन चार दिवसांत तूं साफ बरी होशील. माझ्या निष्काळजी-पणामुळं हें दुखण्याचं संकट तुझ्यावर आलं. आतां प्रकृतीला चार पांच दिवस जप म्हणजे अशक्तता नाहींशी होईल. "

" माझ्या प्रकृतीची कशाला हवी इतकी काळजी ! " अर्धवट विनोदानें

आणि अर्धवट रागानें ती म्हणाली. तिच्या शब्दांच्या स्वरांत रागाचीच छटा अधिक होती, आणि तिचा विनोद केवळ बाह्यात्कारी होता हें माझ्या ताबडतोब लक्षांत आलें.

"मीं तुझा भाऊच नाहीं का!" मी चटकन् बोलून गेलों.

तिनें वर मान करून एकच कटाक्ष माझ्याकडे टाकला. पण त्या कटाक्षांत अर्थांचे पर्वत सामावले होते. त्या कटाक्षाचा अर्थ मला समजला, आणि हा अर्थच शेवटीं कांहीं तरी अनर्थ करणार कीं काय अशी भीति मनांत येऊन माझें हृदय विदीर्ण झालें.

२

दुसऱ्या दिवशीं दोन वाजतां मी पुण्यास येऊन पोंचलों. प्रवासाचा अतिशय त्रास झाला होता, आणि माणिक-संबंधींच्या व इतर विचारांनींहि डोकें भणभणून गेलें होतें. कॉलेजांत आल्यावर क्लबाच्या ब्राह्मणाला निरोप पाठवला, अंघोळ करून जेवलों आणि आतां माणिककडे जावें असा विचार करीत आराम-खुर्चीवर पडलों. इतक्यांत कॉलेजांतील शेवटचा तास संपल्याची घंटा झाली, आणि वर्गांतून सुटलेले विद्यार्थी आपल्याला खोलींत परत येऊं लागले. माझ्या खोलीवर जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जोड्यांचा व बुटांचा फरशीवर होणारा आवाज बराच वेळ चालला होता. इतक्यांत बूट घालून चालणारी कोणी तरी व्यक्ति माझ्या खोलीशीं थबकल्यासारखें मला वाटलें, माझ्या दारावर कोणी तरी टक् टक् असें केलें, व "आंत या" असें मीं म्हणतांच बाळासाहेब आंत शिरला. मी कांहींच न बोलतां त्याला समोरच्या खुर्चीवर बसण्याची नुसती खूण केली, आणि चिरुटाची पेटी त्याच्यापुढें ठेवून मीं आपलें धूम्रपान चालू ठेवलें.

"काय जगदीश, केव्हां आलास?" खुर्चीवर बसून चिरूट पेटवीत बाळासाहेबानें विचारलें.

"आत्तांच आलों."

"वृंदावनाची काय बातमी आहे?"

"इथली बातमी काय आहे?" त्याच्याकडे तीक्ष्ण नजरेनें पहात मीं उलट प्रश्न केला.

" इथली ! " किंचित् गोंधळून बाळासाहेब म्हणाला, " पुण्याची बातमी चार आठ दिवसांत ती काय असणार ? "

माझ्या प्रश्नाचा खरा अर्थ समजूनहि केवळ खरें उत्तर टाळण्याच्या हेतूनें तो असें बोलत आहे हें पाहून मला त्याचा मनस्वी राग आला. तथापि, तो फारसा प्रदर्शित न करतां खुर्चीवर आडवा होतों तो सरळ उठून बसत मीं गंभीरपणानें म्हटलें,

" बाळासाहेब, या वेळीं माझी चेष्टा करूं नकोस. "

माझ्या शब्दांनीं चपापून जाऊन बाळासाहेबानें विचारलें,

" तुला माणिकची बातमी पाहिजे, होय ? "

" इतकी अक्कल तुला असायला पाहिजे. "

" माणिक कालपासून फार आजारी आहे म्हणे ! आतां—"

" माणिक आजारी ? " आश्चर्यानें आणि चिंतायुक्त स्वरानें मी मध्येंच उद्गारलों. " म्हणजे ! मग मला आतां ताबडतोबच तिकडे गेलं पाहिजे. "

मी खुर्चीवरून एकदम उठलों आणि भराभर कसेबसे कपडे करूं लागलों. माझ्या त्या गडबडीकडे बाळासाहेब आश्चर्यानें पाहत होता हें माझ्या ध्यानांत आलें. परंतु तिकडे मी लक्ष दिलें नाहीं. मी बुटाचे बंद बांधीत होतों इतक्यांत आमचे दोस्त वसंतराव, आमच्या टेनिस खात्याचे सेक्रेटरी, खोलींत आले, आणि म्हणाले,

" चला, जगदीश आला, आतां माझी काळजी दूर झाली ! "

त्याच्या बोलण्याचा अर्थ न समजून मीं त्याच्याकडे प्रश्नात्मक दृष्टीनें पाहिलें तेव्हां तो म्हणाला,

" अरे, टेनिस खेळणारा रंगराव आज इथें आलेला आहे. सकाळीं मी त्याच्याकडे जाऊन आज संध्याकाळीं आपल्या कॉलेजवर खेळायला बोलावून आलों आहे. तूं इथें नव्हतास तेव्हां रंगरावाशीं खेळायला कोणाला उभं करावं या काळजींतच मी होतों. बरं झालं, आलास. नाहीं तर आपल्या कॉलेजची अब्रू जायची वेळ आली होती. पांच वाजतां टेनिस कोर्टावर ये. बरं का ? "

मी एक अक्षरहि न बोलतां बुटाचे बंद पुरे बांधले आणि उठून खुंटीवरची हॅट घेऊं लागलों हें पाहून वसंतराव आश्चर्यचकित झाला असेल. तो

माझ्या अगदीं जवळ आला, आणि माझा उजवा खांदा गदगदां हालवीत म्हणाला,

" ए मुखस्तंभा ! ऐकलंस कां नाहीं मीं काय म्हटलं तें ? "

" काय रे बुवा ? " कपाळाला आंठ्या घालून त्रासिक स्वरानें म्हणत मीं खोलीबाहेर पाऊल टाकलें.

माझ्याबरोबर खोलीबाहेर येणें त्या दोघांनाहि भाग होतें. खोलीला मी कुलूप लावीत असतांना वसंतरावानें पुन्हा विचारलें,

" मग जगदीश, बरोबर पांच वाजतां मॅच खेळायला तूं हजर राहणार ना ! "

" आग लाव तुझ्या मॅच्‌ला अन्‌ त्या रंगरावाला ! " इतकेंच उद्गारून मी तेथून ताडकन्‌ निघालों तो त्याच्याकडे वळूनसुद्धां न पाहतां खाड्‌ खाड्‌ बूट वाजवीत जिना उतरून पार खालीं गेलों.

वसंतरावानें बाळासाहेबाला विचारलेलें मला अस्पष्टपणें ऐकूं आलें. " काय रे याला झालं आहे ? "

" त्यालाच विचार. मी काय सांगूं ? " बाळासाहेब त्याला म्हणाला.

माणिक खरोखरच आजारी होती. मी गेलों तेव्हां मालतीबाई तिच्या खोलींतच होत्या. मालतीबाईनीं मुद्दाम डॉक्टर भरूचा यांना बोलावणें पाठविलें होतें. तेहि त्याच वेळीं आले होते. मी खोलींत शिरलों तों माणिक उताणी पडली होती आणि डॉक्टर तिला तपासून पाहात होते. मालतीबाई उभ्या होत्या. मीहि जवळ जाऊन उभा राहिलों. माणिकनें डोळे फिरवून माझ्याकडे पाहिलें. तिच्या दोन भुंवयांमध्यें एक अंधुक आंठी दिसल्यासारखें मला वाटलें. तिच्या त्या दृष्टिक्षेपाचा अर्थ ओळखणें फार कठीण होतें.

तपासणी संपल्यावर स्टेथॉस्कोपची नळी कोटाच्या खिशांत कोंबीत मालतीबाईकडे पाहात डॉक्टर म्हणाले, " यांचा ताप साधा शारीरिक ताप नाहीं. मेंदूचा ताप आहे. यांच्या मनांत कांहीं तरी फार त्रासदायक विचार चालले असले पाहिजेत. यांचा मेंदू मुख्यतः थंड ठेवला पाहिजे. "

" हं. " मालतीबाई म्हणाल्या.

" ठीक आहे. औषध पाठवून देतों. " असें म्हणत डॉक्टर जाऊं लागले. त्यांना दारापर्यंत पोंचवावयास मालतीबाईहि त्यांच्याबरोबर गेल्या.

तीं दोघंहि खोलींच्या बाहेर गेलीं असें पाहतांच माणिकच्या अंथरुणाशीं मी गुढघे टेंकून बसलों आणि पांघरुणाखालच्या तिच्या हाताला स्पर्श करून म्हटलें, " माणिक, काय वेडेपणा हा ! "

मघांप्रमाणेंच गूढ दृष्टीनें पाहून आणि माझ्या हातांतून आपला हात काढून घेत माणिक झटकन् म्हणाली, " कसायाला कशाला हवी मेंढीची दया ! "

" माणिक, असले शब्द तूं मला ऐकवावेस ना ! "

" जशी करणी करावी तशीं बोलणीं ऐकावीं ! "

तें तसलें सूत्रबद्ध बोलणें अधिक वाढविण्यांत अर्थ नाहीं असें पाहून मी स्वस्थ बसलों. माणिकनेंहि डोळे मिटून स्वस्थ पडल्यासारखें केलें. मालतीबाई परत आल्यावर परवां संध्याकाळीं माणिकला एकदम कसा ताप भरला तें त्यांनीं मला सविस्तर सांगितलें. मीं त्यांना विचारलें.

" मी वृंदावनास परत गेल्यावर आबासाहेब इथें आला होता का कधीं ? "

माणिकच्या अंथरुणापासून अंतरावर असलेल्या एका कोचावर आम्ही बसलों होतों. तरी आमच्या बोलण्याचा तिला यत्किंचित्‌हि त्रास होऊं नये म्हणून मालतीबाई हलक्या आवाजांत म्हणाल्या.

" तुम्ही गेल्यापासून आबासाहेब फार वेळां आले. दोन तीनदां ते माणिकला घेऊन फिरायलाहि गेले होते, दोन दिवसांपूर्वीं ते किती वेळ तरी माणिकशीं बोलत तिच्या खोलींत बसले होते; आणि नंतर माणिक जेवायला खालीं आली तेव्हां तिची चर्या मला कशीशीच दिसली. " काय झालं ग ? " असा मीं त्या वेळीं तिला प्रश्नदेखील केला, पण ती कांहींच बोलणी नाहीं. तिच्या मनांत इतके कसले विचार चालले आहेत काय जाणं बाई ! "

" ते विचार मला माहीत आहेत " मीं हलक्या आवाजांत अर्धवट स्वतःशीं व अर्धवट मालतीबाईंना म्हटलें, " अन् ते मी लवकरच नाहींसे करून टाकीन. "

मालतीबाईंना माझ्या बोलण्याचें फार आश्चर्य वाटलें असावें. त्या क्षणभर माझ्याकडे पाहातच राहिल्या व नंतर म्हणाल्या,

" तुम्हां तरुणांच्या भानगडी तुम्हांला ठाऊक ! "

मालतीबाईचें एकंदर चरित्र लक्षांत येऊन माझ्या अगदीं ओंठाशीं वाक्य आलें होतें कीं,

" मोठ्या माणसांच्या भानगडी काय कमी आहेत ! "

पण तें वाक्य बोलण्याची ती वेळ नव्हती. मी कांहींच न बोलतां तेथून उठलों आणि माणिकजवळ जाऊन बसलों.

माणिक डोळे मिटून स्वस्थ पडली होती. दोन दिवसांत तिचे केंस विंचरले नसल्यामुळें तेलावांचून ते कोरडे झाले होते आणि कांहीं कपाळावर, कांहीं गालांवर असे अस्ताव्यस्त पसरले होते. तापाची एक विचित्र तकाकी माणसाच्या अंगावर नेहमीं येते ती तिच्या चेहेऱ्यावर दिसत होती. तापाच्या थकव्यानें तिचें तोंड किंचित् उघडें राहिलें होतें आणि तिच्या पुढच्या दातांचा कांहीं भाग त्यांतून चमकत होता. श्वासोच्छ्वास जरा जोरानें होत असल्यामुळें तिचा वक्षप्रदेश वर खालीं होत होता.

बराच वेळ मी तिच्याकडे पहात स्तब्ध बसलों होतों. माणिकनें डोळे मिटलेले असल्यामुळें तिच्याशीं कांहीं बोलणें शक्यच नव्हतें. तिच्याकडे पाहतां पाहतां मला एकदा असें वाटलें, कीं झटकन् उठून तिला तशीच्या तशीच उचलून हृदयाशीं घट्ट धरावी आणि हृदयाची भाषा हृदयाला ऐकवून माझ्याविषयींचा तिचा गैरसमज नाहींसा करावा. एकदा असें मनांत आलें कीं वर खालीं होणाऱ्या तिच्या त्या सुकुमार हृदयांत मजविषयींचें इतकें प्रेम सांठविलेलें आहे, कीं माझ्याबद्दल तिचें मन कोणीं कितीहि कलुषित केलेलें असलें तरी तें स्वच्छ होण्यास कांहींच वेळ लागणार नाहीं. पुन्हा अशीहि भीति वाटली कीं, मीं कितीहि प्राण पाखडून साऱ्या गोष्टींचा उलगडा केला तरी हट्टी स्वभावाची माणिक तो खरा मानून घेईल कशावरून ?

कांहीं वेळानें मालतीबाई कांहीं कामासाठीं खालीं गेल्यानंतर मीं माणिकचा हात आपल्या हातांत घेऊन पाहिला. आतां ताप बराच कमी झाला होता. माझ्या हाताचा थंड स्पर्श होतांच माणिकनें डोळे उघडून माझ्याकडे पाहिलें. दृष्टादृष्ट होतांच तिनें नजर दुसरीकडे फिरविली. मी तिला म्हटलें,

" माणिक, मी तुला अगदीं नकोसा वाटूं लागलों काय ? "

" मीच नकोशी झालें ना ? आतां—"

" माणिक, हें काय बोलतेस तूं ? तूं मला नकोशी झालीस ? म्हणूनच का वृंदावनाहून तुला इतकीं पत्रं धाडलीं अन्—"

" पत्राचं काय मोठंसं ! "

" म्हणजे ? " मी आश्चर्यानें विचारलें.

" पत्रांनीं हृदयाचं खरं स्वरूप उघडं करून दाखवितां येतं, तसंच झांकूनहि ठेवतां येतं ! "

" म्हणजे ! माझीं पत्रं खोटीं होतीं असं का तुझं म्हणणं ? "

" तें लिहिणारालाच जास्ती माहीत !" भ्रुकुटी वक्र करून माणिक म्हणाली.

" माणिक, माणिक ! " तिचा हात दाबीत मीं म्हटलें, " ही दुष्ट शंका तुझ्या प्रेमळ मनाची खास नाहीं. या गोष्टी तुझ्या मनांत कोणीतरी चांडाळानं भरवून दिल्याखेरीज—"

" विश्वासघात उघडकीला आणणाऱ्यापेक्षां तो करणाऱ्यालाच हें विशेषण अधिक शोभायचं नाहीं का ? " चिडलेल्या स्वरानें ती म्हणाली. ते शब्द उच्चारतांना तिच्या मनांत आलेली रागाची उसळी तिच्या चेहऱ्यावर, आणि तिच्या आवेशयुक्त स्वरांत स्पष्ट दिसली. त्या वाक्याच्या उच्चारानें तिला श्रम मात्र फार झाले, आणि त्यामुळें तें वाक्य संपतांच ' अं: ! अग आई ग ! " असें विव्हळून तिनें डोळे मिटले आणि मान कुशीकडे टाकली.

आतां आज या विषयासंबंधीं तिच्याशीं जास्त बोलल्यास तिच्या मनाला फार त्रास होईल व तिचा कमी होत चाललेला ताप कदाचित् पुन्हां वाढेल अशी मला त्या वेळीं भीति वाटली, व फक्त तिच्या अंथरुणाजवळ स्वस्थ बसून राहावयाचें मीं ठरविलें. पण माझ्या निश्चयाचा कांहीं विशेष उपयोग झाला नाहीं. कारण, माणिक डोळे मिटून पडली तरी तोच विषय तिच्या मनांत घोळत होता. डावा हात वक्षःस्थलावर ठेवून डोळे न उघडतांच ती स्वतःशींच हळूहळू म्हणाली,

" देवा ! नको या जगांतलं जगणं ! प्रेमाचा विषारी पेला आधीं पिऊं नाहीं, अन् प्याल्यानंतर मग विष अंगांत भिनलं तर रडूं नाहीं, असं म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं ! अं: ! पण मला नव्हतं वाटलं असा अनुभव मला कधीं येईल ! "

तिच्या त्या शब्दांनीं माझ्या अंतःकरणाचें पाणी झालें. ती उजव्या कुशीवर निजलेली असल्यामुळें तिचें तोंड मला नीट दिसत नव्हतें. मी उठून ओणवा झालों आणि तिच्या तोंडाजवळ तोंड नेऊन म्हटलें,

" माणिक, माणिक ! हा तुझा सारा गैरसमज आहे बरं ! डोळे उघडून माझ्याकडे बघ ना ! माणिक ! "

डोळे उघडून कपाळावरचे केंस डाव्या हातानें बाजूला सरकवीत ती म्हणाली, " गैरसमज कसा ? आबासाहेबांनीं इतकं सांगितलं तें सारं खोटंच कां ! "

आबासाहेब ! माझी पहिली शंकाच खरी ठरणार तर ! त्या दुष्टानेंच माझ्याविषयीं माणिकचें मन बिघडून टाकलें होतें तर ! त्या नीच, कपटी— पण माणिकच्यादेखत आबासाहेबाला नुसत्या शिव्या देऊन कांहींच फायदा होण्यासारखा नव्हता. म्हणून मीं म्हटलें,

" आबासाहेबांनीं काय सांगितलं तुला ? "

" वृंदावनास कशाला गेलां होतात ! " तिनें उलट विचारलें.

" बाबांच्या समाचाराला. तुला ठाऊक नाहीं का ? " तिच्या उलट प्रश्नाचा रोंख न समजून किंचित् गोंधळून जाऊन मीं म्हटलें.

" छे ! तें खरं कारण नव्हतं ! " माझ्याकडची दृष्टि दुसरीकडे वळवून माणिक म्हणाली, " खरं कारण मला आबासाहेबांनीं सांगितलं."

" काय सांगितलं ? "

" पण त्याचा वाद कशाला हवा ? "

" तुझ्या गैरसमजानं माझे प्राण कासावीस केले आहेत अन् वाद न करतां मी स्वस्थ कसा बसूं ? " मीं आवेशानें म्हटलें, " माणिक, तुला काय सांगितलं आबासाहेबांनीं ? "

" सांगितलं कांहीं तरी."

" पण तुझा आबासाहेबांवर जास्त विश्वास आहे, का माझ्यावर ? "

माणिक कांहींच बोलली नाहीं. माझ्या प्रश्नाचा तिच्या मनावर बराच परिणाम झाला असें तिच्या स्तब्धतेवरून मला वाटलें. माझ्या प्रश्नाकडे तिचें लक्ष पुन्हा वळविण्याच्या हेतूनें मीं पुन्हा म्हटलें,

" अं ? "

" आबासाहेबाचं सांगणं एक वेळ खोटं असेल; पण आपण आपल्या हातांनीं लिहिलेलीं पत्रं तर खोटीं ठरवितां यायचीं नाहींत ना ? "

" माझ्या हातचीं पत्रं ! " मीं आश्चर्यानें उद्गारलों. माझ्या पत्रांत माझ्याविरुद्ध पुरावा देणारा कोणता मजकूर मीं लिहिला असावा याचा मला

मुळींच उलगडा होईना. मीं क्षणभर अगदीं टक लावून माणिककडे पाहिलें. तिच्या प्रश्नानें मला अगदीं निरुत्तर केल्याप्रमाणें तिला वाटत असावेंसें तिच्या चर्येवरून दिसलें. ती मला म्हणाली,

" आतां कां गप्प ? "

मी उत्तर देणार इतक्यांत मालतीबाई वर आल्या. डॉक्टर भरूचाकडून आलेलें औषध माणिकला द्यावयासाठीं त्या आल्या होत्या.

" देतां का एवढं औषध तिला ! मला खालीं काम आहे. " त्या मला म्हणाल्या, आणि मीं ' हो ' म्हटल्यावर त्या खालीं गेल्या.

औषधाचा भाग मी कपांत ओतून माणिकला दिला आणि औषधावर खावयास म्हणून तिच्यासाठीं मुसंब्याची फोड सोलूं लागलों. औषध पिऊन झाल्यावर माणिक माझ्याकडे टक लावून पाहत होती हें पाहून मी तिला किंचित् हंसत विचारलें, " इतकं निरखून काय पाहत आहेस ? "

" अंतःकरणाचा ठाव लागतो का पाहत होतें " माणिक गंभीरपणानें म्हणाली.

" गैरसमजाच्या गुंतागुंतींत अडकल्यावर ठाव कसा काढतां येणार ? " तिचीच उपमा पुढें चालवून मीं म्हटलें.

कांहीं वेळ कोणींच कांहीं बोललें नाहीं. मीं तिला पुनः विचारलें, " माणिक तुझ्या मनांत माझ्याविषयीं काय किंतु आलेला आहे तो एकदा नीट स्पष्टपणें मला सांग, म्हणजे मला त्याचं निराकरण करतां येईल. उगाच आपल्या मनाला त्रास करून घेण्यांत अन् दुसऱ्याला त्रास देण्यांत काय बरं अर्थ आहे ? "

" मी कोणाला त्रास देतें आहे बाई ! " माणिक माझ्या वाक्याचा सरळ अर्थ न करतां म्हणाली. " माझ्याशीं बोलण्याचा इतका त्रास होत असेल तर मी कुठें बोलायला सुजलें आहे. ही मी गप्प बसलें. हवा आहे कशाला वाद ! एकमेकांचीं मनं आतां एकमेकांना कळलीं. आतां चार दिवस मी मनाशीं दुःख करीन अन् स्वस्थ बसेन. आपल्या नव्या बेताच्या आड माणिक येईल अशी भीति आतां आपण मुळींच बाळगूं नका. मला मात्र यापुढें फसविण्याचा प्रयत्न करूं नका. हो ! म्हणतात ना मळमळीत सौभाग्यापेक्षां ढळढळीत वैधव्य बरं ! "

" माणिक, माणिक ! हें तूं काय बोलतेस ? " तिच्या त्या अनिवार शब्दांचा धक्का बसून मीं आवेशानें म्हटलें. माणिकचा स्वभावच असा होता, कीं वादाच्या वेळीं ती सरळ बोलेल अशी अपेक्षा करणें व्यर्थ होतें. परंतु ती इतके भडकलेले शब्द बोलेल अशी मला कल्पनाहि करतां आली नसती. तिच्या मनांत माझ्याविषयीं कसली तरी जबरदस्त शंका रुजली होती व तिच्या संतापानेंच ती अमर्याद झाली होती यांत संशय नाहीं. मी तिला शांत करण्याच्या हेतूनें म्हटलें,

" माणिक, असं माझ्या हातून झालं आहे तरी काय ? "

" आणखी काय व्हायचं ? लग्नाच्या वेळेस आम्हांला वृंदावनाला बोलावणार कीं नाहीं तेवढं सांगा म्हणजे झालं ! "

" काय ! " स्तंभित होऊन मी उद्गारलों.

माणिक कांहीं न बोलतां नुसती माझ्याकडे पाहात राहिली. वरील वाक्य ती वरकरणी विनोदानें बोलली खरी, पण तिच्या अंतःकरणांत त्या वेळीं विनोदाच्या भावनेचा लेशहि नव्हता. उलट त्या वाक्यांतील गर्भित करुण-रसाचाच तिच्या मनावर परिणाम होऊन तिच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले, तिचे ओंठ थरथर कापूं लागले, व लगेच तिला एक मोठा हुंदकाहि आला. खालचा ओंठ दांताखालीं दाबून तो आंवरण्याचा तिनें पुष्कळ प्रयत्न केला. पण अखेर तिचा प्रयत्न फुकट गेला. तिनें मोठ्यांदां हुंदका दिला, आणि दोन्ही हातांनीं आपलें तोंड झांकून घेत म्हटलें,

" आतां समजलं ना माझ्या मनांत काय संशय आहे तें ? "

आतां माझ्या डोक्यांत एकदम प्रकाश पडला. अस्सें ! एकूण अशा तऱ्हेनें आबासाहेबानें डाव टाकला होता काय ? पण, मला घाबरण्याचें कांहींच कारण नव्हतें. मीं माणिकशीं विश्वासघात मनानेंदेखील कधीं केला नव्हता, तेव्हां मला भीति कसली ! माणिकच्या मनांतील सारे संशय पार धुऊन टाकणें मला फारसें अवघड वाटत नव्हतें. तोपर्यंत माणिकच्या तोंडचीं वेडींवांकडीं बोलणीं ऐकून घेण्यापलीकडे मला दुसरा कोणताच त्रास होण्यासारखा नव्हता. मीं म्हटलें, " माणिक ! "

पण माणिकनें वर पाहिलें नाहीं. तिचे हुंदके अजून संपले नव्हते. तिचें सर्वांग कांपत होतें. मीं दोन तीन वेळां तिच्याशीं बोलण्याचा प्रयत्न केल

परंतु तिनें जणूं काय माझे शब्द ऐकलेच नाहींत. मीं तिचा हात आपल्या हातांत घेतला तों मघापेक्षां ताप अधिक झाल्यासारखें मला वाटलें. तिच्या मनःक्षोभामुळें ताप चढत होता. या वेळीं तिच्याशीं कांहीं आणि कसेंहि बोलणें शक्य नव्हतें.

पांच दहा मिनिटांत माणिकचा ताप फारच चढला, आणि वात होऊन बडबडण्यापर्यंत तिची प्रकृति बिघडली. मालतीबाईंना वर बोलवावें असें क्षणभर माझ्या मनांत आलें; पण पुन्हा वाटलें नको, कारण माझें व माणिकचें बोलणें झाल्यामुळें तिचा ताप चढला असा संशय त्यांना साहजिकपणेंच यावयाचा ! मीच उठलों, आणि बर्फ फोडून माणिकच्या कपाळावर सारखा धरून ठेवला.

कांहीं वेळानें माणिक शांत झाली, एकदम चढलेला तिचा ताप उतरला, आणि थोडीशी गुंगी आल्यासारखें होऊन तिचा डोळा लागला. तिच्याकडे पाहात मी बराच वेळ तसाच बसलों. तिच्या मनांत कोणता गैरसमज होता तें आतां मला कळलें होतें, व तो आपण सहज घालवून टाकूं अशा विचारानें माझ्या मनाला एक प्रकारचें सूक्ष्म समाधानहि वाटत होतें. परंतु आजच्या आज माणिकचें मन साफ करतां आलें नाहीं या विचारानें मन अस्वस्थ झालें होतें. आतां यापुढें आज माणिकशीं एकांतीं बोलण्याची संधि मिळणेंदेखील अशक्य होतें ! पुन्हां माणिकशीं बोलावयाला मिळेपर्यंत तिचा राग आपल्यावर राहणार ! त्या रागाचेंहि मोठेंसें महत्त्व नाहीं. तो सहन करतां येईल. पण गैरसमज कायम राहिल्यामुळें तिच्या कोमल मनाला यातना होणार ! बिचारीचें प्रेमळ हृदय त्या गैरसमजानें पिळवटणार ! अरेरे—एकदम जागी करून तिला सांगून टाकूं कां सगळें ?—छे ! भलताच वेडेपणा करून उपयोग नाहीं—

इतक्यांत मालतीबाई खालचें काम आटपून वर आल्या. त्यांनीं मला प्रथमच विचारलें, “ माणिकला सारखी झोंप लागलेली आहे ना ? ”

“ हो. अगदीं शांत झोप लागली आहे ” मीं चटकन् उत्तर दिलें. इतक्या सफाईनें मी खोटें कसें बोललों त्याचें माझें मलाच आश्चर्य वाटलें. पण, त्या वेळीं खोटें बोलण्याशिवाय मीं दुसरें काय करणार ? आमच्या दोघांचा प्रेमकलह तर मालतीबाईंना सांगून टाकावयाचा नाहीं !

३

माणिकच्या घरून मी निघालों तेव्हां चांगली रात्र होऊन अंधार पडला होता. पुण्याच्या म्युनिसिपालिटीचे दिवे लागले होते. परंतु ते किती विनयशील दिवे! आकाशांतील चांदण्यापेक्षां आपला उजेड कदाचित् जास्त पडून त्या स्वर्गीय तेजोगोलांचा आपल्याकडून अपमान होईल म्हणून ते अगदीं बेतानें तेवत होते. त्यांचा वाटसरूंना काय उपयोग होणार? तांगा करावा तर बरीच वाट चालून गेलों तरी एकहि तांगा भेटला नाहीं. त्यामुळें तसेंच रखडत चालत जाणें भाग होतें. रात्रीच्या अंधकारांत मिणमिण करणाऱ्या त्या दिव्यांमुळें मनाची खिन्नता जास्त वाढली. एकीकडे पाय यंत्राप्रमाणें वाट चालत होते, आणि एकीकडे मनाची विचारक्रिया चालली होती. माणिक माझ्यावर अतिशय कोपली होती याविषयीं मला कांहींच शंका उरली नव्हती. पण, आतां संध्याकाळीं ती मला रागानें जे अद्वातद्वा शब्द बोलली त्याचें मला फारसें दुःख या वेळीं होत नव्हतें. कारण, आज नाहीं उद्यां आपण माणिकचा कोप घालवूं असा विश्वास मला वाटत होता. या वेळीं माझ्या मनांत मुख्यतः आबासाहेबाविषयीं विचार चालले होते. माझें आणि माणिकचें प्रेम त्याला बघवत नव्हतें ही गोष्ट आज कित्येक दिवसांपासून मी ओळखून होतों. परंतु आबासाहेब माझ्याविरुद्ध विनाकारण माणिकचें मन गढूळ करील अशी शंका मला कधीं आली नव्हती. कारण, आबासाहेबाची गणना सज्जन माणसांत सहसा करतां येण्यासारखी नव्हती हें जरी खरें, तरी तो इतका नीच वृत्तीचा आणि पाताळयंत्री स्वभावाचा असेल असें मला वाटण्यासारखें आजपर्यंत त्याचें एकहि कृत्य माझ्या पाहण्यांत आलें नव्हतें. शिवाय अलीकडे कांहीं अंशीं माणिकच्याच कारणानें त्याच्या माझ्या मैत्रींत कांहींसा बिघाड झाला होता हें जरी खरें, तरी एके काळीं मीं त्याच्याशीं अकृत्रिम स्नेह ठेवला होता व अजूनहि माझ्या मदतीची तो ज्या ज्या वेळीं मागणी करी त्या त्या वेळीं माझ्याकडून ती त्याला ताबडतोब मिळत असे. तेव्हां माझ्याशीं त्यानें असा द्रोह मांडावा याचें मला पुनःपुन्हा आश्चर्य वाटूं लागलें, आणि त्यापेक्षांहि अधिक आबासाहेबाचा संताप आला. माणिकच्या त्रोटक बोलण्यावरून असें दिसत होतें, कीं वृंदावनास मी गेलों आणि इतके

दिवस राहिलों याचें कारण मी आपलें लग्न ठरवून घेण्याच्या गडबडींत होतों असें आबासाहेबानें माणिकच्या मनांत भरवून दिलें असलें पाहिजे. या बाबतींत माणिकनें आबासाहेबाच्या म्हणण्यावर मूर्खपणानें विश्वास ठेवला याबद्दल आश्चर्य वाटण्यासारखें होतें. पण, एक तर माणिकचा कोणताहि दोष एकदम कबूल करावयास माझें प्रेमी मन कधींच सहसा तयार नसे. आणि दुसरी गोष्ट अशी, कीं मला माणिकच्या अविचारी असूयाबुद्धीचें आश्चर्य वाटण्यापेक्षां आबासाहेबाच्या कपटबुद्धीचा संताप येणेंच या वेळीं अधिक साहजिक होतें. आधींच आबासाहेब व बाळासाहेब या दोघांविषयीं माझें मन अलीकडे विटत चाललें होतें. त्यांतून ऑथेल्लो नाटकांतील प्रयोगाप्रमाणें आबासाहेबानें केलेलें हें वर्तन मला फारच चीड आणण्या-सारखें होतें. आबासाहेबाच्या नीचपणामुळें माणिकचा माझ्यावर राग झाला याबद्दल मला इतकें वाईट वाटत नव्हतें, पण त्यानें विनाकारण तिच्या मनांत नसत्या कल्पना भरवून दिल्यामुळें तिच्या मनाला अतिशय यांतना झाल्या आणि शेवटीं तिची प्रकृतिहि एकाएकीं इतकी बिघडली, या गोष्टीबद्दल मला त्याचा मनस्वी संताप आला. त्याला कांहीं तरी चांगलें शासन केलें पाहिजे असें माझें मन मला हळूंच सुचवूं लागलें.

असा विचार करीत मी किती वेळ चाललों कोण जाणें ! पण विचाराच्या भरांतून जागा होऊन संपलेल्या चिरूटाचा हातांतील तुकडा फेंकीत इकडे तिकडे पाहिलें तों रेल्वेचा पूल ओलांडून मी बराच पुढें आलों होतों असें मला आढळलें. अजून कॉलेजांत पोंचावयास पंधरा मिनिटें पाहिजे होतीं. मी खिशांतून दुसरा चिरूट काढला आणि दुसऱ्या खिशांत काड्याची पेटी काढण्यासाठीं हात घातला—तों पेटी नाहीं ! माणिकच्या अंथरुणापाशीं माझी पेटी राहिली होती ! तंबाखू ओढणारे लोक कधीं लोकांच्या पेट्या आपल्या खिशांत घालून जातात तर कधीं आपल्या पेट्या लोकांच्या घरीं टाकून उठतात ! कोणत्याच गोष्टीबद्दल निंदेला किंवा स्तुतीला पात्र नसतात, कारण दोन्ही क्रिया त्यांच्या हातून अहेतुकपणेंच घडतात !

पण आतां काय करावें ? चिरूट ओढण्याची तर मला लहर आली होती, चिरूटहि मी तोंडांत धरला होता, आणि अशा वेळीं केवळ दीड दमडीची काड्याची पेटी नसल्यामुळें चिरूट न ओढतां परत खिशांत

टाकावयाचा ! धूम्रपानाची तल्लफ आल्यानंतर त्यामध्यें नसते क्षुद्र अडथळे उभे राहिले, कीं तमाखूभक्ताच्या मनाची काय स्थिति होते, ती एक त्याचा तोच जाणे !

मीं पुन्हा भ्रमिष्टासारखे सारे खिसे चांचपून पाहिले. पण पेटी खिशांत नव्हतीच तर हाताला कोठून लागणार ? त्या क्षणीं माझ्या मनांत असा विचार आला, कीं खऱ्या ताम्रमुखी भक्ताला ईश्वराजवळ वर मागण्याचा कधीं प्रसंग आला तर तो सुज्ञ असेल तर असाच वर मागेल, कीं ' देवा, माझ्या खिशांतील काडीच्या पुरवठ्यांत कधींहि अंतर पडूं नये म्हणजे झालें ! ' पण, या विनोदाचा या घटकेला काय उपयोग होता ? आत्तां देव प्रसन्न होऊन माझ्यासमोर ठाकला नव्हता, किंवा वर मागण्याचें सुदैवहि मला लाभलेलें नव्हतें. हताश होऊन रस्याच्या दोन्ही बाजूंना मी दृष्टि फेंकली. पण विडीकाडीचें एकहि लहानसेंदेखील दुकान माझ्या दृष्टिपथांत आलें नाहीं. मी अगदीं हताश झालों, दैवाला दोष देत एक सुस्कारा टाकला, आणि तोंडांतील चिरूट काढून खिशांत टाकीत होतों—इतक्यांत—

लांब अंतरावर माझ्या दिशेनें येणाऱ्या एका वाटसरूच्या तोंडांतील जळत्या विडीचें लाल टोंक मला दिसलें ! मला अत्यानंद झाला. कोलंबसाच्या गलबतावरील माणसांना जमिनीचें दर्शन घडल्याबरोबर झाला नसेल इतका हर्ष मला त्या वेळीं झाला. त्या वाटसरूजवळ काड्याची पेटी मागण्याचें ठरवून तो माझ्याजवळ येण्याची वाट पाहात मी थांबलों. ताम्रमुखीभक्तांमध्यें नांदणाऱ्या विश्वबंधुत्वाचा ज्या वाचकांस अनुभव आहे त्यांना माझें वागणें आश्चर्यकारक वाटणार नाहीं.

तो मनुष्य जवळ आल्याबरोबर मी त्याजजवळ पेटीची मागणी केली व ती त्यानें मोठ्या आनंदानें मान्यहि केली. चिरूट पेटवीत असतांना मी त्याला निरखून पाहिलें व त्यानेंहि माझ्याकडे पुरतें पाहून घेतलें. माझें चिरूट पेटविणें झाल्यावर आम्ही दोघेहि बरोबरच चालूं लागलों.

अडचणीच्या वेळीं मला काड्याची पेटी देऊन त्यानें माझ्यावर केलेल्या उपकारांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या हेतूनें त्याच्याशीं चार शब्द बोलणें मला अवश्य वाटलें. तो पुरा उंचनिंच मध्यम वयाचा माणूस होता, आणि त्याचा कुळंबाऊ थाट थोडासा नव्या पद्धतीचा होता. मीं त्याला म्हटलें,

" काय दादा, कुठले राहणारे ? "

" येरवड्याचा, साहेब ! "

" पुण्यांत काय बाजार करायला गेला होतां ? "

" हां ! बाजारबी करायचा व्हता अन् दुसरंबी एक निकडीचं काम व्हतं. तवा रात झाली परतायला ! "

त्याच्या त्या ' दुसऱ्या ' कामाबद्दल तो अधिक कांहीं बोलला नाहीं, व मीहि कांहीं चवकशी केली नाहीं. आम्ही जरा वेळ मुकाट्यानेंच चाललों होतों. तो माझ्याकडे पुनःपुन्हा निरखून पाहात होता हें माझ्या एक दोनदा लक्षांत आलें. कांहीं वेळानें त्यानें मला विचारलें,

" साहेब, आपुण कोडतामंदी वकिली करत असाल जनू ? "

त्यानें मला असा प्रश्न कां करावा हें प्रथम माझ्या ध्यानांत आलें नाहीं. पण लगेच लक्षांत आलें, मी माझ्या एकंदर साहेबी थाटाच्या पोशाखावरून मी कोणी तरी मोठा माणूस आहे असें त्याला वाटलें असावें. मोठा माणूस म्हणजे वकीलच अशी खेड्यापाड्यांतील साध्याभोळ्या माणसांची समजूत असते ! त्याच्या प्रश्नाचें नक्की कांहींच उत्तर न देणें मला बरें वाटून मींच त्याला उलट प्रश्न केला,

" कां बरं ? "

" नव्हं, एका गोष्टींतला कायदा पुसायचा व्हता म्हून म्हटलं—"

" काय माहिती पाहिजे तुम्हांला ? " कोणत्या ' गोष्टीं'तील कायदा त्याला पाहिजे होता तें जाणण्याच्या उत्सुकतेनें मीं विचारलें.

" त्येचं असं झालं बगा " माझ्याकडून उत्कृष्ट वकिली सल्ला पैसे न खर्च करतां मिळणार अशी खात्री वाटून तो सांगावयास लागला, " माझ्या बायकूवर माझा लई जीव हये, अन् तिचाबी माझ्यावर लई जीव हये. पन, आमच्या घराला लागून तो राघू ढमाले रहातो कनाय ? "

" हं " त्याच्या त्या राघूची काडीइतकीदेखील मला माहिती नसतांना केवळ त्यानें आपलें कथासूत्र पुढें चालू ठेवावें म्हणून मीं म्हटलें.

" त्येला काय आमचं सूख बघवत नाहीं. " तो पुढें सांगूं लागला, " आठ दहा दिवसाखालीं मीं गेलो व्हतो ममईला, आमच्या शेटजींचं कांहीं काम व्हतं म्हून ग्येलों. तर तितक्यामंदी राघू ढमाल्यानं माझ्या घरीं

घेलपाटं घालून अन् माझ्या नसत्या कागाळ्या करून माझ्या बायकुचं मन पार बिघडून टाकलं. आलं कां ध्येनांत ? ”

“ हं. ”

“ मी जसा परत घरला आलों तशी बायकू माझ्यावर पार रुसलेली. मी तिची मायंदाळ समजूत घातली, अखेर तिच्या पायाबी पडलो—व्हय ! आपलीच आवा, तिच्या पाया पडलं म्हून काय झालं त्यामंदी ? ”

“ काय हरकत आहे ! ”

“ तवा शेवटाला तिनं मला राघू ढमाल्याचं संमदं कारस्थान सांगितलं. त्ये ऐकून मी लई भडकलो, अन् त्येला घराबाहेर काढूनश्येनी भर चव्हाठ्यावर त्येला मी बेदम ठोकलं ! ”

“ अस्सं ! ” मी उद्गारलों.

“ माझं करनं ठीक व्हतं कां न्हाई साहेब ? ”

“ हो ! त्यानं तुझा अपराधच केला होता तेव्हां तूं केलेंस तें रास्तच केलेंस ! ” मी जरा दबकतच म्हटलें. कारण, मी त्या वेळीं वकिलाची भूमिका वठवीत होतों.

“ पर आतां असं झालंया, कीं राघू ढमाल्यानं माझ्यावर केली हाये फिर्याद ! ”

“ असं कां ? ”

“ तवा त्या खटल्यामंदी माझं कसं काय व्हईल तो कायदा मला समजाया व्होवा साहेब. दुसरं काय बी नाय ! ”

शहरांत त्यांचें ‘ दुसरें ’ कोणतें काम होतें तें आतां माझ्या ध्यानांत आलें. आतां वकिलाची भूमिका शेवटपर्यंत वठविणें मला भाग होतें. आपल्या शत्रूला ठोकून काढण्याची त्याची वृत्ति मला थोडीशी आवडली असल्यामुळें मी त्याला एकदम म्हटलें,

“ तूं कांहीं भिऊं नकोस. खटला तुझ्यासारखा होईल. ”

“ असं न्हवं का ! ” जणूं काय हायकोर्टाचाच निकाल ऐकल्याप्रमाणें आनंदून तो म्हणाला.

“ अगदीं खास. ”

“ अन् जरी खटला राघूसारखा हून मला दंड झाला तरीबी काय

बिघाडलं त्यामंदी !" तो आवेशानें म्हणाला, "जो आपल्या पिरेमामंदी बिब्बा घालतो त्याला ठोकून काढलाच पायजे ! मग त्यापायीं आपल्याला कायबी शिक्षा झाली तरी बेहत्तर !"

इतक्यांत येरवड्याचें नाकें आलें व त्याची वाट निराळी फुटली तेव्हां तो म्हणाला,

"रामराम साहेब ! लई उपकार झालं गरिबावर !"

"राम राम" मीं उलट म्हटलें.

कॉलेजांत जाऊन पोंचेपर्यंत साऱ्या वाटभर त्या कुणबी तरुणाचे उद्गार माझ्या कानांत घोळत होते. "जो आपल्या प्रेमांत बिब्बा घालतो त्याला ठोकून काढलाच पाहिजे !" रात्रीं आपल्या अंथरुणावर लोळत असतांनाहि तेच शब्द माझ्या डोळ्यांपुढें नाचत होते !

प्रकरण पांचवें.

विवाहवचन

१

शेअर बाजारांतील व्यापाऱ्याला आपल्या पतीची नसेल इतकी प्रेमी माणसाला आपल्या अब्रूची किंमत असते. दुसरे वाटेल ते आरोप तो सहन करील पण प्रेमाशीं बेइमान झाल्याचा आरोप त्याला कधींहि सहन होणार नाहीं. आकाश पाताळ एक करून तो आरोप धुऊन काढल्याखेरीज त्याला चैन पडावयाचें नाहीं. मग माणिकचा गैरसमज नाहींसा करण्यांत माझे आठ दिवस खर्च झाले तरी त्याबद्दल मला कांहीं वाटलें नाहीं यांत नवल कसचें? आधींच यंदाच्या परीक्षेविषयीं मला बरीच निराशा वाटत होती; आणि त्यांतून ऐन कामाच्या वेळचे दिवस अशा रीतीनें खर्च होत चालले. तेव्हां परीक्षेचा मंडप तरी पाहावयास मी जाईन किंवा नाहीं याची माझी मलाच शंका वाटूं लागली. पण करणार काय? प्रेमाच्या परीक्षेचा प्रसंग आल्यावर परीक्षेचें प्रेम कितीसा टिकाव धरणार? आठ दिवस माणिकच्या उशागतीं रात्रंदिवस बसून राहिलों, आणि मनधरणी, विनंती, आग्रह, वादविवाद, विनोद, राग वगैरे चट साऱ्या शस्त्रास्त्रांचा उपयोग करून तिची दिलसफाई केली.

या आठ दिवसांत माझी व आबासाहेबाची गांठ पडली नाहीं असें नव्हे. दोन तीन वेळां तर मी माणिकच्या घरीं असतांनाच तोहि तेथें आला; पण त्यानें माझ्याविरुद्ध उठविलेल्या काहुरांत मी सांपडलों आहे अशी मीं त्याला मुळींदेखील ओळख दिली नाहीं. माणिक त्याच्याशीं चार कुशल प्रश्नोत्तरें करी, परंतु तिनेंदेखील बहुतांशीं माझाच मार्ग स्वीकारला होता. एखाद्या माणसाला दुःखांत लोटण्याचा व्यूह रचावा, व त्या व्यूहांत सांपडूनहि त्या माणसाला दुःखाची यत्किंचित्‌हि छटा चेहऱ्यावर दाखवूं नये हें पाहून नीच

मनुष्य जितका खजिल होतो तितका तो दुसऱ्या कशानेंच होत नसेल. निदान आबासाहेबाच्या बाबतींत तरी माझ्या प्रत्ययाला असें आलें. माझें व माणिकचें खूप भांडण होईल, मी चिडलेला, त्रासलेला, गांजलेला दिसेन, माणिक माझ्याशीं अबोला धरील किंवा चारचौघांसमक्ष मला वाटेल तसें बोलेल, मी दुःखी कष्टी असेन, अशा प्रकारच्या कांहीं तरी अपेक्षा आबासाहेबाच्या मनांत असल्या पाहिजेत. त्या अपेक्षांच्या अनुरोधानेंच तो दर वेळेस माझ्याशी बोलला. पण माझ्या बोलण्यानें किंवा वागण्यानेंहि त्याच्या अपेक्षा फलद्रूप होईनात; तेव्हां तो अतिशय विरमला. आपण टाकलेला डाव विशेष यशस्वी झाला नाहीं हें ध्यानांत येऊन तो फारसा बोलेनासा झाला.

आज संध्याकाळीं मात्र स्वारी आली तीच जरा जोरांत आली असें मला वाटलें. माणिक व मी बिझिक खेळत बसलों होतों, आणि आमचा डाव संपत आला होता इतक्यांत तो आला. आम्हीं दोघांनींहि त्याच्याकडे मान वर करून पाहिलें. पण मी कांहींच बोललों नाहीं, आणि माणिक नुसती थोडीशी हंसली.

आमचा डाव संपेपर्यंत तो स्वस्थ बसला होता. डाव संपल्यावर त्यानें माणिकला विचारलें, " आज आतां अगदीं बरं वाटतंय् का ? "

" हो, हो ! " माणिक पत्त्यांचा जुडगा करीत हंसत म्हणाली, " आज तर आम्ही नाटकाला जाणार आहोंत."

" नाटकाला ? कोण कोण ? "

" आम्ही दोघं ! " माझ्याकडे नजर फिरवून माणिकनें उत्तर दिलें.

" पण तूं नुकतीच दुखण्यांतून उठलेली आहेस अन् मालतीबाई तुला कशा जाऊं देत आहेत कोण जाणें ! "

" तुम्ही माझे पालक नाहींत हें माझं भाग्यच म्हणायचं ! "

माणिकच्या या उत्तरानें आम्ही तिघेहि हंसलों. आबासाहेबाचें हंसणें अर्थातच थोडेंसें कृत्रिम होतें. कारण, त्या उत्तराची खोंच त्याला लागण्या-सारखी होती.

" मग आम्हांला न्या कीं नाटकाला ! " आबासाहेब म्हणाला.

" तुम्ही काय बाई बडी मंडळी ! तुम्ही आमच्याबरोबर कशाला याल ? " साधें नकारात्मक उत्तर देऊन असभ्यपणा पदरीं न घेतां मोठ्या कुशलतेनें माणिकनें आपलें मनोगत व्यक्त केलें.

त्या उत्तरानें पराभूत होऊन आबासाहेब माझ्याकडे वळून म्हणाला, "म्हणजे, आजहि तूं रात्रींच्या हजिरीच्या वेळीं कॉलेजमध्यें नसणारच म्हणायचा ?"

"नसणारच !" एकशब्दात्मक उत्तर देऊन मी स्वस्थ बसलों.

"पाहा बुवा !" आबासाहेब गंभीरपणाचा आव आणून म्हणाला, "गेल्या सात आठ दिवसांत रात्रीं दहा दहा वाजेपर्यंत मालतीबाईच्या घरीं थांबून तूं हजिरी बुडवली आहेस. आजच वसतिगृहाचे सुपरिंटेंडंट मला विचारीत होते, कीं आतांशा जेव्हां पाहावें तेव्हां जगदीश पटवर्धनच्या खोलीला कुलूप असतें हें काय ? कोणत्याहि प्रोफेसरच्या तासाला तो हजर नसतो, अन् खोलींतहि कधीं नसतो, तेव्हां त्याची गोष्ट प्रिन्सिपलच्या कानांवर घातली पाहिजे असं ते म्हणत होते. त्यांतून आज रात्रींहि हजिरीच्या वेळीं तूं खोलींत नसलास म्हणजे—"

"हं ! काय होईल मोठंसं ?" मी म्हटलें.

"काय कसलं ? उगंच बभ्रा होऊन प्रिन्सिपलच्या कानापर्यंत गोष्टी जायच्या ! दुसरं काय ?"

"गेल्या तर गेल्या, मला नाहीं त्याची पर्वा !"

माझ्या उत्तरानें माणिकला एकदम मोठ्यानें हंसूं आलें.

मग तो विषय तितकाच राहिला. मालतीबाई चहा घेऊन वर आल्या. आमच्या सर्वांच्या इतर गोष्टींविषयींच कांहीं वेळ गप्पा झाल्या, आणि नंतर आबासाहेब गेला. आज मी मालतीबाईच्याच घरीं जेवणार होतों त्यामुळें मी तेथेंच राहिलों.

आम्ही नाटकाला गेलों तें केवळ लहर म्हणून मजेखातर गेलों. मला आतां नीटसें आठवत नाहीं; पण बहुतकरून गडकऱ्यांचें 'प्रेमसंन्यास' नाटक होतेंसें वाटतें—हो—तेंच होतें. कंपनी कांहीं मोठी नाणावलेल्यांपैकीं नव्हती. तथापि, नाटकाला माणिकबरोबर जाण्यांत नाटक पाहण्याचें सौख्य अनुभवण्यापेक्षां एक निराळाच हेतु माझ्या मनांत होता. दोन प्रेमी माणसांचा प्रेमकलह झाला म्हणजे केवळ वादविवादानें तो कलह पुरा थांबत नाहीं. एकाची अशी चूक झाली व दुसऱ्याची तशी चूक झाली हें परस्परांच्या वादविवादानें कितीहि सिद्ध झालें व दोघांच्याहि मनाला पटलें तरी केवळ

त्या बुद्धिवादानें कोणाच्याच अंतःकरणाला समाधान वाटत नाहीं. दोघांनाहि ज्यापासून आनंद होतो अशा एखाद्या गोष्टीचा चार माणसांच्या संगतींत किंवा सार्वत्रिक जनसमूहांत मिसळून दोघांनींहि मुकाट्यानें किंवा हंसत खेळत उपभोग घेतला म्हणजे मात्र त्या प्रेमकलहाचें पुरतें शमन होतें. नुसत्या वादानंतर अशी कांहीं गोष्ट घडून आली, कीं दोघांचींहि अंतःकरणें ताबड-तोब पूर्वीच्या प्रेमानें कांठोकांठ भरून वाहूं लागतात ! असें कां व्हावें कोण जाणे ? असा माझा अनुभव आहे एवढें खरें. प्रेमाचा आणि प्रेमकलहाचा ज्यांना अनुभव आहे तेच वाचक माझ्या अनुभवाचा खरेपणा किंवा खोटेपणा ठरवूं शकतील ! माझ्या अनुभवाच्या अनुरोधानेंच आजचा नाटकाचा बेत मी ठरविला होता एवढें खास, व माझ्या अपेक्षेप्रमाणें त्या बेताचा उपयोग झाला हेंहि खचित.

नाटकास जावयास निघाल्यापासून तों नाटकाहून परत येईपर्यंत इतक्या विनोदपूर्ण गोष्टी घडून आल्या, कीं व मी माणिक सारखी हंसत होतों आणि त्या हंसण्याच्या लहरींनीं अखेर माणिकच्या मनांतील कुशंका आणि तिच्या कोपामुळें माझ्या मनांत उत्पन्न झालेली रुखरुख पार धुऊन गेली असें मला वाटलें. आम्हांला जो तांगा मिळाला त्याचें कृश तट्टू आणि म्हातारा हांकणारा यांचा नाटकगृहापर्यंत गाडी पोंचेतों दहा वेळां मतभेद होऊन तो विकोपास गेला. सरळ रस्त्यानें चालणें त्या तट्टाला विशेष पसंत नव्हतेंसें दिसलें, व त्यामुळें आळीपाळीनें रस्त्याच्या डाव्या उजव्या बाजूनें तें चालत (धावत नव्हे !) होतें. दोन्ही बाजूंना आपला पाठिंबा देऊन मोठेपणा मिळविणाऱ्या कित्येक पुढाऱ्यांप्रमाणें चाललेलें त्या घोड्याचें वर्तन त्याच्या मालकाला मुळींच खपेना, आणि आपली नापसंती चाबकाच्या साहाय्यानें त्यानें त्या घोड्याच्या पाठीवर अनेक वेळां नोंदूनहि ठेवली; पण कुत्र्याच्या वांकड्या शेंपटीवर जसा इलाज नाहीं, तसाच घोड्याच्या वांकड्या चालीवरहि नसतो. तांग्याची ही मौज झाली. पुढें आम्ही नाटकगृहांत शिरून आपापल्या जागीं बसतों न बसतों तोंच आमच्या पुढच्या खुर्च्यांवर एक अमर्याद लठ्ठ पारशी गृहस्थ आणि त्यालाहि कमी लठ्ठ दिसावयास लावणारी त्याची बायको असें जोडपें येऊन बसलें. अवा-ढव्य संसारसुखाच्या त्या दोन प्रतिमा येतांच साऱ्या नाटकगृहांत हंसूं पिकलें. आम्हांला हंसूं आलें, पण एक निराळीच चिंताहि आमच्या मनांत उद्भवली.

"संपलं!" माणिक आपली हंसण्याची उकळी हातरुमालाच्या आड दाबीत मला म्हणाली, "आतां नाटक पाहण्याऐवजीं या दोघांच्या मानेवरच्या वळकट्या मोजीत रात्र घालवावी लागणार!"

"कां?" मीं हंसत तिला म्हटलें, "तटबंदीच्या भोंकांतून बाहेरच्या शत्रूवर बंदूक झाडणाऱ्या शिपाई गड्याप्रमाणें या दोन बुरुजांमधील राहिलेल्या बारीक फटींतून एखाद्या पुरुष पात्र्याच्या मिशीचा तुकडा नाहीं तर स्त्रीपात्र्याच्या अंबाड्याचें टोंक तुला पाहायला मिळेल!"

आम्ही दोघेहि खदखदां हंसलों, आणि मी जरा मोठ्यानें बोललों असल्यामुळें आमच्या शेजारची चार पांच मंडळीहि खूप हंसली. आम्ही मॅनेजरला बोलावून त्याच्या कानावर आमचें गाऱ्हाणें घातलें तेव्हां त्यालाहि हंसूं आवरेना.

"प्रेक्षकांकडून असली तक्रार माझ्याकडे येण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे!" तो म्हणाला, व तें ऐकून आम्ही सारे हंसलों. त्यानें आम्हांस दुसरी जागा देऊन संकटांतून सोडविलें. बाकी, नाटकाचा पहिला अंक चालू असतांच तें जोडपें उठून गेलें. त्या वेळीं त्यांच्या अभिनंदनार्थ नाटकगृहांत टाळ्यांचा कडकडाट झाला, आणि रंगभूमीवरचीं पात्रें टाळ्या कां पडल्या तें न समजून गोंधळून टकमकां पाहूं लागलीं, तेव्हां त्या कडकडाटाची पुनरावृत्ति झाली. आम्हांला हंसतां हंसतां पुरेवाट झाली.

नाटक करणाऱ्या पात्रांनींहि त्या रात्रीं हास्यविनोदाचा पुष्कळ पुरवठा केला. गोकुळ हें पात्र विसरभोळेपणाचा मूर्तिमंत पुतळा म्हणून गडकऱ्यांनीं रंगविलेलें आहे. महाराष्ट्र नाटकमंडळींतील एका नटाची गोकुळची सरस भूमिका आम्ही दोघांनींहि पूर्वीं पाहिली होती. परंतु त्या दिवशींच्या गोकुळानें आपल्या भूमिकेला कांहीं अवर्णनीय रंग आणला. गडकऱ्यांनीं आपल्या गोकुळला जेवढ्या गोष्टी विसरावयास लावल्या आहेत तेवढ्यावर त्याची तहान भागेना. नाटकांत त्याच्या तोंडीं घातलेलीं भाषणेंच तो एकामागून एक विसरूं लागला! आणि विसरलेल्या भाषणांची सूचना प्रॉम्प्टर लोकांकडून मिळविण्यासाठीं या विंगपासून त्या विंगपर्यंत पिसाळलेल्या वाघासारख्या येरझारा घालण्यास त्यानें प्रारंभ केलेला पाहून त्याची बायको 'मथुरा'च जेव्हां त्याला त्याचीं भाषणें प्रेक्षकांना ऐकूं जातील इतक्या मोठ्यानें सांगूं लागली तेव्हां आमच्या हंसतां हंसतां मुरकुंड्या वळल्या. गडकऱ्यांनीं

योजिलेल्या विसरभोळेपणाला आपल्या स्वतःच्या विसरभोळेपणाची पुस्ती जोडून काम करणाऱ्या त्या गोकुळची आठवण झाली, कीं मला अजूनदेखील हंसूं आवरत नाहीं.

नाटक संपून नाटकगृहाबाहेर येऊन आम्ही तांग्यासाठीं इकडे तिकडे पाहतों तों एकच तांगा तेथें उभा ! कांहीं चवकशी न करतां आम्ही एकदम तांग्यांत बसलों, आणि लवकर तांगा हांकण्याविषयीं तांगेवाल्याला सांगितलें. त्यानें घोड्याच्या पाठींत चाबकाची दांडी घालून घोडा हांकल्याबरोबर आम्ही समजलों—

मघांचाच म्हातारा तांगेवाला आणि त्याचें वांकड्या चालीचें मारखाऊ तट्टू आमच्या दुर्दैवानें आमच्या सेवेला हजर झालें होतें !

तें पाहून मी व माणिक अतिशय हंसलों. वाटेनें माणिक म्हणाली, "छे ! ! आज आपण मनस्वी हंसत आहोंत अं ! फार हंसलं, कीं पुढें लवकरच कांहीं तरी अनिष्ट व्हायचं असतं म्हणतात ! नको गडे, आतां हंसणं पुरें !"

"त्या मूर्ख समजुतीवर तुझा खरंच का विश्वास आहे ?" मी आश्चर्यानें तिला विचारलें, "फार हंसलं म्हणजे म्हणे रडण्याची वेळ येते ! हंः ! कांहीं तरी वेडगळ समज. पाहूं आतां उद्यां काय होतं तें !"

२

दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी उठतों न उठतों तोंच आबासाहेब व बाळासाहेब माझ्याकडे आले. बाळासाहेब म्हणाला,

"काय जगदीश, चहा देणार कां नाहीं आम्हांला ? फार दिवसांत तुझ्याकडे चहा प्यायलों नाहीं !"

तोंड धुणें संपवून टॉवेलानें तोंड पुशीत मीं म्हटलें, "वा ! चहाला कधीं कोणी नाहीं म्हटलं आहे ? तुकाराम, आणखी दोन कप चहा टाक रे. बसा, मंडळी, बसा !"

चहा तयार होत असतांना आणि चहा पितांना आमच्या बऱ्याच गप्पा झाल्या. चहा संपवून मी चिरूट पेटविण्याच्या बेतांत होतों इतक्यांत आमच्या प्रिन्सिपलसाहेबांचा गडी खोलींत आला व त्यानें माझ्या हातांत एक लहानशी

चिठी दिली. आमचे प्रिन्सिपलसाहेब थोडेसे मराठी शिकलेले होते, आणि मराठींत बोलण्याची किंवा लिहिण्याची त्यांना अनेक वेळां लहर येत असे. चिठीवर वेड्यावांकड्या बालबोध (बालबोध कसलें तें ! तें नीट लावावयास मलादेखील दहा मिनिटें पुरलीं नाहींत !) अक्षरांत लिहिलें होतें :—

" तूं माझ्या बंगल्याकडे मला तत्काळ पहावेस अशी मला गरज आहे.

एफ्. एफ्. कार्टर "

साहेबांचें तें मराठी वाक्य वाचून मी एकदम मोठ्यानें हंसलों, आणि प्रश्नात्मक रीतीनें माझ्याकडे पाहणाऱ्या आबासाहेबांच्या हातीं मीं तो कागद दिला. चिठी वाचतांच आबासाहेब व बाळासाहेबहि हंसूं लागले. आबासाहेबानें डोळे मिचकावून बाळासाहेबाला कसलीशी खूण केलेली मला दिसली; आणि केवळ त्या चिठींतील मजकुरापेक्षां आणखी कांहीं तरी कारण घडून ते दोघे निराळ्याच अर्थानें माझ्याबरोबर हंसत आहेत, व कांहीं अर्थपूर्ण दृष्टीनें ते दोघे माझ्याकडे व परस्परांकडे पाहात आहेत अशी मला क्षणभर शंका आली. पण मीं तिकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. विजार कोट घालीत मीं साहेबांच्या गड्याला विचारलें,

" काय रे, साहेब काय करताहेत ? "

" बागांतल्या झाडास्नी पानी घेता हैत. "

" ठीक आहे. मी आलोंच. तूं हो पुढें. "

मी साहेबांच्या बंगल्यावर गेलों तों झाडांस पाणी घालणें संपवून टॉवेलनें हात पुशीत ते व्हरांड्यांत उभे होते. पायऱ्या चढून व्हरांड्यांत गेल्याबरोबर डोक्यावरची टोपी काढीत मीं म्हटलें,

" गुड मार्निंग, सर ! "

" न–मस्क्यार मिस्टर पटवर्धन " मराठी भाषेंत स्वागत करण्याच्या हेतूनें साहेब म्हणाले.

जरा वेळ कोणीच कांहीं बोललें नाहीं. कार्टरसाहेबांनीं आपलें हात पुसणें संपविलें, एका आरामखुर्चीवर आपला विशाल देह टाकला आणि शेजारच्या एका खुर्चीवर मला बसावयास सांगून तोंडांत धरलेला चिरूट पेटवीत ते म्हणाले,

" मिस्टर पटवर्धन, काल रात्रीं तूं कोठें असतात ? "

साहेब माझ्याशीं आतां सारखें मराठीच बोलणार हें मी समजून चुकलों. तेव्हां त्यांच्या कोणत्या चुकांना हंसावयाचें व कोणत्यांना हंसावयाचें नाहीं, अशी निवडानिवड करणें अशक्य असल्यामुळें त्यांच्या मराठीच्या शुद्धतेकडे लक्ष न देतां सरळ उत्तर द्यावयाचें ठरवून मीं म्हटलें,

" मी काल गांवांत गेलों होतों. "

" काय करटा ? "

" एका मैत्रिणीबरोबर नाटकाला गेलों होतों. "

" शेवटच्या पॅच शहा डिवस टूं राट्रीच्या हजिरीच्या वेळाला गैरहजर होतास काय ? "

" होतों. "

" कां ? "

" मघाशीं सांगितलेली मैत्रीण फार आजारी होती म्हणून मला रात्रीं परत कॉलेजांत यावयास उशीर होत असे. "

" सुपरिंटेंडंटची पॅरवानगी तुला झाली होती काय ? "

" नाहीं. ते माझ्याशीं कधीं सरळ बोलत नाहींत म्हणून त्यांच्याकडे मी परवानगी विचारायला गेलों नाहीं. " मीं स्पष्ट उत्तर दिलें. टेनिस वगैरे खेळ खेळण्यांतील प्रावीण्यामुळें कार्टरसाहेबांची माझ्यावर फार मर्जी होती, व मी त्यांच्याशीं नेहमीं मन मोकळें करून बोलत असें.

" पॅन, माझी पॅरवानगी—"

" मी तीन वेळां आपल्या बंगल्यावर येऊन गेलों, पण आपण भेटलां नाहीं."

यानंतर कांहीं वेळ साहेब कांहींच न बोलतां चिरुटाचे झुरके घेत स्वस्थ पडले होते. ते कसला तरी विचार करीत असावेत. जरा वेळानें त्यांनीं आपल्या मनाशीं कांहीं तरी ठरविलें असावेंसें दिसलें. मराठी बोलण्याचा नाद सोडून ते इंग्रजींत म्हणाले,

" कॉलेजची शिस्त मोडल्याबद्दल तुला शिक्षा करणें जरूर आहे. तुला मी दहा रुपये दंड करतों. "

" ठीक आहे, साहेब. गुड मॉर्निंग ! " असें रागारागानें म्हणून मीं व्हरांड्याच्या पायऱ्या उतरूं लागलों. साहेबांनीं मला दंड केला म्हणून त्यांचा मला राग आला होता, असें मुळींच नव्हे. तर आबासाहेबानें सुपरिंटेंडंटला

चिथावून साहेबांच्या कानांवर या सर्व गोष्टी घातल्या असाव्यात असा मला सकाळपासून आलेला संशय माझ्या मनांत आतां अधिकाधिक दृढ होऊं लागल्यामुळें मी मनांतल्या मनांत अतोनात संतापलों होतों. साहेबांशीं बोलण्यांत तो संताप थोडासा व्यक्त झाल्याचें माझ्या झटकन् ध्यानांत आलें, व म्हणून झटकन् मागें वळून मीं त्यांस म्हटलें,

" सर, माझ्या शब्दांत थोडासा उद्धटपणा होता त्याबद्दल मला माफ करा. मी फार दिलगीर आहे. "

आधींच साहेबांचा स्वभाव दिलदार होता, आणि त्यांतून मी त्यांचा आवडता विद्यार्थी. त्यांनीं मला दंड केला तोच अगदीं आपल्या मनाविरुद्ध केला होता. माझे ते दिलगिरीचे शब्द ऐकून ते हंसून इंग्रजींत म्हणाले,

" पटवर्धन, तुला इतका रागावलेला मीं कधींच पाहिला नव्हता. नुसता दंड झाला म्हणून तूं इतका भडकणारा मुलगा नाहींस. कां इतका रागावला आहेस, सांग. "

" नको सर, त्या गोष्टी आपल्या कानांपर्यंत पोंचविणें प्रशस्त नाहीं. "

" च् ! च् ! वेडा कोठला ! तें कांहीं नाहीं. सांगच मला काय तें. "

साहेबांचा आग्रह अवमानित करणें शक्य नव्हतें. मीं त्यांस विचारलें, " साहेब, मी काल नाटकाला गेलों होतों हें आपल्याला कोणीं सांगितलें ? "

" सकाळीं सुपरिटेंडंट स्वतः येऊन मला सांगून गेले. आबासाहेब मेहेंदळे यानें त्यांस तुझ्याविषयींच्या सर्व गोष्टी सांगितल्या, असें ते म्हणत होते. "

" कोण, आबासाहेब ! " मी उद्गारलों, " हं ! तरी मला वाटलंच होतं ! "

साहेबांच्या बंगल्यावरून मी जों परत आलों तों अतिशय संतापलेला होतों. आबासाहेब केव्हां भेटेल आणि त्याला एकदा शासन केव्हां करीन असें मला झालें होतें. एकदा तर माझ्या मनांत असेंदेखील आलें, कीं तडक आबासाहेबाच्या खोलींत जावें, त्याला चार सरळ प्रश्न विचारावेत, आणि — पण, पुन्हा मनाचें थोडेंसें संयमन केलें, आणि खोलींत परत आलों. कुलुप उघडून धाडदिशीं लाथ मारून दार उघडलें, आणि पाय आपटीत खोलींत शिरलों. मनांतला राग माझा मलाच आंवरेना. कांहीं तरी करावयाचें म्हणून स्टोव्ह पेटविला आणि चहाचें आधण ठेविलें. त्या उकळत्या पाण्याकडे किती वेळ तरी मी—तसाच पाहात राहिलों होतों. त्या पाण्याइतकेंच

माझें मनहि त्या वेळीं उकळत होतें ! मी चहा करीत होतों, पण माझें लक्ष त्याकडे मुळींच नव्हतें. साखर, चहा नीट प्रमाणांत घेण्याऐवजीं कांहीं तरी चमचे मी पाण्यांत टाकले. चहाचा कप तोंडाला लावतांच कडू जहर चव लागली; तेव्हां माझ्या लक्षांत आलें, कीं चहा एक चमचा टाकण्याऐवजीं दोन चमचे टाकून साखर दोन चमच्यांऐवजीं एकच चमचाभर मीं पाण्यांत मिसळली होती. स्वतःवरच जळफळत तो कडू चहा मीं खिडकीबाहेर फेंकून दिला, आणि स्नान करावयासाठीं अंघोळीच्या खोल्यांची वाट धरली. तेथें जातों तों सगळ्या खोल्या बंद. कोणत्याहि खोलीवर ठोठावलें तरी आंतून उत्तर येई,

" अजून दहा मिनिटें अवकाश आहे ! "

माझें डोकें अतिशयच संतापलें. शेवटच्या खोलीवर जोरानें थाप मारून मी विचारलें,

" किती अवकाश आहे ? "

" दहा मिनिटं." आंतून उत्तर आलें, व लगेच आंतील व्यक्तीनें विचारलें.

" कोण जगदीश ? "

" हं ! " आंतील आवाज आबासाहेबाचा आहे अशी ओळख पटतांच मीं कपाळाला आंठ्या घालून मनाशीं म्हटलें, ' पकडून मारूं का याच ठिकाणीं तुला ! '

" काय रे जगदीश " आंतून आबासाहेबानें पुन्हा विचारलें, " प्रिन्सिपलनीं कशाला बोलावलं होतं तुला ? "

मीं मनाशीं म्हटलें, ' अरे चोरा ! मागच्या दारानें घराला आग लावून पुन्हा पुढच्या दारानें पाणी ओतायला तयार आहेस काय ? '

मीं कांहींच बोललों नाहीं असें पाहून आबासाहेबानें पुन्हा आंतून विचारलें, " जगदीश ? "

" अं ? "

" अरे, कार्टरसाहेबांचं काय काम होतं ? "

" बाहेर ये म्हणजे सांगतों. " मीं घोगऱ्या आवाजांत उत्तर दिलें.

माझ्या त्या उत्तरानें आबासाहेब चपापला असावा. मीं विलक्षण क्रुद्ध स्वरानें उत्तर दिलें असें माझें मला देखील वाटलें आणि खरोखरच त्या

वेळीं आबासाहेब खोलीच्या बाहेर आला असता तर त्याची धडगत नव्हती. परंतु सुदैवानें शेजारची खोली त्याच क्षणीं एकाएकीं रिकामी झाली, आणि मी तींत शिरलों. दरवाजा धाड्दिशीं लावून घेऊन गार पाण्यानें स्नान करावयास मीं प्रारंभ केला. पंचवीस बादल्या डोक्यावर ओतल्या तरी माझें डोकें शांत होईना.

अंघोळ आटपून मीं क्लबांत गेलों तों सगळीं मंडळीं जेवावयास बसण्याच्या बेतांत होती. आज रविवार असल्यामुळें क्लबच्या रिवाजाप्रमाणें बारकीशी मेजवानीच होती, व सर्व मंडळी एकदमच जेवावयास आली होती. क्लबच्या खोलींत मीं प्रवेश करतांच वसंतराव ओरडून म्हणाला,

" यावें जगदीश ! आपल्या पंक्तीचा अलभ्य लाभ आज आम्हांला होणार म्हणायचा ! आतांशा काय बुवा तुझं दर्शनदेखील अगदीं दुर्मिळ होऊन बसलं आहे ! "

दुसरा एकजण म्हणाला, " खरंच, काय रे जगदीश ! आज पंधरा दिवसांत तुझी आमची क्लबांत एकदादेखील गांठ पडली नाहीं हें कसं रे ? "

तिसऱ्यानें मला विचारलें, " इतके दिवस होतास तरी कुठं तूं जगदीश ? "

" मसणांत ! " माझ्या संतापांत त्यांच्या बोलण्यानें भर पडून मी चटकन् म्हणून गेलों.

माझ्या उत्तरानें ती सर्व मंडळी चमकली. नेहमीं हंसत खेळत, दंगा करीत, क्लबांतील जेवण जेवणाऱ्या जगदीशकडून असल्या तिरसट उत्तराची त्यांनीं कधींच अपेक्षा केली नसेल. मला तरी काय झालें होतें कोण जाणे ! त्या प्रेमळ मित्रांच्या प्रश्नांना कांहीं तरी विनोदी उत्तरें देऊन त्यांच्या उल्हासांत भर घालावी असें मला पुष्कळ वाटत होतें. परंतु हवेनें एखादें लोहपात्र गंजून जावें त्याप्रमाणें माझी विनोदप्रियता पार गंजल्यासारखी होऊन रागीट शब्दांखेरीज दुसऱ्या प्रकारचे शब्दच माझ्या तोंडून उमटेनात किंवा आनंदाची छटाहि माझ्या तोंडावर क्षणभर ठरेना. त्रासिक मुद्रेनें हातांतील किल्ल्या फिरवीत आणि तोंडानें शीळ घालीत एका रिकाम्या पाटावर मी जाऊन बसलों. माझ्या उजव्या हाताला राधाकांत बसलेला मला आढळला. त्याच्याकडे पाहून तशा रागीट मनःस्थितींतहि मीं मंदस्मित केलें. डाव्या हाताच्या बाजूला मीं दृष्टि फिरविली तों—

आबासाहेब त्या पाटावर बसला होता ! त्याला पाहतांच डोक्यांत एक प्रकारची तिडीक उठली, आणि वाटलें दुसरीकडे बसावें. परंतु, ती गोष्ट आतां शक्य नव्हती. कारण, एकहि पाट रिकामा नव्हता.

मी नांवाला पानावर बसलों होतों. पुरी आणि सुधारस असला, कीं मी दोन अडीच डझन तरी पुऱ्या खावयाचा व सगळ्यांनीं मला खूप आग्रह करून आणखीदेखील पुऱ्या खावयास लावावयाचें, हा नेहमीचा क्रम ठरलेला. पण आज माझें लक्षच जेवणाकडे नव्हतें. माझ्या पानांतील पहिल्या वाढलेल्या पुऱ्याच जशाच्या तशा राहिलेल्या पाहून वसंत ओरडून म्हणाला, " जगदीश, आज तुला झालं आहे तरी काय ? "

" खरंच ! आज हा असं काय करतो आहे रे ? " दुसऱ्यानें त्याच प्रश्नाची पुनरावृत्ति केली.

" अरे, मी सांगूं का ? " बाळासाहेब त्या दोघांकडे पाहात म्हणाला, " कार्टर साहेबांनीं आज जगदीशला बोलावून नेलं होतं. तिथेंच कांहीं तरी कमजास्त झालं असलं पाहिजे !—"

बाळासाहेब पुढें आणखी कांहीं तरी बोलणार होता, परंतु माझी त्याची दृष्टादृष्ट होतांच माझे विस्फारलेले डोळे पाहून तो चपापला, आणि पुढचे शब्द त्यानें तोंडातल्या तोंडांत गिळले. इतक्यांत आबासाहेब मला म्हणाला, " खरंच, जगदीश ! मघांशी मला कांहीं सांगितलं नाहींसच ! कशाला बोलावलं होतं तुला कार्टरसाहेबांनीं ? "

पानांतील पुरीच त्याच्या त्या नकट्या नाकावर फेंकून मारावी असें मला वाटलें ! माझा हातहि पुरीकडे गेला. पण पुन्हा विचार केला कीं या ठिकाणीं असें करणें बरें होणार नाहीं. मनाचें आटोकाट संयमन करून मीं आबासाहेबाला उत्तर दिलें कीं,

" जेवण झाल्यावर सांगेन सगळं तुला. "

जेवण आटोपल्याबरोबर मी झट्‌दिशीं कोणाशीं न बोलतां आपल्या खोलीकडे जाणार होतों. आठ दिवसांपूर्वीं माणिकच्या घरून कॉलेजकडे परत येतांना मला भेटलेल्या तरुण कुणब्याचें " आपल्या प्रेमांत बिब्बा घालणाराला ठोकून काढलाच पाहिजे " हें वाक्य आज सकाळीं साहेबांच्या बंगल्यावरून परत फिरल्यापासून माझ्या मनांत धिंगाणा घालीत होतें. त्या

दिवशीं त्या वाक्याचा माझ्या मनावर परिणाम झालाच होता; परंतु आज आठ दिवसांत घडलेला अनेक गोष्टींचा धुराळा त्याच्यावर सांचून तें वाक्य पुसट झालें होतें. कार्टर साहेबांनीं आबासाहेबाविषयीं सकाळीं जें सांगितलें त्याच्या फुंकरानें तो धुराळा एकदम उडून गेला. आणि तें वाक्य मन:पटलावर पुन्हा स्पष्ट दिसूं लागलें. अंघोळीच्या खोलींत व जेवणाच्या वेळीं त्या वाक्याच्या परिणामानेंच माझे हात शिवशिवत होते, आणि ओठापर्यंत तीक्ष्ण धारेचे शब्द येत होते. एखाद्या लहानशा वाक्यांत भरलेलें तत्त्वज्ञान एखाद्या वेळीं आपल्या मनाला इतकें पटतें, कीं त्याच्या अनुरोधानेंच आपल्या शारीरिक क्रिया आपोआप व्हावयास लागतात. तत्त्वज्ञान म्हणजे बंदुकीच्या दारूसारखें आहे. दारू ठांसून भरली, कीं काडवात लागतांच जसा तिचा बार उडतो त्याचप्रमाणें तत्त्वज्ञान मनांत ठसलें कीं, प्रसंगाची ठिणगी लागतांच त्याचा कृतींत परिस्फोट होतो. नीट्झशेच्या तत्त्वज्ञानाच्या धुंदीमुळेंच महायुद्धांत जर्मन शिपाई तोफांचा धिंगाणा घालीत होते. माझें आज असेंच झालें होतें. त्या तरुण कुणब्याचें तत्त्वज्ञान माझ्या अंगांत सकाळपासून सळसळत होतें. तत्त्वज्ञानाची धुंदी अंगाबाहेर टाकणें मोठें कठीण आहे. आबासाहेब डोळ्यापुढें असेतोंपर्यंत तें तत्त्वज्ञान माझ्या अंगांत उसळणार हें मला माहीत होतें, म्हणूनच जेवण झाल्यावर तडक खोलींत जावयाचें मीं ठरविलें. हात धुतल्याबरोबर पाणी पिण्याचा तांब्या मीं भरून घेतला आणि जेवणाच्या जागीं पाटावर राहिलेली टोपी व किल्ल्या घेऊन मी जाऊं लागलों. इतक्यांत राधाकान्त म्हणाला,

"जगदीश, थांबा हो. इतकी घाई कसली झाली आहे ? आंचवतों अन् आलोंच तुमच्याबरोबर ! मिनिटभर थांबा."

राधाकान्ताला साफ नाहीं म्हणून उत्तर देऊन खोलीचा रस्ता मला सुधारतां आला नसता असें नाहीं. पण राधाकान्ताचा शब्द मला कधींच मोडवत नसे. कां कोणास ठाऊक ! वास्तविक त्याचा व माझा अतिशय स्नेह होता असें नव्हे. किंवा त्याच्या आमच्या आवडीनावडीच्या गोष्टींत, वागण्याच्या पद्धतींत किंवा आचारविचारांत कांहीं साधर्म्य असल्यामुळें आमच्यांत एकमेकाविषयीं ओढा वाटण्यासारखें एखादें बंधन होतें असेंहि नव्हे. या संसारांत कित्येक गोष्टी व विशेषतः व्यक्तीविषयीं आपल्या

मनांतील भावना अशा असतात, कीं त्यांचा आपल्याला कधींच उलगडा होत नाहीं, पण त्यांचा आपल्या व्यवहारावर परिणाम मात्र होत असतो. राधाकान्ताविषयींची माझी भावना या प्रकारचीच होती. माझें मन त्याच्याकडे कां ओढ घेत असे तें मला समजत नसें, व तो माझ्याविषयीं कधीं कधीं विलक्षण आपलेपणा दाखवीत असे त्याचेंहि माझ्या मनाला नेहमीं मोठें गूढ वाटे. ज्या व्यक्तींचा एकमेकांच्या पुढील आयुष्यावर परिणाम व्हावयाचा असतो त्यांच्या परस्परांविषयीं अशाच भावना असतात कीं काय कोण जाणे! कदाचित् तसेंच असेल. राधाकान्तानें 'थांबा' म्हणतांच मी चटकन् हो म्हणून थांबलों एवढें खरें.

पण, आंचवणें झाल्यानंतर क्लबच्या ब्राह्मणाला गांवांतून कांहीं सामान आणावयास सांगण्यासाठीं त्याच्याशीं बोलत राधाकान्त उभा राहिला. तितक्यांत आबासाहेब व बाळासाहेब यांचेंहि आंचवणें होऊन ते आपापले तांबे घेऊन निघाले व मला म्हणाले,

"काय रे जगदीश, कां थांबलास?"

"राधाकान्त येत आहेत. तुम्ही व्हा पुढें."

पण ते पुढें होण्यापूर्वींच राधाकान्त हातांत तांब्या घेऊन आला आणि म्हणाला, "चला."

आम्ही चौघेजण हातांतील तांबे निष्काळजीपणानें हातांत वागवीत खोल्यांकडे जावयास निघालों. आबासाहेबाला टाळण्याची माझी इच्छा सफळ झाली नाहीं हें पाहून मला बरें वाटलें नाहीं. तो मला माझ्याबरोबर मुळींच नको होता. पण आम्ही अर्ध्या वाटेवर जाईपर्यंत तो माझ्याशीं कांहीं बोललाच नाहीं. मीं मनाशीं मोठें समाधान मानलें व म्हटलें, "ठीक आहे. देवानं याला माझ्याशीं बोलायची बुद्धि आणखी दोन मिनिटें देऊं नये म्हणजे मिळविली." पण माझ्या मनांत हा विचार येतो न येतो तोंच आबासाहेब म्हणाला,

"जगदीश!"

"काय?" मीं त्याच्याकडे चटकन् मान करून म्हटलें.

"सकाळीं प्रिन्सिपल्साहेबांनीं तुला कशाला बोलावलं होतं?"

एखादा विजेचा झटका बसावा त्याप्रमाणें क्रोधातिशयानें माझ्या शरीराची

स्थिति झाली. माझ्या डाव्या हातांतील पाण्याचा तांब्या एकदम गळून खालीं पडला. मला कांहींच भान न राहून मी आवेशानें पुढें झालों, आबासाहेबाची मान उजव्या पंज्यांत गच्च आंवळून धरली आणि डाव्या हाताची मूठ त्यांच्या छातीवर दाबीत मीं दांतओठ खात म्हटलें,

"नीचा, चहाडखोरा! विश्वासघातक्या, सगळी आग तूंच पेटवून दिलीस, अन् साळसूदपणानं पुन्हा मलाच प्रश्न विचारतो आहेस काय? बोल, कार्टर साहेबांनीं मला कशाला बोलावलं होतं तें तुला माहीत होतं का नाहीं? बोल. सुपरिंडेंडंटकडून साहेबाचे कान फुंकवले होतेस कीं नाहीं, बोल!"

माझा त्या वेळचा तो एकंदर आवेश आणि आविर्भाव पाहून बाळासाहेब आणि राधाकान्त स्तंभितच झाले. आबासाहेबानें एक साधा प्रश्न विचारल्याबरोबर एखाद्या पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें त्याची गर्दन मीं पकडावी याचें त्या दोघांस अमर्याद आश्चर्य वाटलें असल्यास तें साहजिकच होतें. मला वेड तर लागलें नाहीं, असा प्रश्न विचारणाऱ्या दृष्टीनें माझ्याकडे डोळे फाडून पाहात ते जागच्या जागीं निश्चल उभे राहिले. आबासाहेबाची स्थिति तर अगदीं अनुकंपनीय झाली. माझ्या दृष्टीला दृष्टि भिडतांच तो भेदरून गेला. त्यानें दृष्टि खालीं वळविली, तो थरथर कांपूं लागला, त्याचे ओंठ रक्तशून्य होऊन पांढरे फिकट दिसूं लागले, आणि त्याच्या तोंडाला कोरड पडल्यामुळें 'आ' वासून हवा आंत घेण्यासाठीं तो धडपडूं लागला. आधींच आबासाहेब काडी पेहेलवान! माझ्या हाताची पकड त्याच्या मानेवर बसतांच आणि एखाद्या खून चढलेल्या माणसासारखे माझे डोळे पाहातांच त्याचा कणा मोडल्यासारखें झालें, व धापा टाकीत तो म्हणाला,

"मी-मी-अरे जगदीश,-माझी मा-न-सोड!"

३

अत्याचार केला, कीं त्याचा परिणाम भोगल्याखेरीज कधीं सुटका नसते. अत्याचाराचा स्वभावच असा आहे; त्याला उपाय नाहीं. मीं आबासाहेबास शिक्षा केली खरी, पण त्यानें कार्टर साहेबाकडे तक्रार नेऊन इतका गोंधळ माजविला कीं, मला कॉलेजच्या वसतिगृहांतून घालविण्याचें साहेबांनीं ठरविलें होतें. मला जावें लागलें नाहीं ती गोष्ट निराळी.

संध्याकाळीं साहेबांकडून मला चिठी आली, ती वाचल्याबरोबर मुळीं मी चपापलों. माझ्यावर साहेबांची अतिशय मर्जी होती, पण मला धाडलेल्या चिठींत इतके कडक शब्द वापरले होते कीं, माझ्यावर ते रागावले आहेत हें त्यावरून अगदीं उघड उघड दिसत होतें. आबासाहेबाच्या व माझ्या भांडणाशीं साहेबांनीं पाठविलेल्या निकडीच्या बोलावण्याचा संबंध असला पाहिजे हें ओळखून मनांतल्या मनांत भीत भीत मी त्यांच्या बंगल्यावर गेलों. मी समोर उभा राहतांच ते मला इंग्रजींत म्हणाले.

" पटवर्धन, मी तुझ्यावर फार रागावलों आहे. "

मी कांहींच न बोलतां स्वस्थ उभा राहिलों.

" माझें तुझ्यावर फार प्रेम होतें " ते पुढें म्हणाले, " व अजूनहि आहे. परंतु आज तूं अतिशय वाईट गोष्ट केली आहेस. "

मी कांहींच बोललों नाहीं.

" माझ्या मर्जींतल्या मुलानें असें वर्तन केल्याबद्दल मला विशेषच राग वाटतो. " माझ्याकडे किंचित् टवकारून पाहात ते म्हणाले. मी अजूनहि स्वस्थच होतों.

" आबासाहेब मेहेंदळ्यावर तुझा इतका राग कशासाठीं ? "

मी कांहींच उत्तर दिलें नाहीं.

" बोलत कां नाहींस ? " त्यांनीं पुन्हा विचारलें.

" सर, आपल्या प्रश्नाचं उत्तर द्यायचं म्हणजे मला मर्यादेचं थोडंसं उल्लंघन करावं लागेल, अन् आपल्याला कदाचित् राग येईल. "

" चालेल. मी रागावणार नाहीं. सांग. " साहेब म्हणाले.

" सर, समजा, तुम्ही आपल्या तरुणपणीं एखाद्या मुलीवर प्रेम करीत असतांना तुमच्या एखाद्या मानभावी मित्रानें त्या मुलीचें मन तुमच्याविषयीं खोट्या गोष्टी सांगून कलुषित केलं असतं अन् आणखीहि पुष्कळ चहाड-खोरपणा तुमच्याविरुद्ध केला असता तर त्याला तुम्ही शासन केल्याखेरीज राहिला असतात काय ? "

हें सारें मी चटकन् बोलून गेलों. पण तें बोलणें संपल्यावर माझा मीच चपापलों. विकाराच्या भरांत आपण भलतेंच उत्तर साहेबांना देऊन गेलों, व त्यांचें आपल्यावर कितीहि प्रेम असलें तरी आतां तें सर्व मूर्खपणाच्या

उत्तरानें नाहींसें होऊन त्यांचा राग अतिशय वाढेल असे विचार त्या एका क्षणांत माझ्या मनांत चट्दिशी येऊन गेले. पण माझें भय व्यर्थ ठरलें. उलट मी बोलल्यानंतर मंद स्मित करीत साहेब म्हणाले,

" वा ! पटवर्धन, तूं म्हणजे एक विलक्षण लबाड मुलगा आहेस ! प्रश्न पण प्रश्न विचारलास. माझ्या प्रेमाचा अपमान करणाऱ्या कोणाहि माणसाला खचित् मीं पुरतं शासन केलं असतं ! "

साहेबांचें तें बोलणें ऐकून मी चकितच झालों. माझ्या उत्तरानें त्यांचा माझ्यावरील राग अधिकच भडकणार अशी मला भीति वाटत होती. आणि एखादा एतद्देशीय प्रिन्सिपल असता व त्याला मीं असें उत्तर दिलें असतें, तर माझी भीतीच खरी ठरली असती. पण, माझ्या मोकळेपणाच्या चतुर प्रश्नानें साहेबांना राग येण्याऐवजीं कौतुक वाटलें. युरोपियन स्वभावांतील चांगल्या अंशाचा अनुभव त्या प्रसंगानें मला क्षणभर दिला. त्या विस्मित स्थितींत मी तसाच मूकवृत्तीनें उभा राहिलों.

" पण, तुझं चतुर बोलणं मला कितीहि आवडलं असलं–" साहेब जरा वेळानें म्हणाले, "–तरी कॉलेजच्या शिस्तीच्या दृष्टीनं तसं वर्तन अपराधाच्या सदरांत घालणं मला भाग आहे. तुझ्या स्थितींत मी असतों तर मीं मेहेंदळ्याला मारलं असतं हें जसं मीं कबूल केलं, तसंच तूं माझ्या जागीं असतास तर मी करणार आहे तेंच तूं केलं असतंस असं तूंहि कबूल केलं पाहिजेस. "

साहेब आतां पुढें काय बोलतात इकडे सर्व लक्ष देऊन मी निश्चल उभा राहिलों.

" समजलास, पटवर्धन ! तुला शिक्षा करणं माझ्या अगदीं जिवावर आलेलं आहे. " साहेब पुढें म्हणाले, " पण ती केली नाहीं तर कॉलेजच्या शिस्तीला धक्का बसेल. तूं कॉलेजच्या वसतिगृहांतील खोली सोडून जावंस असं मला वाटतं. "

मी कांहींच बोललों नाहीं, व कांहीं वेळानें साहेबांचा निरोप घेऊन खोलींत परत आलों.

पुढें काय झालें तें मला नक्की माहिती नाहीं. परंतु, झालेल्या एकंदर प्रकाराबद्दल विचार व आश्चर्य करीत मी खोलींत पडलों असतांना सुमारें अर्ध्या तासानें माझ्या खोलीच्या दारावर थाप मारून राधाकान्तानें मोठ्यांदा हांक मारली.

" जगदीश, दार उघडा. "

राधाकान्त या वेळीं माझ्याकडे कां आला असावा तें मला कळेना. दुसरें कोणी आलें असतें तर मीं दार न उघडतां त्याला घालवूनच दिलें असतें. परंतु राधाकान्ताला दार न उघडणें शक्यच नव्हतें.

" जगदीश, वसतिगृह सोडून जायला साहेबांनीं तुम्हांला सांगितलं ना !"

त्यानें आपल्या वाक्यांत भूतकाळाचा प्रयोग कां केला तें न समजून आश्चर्यानें मीं म्हटलं, " हं मग ? "

" तुम्ही जायचं कांहीं कारण नाहीं. "

" म्हणजे ? "

" मी आत्तांच साहेबांकडून जाऊन आलों. तुम्हांला शिक्षा व्हावी हें मला मुळींच बरं वाटेना. साहेबांपाशीं माझी जी कांहीं थोडी पुण्याई आहे ती खर्च करून मीं त्यांच्याजवळ पुष्कळ वाद घातला. आबासाहेबाची सारी कारवाई मीं त्यांना समजावून दिली. आधींच तुमच्यावर साहेबांची मर्जी असल्यामुळें माझं काम कांहीं फारसं कठीण नव्हतं. त्यांनीं शेवटीं सांगितलं, कीं जगदीश पटवर्धनानें वसतिगृह सोडून जायचं कांहीं कारण नाहीं. त्याला कांहींच शिक्षा न दिल्याबद्दल कांहीं विद्यार्थी ओरडले तरी त्याबद्दल मला फिकीर नाहीं. "

" राधाकान्त," मीं म्हटलें " वसतिगृह सोडून जाण्याच्या शिक्षेची मी मोठी पर्वा करीत होतों अशांतली गोष्ट नाहीं. त्या शिक्षेचा बोभाटा बाबांच्या कानीं गेल्यावर ते मला कदाचित् बोलले असते; पण त्याचा फारसा प्रश्न नव्हता. कॉलेजचे दिवस आतां थोडेच उरले होते. तेव्हां मीं कशीहि व्यवस्था केली असती; पण माझ्यासाठीं तुम्ही जी रदबदली केलीत तिच्यावरून तुमच्या मोठ्या अंतःकरणाची आणि प्रेमाची मला पूर्ण साक्ष पटली. काय असेल तें असो, तुमचे माझे पूर्वजन्मींचे ऋणानुबंध असल्यासारखं मला पुष्कळदां वाटतं."

४

" आज कित्येक दिवस तुमच्या बोटक्लबावर नौकाविहाराला यायचं म्हणतां म्हणतां शेवटीं आज वेळ आली !" नदीच्या पात्राकडे पाहात मालतीबाई म्हणाल्या.

आबासाहेबाशीं घडलेल्या प्रसंगाला आठ दहा दिवस होऊन गेले होते. मालतीबाईच्याकडे दोन तीन पाहुणे आले होते, व त्यांना नौकाविहार करण्याची फार इच्छा होती, म्हणून आम्ही सर्वांनींच नौकाविहाराचा मोठा कार्यक्रम ठरविला होता. मीं आमच्या कॉलेजच्या बोटक्लबांतील तीन बोटी आम्हां सर्वांसाठीं राखून ठेविल्या होत्या, आणि मालतीबाईनीं रात्रींच्या कार्यक्रमाला योग्य असें उपाहाराचें सामान घेतलें होतें. माणिक या कार्यक्रमांत मोठ्या आनंदानें मिसळली होती, आणि मीहि परीक्षेला बसावयाचें नाहीं असेंच आतां जवळ जवळ ठरवून टाकल्यामुळें उत्साहानें भाग घेतला होता. चांदणी रात्र असल्यामुळें आमचा एकंदर कार्यक्रम चांगला होणार अशी आम्हां सर्वांची फार अपेक्षा होती. बरोबर रात्रीं दहा वाजतां मालतीबाई, डॉ. शामराव, दोघे पाहुणे व माणिक इतकी मंडळी ज्या धक्क्यावरून बोटी पाण्यांत सोडतात तेथें येऊन पोंचली. एका झाडाच्या बुंध्यावर डोकें टेकून झाडाच्या पानांच्या फटींतून दिसणाऱ्या चंद्राकडे पाहात मी त्या मंडळींची वाट बघतच बसलों होतों. ती आल्यावर मी झटकन् पुढें झालों तों मघाशीं सांगितल्याप्रमाणें मालतीबाई बोलल्या.

उत्तरादाखल मी नुसता हंसलों व लगेच माणिककडे वळून म्हटलें,

“ काय, आज वल्हीं मारणार का नाहीं ? ”

“ हो, तर ! ” तिनें उत्तर दिलें. “ मी कांहीं ताईसारखी पहिल्यांदा आलेली नाहीं ! दोन तीन वेळां वल्ही मारण्याचे धडे मी गिरवलेले आहेत. आज अगदीं मी स्वतः लांबपर्यंत बोट नेणार. ”

“ ठीक, ठीक. ” मीं शाबासकी देण्याच्या आविर्भावानें म्हटलें.

एवढ्या वेळांत क्लबाच्या गड्यांनीं तीन बोटी पाण्यांत सोडून तयार केल्या. मीं मालतीबाईना एका होडींत बसावयास सांगितलें. त्यांच्या मागोमाग डॉ. शामराव होडींत पाय टाकीत होते. पण इतक्यांत मी त्यांना विचारलें.

“ पण, तुम्हांला वल्हीं मारतां येतात का ? ”

“ नाहीं. ”

“ मग तुम्ही यांत बसून उपयोग नाहीं. ”

दोघांहि पाहुण्यांना वल्हीं मारतां येत होतीं. तेव्हां एका होडींत मीं व माणिक, दुसरींत एक पाहुणे — नागपूरचे डॉ. रामनाथ आणि मालतीबाई,

आणि तिसरींत दुसरे पाहुणे आणि डॉ. शामराव अशी व्यवस्था करून आम्ही धक्क्यापासून होड्या सोडल्या. मालतीबाईच्या बोटींत बसावयास न मिळाल्यामुळें शामराव किंचित् नाराज झाल्यासारखे मला दिसले. मालतीबाईसहि तो गोष्ट फारशी पसंत पडली नाहीं, असें मला वाटलें. पण आमची बोट माणिकनें चालू केल्याबरोबर मी ती गोष्ट विसरून गेलों. माणिकच्या वल्हविण्याकडे पाहात मीं हंसत म्हटलें, " अरे वा ! तूं पुष्कळ प्रगति केलीस ! "

तिन्ही होड्या बरोबरच चालल्या होत्या. थोड्या अंतरावर नदीच्या पात्राचे दोन फांटे फुटत होते. उजवीकडील बाजूनें बोटी पुढें नेण्याचा प्रघात असे, आणि डाव्या बाजूच्या प्रवाहानें फारसें कोणी जात नसे. फांटे फुटण्याची जागा आल्याबरोबर मीं सुकाणूं फिरविलें, आणि डाव्या हाताकडील प्रवाहांत आमची बोट फर्रर्र असा आवाज करीत शिरली.

माणिक माझ्याकडे प्रश्नात्मक दृष्टीनें पाहूं लागली.

" देखाव्याची मौज इकडेच अधिक चांगली आहे " मीं हंसत तिला म्हटलें, " शिवाय उगच त्या चौघांच्या गर्दींत जाऊन आपल्याला काय मौज वाटणार आहे ? आपण आपले इकडेच जाऊं झालं ! "

आमची होडी निराळ्या बाजूनें चाललेली पाहून त्या चौघांना आश्चर्य वाटलें. मालतीबाईनीं ओरडून विचारलें, " अग माणिक, तिकडे कुठें चालवलीस बोट ? "

" तुम्ही जा तिकडून ! " मीं ओरडून सांगितलें, " आम्ही जरा इकडे जाऊन परत येतों. उपाहाराच्या वेळेस आम्ही तुम्हांला गांठतों. त्याबद्दल काळजी करूं नका ! "

माझें उत्तर ऐकून तीं सर्वजण मोठ्यांदा हंसलीं, व त्यांच्या बोटी निराळ्या प्रवाहानें जाऊन लवकरच दिसेनाशा झाल्या.

" इतक्या जोरानें कशाला वल्हीं मारते आहेस ? " मीं माणिकला जरा वेळानें म्हटलें. " जरा सावकाश का जाईना बोट ! "

" बरं, जाऊं दे हळुहळू " असें म्हणून माणिकनें दोन्हीं वल्हीं बंद केलीं, आणि प्रथम मिळालेल्या गतीमुळें बोट आपोआप पाणी कापीत पुढें जाऊं लागली.

आमच्या दोन्ही बाजूनें दोन्ही किनाऱ्यांवरचीं झाडें भराभर मागें जात होतीं, आणि 'सळ् सळ्' असा पाण्याचा आवाज होत होता, त्या पाण्याच्या आणि झाडांच्या शोभेकडे पाहात आम्ही दोघेंहि कांहीं वेळ स्तब्ध बसलों.

शेवटीं एका किनाऱ्याच्या बाजूला मीं बोट वळविली, आणि एक चांगलीशी जागा पाहून तेथें बोट उभी केली.

"तूं आज पुष्कळ लांबवर बोट आणलीस ! तुला चांगला दम लागला आहे." मीं माणिकला म्हटलें. ती चांगलीच थकली होती. होडी उभी केल्याबरोबर तिनें हातरुमाल काढून तोंडावरील घर्मबिंदु पुसून काढले. श्रमामुळें तिचा श्वासोच्छ्वास जोरानें होत होता, आणि त्यामुळें वरखालीं होणाऱ्या वक्षप्रदेशाची शोभा माझ्या मनाला फारच आल्हाददायक वाटत होती.

"आतां परत जातांना मी वल्हवीन" मीं म्हटलें.

"कबूल. आतां मुळीं माझ्या हातांत शक्तीच उरली नाही." माणिक म्हणाली, "अन् शिवाय, इतकं वल्हवल्याबरोबर माझ्या तळहाताला घट्टे पाहा कसे पडले !"

असें म्हणून तिनें आपले उताणे तळहात माझ्यापुढें धरून माझ्याकडे हंसत पाहिलें. तिचे दुखावलेले तळहात पाहण्याच्या मिषानें मी तिचे हात किती तरी वेळ आपल्या हातांत धरून ठेवले होते. चंद्रप्रकाशांत तिच्या त्या काळ्यासांवळ्या करकमलांची शोभा कांहीं अवर्णनीयच दिसली, आणि तिच्या लुसलुशीत स्पर्शानें मला तितक्याच अवर्णनीय सौख्याचा अनुभव आला. वाजवीपेक्षां जास्त वेळ मीं तिचे हात धरले आहेत ही गोष्ट जरा वेळानें तिच्या लक्षांत आली. त्याबरोबर तिनें हलकेच आपले हात सोडवून घेतले आणि दोन्ही हातांनीं केंसांचा आंबाडा व्यवस्थित करण्याचें सोंग केलें. केवळ हात सोडविण्यासाठीं तिनें तें नाटक केलें हें मीं ओळखलें, व तें तिच्या लक्षांत येऊन ती थोडीशी हंसली.

"कां हंसलीस ?" मीं मुद्दाम विचारलें.

"कांहीं नाहीं." मान हालवून ती म्हणाली.

"तरी पण ?"

"छे ! कांहीं नाहीं" ती पुन्हां म्हणाली व अधिकच हंसली.

"मी समजलों."

" मग समजल्यावर कशाला विचारावं ? " भ्रुकुटी वक्र करून ती म्हणाली.

पश्चिमेकडून वाहणाऱ्या मंद वायुलहरींचें सौख्य आम्हीं दोघांनींहि कांहीं वेळ स्तब्ध वृत्तीनें अनुभवल्यावर मीं म्हटलें,

" आतां परीक्षेची आशा जवळ जवळ मीं सोडूनच दिली आहे."

" खरं ? " माझ्या बोलण्यानें किंचित् वाईट वाटून तिनें उद्गार काढला.

" नाहीं तर ! गेल्या महिन्या दीड महिन्यांत मीं पुस्तकांचें दर्शनदेखील जर घेतलें नाहीं तर उगंच आतां परीक्षेची भाषा बोलण्यांत तरी काय अर्थ आहे ? "

" पण, परीक्षा झाली असती म्हणजे जरा बरं झालं असतं. "

" हो, पण दोन परीक्षा एकदम कशा देतां येणार ! " अर्थपूर्ण दृष्टीनें तिच्याकडे पाहात मीं म्हटलें.

माझ्या बोलण्याचा गर्भितार्थ तिच्या चटकन् लक्षांत न येऊन तिनें विचारलें, " म्हणजे ? "

" तुझ्यावरचं माझं प्रेम सिद्ध करण्यांतच माझे सारे दिवस घालवून तुझ्या परीक्षेला उतरण्याच्या प्रयत्नांत मी गढून गेलों होतों. अशा स्थितींत पुस्तकी परिक्षेच्या तयारीला अवसर मला कसा मिळावा ? "

" इश्श् ! कांहीं तरीच. " असें म्हणून ती खालीं पाहूं लागली.

जरा वेळ आम्ही स्तब्ध होतों.

मग थोडें पुढें सरकून तिचा डावा हात आपल्या हातांत घेत मीं म्हटलें, " पण माणिक, आतां तरी तुझ्या परीक्षेला मी पुरता उतरलों आहे का ? "

" भलतेच प्रश्न विचारून कां बरं माणसाचा छळ करावा ? " ती म्हणाली, आणि माझ्या हातांतील हात काढून न घेतां तिनें आपला उजवा हात माझ्या डाव्या मांडीवर ठेवला.

" माणिक, माझ्या प्रेमाविषयीं आतां तुला मुळींसुद्धां शंका नाहीं ना ! "

" नाहीं, नाहीं. माझं अंतःकरण उघडलं तर त्यांत शंकेचा कणदेखील सांपडणार नाहीं " आपल्या मोकळ्या उजव्या हातानें वक्षस्थलाला स्पर्श करीत माणिक म्हणाली, " पण माझं अंतःकरण मी कसं बरं घडून दाखवूं ? माझ्या निःशंक मनाची साक्ष मी कशी बरं पटवून देऊं ? "

तिच्या आवाजांत सद्गदित हृदयाचा कंप उत्पन्न झाला होता. तिच्या डोळ्यांतील तेजहि त्या चंद्रप्रकाशांत आपल्या विशिष्ट चमकीनें चमकत होतें. तिच्या उजव्या हाताचीं बोटें जणूं काय अंतःकरण उघडावयास उत्सुक होऊन वक्षःस्थलावर अधीरपणें थांबलीं होतीं. तिचे ते शब्द माझ्या हृदयाला एकदम जाऊन भिडले. मी झटकन् तिचे दोन्ही हात धरले, आणि तिला जवळ ओढून तिच्या अधराचीं दोन तीन चुंबनें आवेगानें घेतलीं, आणि त्या चुंबनांच्या उन्मादानें घोगऱ्या झालेल्या स्वरानें म्हटलें,

" आतां मला साक्ष पटली."

मीं तिचें चुंबन घेत असतां माणिकचें सर्वांग थरथर कांपत होतें. माझ्या चुंबनानंतर माणिक झटकन् मागें झाली. मी काय बोललों तें तिनें ऐकलेंहि नाहीं. ती सर्वस्वीं संभ्रमित झाल्यासारखी दिसली. एखाद्या बावरलेल्या हरिणीप्रमाणें तिनें इकडे तिकडे घाबरलेल्या दृष्टीनें पाहिलें. एकट्या चंद्राखेरीज आमचें चुंबन दुसऱ्या कोणीहि पाहिलें नाहीं अशी खात्री होतांच तिला समाधान झाल्यासारखें दिसलें, व तिनें सुस्कारा टाकून जलपृष्ठाकडे आपली दृष्टि फिरविली.

त्या वेळचा देखावा मी आजन्म विसरणार नाहीं. चहूं बाजूला इतकें शांत आणि स्तब्ध होतें, कीं शांततेच्या समुद्रांतच पडल्यासारखें मनाला वाटत होतें. दोन्ही किनाऱ्यांवरील झाडाझुडपांचा फार आल्हाददायक नाहीं व फार उग्र नाहीं असा एक विलक्षण मिश्र गंध येत होता. वारा अगदीं मंदपणें वाहात होता, आणि त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या लहान लहान लाटांनीं आमची होडी इतक्या सूक्ष्मपणें हालत होती, कीं तिच्यावरून जमिनीला सूक्ष्म स्पर्श करीत पावलें टाकणाऱ्या कुशल नर्तकीची आठवण होत होती. आकाशांतील चंद्र पृथ्वीवरील शोभा पाहात अगदीं सावकाश आपल्या मार्गानें पुढें सरकत होता, आणि या शांत, शोभिवंत पार्श्वभूमीवर माणिकचें चित्र माझ्या दृष्टीसमोर रेखाटलेलें होतें. तिचा संभ्रम अजून विरला नव्हता. तिची दचकलेली दृष्टि तिच्या हालत्या पापण्यांखालीं कशीबशी दडली होती. तिचा श्वास जोरानें होत होता. तिचे ओठ एकमेकांपासून दूर झाले होते. आपला उजवा हात गळ्यापाशीं ठेवून मूढ चित्तानें ती पाण्याच्या चिमुकल्या लहरींकडे पाहात होती. त्या चित्राकडे फार वेळ स्तब्ध वृत्तीनें पाहणें शक्य

नव्हतें. मी पुन्हां पुढें होऊन तिला हृदयापाशीं घट्ट धरलें आणि तिची हनुवटी उजव्या हातानें वर करून म्हटलें,

" माणिक, माझ्याशीं विवाह करायला तूं तयार आहेस ना ? "

ती कांहींच बोलली नाहीं व तिनें आपली दृष्टि पुन्हां खालीं वळविली.

" माणिक, बोल ना. "

" काय ? " तिरप्या नजरेनें वर पाहात तिनें विचारलें.

" तूं माझी पत्नी होशील ना ? "

" होय " असें अर्धस्फुट स्वरानें म्हणत तिनें आपले दोन्ही हात माझ्या खांद्यावर टाकून माझ्या छातीवर आपलें मस्तक ठेवलें.

" माणिक ! माणिक ! " असें म्हणत मीं तिला अधिकच घट्ट धरलें आणि तिच्या मस्तकाचें चुंबन घेतलें—

इतक्यांत एक पक्षी ' क्व आ ! क्व आ ! ' असा आवाज करीत आमच्या होडीला चिकटून फडफडत पाण्याच्या पृष्ठावर चोंच मारून गेला. त्याच्या पंखाच्या फडफडाटानें आम्ही दोघेहि दचकलों. त्याचा तो फडफडाट मला एखाद्या अपशकुनासारखाच वाटला !

प्रकरण सहावें

अकल्पित पत्र

१ आम्ही सकाळीं नुकतेच उठून सर्वजण चहा प्यावयास बसतों न बसतों, तोंच माझा तुकाराम गडी कॉलेजांतून मला बोलाविण्यास आलेला पाहून मला फार आश्चर्य वाटलें. काल रात्रीं डॉ. रामनाथ यांना मालतीबाईच्या घरीं मेजवानी होती, व जेवणानंतर भास्करबुवा बखले यांचें गाणें होतें. गाण्याला रंग फारच चढला होता. भास्करबुवांच्या गाण्याला रंग भरत नाहीं असें क्वचितच होतें. भास्करबुवा म्हणजे एक रसेला, ऐटबाज गवई. त्यांचें गाणें झटकन् जमतें, आणि स्वारी आपल्या गाण्याच्या उन्मादांत आली, कीं कोणीं न सुचवितां ते पोटभर गाणें ऐकवितात. काल पहांटे चार वाजेपर्यंत त्यांनीं मैफल केली. शेवटीं भैरवीच्या वेळीं तर आम्हां सर्वांना त्यांनीं देहभान विसरावयास लावलें होतें. पहांटे चार वाजल्यानंतर मला कॉलेजवर जाणें शक्यच नव्हतें. म्हणून मालतीबाईच्याच घरीं सर्वांच्या बरोबर मीं दिवाणखान्यांत पथारी टाकली. सकाळीं एका टेबलाभोंवतीं आम्ही दहा बारा मंडळी जमून चहा प्यावयाच्या तयारींत होतों; इतक्यांत तुकाराम आला.

“ कायरे तुकाराम, कां आलास ? ” त्याला पाहतांच मीं विचारलें.

“ आपल्याकडे कोण कीं पाव्हणे आले आहेत. ”

“ पाहुणे ? कोण पाहुणे ? ”

“ मला माहीत नाहीं, साहेब, ” तो म्हणाला, “ मी आतां सकाळीं खोली झाडायला गेलों तो एक गृहस्थ दाराशीं येऊन आपली चकवशी करूं लागले. ”

“ हं– ” मीं उत्सुकतेनें म्हटलें.

" मीं त्यांना सांगितलं, कीं आपण रात्रीं गांवांत जेवावयाला गेलां ते परतच आलां नाहीं. तेव्हां त्यांनीं सांगितलं, कीं मी उतरायला आलों आहे. मीं त्यांचं सारं सामान ठेवून घेतलं अन् आपल्याला बोलवायला ताबडतोब आलों–"

" त्यांचं नांव नाहीं तूं विचारलंस ? "

" विचारलं. ते म्हणाले वृंदावनाहून बाबासाहेब आले आहेत असं सांग."

" बाबा इथें आले ? " एकदम आश्चर्यभरानें मी उद्गारलों.

" कोण ? तुमचे वडील ? " मालतीबाईंनीं मला विचारलें.

" हं असं दिसतंय्. " मीं त्यांना घाईनें उत्तर दिलें, आणि माझ्या कपांत माणिक चहा ओतीत होती तिला मीं म्हटलें, " आटप. चहा झटकन पिऊन मला गेलंच पाहिजे. "

" थांबा. थोडीं बिस्किटं आणतें खाऊन " एकीकडे कपांत चहा ओतीत आणि एकीकडे तिरप्या नजरेनें माझ्याकडे पाहात माणिक म्हणाली.

" माफ कर. मला लवकर गेलंच पाहिजे. बाबा असे अवचित इथें कां येऊन थडकले काय जणं ! " किंचित् काळजीच्या स्वरानें चहाचा कप उचलतां उचलतां मीं म्हटलें.

चहा प्यायल्याबरोबर मी लगबगीनें निघालों, आणि तांगा करून तडक कॉलेजवर गेलों. मी खोलीपाशीं जातों तों बाबा व्हरांड्यांत इकडे तिकडे येरझारा घालीत होते. मला पाहून ते म्हणाले,

" आलास का ? "

मीं त्यांना खोलींत नेलें. आम्ही दोघेहि बसल्यावर मीं स्टोव्ह पेटविला आणि बाबांना विचारलें,

" चहा टाकूं का कॉफी ? "

" कॉफी टाक. "

स्टोव्हवर पाण्याचें भांडें ठेवीत मीं विचारलें, " बाबा, पत्र बित्र न पाठवितां यावं लागलं ? "

" कां ? तुला माझं पत्र नाहीं मिळालं ? "

" नाहीं ! "

" तुझ्या हातीं कालच पत्र यायला पाहिजे होतं. "

" मला नाहीं मिळालं पत्र ! "

" असं ! आश्चर्य आहे. " बाबा म्हणाले, " पोस्टांत कांहीं तरी घोंटाळा झाला असला पाहिजे. "

नंतर कांहीं वेळानें बाबा आपण होऊन म्हणाले, " इथल्या लक्ष्मी मिल्सचे शंभर शेअर मीं घेतलेले आहेत, तुला माहीत आहे ना ? "

" हं. "

" त्या मिलच्या व्यवस्थेंत बराच घोंटाळा उडाला आहे, अन् तिच्या शेअरची किंमत पार उतरणार आहे असं मला कळलं म्हणून काय घोंटाळा आहे तें प्रत्यक्ष पाहण्यासाठीं इथें यावं लागलं. एक दिवस मला इथें राहिलं पाहिजे. घोटाळ्याची बातमी खरी असली तर मला तावडतोब शेअर काढून टाकले पाहिजेत. "

कॉफी तयार झाल्यावर ती मीं दोन कपांत ओतली, एक कप बाबांच्या पुढें ठेवला, आणि दुसरा मीं आपल्यासाठीं ठेवला. कॉफी पितां पितां बाबांनीं विचारलें,

" कुठें गेला होतास काल रात्रीं ? "

ज्या प्रश्नाला मी भीत होतों तोच बाबांच्या तोंडून निघाल्याबरोबर मी चमकलों. माणिकविषयींची सर्व हकीगत बाबांना सांगण्याचें मीं ठरविलेंच होतें, आणि आमच्या विवाहाला त्यांची संमति मिळवावयाची झाल्यास त्यांच्याशीं कसें कसें बोलावें या विचारांतच मी गेले दहापंधरा दिवस होतों. परंतु, बाबा माझ्या खोलींत यावयास आणि नेमका त्याच्या आदल्याच रात्रीं मी गांवांत गेलेला असावयास एकच गांठ पडली, हें बरें झालें नाहीं अशी माझ्या मनाला रुखरुख लागली होती. माझ्या अव्यवस्थित वर्तणुकीच्या मुद्देमालासकट मी पकडलों गेलों असें माझें मन मला सांगत होतें. केवळ रात्रीं गांवांत गेल्याची तेवढी एकच गोष्ट बाबांच्या निदर्शनास आली होती असें नव्हे. माझ्या खोलींत माझ्या वर्तणुकीचे दाखले जिकडे तिकडे अस्ताव्यस्त पसरले होते. पुस्तकांच्या टेबलावर पुस्तकांच्या संख्येपेक्षां चिरुटांच्या रिकाम्या व भरलेल्या पेट्यांचीच संख्या अधिक होती. बाबांचें पत्र मला आगाऊ पोंचलें असतें तर मी त्या पेट्या दृष्टिआड करण्याची खबरदारी घेऊं शकलों असतों. पण बाबा आकस्मिक येऊन थडकले आणि मी नेमका

सांपडलों. चिरुटांच्या पेट्यांखेरीज फस्त केलेल्या चिरुटांचे बारीक तुकडेहि एका डब्यांत भरगच्च भरलेले सहज दिसण्यासारखे होते. एखाद्या उपेक्षित बागेंतील जीर्ण झाडांप्रमाणें टेबलावरील पुस्तकें पडलीं होतीं. सवतीच्या मुलांना सावत्र आई जसें वागविते तसेंच मी त्या पुस्तकांना वागविल्याचें उघड उघड दिसत होतें. कित्येक महिने मीं त्यांच्याकडे ढुंकूनहि पाहिलें नव्हतें ही गोष्ट त्या पुस्तकांकडे एक दृष्टिक्षेप टाकल्याबरोबर स्पष्ट होण्यासारखी होती. माझा अभ्यास मुळींच झाला नसून मी परीक्षेला बसणार नाहीं असें मी बाबांना सांगणारच होतों. पण, मी आपण होऊन या गोष्टी सांगणें आणि माझ्या पश्चात् त्या बाबांच्या ध्यानांत येणें यांत फार फरक होता. माणिकचा एक फोटोहि माझ्या टेबलावर काल पडलेला होता—तो फोटो बाबांनीं पाहिला कीं काय?—पण नाहीं. काल संध्याकाळीं तो फोटो कपड्याच्या ट्रंकमध्यें ठेवून मी गांवांत गेलों होतों. ही आठवण होतांच मला जरा त्यांतल्यात्यांत समाधान वाटलें आणि जीव थोडा खालीं पडला.

"काल—गांवांत—डॉक्टर मालतीबाईच्या घरीं—जेवायला गेलों होतों." अडखळत अडखळत मीं सांगितलें. माझ्या उत्तराचा बाबांच्या मनावर काय परिणाम होतो तें मी सूक्ष्म नजरेनें लक्ष लावून पाहात होतों. मालतीबाईचें नांव ऐकतांच त्यांच्या कपाळाला किंचित् आंठ्या पडल्या.

"विलासगडच्या जोश्यांची मालती—तीच ना ती?" त्यांनीं कॉफीचा पेला खालीं ठेवीत विचारलें.

"हं."

"तुझा त्यांचा इतका स्नेह जमला आहे का?"

"विशेष नाहीं. पण—" तें वाक्य पूर्ण न करतां मीं तसेंच सोडून दिलें. मालतीबाईच्या बहिणीशीं माझें किती प्रेम जमलें होतें तें बाबांना कळलें तर त्यांना काय वाटेल या प्रश्नाचें उत्तर मनाशीं शोधीत मी बाबांकडे पहात राहिलों. बाकी मालतीबाईचें नांव ऐकतांच बाबांचा भ्रुकुटीभंग कां व्हावा तें मला नीटसें कळेना.

"विलासगडच्या जोश्यांच्या घरांतली जी हकीकत मला अण्णाकडून कळली ती कांहीं मोठी चांगलीशी नव्हती." बाबा माझ्याकडे पाहात म्हणाले, "मालतीबाईशीं फारसा स्नेहसंबंध तूं न ठेवलास तर बरं."

" छे, छे ! त्यांचा माझा विशेष स्नेह मुळींच नाहीं. " मीं झटकन् उत्तर दिलें. मीं जें म्हटलें तें खरेंच होतें. परंतु, वस्तुस्थितीचा हा फक्त अर्धा भाग होता. मालतीबाईशीं माझा विशेष स्नेह नव्हता, परंतु त्यांच्या धाकट्या बहिणीकडून मला विवाहाचें वचन मिळालें होतें. वस्तुस्थितीचा हा दुसरा अर्ध उघड करून बाबांना सांगण्याचें मीं त्या वेळीं टाळलें.

" हं, तेंच बरं." माझी खरी स्थिति न कळल्यामुळें किंचित् समाधानाच्या स्वरानें बाबा म्हणाले, " मुकुंदराव जोशांबद्दल आणि मालतीबद्दल शेंकडों घाणेरड्या गोष्टी मला अण्णा सांगत होता. सगळेच लोकापवाद सर्वस्वी खरे असतात असं नाहीं. पण लोकांकडून राईचा पर्वत व्हायला तरी कांहीं तरी आधार लागतोच कनी ? असल्या मंडळीपासून आपण आपलं दूर रहावं हें चांगलं. "

" हं. " शून्य मानानें मीं उद्गारलों.

पूर्वी एकदां वृंदावनास शांतानें मला असेंच कांहीं सांगितलें होतें त्याची मला या वेळीं आठवण झाली. माणिकचे वडील आणि थोरली बहीण नीतीच्या प्रशस्त रस्त्यावर वावरणारीं नसलीं तरी माणिकवर असला कांहीं आरोप कोणीं केला नाहीं हें मनांत येऊन मला त्यांतल्यात्यांत बरें वाटलें. पण माझ्या व माणिकच्या विवाहाला बाबांची संमति मिळविण्याच्या मार्गांत ही एक मोठी अडचण उत्पन्न होणार असें वाटून मी एकदम अत्यंत खिन्न झालों.

बराच वेळ मीं कांहींच बोललों नाहीं. बाबाहि स्तब्ध होते.

" बरं, तुझा अभ्यास कसा काय चालला आहे ? " कांहीं वेळानें बाबांनीं मला विचारलें.

हा प्रश्न ऐकतांच आतां साऱ्या गोष्टी एकदां मोकळ्या मनानें बाबांना सांगून टाकण्याची वेळ आली असें मला वाटलें. मी वाईट संगतींत कसा सांपडलों, माझें अभ्यासाकडे दुर्लक्ष कसें झालें, माणिकची माझी गांठ पडून तिच्या माझ्यांत प्रेम उत्पन्न होऊन शेवटीं आम्हां दोघांची विवाहग्रंथिदेखील जवळ जवळ बसल्यासारखी कशी झाली होती, धूम्रपानाच्या व्यसनांत मी कसा वाहवलों होतों, वगैरे साऱ्या हकीकती सांगून एकदां माझ्या स्थितीची खरी कल्पना बाबांना द्यावी असें माझें मन मला जोरानें सांगूं लागलें. केव्हां

तरी सर्व प्रकार बाबांना सांगून त्यांचा राग सहन करणें भागच होतें. तो राग सहन केल्याखेरीज माणिकशीं विवाह करण्यास बाबांची संमति मिळणें शक्य नव्हतें. मग जी गोष्ट केव्हां तरी एकदां करावीच लागणार ती आतांच केलेली काय वाईट, असें माझें मन मला शिकवूं लागलें. मला ती शिकवण पटली, व त्याप्रमाणें बोलण्याचीहि मी तयारी केली—

पण, काय झालें कोण जाणे! कांहीं केल्या एक शब्दहि माझ्या तोंडावाटे फुटेना!

बाबा म्हणाले, "काय, माझ्या प्रश्नाला कांहीं उत्तर नाहीं दिलंस?"

"अं–अं–" माझी वाचा नाहींशी झाल्यासारखेंच मला वाटलें. एक अक्षरहि मला बोलतां येईना.

कांहीं वेळानें बाबा आपलें काम करण्यासाठीं लक्ष्मी मिलमध्यें गेले. मघांच्या भाषणाचा ओघ अर्थातच जेथल्या तेथें थांबला. परंतु प्रत्यक्ष भाषण कांहींच झालें नाहीं तरी बाबांच्या एकंदर चर्येवरून मला हें स्पष्ट दिसलें, कीं माझा एकंदर क्रम बाबांना अगदीं नापसंत वाटत होता.

बाबा गेल्यानंतर मी विचार करूं लागलों, कीं माझ्याविषयीं बाबांचें मत वाईट झालें आहे तें अधिक वाईट न होईल अशी खबरदारी कशी घ्यावी? बाबांच्या देखत माझ्या सहाध्यायी मित्रमंडळींत मिसळणें तर बिलकुल इष्ट नव्हतें. कारण, त्यांच्या भाषणावरून आणि थट्टामस्करीवरून माझें खरें स्वरूप उघड होण्यास क्षणाचाहि विलंब लागणार नाहीं हें मी पूर्ण जाणून होतों. पण बाबा असतांना इतर कितीहि रीतीनें मीं आपल्या मित्रांची संगति टाळली तरी आज दोन असे प्रसंग हटकून घडून येणार होते, कीं त्या वेळीं माझ्या मित्रांना टाळणें मला शक्य नव्हतें. एक आज दुपारीं जेवणाच्या वेळीं आणि आज संध्याकाळीं माझी टेनिसची मॅच् होती त्या वेळीं. अशा दोन्ही प्रसंगीं मी अडचणींत सांपडणार हें उघड होतें. पहिल्या प्रसंगाविषयीं मीं मनाशीं असें ठरविलें, कीं बाबांचें व माझें ताट खोलींत मागवावयाचें म्हणजे सर्व ठीक होईल. संध्याकाळचा प्रसंग टाळतां येईल असें मात्र वाटेना. आजची मॅच् फार महत्त्वाची होती. कारण त्यांत जो यशस्वी होईल, त्याला बक्षिसें मिळावयाचीं होतीं. मॅच् पाहावयास बरेच विद्यार्थी येणार हें निःसंशय होतें, आणि शिवाय माणिक, मालतीबाई ही मंडळींदेखील माझा खेळ

पाहण्यासाठीं मुद्दाम यावयाची होती. माणिकला तर काल दोन चार वेळां मीं आग्रहाचें आमंत्रण दिलें होतें, आणि संध्याकाळीं चार वाजतां तिनें माझ्या खोलींत यावयाचें, व तेथें आमचा सर्वांचा चहा झाल्यावर आम्ही टेनिस कोर्टावर जावयाचें असें काल अगदीं निश्चित ठरलें होतें, व त्याबद्दल मला काल अत्यानंदहि झाला होता. परंतु एकच गोष्टीबद्दल एकदां हर्ष तर दुसऱ्या वेळीं चिंता वाटावी असा अनुभव या संसारांत अनेक वेळां येतो, व त्या अनुभवानेंच या वेळीं माझें मन अगदीं अस्वस्थ होऊन गेलें. संध्याकाळीं माणिक न येईल असें करण्यासाठीं काय युक्ति योजावी याचा मी खूप खूप विचार केला. पण मस्तक जसें कांहीं शून्य होऊन गेलें होतें. कांहीं सुचेना. शेवटीं त्रासून मी खुर्चीवरून उठलों व मनाशीं म्हटलें,

" काय व्हायचें असेल तें होईल ! उगच काळजी करीत बसून काय फायदा ? "

बाबांना मिलमधून परत यावयास बराच उशीर झाला. ते आले तों क्लबांत जेवणाची वेळच झाली होती. बाबांचा चेहरा मात्र जरा प्रफुल्लित दिसला, व त्याचें कारणहि त्यांच्या बोलण्यावरून तावडतोब समजलें. कपडे काढून ठेवतां ठेवतां ते म्हणाले,

" जगदीश, एका मोठ्या काळजींतून सुटलों बुवा ! "

मी कांहींच न बोलतां प्रश्नात्मक दृष्टीनें त्यांच्याकडे पाहिलें. ते पुढें म्हणाले,

" गिरणींत जाऊन अगदीं अंतःस्थ बातमी काढली. कांहींदेखील गडबड नाहीं. शेअर अगदीं सुरक्षित आहेत. इतकंच नाहीं तर शेअरचे भाव दोन चार दिवसांत दीडपटीनं वाढायचा संभव आहे. उगच पुण्याचा हेलपाटा पडला झालं ! नसतों आलों तरी बरं झालं असतं ! "

अगदीं माझ्या मनांतील विचार बाबांच्या तोंडून बाहेर पडला. बाबा आज आले नसते तर फार बरें झालें असतें असें मला सारखें वाटत होतें. माझ्या मनांत सारखा घोळणारा विचार बाबांनीं बोलून दाखविल्यामुळें मी चटकन् बोलून गेलों.

" हो, हो ! नसतां आलांत तर बरं झालं असतं—"

पण लगेच मीं आपली जीभ चावली. मी आणखी कांहीं तरी वेड्यासारखें बरळणार होतों. पण शुद्धीवर येऊन ओंठावर आलेले शब्द मी परतविले.

बाबांचें स्नान वगैरे उरकल्यानंतर आम्ही परत खोलींत आल्यावर ते म्हणाले,

" काय रे बुवा, जेवायला किती अवकाश आहे ? "

" झालंच आहे. आपलीं दोन ताटं खोलींत पाठवून द्यायला मीं आचाऱ्याला सांगून ठेवलं आहे. आतां इतक्यांत येतील ताटं. "

" ताटं इकडे मागवलीं आहेस ? " बाबांनीं मोठ्या आश्चर्याच्या स्वरानें विचारलें.

" हं. क्लबांत सगळी मंडळी जमून धिंगाणा घालतात. तसल्या दंग्यांत जेवायला बसणं तुम्हांला आवडणार नाहीं असं मला वाटलं, अन् मीं ही व्यवस्था करून ठेवली. "

" अं: ! वेडाच आहेस तूं ! " बाबा हंसत म्हणाले, " अरे, तसल्या त्या दांडगाईची तर मला मोठी हौस आहे. पाहूं तरी एकदां तुमच्या क्लबांतली गंमत ! खोलींत एकटं एकटं जेवण्यापेक्षां तुम्हां सर्वांच्या धांगडधिंग्यांत जेवलों तर चार घांस जेवणसुद्धां जास्त जाईल ! कांहीं नको ताटं आणवूस ! चल, वेळ झाली असली तर आपणच क्लबांत जाऊं ! "

" बरं ! "

तीं दोन अक्षरें मीं कशीं उच्चारलीं तें माझें मलाच माहीत ! बाबांच्या बोलण्यानें माझा व्यूह पार ढांसळून गेला ! निराशेनें मीं सर्वस्वीं भांबावून गेलों. शत्रूला अमक्या जागीं यावयास लावून त्याच्याशीं त्या ठिकाणीं लढाई द्यावयाची असें एखाद्या सेनापतीनें ठरवावें व शत्रूनें भलत्याच जागीं जाऊन हल्ला चढवावा, म्हणजे त्या सेनापतीच्या मनाची जी स्थिति होत असेल तिचा मला त्या वेळीं एका क्षणांत अनुभव आला. जें विघ्न टाळण्याची मीं कुशल योजना करून ठेवली होती तेंच आतां माझ्यावर कोसळणार हें मला स्पष्ट दिसूं लागलें. खोलीला कुलूप लावून मी बाबांच्या बरोबर क्लबाची वाट चालूं लागलों खरा, पण खाटकाबरोबर कसाईखान्याकडे जाणाऱ्या बोकडासारखें मला वाटत होतें !

मला भीति होती त्याचप्रमाणें क्लबांत घडलें. माझ्या उजव्या हाताकडील पाटावर वसंतराव बसला होता. त्याची व बाबांची मीं प्रथम ओळख करून दिली. जेवतांना त्याचें व बाबांचें मधून मधून थोडथोडें बोलणें चाललें होतें,

य तें पाहून मला बरेंहि वाटलें. परंतु इतर स्नेह्यांच्या चेष्टेचा ओघ जेव्हां माझ्याकडे वळला तेव्हां मला ती असह्य वाटूं लागली. क्लबांत जेवणाऱ्या तरुण विद्यार्थ्यांच्या जिभा त्या ! त्यांना आधींच आळा नसावयाचा, आणि आज तर त्या विशेषच मोकळ्या सुटल्या होत्या ! शत्रूच्या नागव्या तरवारींची लढाऊ शिपायाला भीति वाटत नसेल इतकी मला त्या नागव्या जिभल्यांची भीति वाटत होती. माझ्या अभ्यासाविषयीं, आबासाहेबाशीं मीं केलेल्या मारामारीविषयीं, आणि सर्वांत त्रासदायक म्हणजे माझ्या व माणिकच्या संबंधाविषयीं माझी चेष्टा करण्यांत सर्वांची जणूं काय मोठ्या स्पर्धेची शर्यत लागली होती. दोन तीन वेळां त्या मंडळींना डोळ्यांनीं खुणवून माझ्या वडिलांच्या सान्निध्याची आठवण करून देण्याचा मीं प्रयत्न केला. पण छे ! ती मंडळी कोठली ऐकावयास ! एक वेळ वर्षाऋतूंतील ढग आपल्या जलधारा आंवरून धरतील, पण हे लोक आपल्या जिव्हा आंवरणार नाहींत ! बाबा मुकाट्यानें सारी चेष्टा ऐकत होते. ती ऐकून त्यांना काय वाटत होतें त्याची कल्पना करणें कांहीं फारसें कठीण नव्हतें. जेवण संपल्या-नंतर आम्ही खोलींत परत आलों तेव्हां एकदांचा माझा जीव खालीं पडला. बाबा माझ्याशीं विशेष कांहींच न बोलतां वामकुक्षी करण्यासाठीं कॉटवर पडले, आणि मीं एक पुस्तक घेऊन इझीचेअरवर अंग आडवें केलें.

बाबा निजून उठल्यानंतर मीं त्यांना साहजिकपणेंच विचारलें, " बाबा, चहा टाकूं का ? "

" नको. " बाबांनीं गंभीर चेहेरा ठेवून उत्तर दिलें. चोराच्या मनांत चांदणें म्हणा, किंवा कांहींहि म्हणा, त्यांच्या बोलण्यांत त्यांचा नेहमींचा मोकळेपणा मला दिसला नाहीं, एवढें खरें.

" थोडासा घ्यायचा असला तर टाकतों. माझी संध्याकाळीं मॅच् आहे तेव्हां मी थोडासा घेणार आहे. "

" बरं, घेईन घोटभर. "

बाबांच्या या उत्तरानें मी थोडासा धिरावलों आणि म्हटलें, " माझी मॅच् पाह्यला येणार ना कोर्टवर ? "

" येईन कीं. पाहूं तरी तुझा खेळ. "

मला वाटलें होतें तितके बाबा रागावले नव्हते असें दिसलें. मला

अधिकच धीर आला. परंतु, आत्तां माणिक येऊन दत्त म्हणून खोलींत उभी राहिली, कीं काय फार्स उडणार त्याचें चित्र माझ्या डोळ्यांपुढें सारखें उभें असल्यामुळें माझी छाती धडधडत होती. चहा तयार करीत असतांना व पितांना माझें लक्ष मुळींच ठिकाणावर नव्हतें. बाबा माझ्याशीं कायसें बोलत होते; परंतु त्यांच्या म्हणण्याला नुसता हुंकार देण्यापलीकडे मीं कांहींच करीत नव्हतों. माझे डोळे माझ्या हातांतील घड्याळाकडे लागलेले होते, मिनिट कांटा बाराच्या आंकड्याकडे हळुहळू सरकत होता, व तें पाहून गळ्याभोंवतालच्या फांसाची गांठ सरकतांना अपराध्याला काय वाटत असेल त्याची मला पूर्ण कल्पना येत होती. माझे कान सर्वस्वी खोलीच्या दाराकडे लागले होते. बाहेर व्हरांड्यांत कसलाहि आवाज झाला, कीं मला वाटे माणिक आली! आणि तो आवाज ऐकूं येईनासा होईपर्यंत माझा जीव तिकडे लागून राही!

आमचें चहा पिणं झालें तरी माणिक आली नाहीं हें पाहून मला जितकें आश्चर्य वाटलें तितकेंच बरेंहि वाटलें. माणिक कां आली नाहीं असा प्रश्न मनांत उभा राहून थोडीशी हुरहुर वाटत होती, हें खरें; परंतु, आज बाबांच्या देखत ती आली नाहीं तर एक अडचणीचा प्रसंग टळेल अशी मनाची भावना असल्यामुळें तिच्या न येण्यानें मला बरें वाटणेंच साहजिक होतें. त्या समाधानी वृत्तींत मी टेनिस खेळण्याचा पोषाख केला. मी बुटाचे बंद बांधीत असतांना बाबांनीं मला विचारलें, " आजचीं तुझी मॅच् महत्त्वाची आहे ना? "

" हो तर! आजच्या मॅच्वर बक्षिसाचा निकाल अवलंबून आहे. "

" मग, तुझा जय होणार कीं नाहीं? "

" मला वाटतं माझा जय व्हायला कांहीं हरकत नाहीं. " बुटाचे बंद बांधून वर बाबांकडे पाहात मीं हंसत म्हटलें.

पावणे पांच झाले. कोर्टवर जावयाची वेळच झाली. माणिक अजून आली नव्हती. मोठ्या उल्हासानें डोक्यावर टोपी चढवीत आणि टेनिसची रॅकेट हातांत घेऊन ऐटीनें फिरवीत मीं बाबांना म्हटलें, " चला. कोर्टवर वेळेवर हजर झालं पाहिजे. "

" हं " असें म्हणून बाबांनीं डोक्याच्या रुमालाचा शेवटचा वेढा बांधला.

परंतु, खोलीच्या दाराबाहेर आम्ही पाऊल टाकतों न टाकतों तोंच

माझ्या उल्हासाचे मनोरे क्षणार्धात पार ढांसळले! आम्ही खोलीबाहेर यावयाला आणि समोरून माणिक घाईघाईनें—जवळ जवळ धांवतच—माझ्याकडे यावयास एकच गांठ पडली! तिला पाहातांच खोलीला कुलूप लावावयास पुढें झालेला माझा हात तेथल्या तेथेंच थांबला. व्हरांड्याच्या फरशीवर खाडखाड बूट वाजवीत माझ्याकडे येणाऱ्या माणिकची मूर्ति दृष्टीस पडतांक्षणींच माझ्या मनाला काय वाटलें तें सांगणें कठीण आहे. माझ्या मनांत उद्भवलेल्या विचारांचें व विकारांचें पृथक्करण करण्याइतका वेगळेपणा माझ्या ठिकाणीं उरलाच नाहीं. माझ्या पाठीशीं उभ्या राहिलेल्या बाबांच्या सान्निध्याची यत्किंचित्‌हि जाणीव मला राहिली नाहीं, व आ करून मूढ मनानें मी माणिककडे बघत राहिलों!

माझ्याजवळ आल्यावर हंसत हंसत लडिवाळपणानं माझ्या हातांतील बॅट आपल्या हातांत घेत माणिक म्हणाली, "मीं इतका उशीर केल्याबद्दल राग नाहीं ना आला? आयत्या वेळीं ताईनं डॉक्टर शामरावांकडे जाण्याचा बूट काढला, अन् तिंचं माझं भांडण झाल्यामुळें मला वेळेवर येतां आलं नाहीं. रागवायचं नाहीं अं—"

इतक्यांत तिचें लक्ष बाबांकडे गेलें व "हे कोण?" असा प्रश्न विचारण्याच्या भावानें तिनें नेत्र विस्तृत करून मजकडे पाहिलें. मी पाठीमागें वळून पाहतों तों बाबा एकेक डोळा एवढाला करून माणिककडे टवकारून पाहात होते. अजबखान्यांतील एखादा विचित्र प्राणी दृष्टीस पडला म्हणजे मनुष्य ज्या तऱ्हेची चर्या करतो त्याच तऱ्हेची बाबांची मुद्रा मला त्या वेळीं भासली. माणिक बाबांकडे आश्चर्यानें पाहात होती, व बाबा तिच्याकडे तिरस्कारयुक्त विस्मयानें पाहात होते. त्या दोघांकडे आळीपाळीनें पाहतां पाहतां मी पुरा गांगरून गेलों. कोणाशीं काय आणि कसें बोलावें हेंच मला सुचेना! शेवटीं बाबांकडे वळून बोलण्याचा प्रयत्न करीत मीं म्हटलें,

"बाबा, मालतीबाई जोश्यांची धाकटी बहीण माणिक—" असें म्हणून मीं माणिककडे बोट केलें. मीं पुढें कायसें बोलणार होतों, पण तितक्यांत बाबा खांकरल्यासारखें करून म्हणाले.

"हं. समजलों. पुरें झालं. मी नाहीं यत तुझी मॅच् पाह्यला! मी जरा गांवांत जाऊन येतों!"

मी बाबांची समजूत घालण्यासाठीं तोंडावाटे शब्द काढणार तोंच बाबा अंगावरचें उपरणें सरसावीत भराभर चालत गेलेदेखील ! त्यांच्या जोड्याचा फट् फट् असा आवाज आणि त्या आवाजाचा प्रतिध्वनि व्हरांड्यांत स्पष्टपणें आम्हां दोघांनाहि ऐकूं आला. जिन्याखालीं उतरणाऱ्या बाबांच्या मूर्तीकडे आम्हीं दोघेंहि क्षणभर पाहात राहिलों ! बाबा दिसेनासे झाल्यावर एक उसासा टाकून मीं मनाशीं पुटपुटलों, " च् ! काय विचित्रपणा ! "

तो एकंदर प्रकार पाहून माणिक मोठ्यानें खदखदां हंसली, व टेनिसची बॅट माझ्या हातांत परत देत तिनें मला विचारलें,

" हे कोण ? "

भुंवया वक्र करून गंभीर मुद्रेनें तिच्याकडे पाहात मीं म्हटलें, " माझे बाबा. "

" तुमचे बाबा ? हं: ! कांहीं तरीच ! "

२

या गोष्टीला पुष्कळ दिवस झाले. परंतु त्या दिवसाच्या हकीगतीची आठवण मी अजून विसरलों नव्हतों. त्या दिवशीं रात्रीं बाबांची व माझी पुन्हां गांठ पडल्यावर आपण होऊन कोणतीहि गोष्ट त्यांच्याशीं बोलण्याचें मला धैर्यच होईना. एखाद्या ज्वालामुखी पर्वताकडे, त्याचा केव्हां मोठा स्फोट होईल त्याचा नियम नाहीं अशा भीतीनें मनुष्य जसा बघत असतो तसा मी बाबांच्या तोंडाकडे मधून मधून पाहात होतों. पण बोलण्याचें धाडस माझ्याच्यानें करवेना. टेनिसच्या मॅचमध्यें माझा जय होऊन मला बक्षीस मिळालें ह्या गोष्टीचा उच्चार करावयासदेखील माझे ओंठ उघडेनात. क्लबांत जेवण करून खोलींत परत येईपर्यंत आम्हीं एकमेकांशीं एक अक्षरसुद्धां बोललों नाहीं. ती गोष्ट मला कशीशीच वाटत होती. परंतु गप्प बसण्याखेरीज दुसरा श्रेयस्कर मार्गच नव्हता. कारण मी एकदां बोललों कीं बाबा रागाच्या भरांत काय काय बोलतील त्याचा नियम नाहीं अशीं मला सारखी भीति वाटत होती.

आणि माझी भीति कांहीं खोटी ठरली नाहीं. खोलींत परत आल्यानंतर कशावरूनसें आमचें बोलणें सुरू होऊन जरा वेळ झाला नाहीं तोंच त्या वेळेपर्यंत प्रयत्नानें दडपून ठेवलेला बाबांच्या मनांतील राग बाहेर पडला.

गेल्या दोन वर्षांत मीं अभ्यासाकडे पूर्ण दुर्लक्ष केल्याबद्दल ते मला पुष्कळ बोलले. कॉलेजांतील इतर बाबतींतहि ज्या ज्या गोष्टी त्यांच्या कानावर गेल्या होत्या त्या सर्वांचा त्यांनीं उल्लेख केला. माझा खर्चिकपणा निघाला. माझी फॅशनची हौस निघाली. माझें धूम्रपानदेखील निघालें. मी धूम्रपान करतों ही गोष्ट बाबांना पूर्वीं कदाचित् माहीत नसेल; पण आज ते माझ्या खोलींत आल्यानंतर माझ्या चिरुटांच्या पेट्यांच्या ढिगाऱ्यापुढें त्यांचें तें अज्ञान टिकणें शक्यच नव्हतें. धूम्रपानाविरुद्ध बाबांनीं एक भलें जंगी व्याख्यानच झोडलें असें म्हणावयास हरकत नाहीं. तें ऐकत असतां एकदां नव्हे दहा वेळां मला असें वाटलें कीं, बाबांना म्हणावें "धूम्रपानाचे दुष्परिणाम मला माहीत नाहींत असं का समजतां? त्याचे सारे अपाय मला माहीत आहेत. तुमच्यापेक्षांहि त्यांचं अधिक रसभरित वर्णन पाहिजे तर मी करून दाखवतों! पण एकदां व्यसन लागल्यावर साऱ्या गोष्टी कळत असून वळेनातशा होतात त्याला काय करायचं? धूम्रपानाची संवय टाकण्याचा मी यापुढें अगदीं मनापासून प्रयत्न करीनः पण एवढं तुमचं व्याख्यान जरा आटपतं घ्या!" पण तसें मी कसें बोलणार? वडील माणसांना जे अनेक प्रकारचे अत्यंत सोईस्कर आणि लहानांच्या मनांत मत्सर उत्पन्न करणारे हक्क आहेत त्यांपैकीं मनाला वाटेल तितकें बोलत राहण्याची मुभा हा एक आहे ना? त्या जन्मसिद्ध हक्काचा बाबा उपयोग करीत असल्यामुळें मी अगदीं स्वस्थ बसून त्यांचें सारें बोलणें ऐकून घेत होतों.

त्या त्यांच्या सबंध बोलण्यांत एक गोष्ट मात्र अशी होती, कीं तिच्यामुळें मला जितकें आश्चर्य तितकेंच समाधानहि वाटलें. ती गोष्ट ही, कीं माणिकच्या व माझ्या प्रेमसंबंधाचा त्यांनीं यत्किंचित्‌देखील उल्लेख केला नाहीं. माणिकची गोष्ट काढून बाबा आपल्याला आतां वाटेल तें बोलणार अशी मला मनांतल्या मनांत सारखी भीति वाटत होती. माझ्या धूम्रपानासकट चट् साऱ्या गोष्टींची हजिरी होत असलेली पाहून तर मला खात्रीच वाटूं लागली, कीं आतां यापुढें माणिकचें आख्यान लागणार व आपणांस हरप्रकारचीं बोलणीं ऐकावीं लागणार. परंतु अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही, कीं जणूं काय माणिकविषयींची गोष्ट आपल्याला काडीइतकीदेखील ठाऊक नाहीं अशा रीतीनें बाबा बोलत होते. त्यांना बाकीच्या साऱ्या गोष्टी कळून

तेवढीच गोष्ट कळूं नये हें मला संभवनीय वाटेना. तेव्हां, त्या विषयाची चर्चा टाळण्याचेंच त्यांच्या मनांत असेल असें मीं मनाशीं ठरविलें. पण, पुन्हां मनाला वाटे, कीं माणिकविषयींचेंच तेवढें बोलणें टाळण्याचें बाबांना काय कारण असणार ? तसें उघड उघड कारण तर कोणतेंहि दिसेना. पण, मीं मनाशीं म्हटलें, कांहीं कां कारण असेना, बाबा ती गोष्ट काढीत नाहींत हें फार उत्तम आहे. कारण त्या वेळच्या संतप्त वातावरणांत माझ्या माणिक-वरील प्रेमाचा नाजूक विषय निघाला तर भर दोन प्रहरच्या प्रखर सूर्यतापांत एखाद्या नाजूक जाईच्या कळीची जी स्थिति होते तीच त्याची होईल अशी मला भीति होती. त्या वेळीं माणिकशीं लग्न लावण्याबद्दल बाबांकडून परवानगी मिळविणें बाभळीच्या झाडाला गुलाबाचीं फुलें येण्याइतकेंच अशक्य होतें. म्हणून माणिकविषयीं बाबा कांहींच बोलेनात हें पाहून मला फार समाधान वाटलें.

बाबा माणिकविषयीं कांहीं बोलले नाहींत; पण माझ्या लग्नाचा विषय त्यांनीं काढलाच. शेवटीं शेवटीं ते म्हणाले,

" मग, एकंदरींत यंदा तूं कांहीं परीक्षेला बसत नाहींत हें खास. "

मी काहींच बोललों नाहीं. कारण, हो म्हणणें आणि स्तब्ध बसणें या दोहोंचाहि अर्थ सारखाच होता.

" तूं परीक्षेला गेला नाहींस म्हणूनच मला फार वाईट वाटतं असं समजूं नकोस. तुझ्या परीक्षेवांचून आमच्या घरांतली चूल खोळंबली आहे अशी कांहीं स्थिति नाहीं. पण, म्हणतात ना ' म्हातारी मेल्याचं दुःख नाहीं, पण काळ सवकतो ! ' तसंच एकदां या असल्या आयुष्याची चटक लागली, कीं मग अभ्यास—"

" नाहीं, तसं नाहीं ! " मीं मध्येंच आवेशानें म्हटलें, " पुढल्या वर्षी अगदीं झटून अभ्यास करून परीक्षा देण्याचा मीं निश्चय केलेला आहे, अन् तो मी पार पाडीन याविषयीं मला शंका वाटत नाहीं. "

" तूं खरोखरच निश्चय केला असलास तर तूं तो पार पाडशील याविषयीं मलासुद्धां शंका नाहीं. "

बाबांच्या शब्दांनीं माझ्या मनाला फारच बरें वाटलें. बाबांचें मत इतर बाबतींत माझ्याविषयीं कितीहि वाईट झालें असलें तरी माझ्या निश्चयी

स्वभावाची अजून त्यांना खात्री होती हें पाहून मला मनांतल्या मनांत आनंद झाला. सूर्यतापांत खूप हिंडून आलेल्या माणसाला, एखाद्या लहानशा झाडाचीच कां होईना पण सांवली मिळाली म्हणजे जितका आल्हाद होत असेल तितका मला बाबांच्या त्या शब्दांनीं झाला. मी त्या आल्हादाचा अनुभव घेत असतांच बाबा पुढें म्हणाले,

" एक गोष्ट आत्तांपर्यंत मीं तुझ्याजवळ बोलून दाखविली नाहीं ती आतां तुला सांगतों. "

बाबा आतां काय सांगणार आहेत कोण जाणे असा विचार मनांत येऊन उत्सुकतेच्या दृष्टीनें मीं त्यांच्याकडे वर मान करून पाहिलें.

" तुझं लग्न यंदांच करून टाकावं असं मीं एकंदर गोष्टींचा विचार करून मनाशीं ठरवलं आहे. अं—तुला या बाबतींत कसं काय वाटतं ? "

बाबांच्या या प्रश्नाला प्रत्यक्ष शब्दांनीं उत्तर देण्यापेक्षां मूक वृत्तीनेंच संमति दर्शविणें मला बरें वाटलें. वास्तविक तो प्रश्न मला अत्यंत प्रिय असा होता. यंदा माणिकशीं लग्न झाल्याखेरीज पुढच्या आयुष्याविषयीं कांहीं कल्पना करावयास मी तयारच नव्हतों. मी व माणिक दोघेंहि विवाहाला अत्यंत आतुर झालों होतों. आमच्या विवाहाला बाबांची संमति मिळेल किंवा नाहीं या चिंतेतच मी रात्रंदिवस होतों. असें असल्यामुळें यंदां माझें लग्न व्हावें अशी बाबांची इच्छा आहे हें त्यांच्या तोंडून कळल्याबरोबर मला अत्यानंद झाला. कोणत्याहि तऱ्हेची तपश्चर्या न करतां देवानें एकदम प्रगट होऊन वरदान दिलें असतां एखाद्यास जो साश्चर्य आनंद वाटेल त्याचा मला त्या क्षणीं अनुभव आला. बाबांच्या बोलण्यांत माणिकशीं मीं विवाह करावा असा बिलकूल उल्लेख नव्हता हें खरें. पण माझें मन मला सांगूं लागलें, कीं माझें व माणिकचें परस्पर प्रेम आहे हें बाबांना तरी काय माहीत ? त्यांनीं तरी कोणत्या कारणानें माणिकचें नांव घ्यावें ? शिवाय लग्नाला बाबांची संमति मिळणें आणि माणिकशी होणाऱ्या माझ्या विवाहाला त्यांची अनुमति मिळणें यांत मला कांहीं अंतर दिसत नव्हतें. कारण, माझें लग्न करावयाचें झालें तरी वधू पसंत करण्याचें काम बाबा शेवटीं माझ्यावरच सोंपविणार याविषयीं मला तिळमात्र शंका नव्हती. यामुळें बाबांचे ते शब्द म्हणजे माझ्या व माणिकच्या विवाहाविषयीं त्यांची अप्रत्यक्ष संमति असेंच मला त्या

क्षणीं वाटलें, व आनंदाच्या भरांत त्या वेळेपर्यंत बाबा मला जे थोडे फार कडु शब्द बोलले होते त्यांच्या वेदना मी पार विसरून गेलों.

कांहीं वेळ बाबा स्तब्ध बसले. परंतु, मी कांहींच बोलत नाहीं असें पाहून त्यांनीं जरा वेळानें विचारलें,

" काय, कांहींच बोलला नाहींस ? मीं काय म्हटलं तें ऐकलंस ना ? यंदा लग्न करायला हरकत नाहीं ना ? "

" नाहीं " मीं कशीं बशीं दोन अक्षरें तोंडाबाहेर काढलीं. बाबांशीं मीं नेहमीं मोकळेपणानें गप्पा मारणारा, पण माझ्या स्वतःच्या विवाहाचा प्रश्न निघतांच माझ्या जिभेवर लज्जेचा इतका भार पडल्यासारखें झालें, कीं तें पाहून माझें मलाच अतोनात आश्चर्य वाटलें. मीं बऱ्याचशा इंग्रजी कादंबऱ्या वाचल्या होत्या, व त्यांत पितापुत्रांचे प्रणयाविषयीं व विवाहाविषयीं झालेले मनमोकळे संवाद वाचून मला नेहमीं वाटे, कीं बापलेकांत अंतःकरणाचा असा उघडेपणा असणें फार चांगलें. त्याची आठवण मला या वेळीं झाली, व माझ्या लज्जेचें मला विशेषच गूढ वाटलें. त्या लज्जेचें कारणच मला समजेना. पण मला ती वाटत होती खरी. पाश्चात्य लोकांसारखें आपण वागूं म्हटलें तरी आपल्या आर्य अंतःकरणांतील वृत्ति बदलणार कशी, असाहि विचार क्षणभर माझ्या मनांत येऊन गेला.

बाबा पुढें म्हणाले, " यंदा तुझं लग्न करण्याची तुझ्या आईचीहि विशेष इच्छा आहे. परवांपासून चार पांच वेळां तिनें हा विषय काढला. अण्णाचा अन् वहिनींचाहि या लग्नाबद्दल फारच आग्रह दिसतो, पण मी सर्वांनाच बजाविलें होतें, कीं जगदीशला विचारल्याखेरीज यंदाचा बेत ठरवायचा नाहीं. अं–मग तुझी संमति आहे असं धरून चालूं ना ? "

" हं " खालीं घातलेली मान वर न करतां डाव्या हातचें नख उजव्या बोटांनीं साफ करीत मीं म्हटलें. मीं तें उत्तर दिलें खरें, पण बाबांच्या एका वाक्याचें मला थोडेंसें आश्चर्य वाटलें. " अण्णाचा अन् वहिनींचाहि या लग्नाबद्दल फारच आग्रह दिसतो " या वाक्यानें मला थोडेंसें गोंधळांत घातलें.

" या " लग्नाबद्दल असें बाबा कां म्हणाले ? " तुझ्या " लग्नाबद्दल असें ते कां म्हणाले नाहींत ? " या " म्हणजे कोणत्या लग्नाबद्दल ? शांताचा तर यांत कांहीं संबंध नाहीं ना ?

अशा नाना प्रकारच्या शंका त्या वेळीं माझ्या मनांत आल्या. एक वेळ असेंहि वाटलें, कीं शांताविषयींच्या शंकेचें निरसन करून घेण्यासाठीं बाबांना स्पष्टच प्रश्न विचारावा, इतकेंच नव्हे तर माणिकविषयींदेखील जें सांगावयाचें तें आत्तांच सांगून टाकावें. पण, पुन्हां मनाशीं नीट विचार केला, कीं असें करणें बरोबर नाहीं, व आवश्यकहि नाहीं. कारण, एक तर माझी मूळ शंकाच निराधार आणि निष्कारण असण्याचा पुष्कळ संभव आहेसें मला वाटलें; आणि शिवाय, बाबांचा मजवरील राग नुक्ताच कोठें थोडा शांत झाल्यासारखा होत होता, तोंच माणिकची गोष्ट काढून ती त्यांना अप्रिय वाटली म्हणजे त्या रागाच्या ज्वाला दुप्पट जोरानें भडकून त्यांत आमच्या लग्नास मिळणाऱ्या त्यांच्या संमतीची शक्यता पार भस्मसात् होऊन जावयाची !

म्हणून त्या वेळीं मी कांहींच बोललों नाहीं. नंतर लवकरच आम्ही दोघें निजलों, व दुसऱ्या दिवशीं दुपारच्या गाडीनें बाबा वृंदावनास निघून गेले.

मी व माणिक त्या दिवसापासून जरा आनंदांत होतों. माणिकशीं लग्न लावण्यास बाबांची संमति जवळ जवळ मिळविल्यासारखेंच मला वाटत होतें; आणि बाबांचें व माझें काय काय बोलणें झालें तें जेव्हां मीं सविस्तरपणें माणिकला सांगितलें तेव्हां तिचीहि समजूत तशीच झाली. याच सुमारास आणखी एक गोष्ट घडली, व त्यामुळें आपल्या विवाहावर सर्व वडील माणसांचा शिक्कामोर्तब लवकरच होणार अशी आम्हां दोघांनाहि सबळ आशा वाटूं लागली. ती गोष्ट म्हणजे माणिकला तिच्या वडिलांचें पत्र आलें. आपण कांहीं कामानिमित्त एक दोन दिवस पुण्यास येणार आहोंत असें त्यांनीं त्या पत्रांत लिहिलें होतें. माणिकचे वडील आले, कीं त्यांची संमति मिळवून आपण अर्धा डाव जिंकून ठेवूं, व मग कॉलेज बंद होऊन आपण घरीं गेलों कीं बाबांचा रुकार सहज मिळवूं असा मी आपल्या मनाशीं बेत करूं लागलों.

माणिकचे वडील ज्या दिवशीं यावयाचे होते त्या दिवशींची सकाळची गोष्ट. माणिकला पोलक्यासाठीं जपानी तऱ्हेचें कापड हवें होतें म्हणून लष्करांतील एका दुकानांत आम्ही गेलों होतों. दोन तीन तऱ्हेचीं कापडें

विकत घेऊन आम्ही बाहेर पडलों. कापडाच्या घड्यांचें बंडल माणिकजवळून मीं आपल्या हातांत घेतलें, व तिची छत्री तिच्या हातांत दिली. आम्ही दोघेहि एकमेकांकडे पाहून हंसलों. त्यांतल्या त्यांत मला जास्त हंसूं आलें. छत्री उघडतां उघडतां माणिकनें विचारलें,

" काय झालं हंसायला ? "

" तूं हंसलीस म्हणून मला हंसायला आलं " असें उत्तर देतांना मी पुन्हां हंसूं लागलों.

" खोटं ! "

" नाहीं, खरंच ! "

" पण, मी मुळीं पहिल्यांदां हंसलेंच नाहीं ! "

माझें हंसणें अजून बंद झालें नव्हतें. तें पाहून माणिकनें पुन्हां विचारलें, " काय झालं सांगा ना ? "

" खरंच विशेष कांहीं नाहीं ! "

" कांहीं नाहीं कसं ? उगंच हंसूं यायला वेड तर लागलेलं नाहीं ! "

हंसण्याचें खरें कारण माणिकला सांगण्याची माझी फारशी इच्छा नव्हती. तेव्हां उत्तराची टाळाटाळ करण्याच्या उद्देशानें मीं म्हटलें, " तें युरोपियन जोडपं चाललं आहे. तें पाहिलंस कां ? नवरा नुसता बगळ्यासारखा उंच आहे अन् बायको कोबीच्या कांद्यासारखी ठेंगणी अन्—"

माझ्या बोलण्यानें माणिकला एकदम मोठ्यांदा हंसूं लोटलें. परंतु, त्या हंसण्याचा आवेग ओसरतांच माझ्याकडे पाहात ती म्हणाली, " कांहीं तरी करून विषय बदलण्याचा प्रयत्न चालला आहे हें मला कळतं बरं का ! मघांच्या हंसण्याचं कारण—"

"—च ! अगदीं सहज हंसलों. "

" सांगायचं आहे का नाहीं ? " एकदम भ्रुकुटी वांकड्या करून व कपाळाला आंठ्या घालून माणिकनें प्रश्न केला, " नसलं सांगायचं तर–"

तिचें तें वाक्य तसेंच अपूर्ण राहिलें. तिच्या आवाजावरून आणि भ्रुकुटीभंगावरून तिच्या रागाचा पारा एकदम चढला होता हें मला तावडतोब दिसलें. सगळ्यांत मला कशाचे भय वाटत असलें तर माणिकच्या रागाचेंच ! माणिकचा लहरी स्वभाव आतां मला पुरा ठाऊक झाला होता.

ती रागावली, कीं शंकराचा तृतीय नेत्र उघडल्याप्रमाणें साऱ्या सृष्टीविषयीं मला धास्ती वाटत असे; व तिच्या रागाला क्षुल्लक कारणहि पुरत असे. तेव्हां तिचे ते शब्द ऐकतांच मी खरें कारण सांगून टाकावयाचें ठरवून म्हटलें,

" न सांगायला काय झालं ? सांगतों. पण सांगितल्यावर रागावतां कामा नये. "

" नाहीं रागावणार " माणिक चटकन् म्हणाली.

" खचित ? "

" अगदीं खचित. "

" मघांच्या त्या दुकानदाराच्या वर्तनाचं मला हंसूं आलं ! " माणिक-कडे पाहात मीं तिला सांगितेंल.

" तें कां ? "

" त्यांच्या वर्तनांत तुला कांहीं विशेष दिसलं नाहीं ? "

" नाहीं. काय होतं असं विशेष ? " मंदस्मित करीत माझ्याकडे वर पाहात माणिकनें विचारलें.

" तुझ्या लक्षांत नाहीं आलं ? "

" नाहीं. " मी काय सांगणार होतों त्याविषयींच्या उत्सुकतेनें तिच्या उत्तराला किंचित् प्रश्नात्मक स्वरूप आलें होतें.

" तो आपणां दोघांना पतिपत्नी समजून आपल्याशीं वागत होता, अन् त्याचंच मला सारखं हंसूं येत होतं. त्याच्याशीं बोलतांना मीं आपलं हंसणं आंवरून धरलं होतं, पण दुकानाबाहेर पाऊल टाकल्याबरोबर माझं हंसणंहि बाहेर फुटलं ! "

" इश्श ! बाकी मलाहि त्या वेळीं थोडीशी तशी शंका आली होती. काय बाई लोक तरी ! " असें म्हणून माणिक मोठ्यानें हंसली.

मीहि पुन्हां मोठ्यानें हंसलों, व तिच्याकडे पाहिलें. आमची दृष्टादृष्ट होतांच माणिकचा चेहरा थोडा आरक्त झाला. तें पाहून मीं पुढें म्हटलें, " बाकी त्यांत आपल्याला लाज वाटण्यासारखं काय आहे ? हृदयाची साक्ष घेतली तर आत्तांसुद्धां आपण दोघं पतिपत्नीच आहोंत, नाहीं कां ? आज नाहीं उद्यां त्या दुकानदाराप्रमाणंच सारे लोक आपल्याशीं वागूं लागतील. "

माणिक कांहींच बोलली नाहीं. तिनें एकदां माझ्याकडे वर दृष्टि करून

पाहिले व किंचित् स्मित केलें, आणि नंतर ती खालीं मान घालून मुकाट्यानें चालूं लागली.

कांहीं वेळानें आम्ही माणिकच्या घरीं पोंचल्यानंतर जिन्याच्या तोंडाशींच मी थांबलों, आणि कापडाचें बंडल तिच्या हातांत देत म्हटलें, "आतां मी नाहीं वर येत. मी जातों कॉलेजवर."

"कां ? घाई आहे ?"

"हं. जातों आतां."

"बरं, पण माझ्या कालच्या प्रश्नाचं काय उत्तर ?"

आज संध्याकाळीं माणिकचे वडील यावयाचे होते; व त्या वेळीं तिच्याबरोबर मीं स्टेशनवर जावें असा तिचा कालपासून सारखा आग्रह चालला होता. काल मीं तिला 'नाहीं' म्हणून सांगितलें तेव्हां ती फार रागावली होती, व 'बरं, उद्यां पाहूं' असें म्हणून मीं त्या वेळीं तिचा राग कसाबसा शांत केला होता. तिनें पुन्हां ती गोष्ट काढलेली पाहून मीं म्हटलें,

"मला वाटलं ती गोष्ट तूं विसरली असशील.

"अशी मी फसायची नाहीं हो !" माणिक हंसत म्हणाली, "हं काय, येणार ना संध्याकाळीं ?"

"आलंच का पाहिजे ?"

"हो." लाडिकपणानें ओंठ पुढें करून माणिक म्हणाली, "अन् न यायला कारण तरी काय आहे ?"

"तसं कारण कांहीं नाहीं म्हणा ! पण तुझ्या वडिलांची अन् माझी पूर्वी कधींच गांठ पडलेली नाहीं तेव्हां जरा—तुझ्याबरोबर मी असणं त्यांच्या मनाला कसं वाटेल !"

"इश्श ! कांहीं तरीच शंका !" माणिक मान हलवून म्हणाली, "अन् शिवाय, मघांशीं म्हटलं ना कीं हृदयाची साक्ष घेतली तर आत्तांसुद्धां आपण दोघं—मग, आतां कां असे आढेवेढे ?"

शेवटचे प्रश्नात्मक शब्द उच्चारून तिनें आपली मान डाव्या खांद्याकडे किंचित् कलती केली, व माझ्याकडे प्रेमभरानें पाहिलें. तिचा त्या वेळचा एकंदर आविर्भाव मनाला मोहून टाकण्यासारखा होता. तिच्या त्या रम्य मूर्तीकडे पाहून मी क्षणभर भान विसरलों. आजूबाजूस कोणी असेल किंवा

नसेल याचा काडीमात्र विचार न करतां मी तिचा उजवा हात आपल्या हातांत पकडून अंतःकरणातील प्रेमाच्या आवेगानें तो दाबीत म्हटलें,

" तुझ्या प्रेमापुढं माझे आढेवेढे टिकणं शक्य नाहीं. येईन मी संध्याकाळीं. माझी वाट बघ. " इतकें म्हणून मीं चटकन् तिचा हात वर उचलला, व त्याचें चुंबन घेतलें.

" इश्श ! हें काय ? " असें हलक्या आवाजांत म्हणत माणिकनें आपला हात सोडवून घेतला.

३

एखाद्या वेळीं आपल्या उल्हासाची मीमांसा आपली आपल्यालाच करतां येईनाशी होते. मन अतिशय आनंदित असतें; पण त्या आनंदाच्या अनुभवाबरोबरच ' इतका आनंद या वेळीं कां व्हावा कांहीं समजत नाहीं ' अशी अंतःकरणांतील एका दूरच्या कोंपऱ्यांत चालू असलेली रुखरुख मनाला खुपत असते. माणिकच्या घरून मी कॉलेजवर परत आलों तेव्हां माझी मनःस्थिति अशीच होती. मी खोलींत शिरलों तो अतिशय उल्हसित वृत्तींत होतों. पण इतका निःसीम उल्हास व आनंद त्या वेळीं मला वाटण्यासारखें कांहीं विशेष कारण घडलें नसल्यामुळें तो आनंद आणि त्या आनंदाबद्दलचें आश्चर्य अशा दोन्ही भावनांचा मिश्र अनुभव त्या वेळीं मी घेत होतों. एक दोनदां तर माझ्या मनांत असेंहि आलें, कीं निष्कारण आनंदातिशय वाटणें हें किंचित् अपशकुनासारखेंदेखील असेल कीं काय कोण जाणे ! विनाकारण फार हंसूं आलें म्हणजे ज्याप्रमाणें पुढील रुदनाचें तें सूचक समजलें जातें तद्वतच माझ्या त्या वेळच्या आनंदाला पूर्व चिन्हाचें स्वरूप असेल कीं काय, अशी शंका एकदोनदां माझ्या मनांत क्षणैक येऊन गेली. पण, शकुन वगैरे गोष्टींवर स्वभावतःच माझा अविश्वास असल्यामुळें त्या शंकांना माझ्या मनांत फारसा थारा मिळाला नाहीं. मीं खोलींत पाय टाकला तेव्हां अगदीं निष्कलंक आनंदांत होतों. तोंडांतील चिरूट टेबलावर ठेवून गाण्याच्या ताना मारीत मीं आपले कपडे उतरले आणि गड्याला हांक मारली, " तुकाराम ! "

" काय साहेब ? " तुकारामानें खोलींत येऊन विचारलें.

" हें बघ, माझा नवा रेशमी कोट अन् विजार परवां आपल्या परटानं नेली आहे, ती त्याच्याकडून उत्तम इस्तरी करवून घेऊन ये. जा, घेतल्याशिवाय येऊं नकोस. आज संध्याकाळीं मला स्टेशनवर जायचं आहे त्या वेळीं मला तो घालायला जरूर पाहिजे. समजलास ? त्याच्यामागं निकड लावून घेऊन ये. "

" बरं साहेब. " असें म्हणून तुकाराम गेला, पण क्षणभरानें पुन्हां परत येऊन तो मला म्हणाला, " साहेब, सकाळीं आपलं एक पत्र आलेलं आहे. पाहिलं कां ?

" नाहीं. कुठं आहे ? "

" हें बघा मीं टेबलाच्या या खणांत ठेवलं आहे. "

" दे इकडं. "

पत्र माझ्या हातांत देऊन तुकाराम निघून गेला. पत्रावरील वृंदावनाच्या पोस्ट कचेरीचा शिक्का पाहून घरून तें पत्र आलें होतें एवढें मीं समजलों. घरून पत्र यायचें म्हणजे एक शांताचें किंवा बाबांचें. मी मागच्या वेळीं वृंदावनास जाऊन आल्यापासून शांताचीं बरींच पत्रें मला आलीं होतीं. तिची पत्र लिहिण्याची तऱ्हा मला फार आवडत असे. श्रीपासून तों शेवटच्या सहीपर्यंत तिच्या पत्रांत विलक्षण रेखीवपणा असे. आणि मजकुराची धाटणीदेखील मोठी आल्हादकारक असे. तिचें पत्र मी नेहमीं मोठ्या उत्सुकतेनें वाचीत असे. पण, हें तिचें नव्हतें खास. पत्रावरील पत्त्याचें अक्षर स्पष्ट सांगत होतें, कीं पत्र आमच्या बाबांचें होतें.

कपडे काढतांना टेबलावर ठेविलेला चिरूट पुन्हां तोंडांत घालून मीं पत्र फोडलें आणि वाचूं लागलों.

" चिरंजीव जगदीश यास प्रेमपूर्वक अनेक आशीर्वाद वि०—मी येथें सुखरूप येऊन पोंचल्याबद्दलचें पत्र धाडलें तें पोंचलेंच असेल. मीं येथें परत आल्यापासून आपल्या घरांत तुझ्या लग्नाविषयींची चर्चा बरीच जोरानें सुरू झाली आहे. मी परवां पुण्यास आलों त्यापूर्वीं लग्नाविषयींचा तुझा विचार कोणालाच कांहीं माहीत नव्हता. त्यामुळें मंडळींचे तुझ्या लग्नाचे बेत केवळ मनोराज्याप्रमाणें चालत असत. तुझे अण्णाकाका आणि काकू यांच्या मनांतून शांताला तुला देण्याचें फार

फार आहे, व तुझ्या आईचीहि इच्छा शांताला सून करून घेण्याची आहे. मलाहि हा सबंध पूर्ण पसंत आहे. हें जरी खरें तरी मी पुण्यास येईपर्यंत आम्ही कोणताच बेत मनाशीं कायम केला नव्हता. कारण, यंदां लग्न करण्याची तुझी इच्छा आहे किंवा नाहीं हें आम्हांला कांहींच माहीत नव्हतें. त्याच दृष्टीनें परवां पुण्यास आलों असतांना मीं तुझ्याजवळ लग्नासंबंधीं गोष्ट काढली. येथें परत आल्यावर लग्न करावयास तुझी तयारी आहे असें जेव्हां मीं मंडळींस सांगितलें, तेव्हां सर्वांना फार आनंद झाला. आमच्या सर्वांच्या मतें शांता व तूं एकमेकांना योग्य व अनुरूप अशींच आहांत, व तुम्हां उभयतांसहि हा विवाह मनांतून हवा आहे अशी आम्हां सर्वांची—विशेषतः तुझ्या आईची व काकूंची—कल्पना आहे. माझा व अण्णाचा आज कित्येक वर्षांचा जो स्नेह आहे त्याची परिणति विवाहांत झाली तर तें सोन्याहून पिवळें होईल असें आम्हां सर्वांप्रमाणें तुलाहि वाटेल याबद्दल माझी खात्री आहे. असें असल्यामुळें गेल्या चार पांच दिवस आम्हीं सर्वजण अतिशय आनंदांत आहोंत, व तुमच्या लग्नाबद्दलचे बेत कायम करण्यांत आम्ही चौघांनीं दोन तीन रात्रींदेखील झोंपेवांचून घालविल्या. अण्णाला पंधरा वीस दिवसांनंतर विलासगडला परत गेलेंच पाहिजे आहे, तेव्हां तो जाण्याच्या आंत हें कार्य उरकलें तर फार उत्तम होईल असें आम्हां सगळ्यांना वाटूं लागलें. आपल्या शास्त्रीबुवांना काल रात्रीं आम्हीं बोलावलें होतें, व मुहूर्तासंबंधीं त्यांचा सल्ला आम्हीं घेतला. त्यांच्या सांगण्यावरून येत्या द्वादशीचा—म्हणजे आजपासून बरोबर बाराव्या दिवसाचा—मुहूर्त कायम केला आहे. तूं यंदा परीक्षेला बसणार नाहींसच व शिवाय कॉलेजांतील तुझी टर्महि सरली आहे. तेव्हां हा मुहूर्त तुलासुद्धां अगदीं सोईस्कर आहे. तरी हें पत्र पावतांच शक्य तितक्या लवकर तूं वृंदावनास निघून यावेंस म्हणजे बरें होईल. तेथें तुझ्या ज्या मित्रांना समक्ष आमंत्रण द्यावयाचें असेल त्यांना तें देऊनच इकडे ये. आपल्या सर्व आप्तेष्टांना पत्रें पाठविण्याच्या उद्योगाला मी एक दोन दिवसांत लागणार आहे. तूं घरीं तावडतोब यावेंस असें तुझ्या आईचें म्हणणें

आहे. आम्ही सर्वजण तुझी वाट पाहात आहोंत. सर्व खुशाल आहेत. कळावें, हे आशीर्वाद.

तुझा
बाबा."

तें पत्र वाचून मला काय वाटलें असेल तें मीं सांगावयास पाहिजे असें नाहीं; आणि तें मी सांगावयाचें म्हटलें तरी तें शक्य नाहीं. कारण त्या वेळीं माझ्या मनाची इतकी चमत्कारिक स्थिति झाली, कीं ती शब्दांनीं वर्णन करून सांगण्याचा प्रयत्न कांहीं झालें तरी व्यर्थच होणार. मस्तकावर एखादा जबर आघात झाल्यावर ज्याप्रमाणें मनुष्य डोकें धरून स्वस्थ बसतो त्याप्रमाणें मी या पत्राकडे शून्य दृष्टीनें पाहात स्तब्ध बसलों. माझ्या डोक्यांत नक्की विचार असा कांहींच चालला नव्हता. मस्तकांत सूं सूं असा आवाज चाललेला तेवढा मला कळत होता.

त्या तशा स्थितींत मी किती वेळ बसलों होतों कोण जाणें! खोलीचें दार उघडून तुकाराम आंत येईपर्यंत मला कसल्याच गोष्टींचें भान नव्हतें. त्याच्या हातांत मीं आणावयास सांगितलेले कपडे दिसत होते. खोलींत आल्यावर दार लोटून घेऊन त्यानें मला विचारलें,

"साहेब, कपडे आणले आहेत, कुठें ठेवूं?"

"उकिरड्यावर फेंकून दे ते कपडे!" मांडीवरील पत्रावर जोरानें हात आपटीत मी म्हटलें, "मला स्टेशनवर जायचं नाहीं अन् कांहीं करायचं नाहीं! दे फेंकून ते कपडे!"

तुकाराम 'आ' वासून माझ्याकडे आश्चर्यातिशयानें पाहात राहिला.

प्रकरण सातवें

घर सोडलें

१ त्या दिवशीं मी स्टेशनवर गेलों नाहीं. बाबांच्या त्या पत्रानें माझी मनःस्थिति अगदीं विलक्षण करून सोडली होती. माझें शांताशीं लग्न व्हावें अशी आईची, काकूंची किंबहुना घरच्या सर्व ंडळींची इच्छा असल्याचा संशय माझ्या मनांत पूर्वी दोन तीन प्रसंगीं उत्पन्न झाला होता, इतकेंच नव्हे तर थोड्या दिवसांमागे बाबा कॉलेजांत आले होते त्या वेळीं त्यांच्या बोलण्यांत त्या इच्छेची छटा अधिक स्पष्टपणें मला दिसून आली होती. परंतु या गोष्टीविषयींचा माझ्या मनांतील विरोध मीं केव्हांच बोलून दाखविला नव्हता; आणि त्याला कारण इतकेंच, कीं स्वतःची कशीहि इच्छा असली तरी माझी संमति घेतल्याखेरीज बाबा हा विवाह निश्चित करणार नाहींत असा मला पूर्ण भरंवसा होता. आजच्या बाबांच्या पत्रानें माझा भरंवसा पार कोसळला, आणि त्याच्या भाराखालीं माझें मन इतकें दडपून गेलें, कीं कांहीं काळ मनाच्या साऱ्या शक्ति पार थिजून जाऊन मला कोणताच विचार सुचेना. टेबलावर दोन्ही कोपरें टेंकून सिगारेट मागून सिगारेट ओढीत मी किती वेळ बसलों तें माझें मलाच समजलें नाहीं. उघडें असलेलें दार पुरतें उघडून आमच्या क्लबचा आचारी खोलींत आला तेव्हां किंचित् दचकून मीं त्याच्याकडे पाहिलें.

"साहेब, बारा वाजून गेले! आज जेवण केव्हां करणार?"

"काय बारा वाजून गेले?" मी अत्यंत आश्चर्यानें उद्गारलों, व टेबलावरील घड्याळाकडे पाहून म्हटलें, "ऊं! खरंच! साडेबारा व्हायला आले! तूं मला आधींच कां नाहीं निरोप पाठविलास?"

कु. १०

" साहेब, गड्याबरोबर दोनदां निरोप पाठविला, पण त्याच्याशीं आपण एक शब्दहि बोलानात; तेव्हां—"

" काय म्हणतोस ? हंः इतका का मी आपल्या विचारांत गढून गेलों होतों ? " मी अर्धवट आपल्याशींच पुटपुटलों, हातांतील जळत्या सिगारेटचें टोंक तसेंच फेंकून दिलें, आणि " बरं, चल आलों मी ! बाकी मला भूक बिलकूल नाहीं ! " असें म्हणत त्याच्या मागोमाग खोलीबाहेर पडलों.

असल्या मनःस्थितींत मी स्टेशनवर कसचा जाणार ? माझ्या मनावर बाबांच्या पत्रानें केलेल्या घावाच्या वेदना ताज्या असतांना माणिकच्यासमोर उभें राहून तिच्या वडिलांशीं शांत चित्तानें चार शब्द बोलणें मला शक्यच नव्हतें. बाकी एक दोनदां असाहि विचार माझ्या मनांत आल्याशिवाय राहिला नाहीं, कीं तडक माणिककडे जावें, आणि तिला सारा प्रकार सांगून आपला बाबांच्याविषयींचा राग तिच्या समक्ष बोलून दाखवून तिच्या प्रेमळ शब्दांत तप्त हृदयाला संमार्जित करून परत यावें. या विचारानें मी एकदां पोशाख करून अर्धवट खोलीबाहेरहि पडलों. परंतु, पुन्हां काय झालें कोण जाणे, तसें करूं नयेसें वाटून मी परत खोलींत गेलों, कपडे काढून टाकले, आणि बाबांच्या पत्राविषयीं विचार करीत पलंगावर पडलों. अथवा, विचार कसला करणार ? त्या वेळची माझी मनःस्थितीच अशी चमत्कारिक होती कीं, त्या वेळीं शांतपणें विचार करणें शक्य नव्हतें. मनुष्याच्या मनाला जबर धक्का देणारी एखादी गोष्ट घडून आली, म्हणजे त्याच्या मनाचा ताळच सुटल्यासारखा होतो, आणि पुढील मार्गाविषयीं विचार करण्याचें सोंग आणून त्यानें स्वतःची कितीहि सफाईची फसवणूक करून घेतली तरी, वास्तविकपणें प्रत्यक्ष शांत विचाराचें कार्य त्याच्या मनाकडून मुळींच होत नसतें. निखाऱ्यावर पाणी टाकलें म्हणजे तो जसा चुर्र आवाज करून आपला राग व्यक्त करीत असतो त्याप्रमाणें दुःखदायक गोष्टीच्या जाणिवेनें मन नुसतें सुस्कारे सोडीत बसतें ! त्या वेळीं शांत विचार कोठून संभवणार ?

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठल्यावर अंतःकरणांतील रागाची पहिली ऊर्मि ओसरली होती. तुकाराम गड्यानें चहा करून दिला तो घेतला, आणि आज माणिककडे गेलों नाहीं तर आणखी तिच्या रागाचा भार सहन करण्याचा प्रसंग यावयाचा अशा विचारानें कपडे अंगावर चढविले. काल स्टेशनवर

ठरल्याप्रमाणें न गेल्याबद्दल आधींच माणिक रागावली असेल ही माझी खात्री होती. रागावणें, फुगणें ही मुळीं तिच्या प्रेमाची दुसरी बाजूच होती हें मी पूर्णपणें जाणून होतों. पण बाबांचें पत्र दाखवून आपली खरी मनःस्थिति तिच्याजवळ उघडी केली, कीं आपल्यावर रागावण्याऐवजी प्रेमळ सहानुभूतीनें ती या क्षुल्लक अपराधाकडे दुर्लक्ष करील असा विचार करीत मी हॅट डोक्यावर ठेविली. सिगारेट पेटवून तोंडांत धरली, आणि कोंपऱ्यांतील काठी घेऊन खोलीबाहेर पाऊल टाकलें. माणिकला सारें सांगावयाचें या विचारानें मनांत उद्भवलेल्या आनंदांत बाबांच्या पत्राबद्दलचा राग विरून गेल्यासारखेंच मला क्षणभर वाटलें. कॉलेजच्या आवाराबाहेर पडल्यावर पहिला तांगा भेटला त्यांत बसतांना किंचित् उल्हसित वृत्तीनेंच मीं तांगेवाल्याला "चल, लवकर हांक!" असें म्हटलेलें पाहून माझें मलाच आश्चर्य वाटलें! खरोखर, मनांत केव्हां कोणती वृत्ति उद्भवेल तें सांगणें कठीण आहे! क्षितिजावरील अभ्रांचे बदलते रंगहि त्यापुढें कमी अनिश्चित आणि आश्चर्यकारक ठरतील!

माणिकच्या घरीं मी पोंचलों तेव्हां दिवाणखान्यांत मालतीबाई एकट्याच असलेल्या मला दिसल्या. मला पाहातांच हातांतील काम बाजूला ठेवीत, हंसत हंसत त्या म्हणाल्या, "यावं, यावं! काल संध्याकाळपासून सारी मंडळी तुमची वाट पाहत आहेत. बसा, बसा. मी आमच्या बाबांना हांक मारतें, बाबा! बाबा!" अशी हांक मारीत मालतीबाई आंत गेल्या, आणि हातांतील काठी टेबलावर ठेवून मी एका कोचावर बसलों. पण येथें बसून राहण्यापेक्षां माणिकला शोधावी असें मनांत येऊन मी पुन्हां उठलों व माणिकच्या खोलीकडे गेलों. खोलीचें दार उघडें होतें. मीं डोकावून पाहिलें पण माणिक आंत नव्हती. तिच्या टेबलावर तोंड धुण्याचा ब्रश, टुथ पावडर, केंस विंचरण्याच्या फण्या आणि ब्रश अस्ताव्यस्त पडले होते आणि तिच्या हलगर्जी स्वभावाची साक्ष देत होते. मी तसाच परत फिरलों आणि दिवाणखान्यांत आलों तों समोरून मालतीबाई आणि त्यांचे वडील येतांना दिसले. त्यांच्याबरोबर माणिक नव्हती. मी जवळ जातांच मालतीबाई मजकडे पाहून आपल्या वडिलांना म्हणाल्या, "हे आपले जगदीश पटवर्धन!"

“ ठीक, ठीक ! ” असें म्हणून नमस्कार करण्याऐवजीं इंग्रजी पद्धती-प्रमाणें मुकुंदरावांनीं आपला उजवा हात हस्तांदोलनासाठीं पुढें केला. मींहि हंसतमुखानें त्यांच्याकडे पाहात हस्तांदोलन केलें.

मुकुंदराव चांगले उंच निंच आणि देखणे असल्यामुळें पाहाणाऱ्याच्या मनावर एकदम परिणाम होईल असेच ते दिसत. माझ्या मनावर मात्र त्यांच्या एकंदर देखाव्याचा सर्वस्वी अनुकूल परिणाम झाला नाहीं. त्यांच्या भव्यपणाबद्दल मला कौतुक वाटलें नाहीं किंवा बुद्धीची साक्ष देणाऱ्या त्यांच्या विशाल चेहऱ्याकडे पाहून मला आनंद झाला नाहीं असें नव्हे, पण त्यांच्याकडे पाहातांच त्यांच्या चेहऱ्यांत मला कांहीं तरी असें दिसून आलें कीं, त्यामुळें तें कौतुक व तो आनंद दोन्हीं पुसलीं गेलीं. असें तें काय होतें तें मला शब्दांनीं दर्शवितां येणार नाहीं. किंबहुना, त्या क्षणीं तें माझें मला तरी कळलें किंवा नाहीं कोण जाणे ! परंतु त्यांच्याइतकाच भव्य व सुंदर आणि शिवाय सदाचरणाची स्पष्ट साक्ष आपल्या दृष्टींत सांठवणारा एखादा पुरुष माझ्यापुढें उभा असता तर मीं ज्या आवेगानें त्याच्याशीं हस्तांदोलन केलें असतें तो आवेग आत्तांच्या माझ्या कृतींत नव्हता हें माझें मलाच त्या क्षणीं भासलें. माझ्या मनांतील विचार किंवा कृतींतील वैगुण्य मुकुंदरावांच्या लक्षांत येणें अर्थातच शक्य नव्हतें. मींहि मनांतील विचारांना फारसा वाव न देतां अर्धवट मुकुंदरावांकडे पाहात व अर्धवट मालतीबाईकडे वळून म्हटलें, “ काल संध्याकाळीं मी स्टेशनवर आलों नाहीं याबद्दल मी फार दिलगीर आहें. ”

“ इश्श ! त्यांत दिलगिरी प्रदर्शित करण्याचं काय कारण ! ” मालती-बाई हंसत म्हणाल्या.

मीं व मुकुंदराव एका कोचावर बसलों आणि मालतीबाई समोरच्या आरामखुर्चीवर पडल्या. बसतां बसतां मुकुंदराव म्हणाले, “ काल माणिक मात्र तुमची सारखी आठवण करीत होती. तुम्ही न आल्याबद्दल ती थोडीशी रागावलेलीहि दिसली—”

“ हं. ” माणिकच्या रागाची ही पूर्वसूचना मिळालेली पाहून मी म्हटलें.

“ आमची माणिक मोठी रागीट आहे. तिच्या भावी पतीला तिचा

राग काढतां काढतां पुरे वाट—" असें बोलतां बोलतां त्यांनीं आपली दृष्टि माझ्याकडे रोंखून लावली.

मुकुंदरावांचे डोळे मोठाले होते, पण ते घारे होते. घारे डोळे वाईट असें मी म्हणत नाहीं. एखाद्याला ते आवडतीलहि. पण माझी वैयक्तिक आवड अशी होती, कीं डोळ्यांतील घारेपणा मला बिलकुल आवडत नसे; इतकेंच नव्हे, तर घाऱ्या डोळ्यांच्या माणसाविषयीं माझा ग्रह प्रतिकूलच होत असे. आधींच मुकुंदरावांना पाहून माझें मन विशेष समाधान पावलें नव्हतें. त्यांतच त्यांच्या घाऱ्या दृष्टीची भर पडतांच मनाचें पहिलें असमाधान अधिकच दृढ झालें. त्यांच्याकडे पाहात असतांना माझ्या कपाळाला असमाधानाची बारीकशी आंठी पडल्यासारखेंहि मला वाटलें. पण तें बरें नव्हे असें वाटून मीं चेहऱ्यावर उल्हासितपणा आणला. मुकुंदरावांच्याविषयीं एकंदरींत माझा ग्रह बरा झाला नसला तरी, माणिकच्या भावी पतीविषयीं त्यांनीं जो उल्लेख केला, व विशेषत: तो करीत असतां मजकडे जें मुद्दाम रोंखून पाहिलें त्यानें मला बरें वाटलें. कारण माझ्या व माणिकच्या विवाहाबद्दलची संमति त्यांच्या त्या शब्दांत व दृष्टींत प्रतिबिंबित झाली होती हें एखाद्या आंधळ्यानेंहि त्या वेळीं सांगितलें असतें. बाबांच्या असंमतीच्या धगीनें होरपळत असलेल्या माझ्या हृदयाला माणिकच्या वडिलांची ही सूचित संमति चंदनाच्या उटीसारखी वाटली असल्यास नवल तें काय? मुकुंदरावांकडे पाहात, हंसत हंसत मीं म्हटलें,

"आपल्या म्हणण्याचा गर्भितार्थ मी समजलों. पण माणिकचा राग काढण्याची मला आतां पुकष्ळ संवय झाली आहे."

हे माझे शब्द ऐकून मुकुंदराव मोठ्यानें हंसले व म्हणाले, "ठीक, ठीक, मग कांहीं हरकत नाहीं."

मुकुंदरावांशीं संभाषण करण्यापेक्षां माणिकशीं बोलण्याविषयीं, निदान ती दृष्टीला पडण्याविषयीं, मी अधिक उत्सुक होतों. वर सांगितलेले मुकुंदरावांचे शब्द संपून त्यांच्या हंसण्याचा प्रतिध्वनीहि अस्पष्ट होत आला. इतक्यांत माझी उत्सुकता पूर्ण झाली. माझ्या भुकेल्या दृष्टीला शांत करणारी माणिकची मूर्ति समोरच्या दारानें दिवाणखान्यांत पाऊल टाकतांना मला दिसली.

माणिकला पाहतांच मालतीबाई तिला ओरडून म्हणाल्या, " माणिक, तूं आपल्यासाठीं चहा आणशील तेव्हां आणखी एक कप आण ग ! इथें जगदीश आले आहेत ! "

माणिकनें कांहीं प्रत्युत्तरहि केलें नाहीं किंवा ती मागेंहि परतली नाहीं. ती थेट आमच्या सर्वांच्या मध्यभागीं असलेल्या टेबलाजवळ आली आणि त्यावर परीट घडीचा एक सुंदर रुमाल घालूं लागली. तिच्या पाठोपाठ घरांतील आचारी एका ट्रेमध्यें चहाचें सर्व सामान आणि दोन बशी पेले घेऊन आला, त्याला ते टेबलावर मांडण्याविषयीं तिनें खूण केली. तिनें दोन पेले चहा आणविलेला पाहून मालतीबाई आश्चर्यानें म्हणाल्या, " मी तुला सांगायच्या आधींच कसं समजलीस ग, बाहेर दुसरा कप हवा आहे म्हणून ? "

माणिक क्षणभर कांहींच बोलली नाहीं. पण, दुसऱ्याच क्षणीं अर्धी नजर वडील बहिणीकडे लावून आणि तिरप्या नजरेचा कटाक्ष माझ्याकडे फेकून ती म्हणाली,

" ताई, लोकांना आपली काळजी नसली तरी आपलं वेडं मन मात्र त्यांच्या येण्याकडे लागून राहिलेलं असतं, अन् मग नुसत्या अस्पष्ट चाहुलीनं देखील माणूस आलं गेलेलं कळतं ? "

मीं मनांत म्हटलें, ' माणिक माणिक ! किती निष्ठुरपणानं खोचून बोलत आहेस तूं ! पण, माझी खरी स्थिति तुला कळेल तेव्हां या वाग्बाणाबद्दल तुझं तुलाच वाईट वाटेल ! '

माणिकच्या खोंचदार बोलण्याला उघड प्रत्युत्तर देणें शक्य नव्हतें. तिच्याकडे व मालतीबाईकडे पाहात मी नुसता हंसलों, व बोलण्याचा ओघ बदलावयाच्या हेतूनें मुकुंदरावांकडे वळून म्हटलें, " आपण नाहीं घेत चहा ? "

" मी अन् बाबांनीं मघांशींच चहा घेतला. " मुकुंदरावांच्याऐवजीं मालतीबाईनीं उत्तर दिलें, " माणिक उशीरा उठली म्हणून तिचा चहा मागवला. "

" असं. " म्हणून मी उठून चहाच्या टेबलाजवळ गेलों आणि माणिकनें ओतून तयार केलेल्या पेल्यांपैकीं एक उचलून हातांत घेतला. दुसरा कप उचलतां उचलतां माणिकनें माझ्याकडे पाहतांच तिलाच फक्त ऐकूं जाईल इतक्या हलक्या स्वरांत मीं म्हटलें, " माणिक, अशी रागावूं नकोस ! "

माणिकनें फक्त मानेला लहानसा हिसका दिला आणि चहा पिण्यास सुरुवात केली. तिचा राग गेलासें दिसलें नाहीं. माझ्या बोलण्यांत थोडी चूक झालीसें मला वाटलें. ' माणिक, क्षमा कर ' अशा वाक्यानें तिचा राग एकदम गेला असता. पण, माझें मन किती हट्टी, आणि जीभ किती मानी ! चूक लक्षांत येऊनहि मीं ती ताबडतोब सुधारली नाहीं !

चहा पिऊन झाल्यावर मी फिरून कोचावर बसलों, आणि माणिक मालतीबाईंच्या शेजारच्या खुर्चीवर बसून आपल्या शिवणकामांत गुंग झाली—निदान आपण त्यांत गुंग आहों असें तिनें दाखविलें. माझ्या व मुकुंदरावांच्या बोलण्यांत भाग घेण्याची तिची इच्छा दिसली नाहीं. आम्ही काय बोलत होतों तें मला नक्की आठवत नाहीं; पण एवढें खास, कीं त्या बोलण्यांत माझें लक्ष काडीभरहि नसून, माणिकनें एवढा राग काय म्हणून धरावा, माझी चूक आहेच असें गृहीत धरून माझ्याशीं तिनें असें रुसण्याचें वर्तन कां करावें, मुकुंदरावांच्यादेखत तिनें हा अबोला धरला हें बरें काय, वगैरे जे विचार माझ्या मनांत चालू होते त्यांतच माझें लक्ष होतें, व त्या विचांरामुळें माणिकचाच मला आतां थोडा राग येऊं लागला होता. ज्यांत माझें मन नव्हतें असें मुकुंदरावांच्याबरोबर चाललेलें बोलणें मला दुःसह वाटत होतें, व हा भार माझ्या शिरावरून कसा दूर होईल असें मी मनांत सारखें म्हणत होतों. एकट्या माणिकशीं बोलायला सांपडावें म्हणून माझा जीव तळमळत होता, व ती संधि मिळेल कीं नाहीं, अशा शंकेनें मी निराश होत होतों — इतक्यांत दैवानें खैर केली, आणि मला जें हवें होतें तें झालें.

" बॅरिस्टरसाहेब ! " अशा हांका मारीत डॉ० शामराव दिवाणखान्याचा जिना चढत आले, आंत येऊन मुकुंदरावांना पाहातांच म्हणाले, " चला, चला, मोटार उभी आहे खालीं ! "

मुकुंदराव आणि मालतीबाई तें ऐकतांच उठलीं. जातां जातां माझा हात धरून मुकुंदराव हंसत म्हणाले, " बरं, मी आतां जातों. जरा काम आहे. आपण पुन्हां यालच ! "

थोड्याच वेळांत तीं तिघेंहि निघून गेलीं, आणि मी व माणिक दिवाणखान्यांत एकटींच राहिलों.

बराच वेळ झाला तरी माणिक आपण होऊन कांहींच बोलेना. मी

तिच्याजवळ आहे हें तिला जणूं काय माहीतच नव्हतें. वास्तविक नेहमीं-प्रमाणें म्हटलें तर तिचा रुसवा पाहून मी कांहीं तरी गोड चेष्टा करून तिला हंसवावयाचा; पण आज ती गोष्ट माझ्या मनांतदेखील आली नाहीं. आधींच बाबांच्या पत्रानें गांजलेल्या माझ्या मनाला तिच्या रागावण्यानें आढी बसल्यासारखें झालें. जरा वेळ वाट पाहून मीं रुष्ट स्वरांत म्हटलें,

"माणिक, मी इथं बसलों आहे म्हटलं!"

माणिक कांहींच बोलली नाहीं. लोंकरीच्या धाग्यांतून चालणारी तिची लांब सुई क्षणभर थबकली. तिच्या कपाळावर एक दोन आंठ्या उभ्या राहिल्या. अधिकच रागावून मीं म्हटलें, "माणिक, तुझ्या शब्दाची किती किंमत आहे असं तूं समजतेस?"

मान वर न करतां माणिक म्हणाली, "माझी किंमत नाहींशी झाली म्हणून तर काल आलां नाहींत!"

"पण मला न यायला कारण काय झालं याची चवकशी कर अन् मग–"

"चवकशी काय करायची आहे त्यांत! आलं असेल कुठलं तरी टेनिसचं बोलावणं अन् त्यापुढें माणिकवरचं बेगडी प्रेम गेलं असेल विरघळून!"

"माणिक, किती दुष्ट तर्क हे! मी—"

"मी आपली आहे दुष्ट! सुष्टांनीं दुष्टांचा नाद सोडावा म्हणजे—"

आतां मला आपला राग अगदी आंवरेना. आज काय झालें होतें कोण जाणे, पण चार गोड शब्दांनीं माणिकचा राग नाहींसा करण्याचें माझें नेहमींचें कौशल्य आज अगदीं हरपल्यासारखें झालें होतें! गोड शब्द येण्याऐवजीं रागाच्या लहरीच अंतःकरणांत उठत होत्या. मी इतका हृदयाला पीळ पडून बोलत असतां शांतपणानें हातांतील काम करीत विषारी शब्दांचे फूत्कार सोडणाऱ्या माणिकची मूर्ति मला पाहावेना. दांत ओंठ खात मीं म्हटलें, "तुझ्या निष्ठुरपणाची कमाल आहे!"

"म्हणजे?" वर मान करून माणिक माझ्याकडे पाहात म्हणाली. "एकेक शब्द मोठा गमतीचा बोलतां! माझीच चूक झाली वाटतं? काल पुनः पुन्हा कबूल करूनसुद्धां स्टेशनवर आला नाहींत! माझी निराशा तर झालीच, अन् वर ताईनीं अन् बाबांनीं माझ्या भोळेपणाबद्दल

माझी चेष्टा केली ती निराळीच ! बरं, आतां येऊनदेखील धड बोलणं झालं कां ? अन् इतकं होऊन पुन्हां माझीच चूक ! मीच निष्ठुर ! मीच दुष्ट ? आश्चर्य आहे बाई ! पण जाऊं दे. बोलायचं काय अशा माणसाशीं ! एक अवाक्षर नाहीं मी आतां बोलणार ! " असें म्हणून ती आपल्या जागेवरून उठली.

तिचें तें बोलणें आणि तें उठणें मला सहन करवेना. रागाच्या भरांत ताडकन् मीहि उठलों. टेबलावर ठेवलेली काठी उचलून मीं म्हटलें, " बरं आहे. माझीहि बोलण्याची इच्छा नाहीं. जातों मी ! "

रागारागानें पावलें टाकीत मी दिवाणखान्याच्या दाराकडे गेलों. जिनाहि तितक्याच आवेगानें उतरून जाण्याचें माझ्या मनांत होतें. पण मी जिन्याच्या पहिल्याच पायरीवर क्षणभर थबकलों आणि मागें वळून पाहिलें तों—

हातांतील विणकाम टेबलावर फेंकून देऊन माणिकनें पदरानें तोंड झांकलें. एक अस्पष्ट हुंदका मला ऐकूं आला. पदरानें तसेंच तोंड झांकून माणिक आपल्या खोलीकडे धांवत गेली आणि धाडकन् दार लोटून आंत शिरली. पदरांत गुदमरलेले तिचे एक दोन हुंदके मला पुन्हां ऐकूं आले.

तें पाहतांच जिन्याकडे वळलेले माझे पाय परत फिरले. मी धांवतच माणिकच्या खोलीकडे गेलों. पलंगावरच्या उशीवर पालथें मस्तक ठेवून माणिक हुंदके देत होती. माझी चाहूल लागतांच वर पाहून रडव्या स्वरांत ती म्हणाली, " मी—दुष्ट आहेना ?—कशाला आलांत ? "

चार पांचच शब्द—पण त्यांनीं माझा राग पार नाहींसा केला. डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रूंनीं आणि कपाळावर आलेल्या चार पांच केसांनीं अधिकच करुणाजनक झालेल्या तिच्या मुद्रेकडे पाहातांच माझ्या जिवाची मघांची अभिमानाची अढी पार तुटली, मघांचा राग वाऱ्यावरील चिटोऱ्याप्रमाणें उडून गेला. एका प्रेमळ जिवावर राग धरून मीं केवढा अपराध केला असें वाटून माझा कंठ दाटून येऊन मीं म्हटलें, " माणिक, मी चुकलों ! काल न येण्याचा एक अपराध करून आजच्या अपराधाची मी त्याला जोड दिली ! पण, माझ्या हृदयाची कालवाकालव तुला कळेल तर तूं मला क्षमा करशील. हें वाच आणि मग मला कालच्या अपराधाबद्दल दोषी धर. " असें म्हणून खिशांतील पत्र काढून मीं आपला उजवा हात तिच्यापुढें केला.

माझ्या हातांत पत्र पाहतांच माणिकला आश्चर्य वाटलें. गालावरील आसवांचा ओघळ पुशीत आणि केंस मागें करीत तिनें विचारलें,

" कुणाचं पत्र ? "

" बाबांचं. वाच म्हणजे कळेल. "

कांपऱ्या हातांनीं तिनें पत्र घेतलें, आणि ' यांत काय मजकूर आहे ? ' असें विचारणारा एक कटाक्ष माझ्याकडे टाकून तें वाचावयास सुरुवात केली.

पत्रवाचन संपतांच तिनें एक सुस्कारा टाकला आणि शून्य दृष्टीनें पत्राच्या कागदाकडे ती पाहूं लागली.

" माणिक, माझ्या हृदयाच्या यातना आतां तरी तुला समजल्या ना ? " मीं पुढें होऊन विचारलें.

माझ्या प्रश्नाकडे फारसें लक्ष न देतां, मान तशींच खालीं ठेवून तिनें विचारलें. " मग ? वृंदावनाला, जाण्यापूर्वी निरोप घ्यायला आला होतात एकूण ? "

तिचा हा प्रश्न ऐकून मी चपापलों. पण, तिची शंका वाजवी होती. तिचा उजवा हात आपल्या हातांत घेत मीं म्हटलें,

" माणिक, वृंदावनास जाण्याइतका मी नीच असेन असं तुला वाटतं ? या पत्रानं माझं तुझ्यावरचं प्रेम ढळलं असं तूं समजतेस ? माणिक, माणिक ! तूं माझं प्रेम अजून ओळखलं नाहींस काय ? " असें म्हणत तिचा उजवा हात उचलून मीं तो आपल्या हृदयाशीं घट्ट दाबून धरला.

माणिक अजून भांबावलेली होती. मी आणखी काय बोलतों इकडे तिचें सारें लक्ष लागलें होतें. मीं पुढें म्हटलें,

" माणिक, बाबांच्या पत्राप्रमाणं मी घरीं जाऊन शांताशीं लग्न लावीन अशी शंका तूं आपल्या मनाला क्षणभर तरी कशी घेऊं दिलीस ? कालचा सबंध दिवस मीं कोणत्या मनःस्थितींत काढला हें मी तुला कसं सांगूं ? बाबांच्या संमतीनं तुझ्याशीं विवाह करण्याच्या मनोराज्यांत मी होतों, आणि अशा वेळीं या पत्राचा प्रहार माझ्या हृदयावर झाला ! माणिक, अशा वेळीं मला दुसरं कांहीं नको ! तुझ्या गोड प्रेमाच्या चार शब्दांचा मला आधार दे–माणिक ! माझ्यावर राग धरूं नकोस ! "

माझे शब्द ऐकून माणिक अश्रु गाळूं लागली. डावा हात माझ्या खांद्यावर

ठेवून ती म्हणाली, " मी चुकलें. तुमच्या होरपळलेल्या हृदयाला मीं आपल्या मूर्खपणाच्या रागानं आणखी गांजलं. मी क्षमा कशी मागूं ? माझं वेडं प्रेम मनांत आणून सारं विसरा."

इतकें बोलून तिनें आपलें मस्तक माझ्या छातीवर टेंकलें. तिच्या मस्तकाचें चुंबन घेत मीं म्हटलें, " आतां मला बाबांची पर्वा नाहीं. माणिक, आपण प्रेमानं अशीं एक झालों असतांना आपल्याला वेगळं करण्याची शक्ति कोणांत असणार ! "

मी तिचें मस्तक वर उचलून तिच्याकडे पाहात म्हटलें, " माणिक, "

" काय ? " असें अस्पष्ट स्वरांत विचारीत तिनें मंद हास्य केलें, आणि पुन्हां माझ्या हृदयावर आपलें मस्तक टेकलें.

२

चार दिवस गेले. आज सकाळचा माझा चहा राधाकान्ताकडे व्हावयाचा होता. परीक्षेला अजून कांहीं दिवस अवकाश होता; परंतु परीक्षेच्या आधीं थोडे दिवस मुंबईस जाऊन राहून अभ्यास करण्याचें राधाकान्तानें ठरविलें होतें. काल रात्रीं क्लबांतून जेवून परत येत असतां तो मला म्हणाला,

" जगदीश, उद्यां सकाळीं माझ्याकडे चहा घ्या. "

" चहाचं बोलावणं मी कधींच नाकारीत नसतों. पण उद्यां काय विशेष आहे ? "

" विशेष कसलं आहे ! " राधाकान्त म्हणाला, " उद्यां दुपारीं मी मुंबईस जाणार. तुम्ही परीक्षेला बसावयाचं नाहीं असं ठरवलं आहांत, तेव्हां तुमची आमची पुन्हां कधीं काळीं गांठ पडेल का न पडेल तें कोणी सांगावं ? तेव्हां एकमेकांचा निरोप घेण्यापूर्वीं एकत्र चहा घेऊं झालं. याल ना ? "

असें म्हणून त्यानें माझ्या खांद्यावर हात ठेवला. काळोखी रात्र असल्यामुळें चहूं बाजूनं अंधार पडला होता. अंधाराइतकीच शांतताहि चारी दिशांना नांदत होती. चंद्रविरहित आकाशांतील अनंत तारकांच्या छताखालीं आम्ही दोघेच उभे आहोंत – सारें जग शून्य आहे – असा मला क्षणभर भास होऊन राधाकान्ताच्या त्या निर्वाणीच्या शब्दांनीं माझें हृदय हाललें. हा विचित्र अनुभव एक क्षणभरच टिकला. पण तो आजदेखील मला

स्पष्ट आठवतो; इतकेंच नव्हे तर, त्याविषयीं आज लिहितांना त्या अनुभवाचा प्रतिध्वनि उमटत असल्यासारखें मला भासत आहे.

दुसऱ्याच क्षणीं जागें झाल्याप्रमाणें करून मीं उत्तर दिलें,

" हो. अवश्य येईन. चहा मात्र झोकांत केला पाहिजे. "

" तुम्हीच उठलांत कीं माझ्या खोलींत या अन् चहा बनवा म्हणजे झालं ! " राधाकान्त हंसत म्हणाला.

हें ठरल्याप्रमाणें आज उठल्यावर तोंड वगैरे धुऊन मी राधाकान्ताच्या खोलींत गेलों. आज त्याला जावयाचें असल्यामुळें पुस्तकें, कपडे वगैरे सामान आवरून बांधण्याच्या गडबडींत तो होता. मी आलेला पाहातांच त्यानें काम बाजूला ठेविलें आणि उठून चहाचें सारें सामान एका टेबलावर आणून ठेवलें. मीं स्टोव्ह पेटविला, पाणी मोजून स्टोव्हवर ठेवलें आणि सिगारेट पेटवून धूम्रपान सुरू केलें. राधाकान्त अर्धवट बसल्या स्थितींत टेबलाच्या काठांवर टेकून माझ्याकडे पाहात होता.

चहा तयार होत असतां आमचें इकडचें तिकडचें बोलणें चाललें होतें. चहा तयार होऊन मीं तो दोन कपांत ओतला आणि एक कप उचलून त्यांतील चहा चमच्यानें ढवळीत राधाकान्तकडे पाहात मी म्हटलें,

" तुमचा माझा इतका स्नेह आहे याचं साऱ्या मंडळींना आश्चर्य वाटतं. तुमच्यांत व माझ्यांत प्रत्येक बाबतींत इतकं अंतर असतांना हा स्नेह कसा बनला याचं मला स्वतःलादेखील आश्चर्य वाटतं. "

" या बाबतींत भवभूति कवीचं म्हणणं मला पुरं पटतं ! " राधाकान्त म्हणाला. " व्यक्तीव्यक्तींचे स्नेह जमायला अंतःकरणांतले गूढ हेतूच कारण होत असतात. आपल्या दोघांच्या विचित्र स्नेहाबद्दल म्हणाल तर आजपर्यंत मीं कधीं बोलून दाखविली नाहीं ती गोष्ट आत्तां बोलून दाखवितों. मीं एकांतांत जेव्हां जेव्हां विचार करीत असतों त्या त्या वेळीं मला असं वाटतं कीं तुमच्या माझ्या आयुष्याचे धागे आपणां दोघांनाहि कल्पना नाहीं इतके एकत्र गुंफलेले आहेत. आपल्या पुन्हां भेटीगांठी होतील का नाहीं कोण जाणें अशा विचारानं मीं तुम्हांला आत्तां चहाला बोलावलं खरं; पण अगदीं आंतलं मन मला सारखं सांगत आहे कीं तुमची माझी ही कांहीं शेवटची भेट नाहीं. "

बोलतां बोलतां राधाकान्त थबकला. त्याचा चेहरा अतिशय गंभीर दिसत होता. त्याच्या तोंडचे शब्द अगदीं हृदयापासून निघत असल्याचें स्पष्ट दिसत होतें. किंचित् वेळानें त्यानें मला विचारलें, " जगदीश, एक प्रश्न विचारूं का ? "

" विचारा–" चहाचा पेला संपला असूनहि तसाच हातांत धरून राधाकान्ताकडे पाहात मीं म्हटलें.

" आज चार पांच दिवस तुम्ही कसल्या चिंतेंत आहांत ? "

राधाकान्ताच्या त्या प्रश्नानें मला आश्चर्य वाटलें हें खरें. पण तो प्रश्न मला नकोसा वाटला असें नाहीं. उलट गेल्या चार पांच दिवसांतील माझ्या हृदयांतील तळमळ कोणाजवळ तरी बोलून दाखविण्यास, आणि माणिकच्या माझ्यावरील प्रेमाचें कोणाजवळ तरी वर्णन करण्यास मी एक प्रकारें उत्सुकच झालों होतों. अशा मनःस्थितींत राधाकान्तासारख्या माणसाकडून हा प्रश्न आल्यामुळें त्याला बाबांच्या पत्राची सारी हकीकत सांगण्यास माझ्या मनाला मुळींच संकोच वाटला नसल्यास नवल नाहीं.

माणिक व मी एकमेकांशीं वचनबद्ध कशीं झालों होतों, बाबा येथें आले असतांना त्यांच्या सांदिग्ध बोलण्याचा निषेध न करतां मी स्वस्थ कसा बसलों, नंतर बाबांचें पत्र काय आलें, तें आल्यानंतरहि माझा माणिकशी विवाह करण्याचा निश्चय कायम कसा होता, तें सर्व सांगून व माणिकचें माझ्यावर केवढें प्रेम आहे याचें मोठ्या उत्साहानें भडक शब्दचित्र रंगवून मी राधाकान्तला म्हणालों,

" दोन दिवसांपूर्वीं मी बाबांना एक लांबलचक पत्र पाठवून त्यांत माझे सारे विचार विनयानं पण स्पष्ट रीतीनं त्यांच्यापुढें मांडले आहेत, आणखी–"

" मग त्याचं उत्तर काय आलं ? " राधाकान्तनें आतुरतेनं विचारलें.

" आज बाबांचं उत्तर येण्याची मी अतिशय उत्कंठेनं वाट पाहातों आहे. " मीं उत्तर दिलें.

" पण तुमचा काय अदमास आहे ? "

" बाबांना माझं म्हणणं पटेल अन् ते आपला घाईनं ठरविलेला बेत रहित करून आमच्या विवाहाला संमति देतील. "

" हं ! " चहाचा रिकामा पेला बाजूच्या टेबलावर ठेवीत राधाकान्त

उद्गारला. त्याच्या त्या एकाक्षरी उद्गारांत मतभेदाची छटा पूर्ण बिंबली होती. म्हणून मीं विचारलें,

" कां, तुम्हांला माझ्यासारखं नाहीं वाटत ? "

" नाहीं. तुमच्या वडिलांचा स्वभाव मला मुळींच माहीत नसून किंवा वृंदावनास तुमच्या घरीं काय काय बेत चालले असतील त्याचीहि मला कल्पना नसून मी असं बोलतों याचं तुम्हांला आश्चर्य वाटत असेल—"

" वाटतंच आहे ! " नवी सिगारेट तोंडांत धरून तिच्या टोंकाला पेटलेली काडी लावीत मी म्हटलें, " तुम्ही कशाच्या आधारावर हा तर्क करता ? "

" एकाच आधावावर, पण तो आधार मला फार विश्वनीय वाटतो. तुमची पत्रिका मीं एकदां नीट प हिलेली आहे. माणिकशीं तुमचा विवाह होईल असं तुमची पत्रिका बिलकुल सांगत नाहीं —"

" उंः ! पत्रिकेवर माझा मुळींच विश्वास नाहीं. " हातांतील विझलेली काडी जोरानें दूर फेंकीत मीं म्हटलें, " बोलायचीच वेळ आली म्हणून मी आतां तुम्हांला स्पष्टच सांगतों, कीं घरच्या साऱ्या माणसांची गैरमर्जी संपादून-देखील माणिकशीं विवाह करायचा मीं पक्का निश्चय केलेला आहे. या माझ्या निश्चयापुढें पत्रिकेचा काय टिकाव लागणार मला सांगा. "

" तें नाहीं मला सांगतां येत. पण माझा आपला विश्वास आहे खरा. अन् एक गोष्ट तुम्हांला सांगून ठेवावीशी वाटते. सांगू ? "

" सांगा. "

" तुमच्या बाबांचें आज जर नकारात्मक पत्र आलं—"

" साहेब ! हें पत्र आलं आहे. " एकदम खोलीचें दार लोटून आमचा तुकाराम गडी आंत आला, आणि त्यानें एक पाकीट माझ्या हातीं दिलें.

मीं किती आतुरतेनें पाकीट फोडलें माझें मला माहीत. आंतील नोट-पेपरवर मजकूर अगदीं थोडा असलेला पाहून माझ्या पोटांत धस्स झालें. माझें म्हणणें बाबांना पटलें असतें तर त्यांनीं सविस्तर पत्र लिहिलें असतें अशी माझी खात्री होती. पत्राचा तो त्रोटकपणा रागावलेल्या मनाचा तुटकपणा पूर्ण व्यक्त करीत होतासें मला त्या क्षणीं वाटलें, आणि जड अंतःकरणानेंच मीं पत्र डोळ्यापुढें धरलें. पत्रांतील एकेक शब्द वाचण्यापेक्षां

सबंध पत्रच माझ्या डोळ्यांनीं एकदम पाहून घेतलें असें म्हणणेंच अधिक यथार्थ होईल.

" वृंदावन,

" अनेक आशीर्वाद उपरि

" तुमचें पत्र मिळालें. आमचे बेत आणि तुमची इच्छा हीं दुर्दैवानें इतकीं विरुद्ध आहेत, कीं त्यांचा मेळ बसविणें अशक्य आहे. तुमचा मानस मला बिलकुल पसंत नाहीं. आमच्या इच्छेविरुद्ध तो संबंध जोडण्याची तुम्हांस बुद्धि झालीच तर तुम्ही यापुढें आम्हांस न भेटणें बरें. माझी पुरती बेअब्रू झाली. फटफजितीला पारावर उरली नाहीं. अण्णाला तर नाहींच, पण गांवांतील दुसऱ्या कोणत्या माणसाला तोंड दाखवावयास जागा ठेवली नाहींत. अजूनहि सुबुद्धि सुचली तर तुमचा गरीब बाप जन्मभर उपकार स्मरील. मात्र आपलाच शहाणपणा आम्हांस पटविण्यासाठीं यावेंसें वाटलें तर स्पष्टच लिहितों कीं त्यापेक्षां तोंड न दाखवाल तर बरें! असो. असाल तेथें खुशाल असा. बाबा."

पत्रांतील मजकुरानें मला जबर धक्का दिला. माझ्या हातांतील जळती सिगारेट गळून पडली. माझ्या डोळ्यांपुढील गोष्टी स्पष्ट दिसत नाहींतसें मला क्षणभर वाटलें. हातांतील पत्र थरथर हालूं लागलें. हृदय भरून येऊन गळा दाटला. एखाद्या निर्बुद्ध यंत्राप्रमाणें हात पसरून राधाकान्ताच्या हातीं पत्र देऊन मीं सुस्कारा सोडला.

पत्र वाचून झाल्यावर राधाकान्तानें माझ्याकडे पाहात " हं " असा फक्त उद्गार काढला.

कांहीं वेळ आम्ही दोघेहि स्वस्थ बसलों होतों. शून्य वृत्तीनें चहाच्या रिकाम्या पेल्यांतील चमचा पेल्याच्या कांठावर मी वाजवीत होतों. खरें म्हटलें तर माझे विचार पार गारठून गेले होते. खोलींत नसून एखाद्या उजाड जागेंत आपण आहोंत असें मला त्या वेळीं वाटलें. माझ्या डोळ्यापुढें अंधाराच्या आडव्या उभ्या रेघा अशा कांहीं खेळत होत्या, कीं चहाच्या केटलीवर घोंटाळणाऱ्या माशा मोठमोठ्या पक्षांच्या आकाराच्या आहेतसें मला वाटलें. राधाकान्ताचा आवाज कानीं पडून मी या आभासांतून जागा झालों. किंचित् दचकून मीं त्याच्याकडे पाहिलें. तो म्हणत होता,

" मघाशीं तुम्हांला जें सांगत होतों तेंच आतां सांगतों. "

मीं कांहींच न बोलतां किंचित् मान हालवली, आणि त्याच्याकडे पाहात राहिलों. तो पुढे म्हणाला,

" तुमच्या आईबापांच्या हृदयाला दुःख होईल असं कांहींहि करूं नका. तुमचं अन् माणिकचं एकमेकांवर अत्यंत प्रेम असेल. त्याविषयीं मी शंका घेत नाहीं. पण तें प्रेम असलं तरी तुम्ही वडिलांचं मन आपल्याला अनुकूल करून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करणं हेंच तुमचं कर्तव्य आहे. तुम्ही वृंदावनास जा अन् सगळ्यांची विनवणी करा. कांहीं झालं तरी आईबापांना कष्टी करूं नका. जगदीश, तुम्हांला आईबापांच्या प्रेमाचा मनसोक्त उपभोग घ्यायला मिळाला आहे म्हणून कदाचित् त्याची तुम्हांला किंमत वाटत नसेल. पण, त्याची किंमत स्वर्गाच्या मापानंदेखील मोजतां येणार नाहीं हें लक्षांत ठेवा ! मी तुमच्या जागीं असतों तर आधीं वृंदावनास धांवत गेलों असतों ! "

राधाकान्ताचा उपदेश मला त्या स्थितींत पटणें शक्य नव्हतें. माणिकच्या व माझ्या प्रेमाची या वेड्याला कल्पना नाहीं म्हणून हा असें बरळतों आहे असें मला वाटलें. बाबांच्या रागाचा मला विलक्षण राग आला होता. खोलींतून जाण्याच्या विचारानें मीं म्हटलें,

" बरं ! पाहूं आतां काय करायचं तें. मी जातों आतां...तुम्ही आज जाणार मुंबईस ?–ठीक–पुन्हां भेट ? "

" नेमानेम असतील तर भेट झाल्यावांचून राह्यची नाहीं. "

" हं ! "

" पण जगदीश, वृंदावनाला जा अं ! "

" बरं, बरं ! " वृंदावनाला जावयाचें नाहीं असा माझ्या मनाचा आंतून दृढ निश्चय होत असतांना मीं म्हटलें, आणि खोलीच्या बाहेर पडून जड पावलें टाकीत मी आपल्या खोलींत शिरलों.

३

असें करणें मला मनापासून पसंत होतें असांतील गोष्ट नाहीं; पण साऱ्या गोष्टींचा विचार केल्यावर तसें करणेंच बरें वाटूं लागून मीं आपली त्या गोष्टीस संमति दिली. बाबांचें तें रागाचें पत्र माणिकला मीं दाखविलें तेव्हां तिनें प्रथम राधाकान्ता

सारखाच मला सल्ला दिला. पण मी वृंदावनास जावयास मुळींच तयार नव्हतों. मला लोकांनीं त्या वेळीं वेडा म्हटलें असेल, व आज ती भूतकालची गोष्ट मीं शांत दृष्टीनें पाहूं लागलों कीं त्या वेळचा माझा वेडेपणा मला देखील दिसतो; पण, त्या वेळीं साऱ्या जगानें कंठरव करून मला वृंदावनास जाण्याचा उपदेश केला असता तरी मीं सबंध जगाला धिक्कारून बाजूला सारलें असतें! प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांत, मला वाटतें, असे एक दोन तरी प्रसंग येतातच, कीं त्या वेळीं त्याच्या एखाद्या विशिष्ट भावनेची ज्वाला इतकी भडकते, कीं त्याच्या अंतर्यामींचा सुविचार आणि लोकांचा उपदेश तींत पार खाक होऊन जातात! बाबांच्या पत्रानें माझी स्थिति अशीच केली होती. वृंदावनास जाऊन बाबांची समजूत घालावी असें एकदांदेखील माझ्या मनांत आलें नाहीं. माझ्या व माणिकच्या प्रेमाचा धिक्कार करून बाबांनीं माझा इतका अपमान केला आहे, कीं त्यापुढें मी घर अजिबात सोडून दिलें आणि स्वतंत्रतेनें वागलों तरी तें क्षम्यच होईल, असें माझ्या मनानें पक्कें घेतलें होतें. मीं घर सोडलें तर आईला विलक्षण दुःख होईल, इतकेंच नव्हे तर बाबांच्या अंतःकरणालासुद्धां तें लागल्याखेरीज राहणार नाहीं, असा विचार उद्भवला कीं माझें मन मला सांगे कीं, मी विनाकारण थोडेंच घर सोडीत आहे? माझ्या व माणिकच्या विवाहाला संमति न देण्याचा दुष्टपणा आईबाप करीत आहेत म्हणून हा निष्ठुरपणा मला निरुपाय म्हणून करावा लागत आहे! यांत माझा अपराध कोठें उरला?

वृंदावनास न जाण्याचा माझा अगदीं निश्चय झालेला पाहून माणिक मला म्हणाली,

“ तिकडे पुन्हां जायचं नाहीं असं अगदीं ठरवलं असेल तर मग मला एक गोष्ट सुचवावीशी वाटते. ”

“ ती कोणती? ”

“ मान्य केली पाहिजे हो! तर सांगतें — नाहीं तर ती आपली माझ्या मनांतल्या मनांत राहीना! ”

“ काय गोष्ट आहे ती कळल्याशिवाय कशी बुवा संमति द्यायची? ” मीं हंसत म्हटलें.

“ मग नाहीं सांगत तर! ”

" तुझ्या नेहमींच्या स्वभावाला शोभेल असाच हा हट्ट आहे. बरं कबूल ! जें म्हणशील तें कबूल करीन. आतां तर सांगशील ? "

" इथंच राह्यचं असलं तरी आतां कॉलेज लवकरच बंद होणार अन् मग कॉलेजांत राहणं शक्य नाहीं. तेव्हां आमच्याच घरीं मुळीं उद्यांपासून – आजपासूनसुद्धां – राहायला येणं फार चांगलं. माझी ही विनंती – " तिनें तें वाक्य तसेंच अपुरें ठेवून मजकडे पाहिलें, व बराच वेळ मीं कांहींच बोललों नाहीं असं पाहून ती म्हणाली, " कां ? बोलत नाहीं ? "

" ही गोष्ट एकदम हो म्हणण्यासारखी नाहीं, माणिक ! " मी जरा गंभीर मुद्रेनें तिला म्हटलें. " माझ्या मनाची या गोष्टीला विशेष हरकत नाहीं पण, लोक काय म्हणतील तें पाह्यलं पाहिजे ना ? "

" लोक ! अन् तुम्हांला लोकांच्या म्हणण्याची किंमत ! आज हें नवंच ऐकतें आहे ! वृंदावन वर्ज्य केल्यानं जो लोकापवाद येईल त्यापेक्षां आमच्या घरीं आल्यानं कांहीं अधिक येईल असं मला नाहीं वाटत ! अन् तुम्हांला तसं वाटत असेल असंहि नाहीं ! कांहीं तरी सबब पुढें करायला पाहिजे होती–बरे आपले ' लोक ' सांपडले आयतेच ! "

तिच्या म्हणण्यांतील सत्य मला पटलें, आणि तिनें केलेल्या चेष्टेचें मला हंसूंहि आलें. नंतर या विषयावर बरेंच बोलणें झालें. माणिकनें आपल्या वडील बहिणीकडून व वडिलांकडूनहि मला अतिशय आग्रह करविला, व शेवटीं मी माणिकच्या म्हणण्याला संमति देऊन घरीं राहावयास आलों. याच गोष्टीला उद्देशून मीं प्रारंभीं म्हटलें, कीं झाली गोष्ट मला सर्वस्वीं पसंत होती असें नव्हे, पण एका अर्थीं तसें करणें प्राप्तच होतें.

असो. या गोष्टीला दोन दिवस झाले. माणिकच्या घरीं आज रात्रीं चांदण्यांतील मेजवानी होती. चार पांच दिवसांनीं मुकुंदराव विलासगडला परत जाणार होते, आणि ते ज्या कामासाठीं इकडे आले होते तें कामहि यशस्वी झालें होतें, तेव्हां अशा दुहेरी निमित्तानें त्यांनीं आपल्या मित्रांना आज रात्रीं मेजवानी द्यावयाचें ठरविलें होतें.

मेजवानीच्या तयारीच्या धांदलींत माणिक आज गुंतली होती. त्यामुळें मला एकटें फिरावयास जाणें भाग होतें. शिवाय, कॉलेजच्या खोलींतून कांहीं जिनसा आणावयाच्या अजून राहिल्या होत्या. म्हणून संध्याकाळ झाल्यावर

कॉलेजांत जाऊन मीं त्या जिनसांची बांधाबांध केली, तुकारामबरोबर त्यांची गांवांत रवानगी केली, आणि सूर्यास्त होऊन चांदणें पडलेलें पाहून चांदण्यांत हलके हलके चालतच गांवांत जावयाचें ठरवून कॉलेजच्या आवारांतून मी बाहेर पडलों.

कॉलेजच्या फाटकाबाहेर पडून मी पन्नास एक पावलें गेलों असेन नसेन इतक्यांत आमच्या वर्गांतील तीन विद्यार्थी गांवांतून परत येत असतांना मला भेटले. मला पाहतांच "ओहो! कोण पटवर्धन? नमस्कार." असें म्हणून तिघेहि थांबले.

"नमस्कार, नमस्कार!" असें म्हणून मीहि थांबलों, व खिशांतील सिगारेटची पेटी काढून पुढें करून म्हटलें, "घ्या."

तिघांपैकीं दोघांनीं सिगारेट काढून घेऊन पेटविली. तिसरा विद्यार्थी माझ्या विशेष परिचयाचा नव्हता, त्याला मीं हंसत विचारलें, "कां? नाहीं ओढीत वाटतं?"

सिगारेट ओढणाऱ्या दोघांपैकीं एकजण त्याच्या पाठीवर थाप मारून म्हणाला, "काय? तूं सिगारेट ओढीत नाहींस! मग या कॉलेजांत येऊन केलंस काय? अरे, या कॉलेजांत यायचं म्हणजे उनाडायला, बोटिंग करायला, चार दिवस मौज करायला यायचं असतं—निदान आमच्यासारखे लोक तरी या विचारानं येतात. सिगारेटसारख्या सोंवळ्या गोष्टीचा इनकार करतोस? मग—पण तें जाऊं दे. घे सिगारेट. अन् पटवर्धनांच्या जवळची सिगारेट म्हणजे उत्तमांपैकीं असायची—हं घे. आटप!"

त्याच्या तोंडची ती या कॉलेजांत येण्याच्या हेतूची मीमांसा मला मुळींच रुचली नाहीं. पण, माझें मन मला म्हणूं लागलें, "तुझी वर्तणूक या मीमांसेला फारशी विरुद्ध कोठें आहे? तूं व्यसनांत न सांपडतां प्रेमांत सांपडलास! पण अभ्यास आणि घरच्या मंडळीचा संतोष या दृष्टीनें—"

मनांतील हे विचार मी तसेंच दाबले आणि सिगारेटचा ओढलेला झुरका नाकावाटे बाहेर सोडीत मीं घाईनें सिगारेटची पेटी फटदिशीं बंद करून खिशांत टाकली, आणि त्या तिघांस म्हटलें, "बरं मंडळी! जातों! गर्दींत आहे जरा!"

मीं पुढें पाऊल टाकलें, पण त्यांपैकीं एकानें माझ्या खांद्यावर हात

ठेवून मला थांबविलें व म्हटलें, "खरंच, पटवर्धन, तुम्हांला विचारायचं राह्यलंच!"

"काय?"

"माणिक जोशीवरून तुमचं अन् तुमच्या वडिलांचं बिनसलं—"

त्याचा प्रश्न माझ्या ध्यानांत येतांच माझ्या भिंवया चढल्या. क्रोधाविष्ट मुद्रेनें त्याच्याकडे एकवार पाहून मीं त्याच्या हाताला हिसडा दिला, आणि क्षणभरहि तेथें न थांबतां पाठ वळवून झपाझप पावलें टाकीत मी जाऊं लागलों.

माझें हें वर्तन पाहून त्या तिघांस आश्चर्य वाटलें असलें पाहिजे. आपण केलेली थट्टा बरोबर वर्मीं लागूं पडली असें वाटून त्यांना आनंदहि झाला असला पाहिजे. कांहीं अंतरावर गेल्यावर मला त्यांचें थोडेंसें संभाषण त्या निःशब्द वातावरणांत ऐकूं आलें.

"काय भयंकर चिडला रे!" एकजण म्हणाला, "एकूण बातमी खरीच आहे तर – पण हा कॉलेज सोडून राहातो कुठें रे?"

"अहा रे वेड्या!" दुसऱ्यानें म्हटलेलें मीं ऐकलें, "ज्या मालतीसाठीं या माधवानं आपलं घर सोडलं ती या वेळीं याला आश्रय न देईल तर याची प्रियसखी कसली!"

तिघेहि मोठ्यांदा हंसले. त्यांचा खदखदाट मला स्पष्ट ऐकूं आला व त्यानंतर त्यांचें बोलणें मला ऐकूं येईनासें झालें. परंतु, जे शब्द कानांवर आले होते त्यांमुळें मला अनावर संताप आला होता. एक क्षणभर असें वाटलें, कीं परत फिरून धांवत जाऊन, एकेकाचा गळा दाबून त्यांच्या बेजबाबदार जिव्हा कायमच्या घशाबाहेर काढाव्या! पण, दुर्दैवानें आपल्या प्रिय वस्तूवरील शिंतोडे अशा रीतीनें धुऊन काढण्याचें सतरावें शतक तीनशें वर्षांनीं मागें फेकलें गेलें होतें!

मीं आपला राग आंवरला व पुढें चालूं लागलों. पण आज लोक आपल्या व माणिकच्यासंबंधीं काय बोलत असतील याची या प्रसंगानें मला पुरती कल्पना आणून दिली होती, व त्या कल्पनेनं मन अर्धवट चिडलेलें व अर्धवट खिन्न झालेलें असल्यामुळें हताश पावलें टाकीतच मी पुढें निघालों. त्या वेळीं चंद्रप्रकाशांत नाहणाऱ्या सृष्टीचें सौंदर्य अवर्णनीय मोहक

असलें पाहिजे. पण माझें लक्ष आकाशांत तरंगणाऱ्या चंद्रबिंबाकडेहि नव्हतें, किंवा रस्त्याच्या दोन्ही बाजूंस शिस्तीनें उभ्या टाकलेल्या निशिगंधाच्या उंच सडक झाडांच्या शोभेकडेहि नव्हतें. भारावलेल्या मनानें मी चाललों होतों, व यंत्राप्रमाणें एकदां सिगारेटचा झुरका ओढीत होतों, आणि एकदां रस्त्याकडे वर मान करून पाहात होतों.

अशा रीतीनें मी स्टेशनाच्या कोपऱ्यापर्यंत गेलों. तेथें गेल्यावर तेथील एकंदर गडबडीनें व माणसांच्या रहदारीनें आतांपर्यंतचा माझा एकांत मोडला. आणि मनावरील खिन्न विचारांचें आवरण आपोआप दूर सरकून माझें लक्ष भोंवतालच्या देखाव्याकडे वळलें. चांदणी रात्र होती तरी स्टेशनच्या कोपऱ्यावरील गॅसचे दिवे नेहमीप्रमाणें लागलेले होते. मुंबईकडील मेल नुकतीच आली होती व तांगे, गाड्या, उतारू आणि पोलीस यांचा एकच हलकल्लोळ स्टेशनच्या आवारांतून ऐकूं येत होता. उतारूंनीं भरलेले तांगे एका पाठोपाठ एक असे स्टेशनच्या फाटकांतून बाहेर निघत होते. चंद्र आणि गॅसचे दिवे यांच्या संमिश्र विचित्र प्रकाशांत त्या तांग्यांची रांग पाहून मी स्वप्नांतच असल्यासारखें मला क्षणभर वाटलें. मी कांहींसा पुढें आलों तों एक गृहस्थ एका तांगेवाल्याशीं जरा आवेशानें बोलत असलेले पाहून माझें लक्ष साहजिकपणेंच तिकडे गेलें.

"मी तुम्हासनी फकत डेक्कन कालिज्यामंदी घालवीन! तुमचं कोन मानूस तथं असल त्ये तुमचं तुमी सोदा!" तांगेवाला त्या गृहस्थास म्हणत होता.

मी थोड्या अंतरावर होतों, व शिवाय गृहस्थ माझ्याकडे पाठ करून बोलत होता. त्यामुळें त्याचा चेहरा मला दिसला नाहीं. त्यानें तांगेवाल्याला दिलेलें उत्तर मात्र मला चांगलें ऐकूं आलें. तो आवेशानें म्हणाला,

"अरे वारे तुम्ही पुण्याचे तांगेवाले! माझ्याकडून दीड रुपया घेऊन पुन्हां तूं मला फक्त कॉलेजच्या फाटकाशीं सोडणार काय? अशी सोदेगिरी—"

"दादा, जपूनशान बोला! नसल परवडत तर दुसरा तांगा बगा! शिया द्यायचं—"

त्यांचें तें उंच आवाजांतील संभाषण (!) ऐकून शांतता राखण्याच्या कामावर सरकारनें नेमलेला काळा ड्रेसवाला पुढें होऊन तांग्यापाशीं गेला,

आणि तांग्याच्या चाकावर आपला कमरेचा सोटा आपटून त्या दोघांनाहि सारखेंच दरडावण्याच्या हेतूनें ओरडला, " ए ! "

इतक्या अवकाशांत मीहि पुढें झालों होतों. कारण त्या गृहस्थाचा आवाज माझ्या कानीं पडतांच ते आमचे वृंदावनचे दिवाणजीच होते असें मीं ओळखलें होतें. तांग्यापाशीं मी जाऊन उभा राहतांच दिवाणजींनीं माझ्याकडे पाहिलें व मला ओळखतांच हातांतील सामानाचें जुनें तरटाचें पाकीट खालीं ठेवीत, व डाव्या खांद्याखालीं कशीबशी दाबून धरलेली जाडजूड छत्री सांवरीत उजव्या हातानें माझा हात धरून ते आनंदानें म्हणाले,

" कोण साहेब ! वा, वा, वा ! सोन्याहून पिंवळं झालं ! तुमच्याचकडे आलों आहे. हे तुमचे पुण्याचे तांगेवाले मुलखावेगळे खरे ! असो. आतां तुम्ही अन् तो तांगेवाला, घाला गोंधळ ! मी आपला बसतों—"

इतकें बोलून दिवाणजींनीं पाकीट उचलून तांग्यांत ठेवलें, छत्रीहि तांग्यांत टाकली, आणि स्वतः आंत बसण्यासाठीं त्यांनीं तांग्याच्या पायरीवर पाय ठेवला.

एखाद्या तिऱ्हाइताला त्या प्रसंगांतील विनोदानें हंसूं लोटलें असतें. पण विनोदाचा आस्वाद घेण्यासारख्या मनःस्थितींत मी त्या वेळीं नव्हतों. एक तर आधींपासूनच मी विषण्ण वृत्तींत होतों, आणि खेरीज दिवाणजी एकदम वृंदावनाहून या वेळीं माझ्याकडे म्हणून मुद्दाम आलेले पाहून मी अगदीं घोटाळ्यांत पडलों. शिवाय, हे माझ्याकडे आलेले, आणि मी तर कॉलेजच्या खोलींत राहातदेखील नाहीं ! ही गोष्ट यांना कळवावयाची कशी ?

त्या तशा घोंटाळलेल्या मनःस्थितींतहि क्षणभरानें मीं एक निश्चय करून दिवाणजींना म्हटलें, " तांग्यांत नका बसूं ! आपल्याला तांग्याची जरूरी नाहीं. जरा माझ्याबरोबर या म्हणजे सांगतों सगळं — ए हमाल, सामान उचल अन् आमच्या मागोमाग ये. "

दिवाणजींनीं आश्चर्यानें आ करून एक वेळ माझ्याकडे पाहिलें, व मग मी कांहींच बोलत नाहीं असें पाहून माझ्याबरोबर चालण्यास सुरुवात केली.

स्टेशनजवळील ' सुखनिवास 'मध्यें दिवाणजींना उतरविण्याचें मीं मनाशीं ठरविलें होतें. ' सुखनिवास 'च्या आवारांत शिरतांच इकडे तिकडे साशंक मुद्रेनें पाहात दिवाणजींनीं मला विचारलें, " साहेब, हें तुमचं कॉलेज ? "

" नाहीं. "

" मग, तुमच्या कॉलेजवर चला कीं ! तुमच्या खोलींतच उतरायला मला आईसाहेबांनीं सांगितलं आहे ! "

" तें खरं " मीं शांतपणें म्हटलें, " पण मी आतांशा कॉलेजांत राहात नाहीं ! "

" मग ? " आश्चर्यातिशयानें दिवाणजींनीं विचारलें.

" माणिक नांवाची माझी भावी पत्नी आहे तिच्या घरीं ! " मीं मुद्दामच किंचित् चेष्टेच्या स्वरानें म्हटलें.

" काय म्हणतां ! " आश्चर्याला पारावार न राहून दिवाणजी उद्गारले, " च् च्च च् ! साहेब ! हा हट्ट सोडा. मुद्दाम आपली समजूत काढून आपल्याला घरीं नेण्यासाठीं आईसाहेबांनीं मला पाठवलं आहे ! "

" अस्सं ! बरं असो. त्याविषयीं आपण मग बोलूं. आधीं मला तुमची व्यवस्था लावूं द्या. "

मॅनेजरची गांठ घेऊन मीं दिवाणजींची सारी व्यवस्था लावून दिली, व त्यांना त्यांच्या खोलींत पोंचतें केल्यावर त्यांना म्हटलें, " बरं मी आतां जातों. मला गेलंच पाहिजे. आधींच उशीर झाला आहे. "

दुसऱ्या दिवशीं दुपारच्या गाडीनें दिवाणजी वृंदावनाला जावयास निघाले. त्यांना पोंचविण्यासाठीं मी स्टेशनवर गेलों होतों. गाडी सुटण्यापूर्वीं दिवाणजी डब्याच्या खिडकींतून वाकून माझ्याशीं बोलतां बोलतां म्हणाले,

" साहेब, माझी म्हाताऱ्याची अगदीं निराशा केलीत ! थोरल्या साहेबांनीं हट्ट धरला अन् तुम्हीहि हट्ट घेतला ! आतां हें व्हायचं कसं ? माझं हें अपेशी तोंड मी आतां आईसाहेबांना कसं दाखवूं ? त्यांच्या तर डोळ्याचं पाणी खळत नाहीं. "

बोलतां बोलतां म्हाताऱ्यानें डोळ्यांना उपरणें लावलें.

माझाहि गळा दाटून आला. मीं दिवाणजींना रडव्या स्वरांत म्हटलें, " दिवाणजी, या गोष्टीला आतां उपाय नाहीं. बरं, आईला सांगा मी खुशाल आहे. कांहीं काळजी करूं नकोस ! "

मला पुढें बोलवेना. माझ्या डोळ्यांत अश्रु उभे राहून ते घळ्दिशीं गालांवर ओघळले.

गाडीची शिटी झाली. मी दिवाणजींचा हात दाबून म्हटलें, " बाबांना माझे सांष्टांग नमस्कार सांगा. अन् आईला म्हणावं—"

माझे शब्द दाटलेल्या गळ्यांत तसेच राहिले. गाडी चालू झाली. हातरुमालानें मीं आपले डोळे पुसून परत फिरलों. गाडी निघून गेल्यामुळें प्लॅटफॉर्म ओसाड आणि भयाण दिसत होता !

प्रकरण आठवें

हॅम्लेटची अवस्था

१ वास्तविक माझ्या व माणिकच्या विवाहाचा समारंभ पुढच्या महिन्यांत व्हावयाचा. मुकुंदरावांची आमच्या विवाहाला पूर्ण संमति होती, व विलासगडला एकदां जाऊन येऊन विवाह साजरा करण्याचें त्यांनीं मनाशीं ठरविलें होतें, व मजजवळ एकदोन वेळां त्यांनीं तसें बोलूनहि दाखविलें होतें.

पण, विधिघटना तशी नव्हती कीं काय कोण जाणे! मुकुंदराव विलासगडला जावयास निघण्याच्याच दिवशीं सकाळीं त्यांस कलकत्त्याहून त्यांच्या एका बंगाली मित्राची तार आली. त्या मित्राच्या पुतण्याच्या लग्नामुळें कांहीं इस्टेटीच्या भानगडी उत्पन्न होऊन मुकुंदरावांचा कायद्याबद्दल सल्ला विचारण्यासाठीं त्यानें त्यांस तांतडीनें बोलाविलें होतें. त्याप्रमाणें मुकुंदराव प्रथम विलासगडला जाऊन पुढें कलकत्त्यास गेले, व तेथून चारपांच दिवसांनीं त्यांचें जें पत्र आलें त्यांत त्यांनीं आपणांस कलकत्त्यास निदान एक महिना तरी राहणें भाग पडेल असें लिहिलें होतें, व त्यामुळें माणिकचें लग्न लांबणीवर पडेल त्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली होती. पण या लांबणीबद्दल मला किंवा माणिकला मुळींच वाईट वाटलें नाहीं. आमच्या प्रेमाला विवाहाचें व्यावहारिक स्वरूप एकदांचें कसेंबसें मिळावें म्हणून ती किंवा मी, कोणीच उतावीळ झालों नव्हतों. मग विवाहसमारंभ आजचा उद्यांवर गेला म्हणून आम्हांला वाईट वाटण्याचें काय कारण?

एका गोष्टीबद्दल मात्र माणिकला नव्हे पण मला वाईट वाटूं लागलें होतें. ती गोष्ट म्हणजे ही, कीं या पंधरा दिवसांत माणिकचें व माझें बारीक सारीक गोष्टींवरून लहानसहान भांडण अनेक वेळां झालें होतें, त्यामुळें

आम्ही दोघे पूर्वींच्या प्रेमळ दिलसफाईनें एकमेकांशीं वागत नाहीं कीं काय अशी अंधुक शंका आज दोन दिवस मला येऊं लागली होती. प्रसंग अगदीं क्षुल्लक होते, व त्या प्रसंगींचे माणिकच्या तोंडचे शब्दहि साधेच होते. पण माझ्या मनाला ते प्रसंग उगीचच्या उगीच बोंचले म्हणा, कांहींहि म्हणा; माणिकच्या मजविषयींच्या वृत्तींत फरक झाला कीं काय, असा संशय माझ्या मनाला त्रास देऊं लागला होता खरा. एके दिवशीं आम्ही दोघे एका दुकानांत शिरलें, व माणिकला पोलक्याच्या बाह्यांसाठीं लेस हवी होती म्हणून तिचे नमुने दुकानदाराकडून मागविले. पूर्वीं मी माणिकला घेऊन अनेक वेळां बाजारांत जात असे, तिला आवडेल ती जिन्नस घेण्याबद्दल मीच तिला आग्रह करीत असे, व तिची किंमत देऊन टाकीत असे. परवां दुकानदारानें पुढें टाकलेल्या लेसपैकीं जो नमुना माणिकला आवडला तो अतिशय महाग होता. पण तो महाग होता म्हणून नव्हे, तर खरोखरच माझ्या दृष्टीला तो विशेष आवडला नाहीं म्हणून मीं तो पसंत न करतां दुसरा एक थोड्या स्वस्त दराचा नमुना पसंत केला. माणिकनें महागाईच्याच नमुन्याचा हट्ट धरला. तेव्हां शेवटीं त्रासून मीं म्हटलें,

"मग मला विचारतेस कशाला. तुला आवडेल ती लेस तूं घे."

"बरं, बरं!" असें रागारागानें म्हणून माणिकनें दुकानदारास चार वार लेस द्यावयास सांगितली, व तिची किंमत देण्यासाठीं ती आपल्या पिशवींतून पैसे काढूं लागली.

तिच्या पाकिटावर उजवा हात दाबून डाव्या हातानें आपल्या खिशांतील पाकीट काढीत मीं हंसत म्हटलें, "वा, वा! किती बिल द्यायचं आहे हें मला सांग, मी देतों."

"कांहीं नको!" माझा हात अंमळ तिरस्कारानें दूर करीत माणिक म्हणाली, "माझ्या लेसचे पैसे माझी मी देईन बरं? सध्यांच्या तुमच्या स्थितीला तुम्हांला बरोबर घेऊन असले जिन्नस खरेदी करण्याची चूक मी एकदां केली, त्याबद्दल क्षमा असूं द्या. पुन्हा नाहीं ही चूक करणार!"

दुकानदारासमक्ष माणिकनें काढलेले ते उद्गार मला अतिशय लागले. बाबांकडून आतां मला मुळींच पैसे येत नसत, व एका स्नेह्याकडून मीं कांहीं दिवसांकरितां कर्ज काढलें होतें हें खरें; पण माझे पैसे खर्च होतील म्हणून

मीं स्वस्त दराची लेस पसंत केली होती असें मुळींच नाहीं. असें असतांना एका तिऱ्हाईत मनुष्यासमोर माणिकनें माझ्या तात्पुरत्या गरिबीची हेटाळणी केलेली पाहून मला वाईट वाटलें. मी कांहींच बोललों नाहीं, व आम्ही दोघेंहि दुकानाबाहेर पडलों. त्या संबंध दिवसभर माणिकशीं कांहीं बोलावेंसेंच मला वाटेना, व त्यावरून ती माझ्यावर अधिकच रागावली तेव्हां मीं तिला कायसें कडू उत्तर दिलें.

असे पांच सहा प्रसंग गेल्या पंधरवड्यांत घडले होते, व त्यामुळें माझ्या मनावर एक प्रकारच्या सूक्ष्म अस्वस्थतेचें पटल चढूं पाहात होतें — किंबहुना चढलें होतें. ही अस्वस्थता वाढण्याला आणखीहि एक कारण असें झालें होतें कीं, गेल्या पांच सहा दिवस बाळासाहेब व आबासाहेब यांच्या मालतीबाईच्या घरीं बऱ्याच खेपा होऊं लागल्या होत्या, व माणिकभोंवतीं पूर्वीप्रमाणें घिरट्या घालतांना त्यांना पाहून मला जरी संताप येई तरी मला कांहींच करणें शक्य नव्हतें. मीच मालतीबाईच्या घरीं कांहीं दिवसांपुरता पाहुणा म्हणून राहिलों असतांना त्यांचें जाणें येणें बंद करण्याचें माझ्यांत काय सामर्थ्य होतें? ही गोष्ट मीं एकदां माणिकजवळ बोलून दाखविली; पण "त्या दोघांच्या येण्यानं आपलं काय जातं!" असें म्हणून तिनें मानेला एक हिसडा दिला, व मजकडे पाहून नुसतें मंद हास्य केलें. तेव्हां तें बोलणें तितकेंच राहिलें, व माझ्या मनाची रुखरुखहि कायम राहिली. असो.

आज शनिवार होता, आणि दोन वर्षांनीं पुण्यास आलेली शाहू नगरवासी नाटक मंडळी 'हॅम्लेट' नाटकानें आपल्या मुक्कामाला सुरुवात करणार होती. म्हणून दुपारीं चहा पिण्याच्यावेळीं मीं मालतीबाई व माणिक यांस उद्देशून म्हटलें,

"आज आपण तिघंहि नाटकाला जाऊं! अं!"

माणिककडे पाहून मीं प्रश्न केला होता. पण आपण केटलींतून कपांत चहा ओतण्यांत गुंग आहोंत असें दाखवून तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. मालतीबाईनीं विचारलें,

"कोणत्या नाटकाला? इथं तर सध्यां चांगली कंपनी एकहि नाहीं!"

"वा!" मीं त्यांना म्हटलें, "गणपतरावाची कंपनी आली आहे ना! त्यांचं आज हॅम्लेट आहे. म्हणून तर नाटकाला जायची गोष्ट मी काढली."

" असं का ! " हंसत मालतीबाई म्हणाल्या.

माणिक अजूनहि स्वस्थ बसली होती. चहा संपवून तिनें रिकामा पेला खालीं ठेवला तरीहि ती कांहीं बोलली नाहीं. या तिच्या स्तब्धतेचा मला राग आला, व मी आपला चहा पिऊं लागलों. ही गोष्ट मालतीबाईच्या लक्षांत आली असें दिसलें. कारण त्यांनीं लगेच तिला विचारलें,

" माणिक, तूं कांहींच बोलत नाहींस ? "

" कशाबद्दल ? " जणूं काय आतांपर्यंतचें आम्हां दोघांचें संभाषण तिनें मुळींच ऐकलें नव्हतें अशा आविर्भावानें माणिकनें प्रश्न केला.

" जायचं कां गणपतरावाच्या हॅम्लेटला ? " मालतीबाईनीं पुन्हां विचारलें.

" खरं सांगूं तुला ताई ? मला प्रोज नाटक मुळींच आवडत नाहीं. संगीत नाटकाची मौज कांहीं विशेष असते. बालगंधर्वांच्या एका पदाची सर डझनभर प्रोज नाटकांत येईल का नाहीं याची मला शंका आहे—"

" कांहीं तरी काय बरळतेस ? " तिच्या मूर्खपणाच्या तुलनेचा राग येऊन मीं एकदम वर मान केली, व तिच्याकडे पाहून जरा आवेशानें म्हटलें.

" इश्श ! एकदम रागवायला काय झालं ? " माझ्या दृष्टीला दृष्टि देऊन माणिक हंसत म्हणाली, " माझं मत चुकीचं असेल, पण तें आपलं आहे खरं. अन् शिवाय नायिका मेली, नायक मेला, त्याची आई मेली – सारीं माणसं मेलीं, असला त्या हॅम्लेट नाटकाचा शेवट माझ्याच्यानं मुळींच नाहीं पाहवत ! मीं एकदां केव्हांसं मुंबईस बाबांच्याबरोबर तें नाटक पाहिलं होतं – आतां तें नाहीं मी पुन्हां पाह्यची ! रडवणारीं नाटकं मला कधींच पाहावींशीं वाटत नाहींत ! "

" अस्सं ! म्हणूनच वाटतं तिगस्तां किर्लोस्कर कंपनी इथं होती तेव्हां 'प्रेमशोधन' नाटकाची सोमवती घातलीस ! " मालतीबाई तिला गप्प करण्याच्या उद्देशानें म्हणाल्या.

" पण 'प्रेमशोधन' संगीत होतं ना ! " मालतीबाईकडे पाहात मीं मुद्दामच कुजकेपणानें बोललों.

" तें कांहीं नाहीं ? चल आज नाटकाला. " माणिकला मालतीबाई म्हणाल्या, " जगदीशराव, येईल ती ! करा तुम्ही तीन खुर्च्या रिझर्व. "

" उगीच नको अं ! " चिडलेल्या स्वरानें माणिक माझ्याकडे पाहात म्हणाली, " मी कांहीं येणार नाहीं, अन् मग तुमचे पैसे जातील वायां ! "

" बरं, बरं ! " मीहि चिडून म्हटलें, " माझे पैसे कांहीं उतू चालले नाहींत. ताई, तुम्ही अन् आम्हीच जाऊं झालं ? "

आमच्या दोघांच्या जागा मी रिझर्व करून आलों, आणि रात्रीं जेवण करून नाटकाची वेळ झाल्यावर आम्ही दोघें घरांतून बाहेर पडलों.

मालतीबाई मला वाटेंत म्हणाल्या, " आज माणिकनं फारच हटवादी-पणा केलान् हो ! "

" हं अ ! एखादे वेळीं तिचा हट्ट कळसाला पोचतो. " मीं म्हटलें.

" बाकी मला वाटतं, आज ती हॅम्लेटला न येण्याचं कारण कांहीं निराळंच आहे. "

" तें काय ? " मीं आतुरतेनें विचारलें.

" काल संध्याकाळीं आबासाहेब अन् बाळासाहेब आले होते तेव्हां लष्करांतल्या एका सिनेमांत सध्यां चालू असलेल्या फिल्मची ते फारच तारीफ करीत होते. आज रात्रीं दहा वाजतां तिकडे जाण्याविषयीं त्या तिघांचे बेत चाललेले मीं ऐकले. आज़ दुपारीं ही गोष्ट मी माणिकला विचारायला हवी होती; पण त्या वेळीं ती माझ्या लक्षांतच आली नाहीं. बाकी—"

" हं ! असो – तिची – मर्जी ! " मालतीबाईच्या बातमीनें माझ्या अंतःकरणांत उचंबळणाऱ्या रागाच्या ऊर्मीला मोठ्या प्रयत्नानें दाबून मीं म्हटलें, व माझ्या चेहऱ्यावर कोणताहि विकार दिसूं न देतां, इतर गोष्टीं-विषयीं बोलत मी त्यांच्याबरोबर चालूं लागलों. पण मीं बाहेर दाखविली नाहीं म्हणून मनाची व्यथा बोलण्याचालण्यावर परिणाम केल्यावांचून थोडीच राहणार ? आम्ही थिएटरच्या दारापाशीं जातों तों ' विकारविलसित ' नाटकाचीं पुस्तकें विकणारीं दोन तीन मुलें आमच्यापुढें आलीं. पुस्तक विकत घेण्याबद्दल मालतीबाईनीं मला दोन तीन वेळां सांगितलें तरी तें मीं ऐकलें नसावें. शेवटीं माझा हात जरा जोरानें हालवून त्या मला म्हणाल्या, " एक पुस्तक असूं द्या आपल्याजवळ ! "

शून्य मनःस्थितींतून दचकून जागा होत मीं म्हटलें, " हो, हो. दे रे पोऱ्या एक पुस्तक. "

मुलाच्या हातांतून मीं एक पुस्तक घेऊन मालतीबाईच्या हातीं दिलें, खिशांतील पाकिट काढून पांच रुपयांची एक नोट त्या पोऱ्याच्या हातावर ठेवली आणि तसाच पुढें चालूं लागलों.

माझ्या मनांत माणिकविषयींचेच विचार घोळत होते. मी स्वतःशींच पुटपुटलों, " माणिकचं हें करणं कांहीं ठीक नाहीं. "

इतक्यांत मागून पोऱ्या ओरडला, " साहेब ! अहो साहेब ! पैसे परत घ्याना ! "

मी थांबत नाहीं असें पाहून तो धांवत माझ्यापुढें येऊन उभा राहिला, व उजव्या हातानें कांहीं पैसे पुढें करीत हंसत म्हणाला,

" साहेब, आपले बाकी पैसे घ्याना ! "

तें पाहून मालतीबाईना आश्चर्य वाटलें, हंसूंहि आलें. त्या मला विचारूं लागल्या, " म्हणजे पैसे परत न घेतां तसेंच पुढें आलांत तुम्ही ? "

" हं ! " मीहि हंसलों व पैसे घेतले. माझ्या भ्रमिष्टपणाचें मला आश्चर्य वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. माणिकनें माझ्या मनाला किती जबर दुखापत केली होती याची तिला कल्पना तरी असेल का, असा विचार करीत मालतीबाईच्याबरोबर मी पुढें चालूं लागलों.

थिएटर चिकार भरून गेलें होतें. आणि नवल हें कीं, प्रेक्षकवर्ग सर्वस्वीं उच्च दर्जाचा होता. पहिल्या प्रतीच्या खुर्च्यांपासून तों तिसऱ्या मजल्यावरील शेवटच्या बाकापर्यंत प्रेक्षकांनीं नाटकगृह फुलल्यासारखें दिसत होतें. नाटकगृहांत क्वचितच दिसणारी कितीतरी मंडळी आज अगदीं पुढच्या खुर्च्यांवर झळकत होती. मी व मालतीबाई आपल्या जागेवर जात होतों तों अगदीं पहिल्या रांगेंतील मधल्या खुर्च्यांवर आमच्या कॉलेजचे युरोपियन प्रिन्सिपल, त्यांचें कुटुंब व आणखी कांहीं युरोपियन गृहस्थ माझ्या दृष्टीस पडले, व त्यांस तेथें पाहून मला आश्चर्य वाटलें. इतक्यांत प्रिन्सिपलनींहि मला पाहिलें, व त्यामुळें मला पुढें जाऊन त्यांना इंग्रजी पद्धतीचा नमस्कार करणें भाग पडलें.

हस्तांदोलन झाल्यावर प्रिन्सिपल मला इंग्रजींत म्हणाले, " आम्हांला इथं पाहून तुला फार आश्चर्य वाटलं असेल नाहीं ? "

मींहि हंसत इंग्रजींत उत्तर दिलें, " हो वाटलं खरं ! "

" या तुमच्या नटाचं हॅम्लेटचं काम मीं पूर्वी एकदां कांहींशा निमित्तानं पाहिलं. तें त्या वेळीं मला इतकं आवडलं कीं, आमच्या इंग्लंडमधील मॅथीसन लँग वगैरे सध्यांच्या पहिल्या प्रतीच्या नटांच्या पंक्तीला त्याला बसवायला कांहींच हरकत नाहीं अशी माझी खात्री झाली. विशेषतः शेवटच्या अंकांत विष भिनून मरण्याच्या वेळचा अभिनय तुमचा हा नट फारच बहारीचा करतो असं माझं मत आहे, आणि म्हणूनच माझे हे पाहुणे तज्ज्ञ सर्जन असल्यामुळें त्या अभिनयावर अभिप्राय देण्यासाठीं मीं त्यांस आज मुद्दाम आग्रह करून आणलं आहे ! " असें म्हणून साहेबांनीं त्या दुसऱ्या युरोपियन गृहस्थाकडे पाहिलें, व माझी त्यांची ओळख करून दिली. मीं त्यांच्याशीं हंसतमुखानें हस्तांदोलन केलें व दोन चार औपचारिक शब्द बोलून मालतीबाईंच्या जवळ जाऊन बसलों.

आमच्या प्रिन्सिपलनीं गणपतरावाविषयीं जे उद्गार काढले त्यामुळें मला अत्यानंद झाला होता. एका युरोपियन गृहस्थाकडूनहि तारीफ मिळविणाऱ्या आमच्या महाराष्ट्रीय नटवर्याविषयीं मला धन्यता वाटली. मोठ्या उत्साहभरानें प्रिन्सिपलचें सर्व बोलणें मीं मालतीबाईंना सांगितलें.

पण हें काय ? साडेनऊ वाजून गेले होते तरी पडदा वर जाईना !

दहा वाजले तरी नाटकाला प्रारंभ नाहीं !

आतां प्रेक्षक मंडळींत बरीच अधीरता प्रगट होऊं लागली. खुर्च्यांवरील बडीबडी मंडळी आपआपसांत कुजबुजूं लागली, विद्यार्थी मंडळींत टाळ्यांच्या लाटा उसळूं लागल्या, आणि अगदींच कनिष्ठ प्रेक्षकवर्गात कर्कश शिट्या वाजूं लागल्या. नाटकास सुरुवात कां होईना याचें कारण फार थोड्यांना तर्कानें जाणतां आलें, व ते थोडे लोक इतरांना हळू किंवा मोठ्यानें त्या कारणाचा उलगडा करून सांगूं लागले. मींहि मालतीबाईंना म्हटलें, " माझी शंकाच खरी असली पाहिजे. "

" ती कोणती ? "

" आज गणपतराव मदिरादेवीच्या तडाक्यांत सांपडला असला पाहिजे ...आज कदाचित् खेळहि अजिबात बंद करतील—"

" खरं कीं काय ?...अरेरे ! " मालतीबाई उद्गारल्या.

" याला म्हणतात दैवदुर्विलास ! "

सव्वा दहा वाजून गेले !—तरी पडदा वर जाईना !

आतां मात्र प्रेक्षक मंडळी अनावर होऊं लागली. टाळ्या, शिट्या, आरोळ्या—एकच गोंधळ माजून राहिला !

इतक्यांत घंटा वाजली, पडदा वर झाला, आणि अंधारांतील किल्ल्याचा देखावा सर्वांच्या नजरेस दिसला, आणि खवळलेला प्रेक्षकसमुद्र एकदम शांत झाला.

" आहे, आज काम पाह्यला मिळतं आहे ! " एक सुस्कारा टाकून मीं मालतीबाईंना म्हटलें.

दोन अंक संपले होते. तिसरा अंक लवकरच सुरू होणार होता. तिसऱ्या अंकांत काय काय आहे तें पाहण्यासाठीं मीं पुस्तक चाळीत होतों, इतक्यांत मालतीबाई मला डिंवचून म्हणाल्या,

" अगबाई ! माणिक आली आहे ! पाहिलीत ? "

" काय ?—माणिक ? " पुस्तक माझ्या हातून गळून पडलें व मीं आश्चर्यातिशयानें ते शब्द उच्चारीत मालतीबाईंनीं बोट दाखविलें त्या बाजूला पाहूं लागलों—

खरेंच ! आबासाहेब व माणिक रंगभूमीच्या टोंकाला अगदीं खेटून उभीं होतीं, आणि बाळासाहेब मॅनेजरकडून तीन खुर्च्या त्या ठिकाणीं टाकून घेत होता. माझ्या आश्चर्याला पारावार राहिला नाहीं.

माझी व माणिकची दृष्टादृष्ट होतांच ती हंसली, व हंसत हंसतच आमच्याकडे येऊन मला म्हणाली, " मी आलें हें पाहून भयंकर आश्चर्य वाटत असेल ना ? "

मीं हंसावयाचा प्रयत्न केला, पण हंसूंच येईना. मीं कांहींच न बोलतां माणिककडे नुसता पाहात राहिलों.

ती पुढें म्हणाली, " बाळासाहेब अन् मी गेलों होतों सिनेमा पाह्यला. सिनेमा सुटल्यावर आबासाहेब म्हणाले, चला जाऊं नाटकाला, जेवढं पाह्यला सांपडेल तेवढंच पाहूं. त्यांच्या मोटारींत मी असल्यामुळं मला नाहीं म्हणतां येईना. असं झालं अन् शिवाय—"

घण् घण् ! घण् घण् ! घण् घण् ! पडदा वर गेला, आणि माणिक आपलें बोलणें तसेंच टाकून गडबडीनें आपल्या जागेवर जाऊन बसली.

मी आणि मालतीबाई एका जागीं बसलेलीं!--आणि आबासाहेब व बाळासाहेब या दोघांच्यामध्यें माणिक बसलेली!--तो एकंदर प्रसंग कट्यारी-सारखा माझ्या हृदयाला बोचूं लागला! त्याच वेळीं आबासाहेब व बाळा-साहेब दोघांनींहि मागें वळून माझ्याकडे पाहिलें, व दोघेहि अशा कांहीं मुद्रेनें हंसले कीं--

माझें डोकें अगदीं भणभणून गेलें! रंगभूमीवरील राजा, राणी, मल्लिकेचा बाप या पात्रांच्या संभाषणांतील एकहि शब्द मला नीटसा ऐकूं येत नव्हता! मोठ्या प्रयत्नानें मीं आपलें डोकें शांत केलें, आणि रंगभूमीकडे दृष्टि वळविली तों--

राजा-राणी वगैरे पात्रें गेलीं होतीं. मल्लिका एक पुस्तक वाचीत कोचा-वर बसली होती. गणपतराव बुइंगमधून प्रवेश करून म्हणूं लागला, "जगावं कां मरावं--"

साऱ्या नाटकगृहांत गाढ शांतता होती. गणपतरावाचा एकेक शब्द प्रत्येकजण उत्कंठेनें पीत होता.

'जगणें व मरणें' याविषयीं विचार करण्यांत गुंग झालेल्या हॅम्लेटच्या दृष्टीला मल्लिका पडतांच त्याचे ते विचार बंद पडले, आणि तिच्याकडे पाहत आपल्या हाताचें चुंबन घेऊन तो तिच्याजवळ गेला. पण तिनें प्रेम-भराचा एकहि शब्द न बोलतां एखाद्या परकी माणसाप्रमाणें प्रकृतीची चौकशी करतांच त्याला तिच्या हृदयाचा परकीपणा समजला, आणि तो दूर झाला.

मल्लिकेच्या हृदयांतील प्रेमाचा झरा आटल्याचा संशय येऊन तो दूर सरकलेला हॅम्लेट व मल्लिका यांचें भाषण ऐकतांना एकमेकांपासून आज दूर दूर बसलेल्या माणिकची व माझी कल्पनाच माझ्या मनांत सारखी येऊं लागली. हॅम्लेटच्या एकेका शब्दानें आमच्या दोघांच्या परस्पर भावनेबद्दलची तुलनाच माझ्या मनांत उभी राहूं लागली. हॅम्लेटच्या तोंडांतून बाहेर पडणाऱ्या वाक्यांना आज कांहीं निराळाच अर्थ प्राप्त झाला होता.

चंद्रसेन :--...होतें खरें माझें एकदा तुझ्यावर प्रेम!

मल्लिका :--...महाराज, आपण असें मला भासविलें खरें.

चंद्रसेन :--...आपण माझ्यावर भरंवसा ठेवायचा नव्हता....मीं आपल्यावर प्रीति ठेवलीच नाहीं.

मल्लिका :——तर मग आपण मला फारच फसविलें.

चंद्रसेन :——आम्ही सगळे पक्के दगलबाज हरामखोर आहों; आमच्या-पैकीं कोणावरहि विश्वास ठेवूं नको. आपली एखाद्या मठाची वाट धर !

चंद्रसेन :——...याकरितां जोगीण बन आणि एखाद्या मठांत चालती हो. ऊठ ! अथवा लग्न करण्याविषयीं तुझा आग्रहच असेल तर तें एखाद्या ठोंब्याशीं लाव. कारण, तुमच्यामुळें आपल्या तोंडाला काळोखी कशी येते हें शहाण्या लोकांना पक्कें ठाऊक झालें आहे. तर मग गोसावीण हो, आणि विलंब न लावतां एखाद्या मठांत दडी दे.

चंद्रसेन :—— ...तुम्ही बायका देवानें एक चेहरा दिला असून आपल्या करितां दुसरा उत्पन्न करतां !...चल जा. एकदम मठाची वाट धर कशी !

इतकें बोलून गणपतराव बुइंगमधून निघून गेला. मोत्यांच्या सरीप्रमाणें त्याच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या शब्दांकडे माझें मन असें कांहीं लागलें होतें कीं, तो स्टेजवरून आंत गेल्याबरोबर माझ्या जिवाला आधार देणारी एक गोष्ट नाहींशी झाल्यासारखें — जगांतील एखादी अत्यंत आवश्यक वस्तु नाहींशी झाल्यासारखें—मला त्या क्षणीं वाटलें. झोंपेंतून जागा झाल्याप्रमाणें मी रंग-भूमीकडे पाहात होतों. मल्लिकेचे ओंठ हालतांना मला दिसत होते, पण तिचे शब्द ऐकूं येण्याऐवजीं स्टेजवरील गॅसच्या बत्त्यांचा सूं असा आवाज आणि चंद्रसेनाच्या तोंडचे उद्गारच माझ्या कानांत घुमत होते !

नाटक संपून आम्ही सर्वजण बाहेर पडलों. आबासाहेब व बाळासाहेब मोटारमध्यें बसून आपल्या घरीं गेले. मी, माणिक व मालतीबाई एका गाडींत बसून निघालों.

कृष्णपक्षाच्या उत्तरार्धांत उशिरां उगवणारा अर्धचंद्र क्षितिजावर आला होता. पहाटेचा गार वारा सुटूं लागला होता. शांत रस्त्यांतून जाणाऱ्या आमच्या गाडीच्या घोड्यांच्या टापांचा प्रतिध्वनि होत होता. त्या वेळच्या त्या सृष्टीच्या विलक्षण स्वरूपानें मी क्षणभर स्वतःच्या मनांतील विचार विसरलों होतों.

इतक्यांत माणिकनें विचारलें, " सारखं बघत राहण्याइतकं त्या चंद्रांत काय आहे ? आज इतका राग कसला आला आहे ? ताई, तूंच बघ हो कसा अबोला धरला आहे तो. "

मी कांहींच बोललों नाहीं. फक्त चंद्राकडे लागलेली दृष्टि वळवून माणिक-कडे एकदा पाहिलें.

" रागाचं कारण तरी काय ? " माणिकनें मला पुन्हा प्रश्न केला.

" आपल्याच मनाला विचार. "

" माझं मन नाहीं मला कांहीं सांगत !" मान वेळून माणिकनें उत्तर दिलें.

" मग जोगीण बन अन् मठांत जा ! " मी चटकन् बोलून गेलों. माणिकनें क्षणभर माझ्याकडे डोळे वटारून पाहिलें.

" इश्श ! हॅम्लेटचं काम चाललं आहे कीं काय ? " ती उद्गारली.

" हं ! तीच दशा झाली आहे माझी ! " असें म्हणून मी पुन्हा चंद्रा-कडे पाहूं लागलों, माझ्या उत्तरानें प्रसन्न होऊन चंद्र माझ्याकडे हास्यवदनानें पाहत होता !

२

दुसऱ्या दिवशीं मन अगदींच अस्वस्थ झालें होतें, व कांहीं केलें तरी चैन पडेना. माणिकला आज किंचित् ताप आला होता, म्हणून ती आपल्या खोलींतच पडून होती. सकाळीं तास अर्धातास तिच्याशीं मी बोलत बसलों होतों; परंतु, आधिक वेळ बोलत बसण्यइतकी तीहि आनंदांत नव्हती, व तसें करण्यांत मलाहि फारसा आनंद वाटला नसता. शेवटीं, हॅम्लेट नाटकाचें इंग्रजी पुस्तक मिळवून मूळ इंग्रजी व मराठी भाषांतर यांची तुलना करण्यांत दिवस घालवावा असा विचार माझ्या डोक्यांत आला. कारण, काल रात्रीं नाटक पाहतां पाहतां मला एक दोन ठिकाणीं असें वाटलें होतें, कीं आगरकरांनीं एकंदरींत फारच सुरस भाषांतर वठविलें असलें तरी भाषांतराच्या कांहीं जागा असाव्या तितक्या बहारीच्या नाहींत. म्हणून जेवतांना मीं माणिकला म्हटलें,

" हॅम्लेटचं इंग्रजी पुस्तक आहे कां तुझ्याजवळ ? "

" इश्श ! " हंसत माझ्याकडे पाहत माणिक म्हणाली, "कॉलेजांत जाणाऱ्या माणसाजवळ हॅम्लेट असायचं का माझ्यासारख्या मुलीजवळ ? "

" माझ्याजवळ हॅम्लेटची एक सुंदर प्रत होती – पण ती कोणींतरी लांबविली. कुठें बरं मिळेल आतां पुस्तक —"

इतक्यांत आठवण झाल्यासारखें करून माणिक बहिणीला म्हणाली, " खरंच ताई, डॉ० शामरावांच्याजवळ आहे हॅम्लेट. गतवर्षी तूंच त्यांना हॅम्लेटची एक सुंदर प्रत नजर केली होतीस – तुला नाहीं आठवत ?"

" हो. खरंच " मालतीबाईनीं उत्तर दिलें, व नंतर माझ्या सांगण्यावरून गड्याच्या हातीं डॉ० शामरावांकडे चिठी पाठवून त्यांनीं पुस्तक आणविलें.

जेवण झाल्यावर मी आपल्या खोलींत जाऊन अंथरुणावर स्वस्थ पडलों, सिगारेट पेटविली आणि मराठी व इंग्रजी हॅम्लेटचीं पुस्तकें हातांत घेऊन माझ्या आवडीचीं एकेक भाषणें दोहींतून आळीपाळीनें वाचूं लागलों. माझ्या मनांत होतें तें स्थळ मी बारकाईनें पाहूं लागलों, व आगरकरांच्या भाषांतरापेक्षां अधिक मार्मिक भाषांतर त्या त्या स्थळीं करतां येईल ही माझी मूळ कल्पना दृढ होत चालली. होतां होतां माझ्या अत्यंत आवडीचा असा हॅम्लेटच्या व त्याच्या आईच्या संभाषणाचा प्रवेश काढण्यासाठीं मीं पानें उलटलीं तों—

एक नोटपेपर खालीं गळून पडला !

कोणीं खूणबीण घालून ठेवली असेल असं वाटून मीं तो नोटपेपर वर उचलला तों त्याच्या सुलट्या बाजूवरचीं अक्षरं माझ्या दृष्टीस पडलीं—

" प्रिय—

तीं अक्षरें पाहतांच तें खासगी पत्र असलें पाहिजे असें वाटून आपण तें वाचणें बरोबर नाहीं असेंहि माझ्या मनांत आलें. पण नुसता " प्रिय—" असला विचित्र मायना कोणीं कोणाला लिहिला असावा अशी उत्सुकता माझ्या मनांत मोठ्या तीव्रतेनें उत्पन्न झाली व ती मला आवरतां येईना. शेवटीं खालची सही मीं पाहिलीच.

आपली

मालती. "

सही वाचल्यावर हें पत्र मालतीबाईनीं लिहिलें असावें असा माझ्या मनाचा साहजिकच तर्क झाला; व पुस्तक ज्या अर्थी डॉ. शामरावांस

मालतीबाईंनीं भेट म्हणून दिलें होतें त्या अर्थी तें पत्रहि शामरावांसच त्यांनीं केव्हां तरी लिहिलें असलें पाहिजे व शामरावांच्या हातून तें या पुस्तकांत राहिलें असलें पाहिजे—

मीं पत्रावरची तारीख पाहिली तों ती १२ ऑक्टोबर १९१३.

गतवर्षींचेंच पत्र होतें तर !

पत्रांतील मजकुराविषयीं माझ्या मनांत आतां अमर्याद जिज्ञासा उत्पन्न झाली. तें पत्र वाचणें बरें नव्हे असा विचार माझ्या मनांत आला नाहीं असें नव्हें. पण वरून दिसावयास अत्यंत क्षुल्लक अशीं जीं पापें असतात त्यांच्याविषयींचा मोह सुविचारानें आंवरणें फार कठीण असतें. चोरीसारख्या पापाची वासना मारणें सोपें आहे. पण दुसऱ्याचें खाजगी पत्र हातीं आलें असतांना – आणि विशेषतः त्यांतील मजकुर अत्यंत रहस्याचा आहे अशी शंका आली असतांना – तें न वाचतां घडी करून बाजूस ठेवणें मोठें दुर्घट आहे ! निदान, मला तरी तें त्या वेळीं दुर्घट वाटलें. आधींच मालतीबाई व डॉ. शामराव यांच्या परस्पर संबंधाविषयीं मी अनेक प्रकारचे लोकप्रवाद अनेक वेळां ऐकले होते, व दोन चार प्रसंगीं प्रवादांत सत्यांश असावा अशी शंका मलाहि आली होती. तेव्हां त्या प्रवादांची व माझ्या शंकेची कायमची शहानिशा करण्याजोगें हें पत्र अनपेक्षित रीतीनें माझ्या हातीं आल्यावर तें वाचल्याशिवाय मला राहवलें नाहीं यांत कांहीं नवल नाहीं. निदान मला तरी असें वाटतें. मग माझ्या पापभीरू वाचकांना काय वाटेल तें वाटो !

पराकाष्ठेच्या कुतूहलानें मी तें पत्र वाचूं लागलों ——

" १२ ऑक्टोबर १९१३

" प्रिय—

" लोणावळ्यास जाऊन दहा दिवसांचे जुने झालांत तरी मला एकहि पत्र नाहीं हें काय बरं ? पत्र न आल्यामुळें माझ्या कामाकडे माझं कसं तें मुळीं लक्ष नाहीं. दवाखान्यांत आपली नांवाला जातें, रोग्यांना कशीबशीं औषधं लिहून देतें, अन घरीं परत येतें झालं. पोस्टमन आला, कीं वाटतं आज तरी प्रेमाचे चार शब्द वाचायला मिळतील. पण रोज निराशेखेरीज दुसरा कांहीं मोबदला नाहीं. हें शोभतं ना ? लोणावळ्यास इतकं कांहीं चोवीस तास काम नाहीं

मला माहीत आहे. मग काम नसतांना माझी आठवण होत नाहीं का ? कां माझ्यावर रागबिग झाला आहे ? हो खरंच, रागाचं नांव काढतांच इथून जायच्या दिवशीं खरोखरच माझ्यावर राग धरला होतात त्याची मला आठवण होते, आणि त्या रागाचं कारण आठवलं कीं हंसूं आल्यावांचून राहत नाहीं ! इश्श, खरंच का तो राग अजून कायम आहे ? असं असेल तर तुमच्या वेडेपणाची कमालच म्हटली पाहिजे हो ! रागावायला कारण तरी जरा सबळ शोधून काढावं माणसानं ! आबासाहेब अन् मी प्रियकर अन् प्रियकरिणी-प्रमाणं एकमेकांशीं वागत असतांना तुम्हीं पाहिलंत -- इश्श ! मला लिहवतदेखील नाहींत हे शब्द ! काय हा वेडा संशय अन् काय हा वेडा राग तरी ! असल्या आरोपापुढें माणसानं बोलायचं तरी काय ? त्याच दिवशीं मी तुमची समजूत काढली, अन् आजहि पुन्हा लिहितें, कीं तुम्ही आम्हां दोघांना पाहिलंत त्या वेळीं आबासाहेबानं अचरटपणा करण्याचा प्रयत्न केला हें खरं आहे; पण त्याच्या प्रयत्नांचा धिक्कार केल्याशिवाय मी राहिलें नाहीं -- पण जाऊं देत गडे या भिकार गोष्टी ! माझ्या हृदयाचा तुम्हांला संशय तरी कसा येतो ? काय करूं म्हणजे माझ्या अढळ प्रेमाची तुमच्या मनाला साक्ष पटेल ? असली साक्ष पटवण्याची भाषा तुमच्या माझ्यांत सुरू व्हावी याचीदेखील मला किती लाज वाटते म्हणून सांगूं ? विसरा सारा राग आला असेल तितका, अन् मोठं मोठं पत्र लिहा. मी अगदीं चातकासारखी वाट पाहते आहे हो !

आपली

मालती. ”

ताजा कलम :—“ मला सुमारें शंभर रुपयांची फारच निकड आहे. ताबडतोब पाठवाल तर उपकार होतील. ”

पत्रांतील मजकूर, पत्राची भाषा आणि पत्रावरून उघड होणाऱ्या गोष्टी इतक्या कांहीं विलक्षण होत्या कीं, तें पत्र वाचून मला आश्चर्य वाटलें असें म्हणणें म्हणजे त्या वेळच्या माझ्या मनःस्थितीचें अगदीं अपुरें वर्णन करण्यासारखें आहे. आश्चर्यानें थक्क होऊन मी कांहीं वेळ वर खोलीच्या

कडीपाटाकडे शून्य मनानें बघत स्वस्थ पडलों होतों. मालतीबाईच्या शीला-विषयीं पूर्वी माझ्या कानांवर आलेल्या लोकप्रवादांवर फारसा विश्वास ठेवावयास माझें मन कधींच तयार नव्हतें; कारण मला वाटे लोक काय वाटेल त्या व्यक्तीविषयीं वाटेल तें बोलतील. पण या पत्रापुढें माझी मति गुंगच होऊन गेली. मालतीबाई व शामराव यांचे संबंध कोणत्या प्रकारचे होते तें त्या पत्रावरून कोणालाहि समजण्यासारखे होते. पत्राची चातका-सारखी वाट पाहणाऱ्या मालतीबाई वास्तविक 'ताज्या कलमां'तील शंभर रुपयांचीच चातकासारखी त्या वेळीं वाट पाहत असल्या पाहिजेत, अशीहि मालतीबाईच्या नाटकी प्रेमावर मीं आपल्या मनाशीं टीका त्या क्षणीं केली. शामराव म्हणजे कुरूपतेच्या अनेक प्रकारांची बेरीज, आणि मालतीबाई रूपवती नसल्या तरी देखण्या खास, असें असतांना लोक म्हणतात तसा प्रकार कसा संभवेल, अशी पूर्वी माझ्या मनाशीं मी शंका घेत असे; पण पत्रांतील तो शंभर रुपयांविषयींचा ताजा कलम वाचून त्या शंकेला उत्तर सांपडल्यासारखें मला वाटलें; आणि खऱ्या प्रकारावर हा एकंदर प्रकाश पडतांच मला त्या पत्राची किळस येऊन मीं तें बाजूला ठेवलें. त्या पत्रा-वरून आबासाहेबाचें स्वरूपाहि उघड होत होतें, व जसा आबासाहेब तसा बाळासाहेब हा सिद्धांतच होता! एकूण तें टीचभरच पत्र मीं वाचलें खरें, पण त्यानें किती व्यक्तींचें कांहीं निराळेंच स्वरूप माझ्या दृष्टीला दाखविलें!

आणि, अशा माणसांच्या संगतींत ही माणिक कशाला राहते?—

हा प्रश्न नंतर माझ्या मनांत घोळूं लागला. मालतीबाईशीं आचरटपणानें वागूं पाहणाऱ्या आबासाहेबाला किंवा त्याच्याच किंमतीच्या बाळासाहेबाला माणिकनें आपल्या जोड्यापाशीं देखील उभें राहूं देऊं नये! पण माणिक ऐकेल तर ना?

तिला दाखवावें कां हें पत्र?—आणि—

असे विचार करतां करतां माझा डोळा लागला असावा. मी तसाच किती वेळ निजलों होतों कोण जाणे. पण दचकून जागा होऊन पाहतों तों मालतीबाई खोलीच्या दारांत उभ्या राहून मला हांक मारीत होत्या,

"जगदीश, चार वाजले, चहाला चला."

मी उठून दिवाणखान्यांत गेलों. माणिक व मालतीबाई चहा घेत असतां

माणिकनें बहिणीला, तिच्या पोषाखाकडे पाहत विचारलें, " ताई, तूं कुठें बाहेर जाणार आहेस होय ? "

" हं. "

" कुठें ? "

" भगिनी-समाजांत आज डॉ. शामरावांचं व्याख्यान आहे. "

" अस्सं ? कोणत्या विषयावर ? "

" स्त्री–पुरुषांची नैतिक जबाबदारी—"

तें ऐकतांच आश्चर्याचा इतका जबर धक्का मला बसला, कीं माझ्या हातचा कप खालीं पडला, चहा सांडला आणि कपाचे तुकडे तुकडे झाले !

" काय झालं ?" माणिकनें व मालतीबाईनीं एकदम विस्मयानें विचारलें.

" कांहीं नाहीं. " मालतीबाईकडे पाहत मीं म्हटलें.

माझी नजर त्यांना कांहीं विचित्र वाटली कीं काय, कोण जाणे ! माझ्या दृष्टीला दृष्टि भिडतांच त्यांनीं आपलें तोंड दुसरीकडे वळविलें, व त्या आपल्याशींच पुटपुटल्या, " इश्श ! "

इतक्यांत बाहेर एक मोटार थांबली. बुटाचा कर्रकर्र आवाज करीत डॉ. शामराव जिना चढून दिवाणखान्यांत आले, आणि मालतीबाईकडे पाहून म्हणाले, " काय ? तयारी आहे ना ?

" हो. चलायचं. " असें म्हणून मालतीबाई लगबगीनें पुढें झाल्या.

मी त्या दोघांकडे पाहत वेड्यासारखा जागच्या जागीं उभा होतों ! तीं दोघें जिना उतरून गेल्यावर मीं एक सुस्कारा टाकला, व आपल्याशींच पुटपुटलों, " हं ! मजा आहे या जगाचीं ! "

३

त्या गोष्टीला तीन वार लोटले; पण त्यापैकीं एकाहि दिवशीं मीं व माणिक पूर्वीच्या प्रेमभरानें एकमेकांशीं बोललों चाललों नव्हतों. पूर्वीं जितक्या श्रीमंतीनें मीं माणिकच्या आवडी नावडी पुरवीत असें तितकी श्रीमंती आतां मजजवळ न उरल्यामुळेच माझ्यापेक्षां पोकळ श्रीमंत आबासाहेबाची संगति माणिकला प्रियकर वाटूं लागली होती, याविषयीं मला आतां मुळींच शंका उरली नव्हती. अनेक लहानमोठ्या गोष्टींनीं तो माझा समज दृढ केला होता.

मात्र चार घटका मौज करण्याला श्रीमंत आबासाहेबाची संगति माणिकनें धरली तरी तिचें खरें प्रेम माझ्यावरच असल्याबद्दल माझी खात्री होती. म्हणूनच त्या घरांत दिवस काढण्याला मी तयार झालों. नाहीं तर–मालतीबाईशीं एकहि शब्द न बोलण्याइतका त्यांच्याविषयींचा तिटकारा मनांत भिनला असतांना, मी मालतीबाईच्या घरांत एखाद्या आश्रितासारखा असल्याची लोकांत कुजबूज चाललेली असतांना व त्याच अर्थाचीं वाक्यें आबासाहेब व बाळासाहेब यांच्या तोंडून एक दोन प्रसंगीं बाहेर पडलीं तरी तीं मला निमूटपणें सहन करणें भाग पडलें असतांना, आणि आबा-साहेबाची संगति केवळ सहन करणेंच नव्हे तर ती मुद्दाम संपादन करण्या-इतकी माणिक मूर्ख बनलेली माझ्या डोळ्यांस दिसत असतांना—

मीं ते तीन वार कसे काढले माझे मला माहीत !

पण, ज्या अर्थी माणिकच्या अंतःकरणांतील प्रेमाचा संशय न घेतां मी तिच्या घरांत दिवस काढीत होतों, त्या अर्थी आजचा प्रसंग अगदींच अन-पेक्षित रीतीनें घडून आला, आणि माझी कल्पनाहि नव्हती–आणि दुसऱ्या कोणाचीहि नसेल–अशा थराला त्यामुळें गोष्टी गेल्या, असेंच म्हटलें पाहिजे.

आज मनस्वी उकडत होतें. मालतीबाई आपलें दवाखान्यांतील काम आटोपून कोणीकडेशा गेल्या होत्या. संध्याकाळीं घरांत बसून मला चैन पडेना म्हणून बाहेर फिरावयास जाण्याविषयीं मी माणिकला विचारलें. तिची प्रकृति अजून थोडी नादुरुस्त असल्यामुळें आपण गाडी करून बागेंत जाऊं असेंच मीं तिला म्हटलें. पण तिची घरांत बसण्याचीच लहर दिसली. पूर्वींचा परस्परांतील लडिवाळपणा आतांशा मावळल्यासारखा झाल्यामुळें मीं तिला दोन तीनदा विचारण्यापलीकडे अधिक आग्रह केला नाहीं. ती रस्त्यावरील खिडकीजवळच्या आरामखुर्चीवर कोणतेंसें पुस्तक वाचीत पडली आणि मी एकटाच फिरावयास गेलों.

त्या फिरण्यानें माझ्या मनाची त्रासिक स्थिति कमी होण्याऐवजीं वाढली मात्र. माझें आणि उकडणाऱ्या हवेचें अगदीं हाडवैर ! त्यामुळें आजच्या हवेनें मी बेजार झालों. बागेंत गेलों तों तेथेंहि सारें उजाड – ओसाड – रूक्ष असेंच दृष्टीला भासलें. लष्करी बाजा वाजत होता, त्याचे नानाप्रकारचे विवादी भेसूर सूर कानीं पडून मस्तकाची भणभण अधिकच वाढली; आणि

बागेंत परत येतांना रस्त्यांतील धूळ, गाडीवाल्यांचा ओरडा आणि पिसाळल्याप्रमाणें वाटेल त्या दिशेला धांवणाऱ्या लहानथोर माणसांची रहदारी, या गोष्टींनीं कसें अगदीं गांजल्यासारखें झालें. डोक्यावरची टोपी डाव्या हातांत घेऊन हातांतील रुमालानें घाम पुशीत, हुश् हुश् करीत मी कसाबसा घरापर्यंत पोंचलों. घराची पायरी चढतांना वर मान करून पाहिलें तो दिवाणखान्यांत अंधारच दिसला. अजून मालतीबाई आल्या नसतील, व माणिक आपल्याच खोलींत पडून राहिली असेल, अशा रीतीनें दिवाणखान्यांतील अंधाराची स्वतःच्या मनाशीं मीमांसा करीत मी घरांत शिरलों.

अगदीं गळून गेलेल्या पायांनीं मी कशाबशा जिन्याच्या पायऱ्या चढलों त्या वेळीं माझ्या मनांत असा विचार आला, कीं चोरटेपणानें जिना चढणाऱ्या एखाद्या भामट्याच्या पावलांचादेखील अधिक आवाज झाला असता इतक्या निर्जीव स्थितीनें मी मार्ग आक्रमीत होतों. दिवाणखान्याच्या दाराजवळच्या पायरीवर मीं उजवा पाय टेंकला असेल नसेल तोंच मला ऐकूं आलें—

"मग जगदीशला तसं सांगून कां नाहीं तूं टाकीत?"

माझें नांव उच्चारलेलें ऐकतांच मी चमकलों व जागच्या जागींच उभा राहिलों. माझ्या कानीं आलेले शब्द अगदीं हलके, कुजबुजण्याच्या स्वरांत उच्चारिले होते. तथापि तो आवाज आबासाहेबाचा होता हें मीं तत्क्षणीं ओळखलें. मी कानोसा घेउन ऐकूं लागलों.

"अं! सांगायला माझा धीरच होत नाहीं."

ते शब्द माणिकचे होते, त्याविषयीं शंकाच नव्हती! तिचें बोलणें ऐकून मी जरा घोंटाळ्यांत पडलों. मला काय सांगून टाकावयाचें? आणि अशी कोणती गोष्ट सांगावयाची, कीं ती मला सांगण्याचा माणिकला धीरच होऊं नये? अथवा—

एक विलक्षण शंका माझ्या मनांत उभी राहून मीं स्वतःशींच म्हटलें, "असं असेल काय?"

इतक्यांत आबासाहेब कुजबुजतांना मीं ऐकलें, "माणिक, किती वेडी अन् भित्री आहेस तूं! जगदीशला तूं कां भ्यावंस? तो तुला नकोसा वाटत—"

" असं बोलूं नका. त्यांच्याविषयीं मला काय वाटतं तें आतांशीं माझं मलाच कळेनासं झालं..."

माणिकचे पुढचे शब्द मला ऐकूं आले नाहींत; पण जे माझ्या कानीं आले होते तेवढेच मला जागच्या जागीं स्तंभित करण्यास पुरेसे होते. सारा जीव कानांत एकवटून आणि श्वासोच्छ्वासाचा अवरोध करून मी तसाच ऐकत उभा राहिलों—

" हंः ! माणिक, तूं अगदीं वेडी आहेस ! हा लपंडाव तुला किती दिवस चालूं ठेवतां येईल ? भिकारी जगदीशवर प्रेम असल्याची स्वतःची खोटी समजूत तूं किती दिवस कायम ठेवणार ?—तें कांहीं नाहीं—माणिक, मला सांग तुझं माझ्यावर प्रेम——"

पुढचे शब्द माझ्या कानीं आले नाहींत. आबासाहेबाचे कपडे व माणिकचें लुगडें यांचा सळसळल्यासारखा आवाज झाला !

" हंः ! आबास..... हें काय हें ? —"असे माणिकचे गुदमरलेले शब्द मीं ऐकले !

चुंबनाचा च्यु असा आवाजहि झाला ! माणिकच्या बांगड्या वाजल्या ! कोचावर कांहींतरी धडपड झाल्यासारखें मला वाटलें.

" बरं, माणिक, मी जातों. " आबासाहेब म्हणाला.

तें ऐकतांच मी निमिषार्धांत जिना उतरलों, आणि घरच्या रस्त्या-पासच्या पायऱ्यांवर जाऊन उभा राहिलों.

दुसऱ्याच क्षणीं आबासाहेब जिना उतरून खालीं आला. माझ्याजवळ तो येतांच मीं झटकन् पुढें होऊन त्याचें मनगट धरलें व दांत ओंठ खात म्हटलें, " आबासाहेब ! "

आबासाहेब विजेचा धक्का बसल्याप्रमाणें दचकला. माझी दृष्टि त्याला भयंकर वाटली असावी. माझा आवाज तर माझा मलाच भेसूर वाटला.

" को—ण ! ... जगदीश ! " आबासाहेब पुटपुटला.

" होय, तोच मी ! चाललास कुठें ? वर चल जरा ! इतकं भ्यायला काय झालं ? माणिकला मित्री म्हणणारा शूर पुरुष तूंच ना ? ....चल. "

असें म्हणून मी जवळजवळ धावतच जिना चढलों, आणि उजव्या हातानें आबासाहेबाला एखाद्या निर्जीव वस्तूप्रमाणें ओढीत नेलें.

मधल्या वाटोळ्या टेबलावरील दिवा लावण्यासाठीं माणिक खालीं वांकली होती. माझ्या व आबासाहेबाच्या पावलांचा आवाज ऐकतांच तिनें अंमळ दचकून वर पाहिलें. हातांतील जळती काडी टाकून देण्याचें भान न राहून आमच्याकडे आश्चर्यानें पाहत ती उद्गारली, " हें—हें काय ? "

आबासाहेबाला मागोमाग ओढीत मी तिच्याजवळ गेलों, आणि त्याला पुढें लोटीत म्हटलें, " माणिक, तुला एकटीला धीर होत नाहीं म्हणून तुला धीर देणारा हा शेंदाड शिपाई इथें आणला आहे ! सांगून टाक आतां मला काय सांगायचं असेल तें ! "

माझी दृष्टि पाहून आणि आवाज ऐकून माणिक पार गांगरून गेली. तिला घेरी आली असावी. आधारासाठीं तिनें टेबलावर उजवा हात टेकला. तरीहि तिच्यानें उभें राहवेना. ती मटकन् शेजारच्या कोचावर गळलेल्या फुलासारखी पडली.

त्या दिवशीं रात्रीं मुंबईला जाणाऱ्या शेवटच्या गाडींत एका सेकंड क्लासच्या डब्यांतील बर्थवर मी पडलों होतों. मी नांवाला डोळे मिटले होते, पण झोंप कोठून येणार ? आगगाडीच्या इंजिनापेक्षांहि अधिक जोरानें मेंदू विचारांनीं थडथडत होता.

ऐन मध्यरात्र असावी. मी अंथरुणावरून उठून बसून राहिलों, खिडकी उघडली, आणि बाहेर डोकावून पाहिलें.

गाडी रिव्हर्सिंगवर उभी होती. आकाश अनपेक्षित ढगांनीं भरलेलें होतें. एखादी चांदणी मध्येंच लुकलुकलेली दिसत होती. एका बाजूला सह्याद्रीचा डोंगर एखाद्या अजस्र कृष्णछायेप्रमाणें दिसत होता. दुसऱ्या बाजूला पश्चिमेकडील खोऱ्याचा विस्तार एखाद्या झोंपी जाऊन घोरत पडलेल्या राक्षसासारखा भासत होता !

सृष्टीचें तें भेसूर स्वरूप माझ्या डोळ्यांना प्रिय वाटलें नाहीं. थोड्याच वेळानें मीं खिडकी बंद केली आणि अंथरुणावर पुन: पडलों.

गाडी घाटांतून जाऊं लागली होती. तिचा आवाज होत होता, " धडाड्, धडाड्, धडाड् ! "

डोंगर त्या आवाजाचा प्रतिध्वनि उमटवीत होते, " धडाड् ! धडाड् ! धडाड् ! "

क्षणभर मला वाटलें या अफाट जगांत दुसरी कोणतीहि वस्तु नसून मोकाट सोडलेल्या गाडींत माझें टीचभर शरीर कोणींतरी ठेवून दिलें आहे ! अनंत अवकाशांत गाडी पुढें चालली होती !

" धाड् ! धडाड् ! धडाडड् ! "

माझ्या मनांत आलें, या अफाट विश्वांत माझी कोठें गणना होणार ! आणि या विश्वाच्या घडामोडींत माणिकच्या वर्तनानें माझ्या हृदयांत भडकविलेल्या दुःखाच्या ज्वाळा कितीशा महत्त्वाच्या ठरणार !

माझ्यासारखा एक क्षुद्र जीव अफाट आवकाशांतून धावणाऱ्या या गाडींत या क्षणीं पडला आहे ! कदाचित् दुसऱ्याच क्षणीं मी मृत्युवश होऊन——

हॅम्लेटचें भाषण बोलणाऱ्या गणपतरावाची मला आठवण झाली. त्या दिवशीं रंगभूमीवर उभा राहून बोलतांना तो मला जसा दिसला तशीच मूर्ति या वेळीं माझ्या दृष्टीसमोर उभी राहिली. तो बोलत होता——

" निजणं–अन्–मरणं ! निजणं–अन्–मरणं ! "

प्रकरण नववें

मर्मभेद करणारा जपानी पोषाख

१

मुंबईस यापूर्वी मी कितीदा तरी आलों असेन; परंतु, परिस्थितीच्या प्रवाहांत सांपडून घराला मुकलेला, आणि माणिकच्या प्रेमाच्या स्वप्नांतून जागा झालेला जगदीश या नात्यानें या वेळीं मी मुंबईस आलों होतों! पहिले आठ दहा दिवस डोकें ठिकाणावर नसल्यासारखाच मी वागत होतों! एम्पायर हॉटेल-मध्यें एक खोली मीं घेतली होती खरी; पण मी आपल्या खोलींत एखादे वेळीं चोवीसांपैकीं सात आठ तासहि नसे, तर एखादे वेळीं रात्रंदिवस खोलींतील अंथरुणावर पडून राहिलेला असे. केव्हां तरी जेवावयाचें, कोठें तरी हिंडावयाचें, कोठें तरी बसावयाचें, असा भ्रमिष्टासारखा मी वागत होतों. एकदोनदा तर मी खरोखरीच वेडा असल्याचा संशय हॉटेलच्या मॅनेजरला आला, त्यानें मला काढण्याचा बेत केला. पण त्याचा तो गैरसमज लवकरच दूर झाला, व हॉटेल सोडण्याचा माझ्यावर येऊं पाहणारा प्रसंग टळला.

पूर्ण भ्रमिष्टपणाच्या या दहा बारा दिवसांनंतर माझा मेंदू थोडाथोडा विचार करूं लागला. माणिकविषयीचे सर्व विचार पार विसरण्याची मी आधीं आपल्या मेंदूला संवय लावूं लागलों. उत्तर रात्रीं पडलेलें स्वप्न दुसऱ्या दिवशीं पुनःपुनः खरेपणाचा आभास उत्पन्न करीत असतांहि ज्याप्रमाणें त्या स्वप्नाला आपण मनावेगळें करतों, त्याप्रमाणें माणिकविषयींच्या सर्व आठवणींवर विस्मरणाचें प्रचंड दडपण घालण्याचा मीं निश्चय केला. झाल्या गोष्टी झाल्या, आपण एकदा फसलों, आतां त्याविषयींचा विचारहि नको, आणि सुखदुःखहि नको असें मीं आपल्या मनाला शिकविलें. तसेंच वृंदावनास घरीं जाण्याचा विचारहि माझ्या मनांत उभा राहणें शक्य नव्हतें.

कारण, आतां माणिकच्या विवाहाचा प्रश्न जरी नाहींसा झाला होता, तरी माणिकवर प्रेम करण्यांत आपण मूर्ख ठरलों अशी कबुली देऊन घरीं जावयास माझ्या मानी अंतःकरणाची तयारी होणार कशी ? सारांश, मुंबईत स्वतंत्रपणें राहणेंच मला भाग आहे ही गोष्ट मी समजून चुकलों; व माझा मेंदू जेव्हां कांहीं विचार करण्याइतका समर्थ झाला, तेव्हां मुंबईत स्वतंत्र राहण्यासाठीं कोणत्या साधनाची योजना करतां येईल, व घर सोडून माणिककडे राहावयास जाण्याच्या वेळीं काढलेल्या कर्जाची फेड कोणत्या मार्गानें करतां येईल, हेच विचार मी मुख्यतः करूं लागलों.

कोटाच्या आंतील खिशांत नोटांनीं भरलेलें पाकीट बाळगून दोन दिवस मौज करावयास आलेल्या मुशाफराला मुंबई जितकी रमणीय वाटते, तितकीच पोटाचा धंदा शोधीत रस्तोरस्तीं हिंडणाऱ्या पाहुण्याला ती कठोर आणि भेसूर वाटते. पूर्वीं अनेक वेळां मौज करणाऱ्या मुशाफराच्या नात्यानें येऊन मुंबईच्या वैभवाचा मीं उपभोग घेतला होता. पण आतां माझी स्थिति पालटली होती. ती पूर्वींचीच मुंबई आज मला अफाट, अथांग आणि भयाण समुद्रासारखी वाटत होती !

राधाकान्ताची परीक्षा संपून तो बहुतकरून अलाहाबादला गेला असेल, किंवा कदाचित् तो अजून मुंबईतहि असेल, असें एकदोन वेळां माझ्या मनांत आलें. दुःखानें आणि निराशेनें हलकें झालेलें मन साहजिकपणेंच त्याच्या निर्हेतुक प्रेमळ सहानुभूतीची आठवण काढूं लागलें. परंतु एक तर राधाकान्त मुंबईत असण्याचा संभव बराच कमी होता; आणि शिवाय तो मुंबईत आहे असें मी गृहित धरून चाललों तरी त्याच्या ठावठिकाणाविषयीं मला कांहींच कल्पना नसतांना मी त्याला शोधणार कोठें आणि कसा ? मुंबईत त्याचा शोध करावयाचा म्हणजे समुद्रांत पडलेल्या एका गवताच्या काडीचा शोध लावण्यासारखेंच होतें !

विचार करूं लागतांच येवढें मात्र माझ्या मनाला पक्कें वाटलें, कीं कोठें तरी नोकरी धरल्याखेरीज गत्यंतर नाहीं. नोकरी करण्याची गोष्ट मनांत येतांच मनाला कसेंसेंच वाटलें. ज्या गोष्टीची संवय नाहीं—इतकेंच नव्हे, तर ज्या गोष्टीची कल्पना कधीं स्वप्नांतदेखील केलेली नाहीं ती आतां करावयाची होती——पण परिस्थितीपुढें इलाज नव्हता !

म्हणून दहा पंधरा दिवसांनंतर एके दिवशीं दुपारचें जेवण झाल्यानंतर मनाचा मोठा हिय्या करून नोकरी शोधण्यासाठीं मी हॉटेलच्या बाहेर पडलों आणि ट्रॅममध्यें बसलों.

ट्रॅमचा कंडक्टर एकेका माणसाला तिकीट देत होता. कोणी कोठलें, कोणी कोठलें, अशी सर्व मंडळी तिकिटें मागत होतीं. प्रत्येकाचें जावयाचें ठिकाण ठरलेलें होतें. कंडक्टर माझ्याजवळ येऊन उभा राहिला, व 'कोठलें तिकीट पाहिजे' असें नुसतें खुणेनें विचारून त्यानें आपली डाव्या बाजूला लटकलेली तिकिटांची जस्ती पेटी पुढें सरसावली.

मी गोंधळून जाऊन एखाद्या वेड्या-मुक्यासारखें त्याच्याकडे क्षणभर पाहिलें. मला कोठें जावयाचें होतें ? अमुक ठिकाणीं जावयाचें असें मी कसें ठरविणार ? एखाद्या बाजारांतील जिनसेप्रमाणें ज्या ठिकाणीं नोकरी उचलून घेतां येते असें ठिकाण कोठें होतें ? ट्रॅममधील इतर लोक किती सुखी व दैववान् ! त्यांचें ध्येय ठरलेलें होतें !—एखाद्या दरवेशाप्रमाणें भटकत—

"साहेब, किदर जाना ?" मी कांहींच बोलत नाहीं असें पाहून, आपल्या जस्ती पेटीवर उजव्या हातांतील लोखंडी चिमट्याचा आवाज करीत कंडक्टरनें विचारलें.

मी दचकलों, आपल्या विचारांतून जागा झालों, आणि शून्यवृत्तीनें 'वेस्ट' असें कंडक्टरला सांगून त्यानें झटकन् दिलेलें तिकीट हातांत घेतलें व त्याच्या हातावर एक आणा ठेवला.

मी कोठें जाणार ?

ट्रॅमच्या तिकिटाकडे पाहत मी आपल्या मनाला पुनःपुन्हा प्रश्न करीत होतों, "मी कोठें जाणार ?"

मनाला कांहींच उत्तर सांपडेना.

शेवटीं 'व्हाइट वे-लेड लॉ'च्या दुकानाची भव्य इमारत उजव्या हाताला दिसली, व अशाच एखाद्या दुकानांत शिरून 'नोकरी आहे कां' म्हणून विचारावें अशी मनांत कल्पना आली. विजेची चावी दाबावी आणि प्रकाश पडावा त्याप्रमाणें ती कल्पना मनांत यावयाला आणि ट्रॅम उभी राहावयाला एकच गांठ पडली, आणि ताबडतोब मागचापुढचा कांहीं एक विचार न करतां मी ट्रॅममधून खालीं उतरलों.

रस्त्यावर उभें राहून मी सभोंवार पाहिलें. जिकडे तिकडे गडबड, घाई, धांदल उसळली होती! कोणालाहि क्षणाचीहि फुरसत नव्हती. हजारों रुपयांच्या मोटारींत भरधाव जाणाऱ्या लक्षाधीश व्यापाऱ्यापासून तों डोक्यावरील ओझ्याखालीं वांकून जाऊन आपले काटकुळे पाय झपाझप दामटणाऱ्या मजुरांपर्यंत – प्रत्येकाची लगबग चालली होती. क्षणभर मला वाटलें, मी जर चितारी असतों तर जीवनकलहाचें हें चित्र मीं चित्रफलकावर हुबेहूब वठविलें असतें! खरोखर, जीवनकलहाची चांगली कल्पना कोणाला करून द्यावयाची असेल तर त्यानें भरदुपारीं मुंबईंचे असले देखावे पाहावें. उतूं जाईपर्यंत भरून जाणाऱ्या ट्रामगाड्या, शर्यतींत सुटल्याप्रमाणें एका पाठोपाठ धांवणाऱ्या मोटारी, गर्दींत आपलेहि तट्टू पुढें दामटणारे गाडीवाले, झपाझप चालणारे व पळणारेहि लोक! कोणाला कोणाकडे वळून पाहण्यासदेखील क्षणाचा विसांवा नाहीं! पोटानें डंवचल्यामुळें पैशापाठीमागें धावणारा माणूस! काय त्याची ही दशा!

पण, मी आतां कोठें धावूं?

माझ्यासमोरच एक जपानी दुकान दिसलें. त्यांत शिरावयाचें मीं ठरविलें. हातांतील सिगारेट फेंकून दिली, कोट जरा साफ केल्यासारखें केलें आणि डोक्यावरची साहेबी टोपी हातांत काढून घेत मी दुकानांत पाऊल टाकलें.

जपानी कापड, रेशीम, लहान-मोठीं चित्रें, चिकाचे पडदे आणि नानाप्रकारच्या चित्रविचित्र वस्तु यांचें तें जंगी दुकान होतें. दुकानांत माल खच्चून भरला होता, व गिऱ्हाइकांना माल दाखविण्यांत दुकानांतील तरुण जपानी नोकर गढून गेले होते. मी आंत शिरतांच एक जपानी इसम पुढें झाला, व मला मोडक्या इंग्रजींत विचारूं लागला "काय पाहिजे?"

इंग्रजी शब्द विचित्र तऱ्हेनें उच्चारलेले ऐकून मला जरा हंसूं आलें, पण तें बाहेर न दाखवितां मीं त्याला म्हटलें "मला कांहीं खरेदी करावयाचें नाहीं. कृपा करून माझी व मॅनेजरची भेट करून द्याल तर—"

"मॅनेजरची–भेट?" जरा आश्चर्यानें त्यानें आपले बारीक डोळे माझ्याकडे लावून विचारिलें.

"होय, आपले फार उपकार होतील."

त्यानें क्षणभर माझ्याकडे विस्मयानें पाहिलें. आमच्या मॅनेजरची गांठ घेऊं इच्छिणारा हा हिंदी गृहस्थ कोण आहे असा विचार त्याच्या मनांत आल्याची साक्ष त्याची दृष्टि पुरतेपणीं देत होती.

" आपण व्यापारी आहांत ? "

" नाहीं. माझं मॅनेजरशीं काम आहे. "

" बरं जरा उभे राहा. "

असें म्हणून तो गेला व मी तेथेंच उभा राहिलों. थोड्या वेळानें तो परत आला व मागोमाग येण्याविषयीं त्यानें मला खूण केली. मॅनेजरच्या खोलीशीं पोंचतांच तो थांबला. दार ढकलून मी आंत गेलों.

मॅनेजरनें आपल्या कामांतून मान वर करून मजकडे पाहिलें; मीं इंग्रजी पद्धतीचा नमस्कार करतांच त्यानेंहि तो उलट केला व खुर्चीकडे हात करून मला बसण्यास सांगितलें. मी बसल्यावर त्यानें मला इंग्रजींत विचारिलें, " काय काम आहे ? "

त्याचें इंग्रजी व्याकरणदृष्ट्या शुद्ध होतें. परंतु तोंडांतल्या तोंडांत शब्द उच्चारणाऱ्या बोबड्या जपानी तऱ्हेची लकब त्याच्या बोलण्यांत पूर्णपणें दिसून येत होती. जपानी ठेवणीप्रमाणें त्याचे डोळे किलकिले, नाक नकटेंसें, भुंवया तुरळक, हनुवटी रुंद, डोळ्याखालचीं हाडें उंच आणि जिव्हणी रुंद होती; त्याची ती चेहेरेपट्टी भव्य आणि दुसऱ्यावर सहज छाप पाडण्यासारखी होती; आणि त्याच्या दृष्टींत कांहीं विलक्षण तीक्ष्णता सांठलेली दिसत होती.

" मी एक युनिव्हर्सिटीचें शिक्षण संपादन केलेला तरुण आहें. आपल्या दुकानांत नोकरी धरण्याची माझी इच्छा आहे. माझा आपणांस कांहीं उपयोग होण्यासारखा असेल तर मला आनंद होईल. " मॅनेजरकडे स्थिर नजरेनें पाहत मी शांतपणें म्हणालों.

माझ्या शांत वृत्तीचा आणि विशेषतः माझ्या सफाईदार इंग्रजी भाषेचा व उच्चाराचा मॅनेजरच्या मनावर चांगला परिणाम झाला असावा असें त्याच्या मुद्रेवरून दिसलें.

" अस्सें ! " असें म्हणून तो क्षणभर पाहत राहिला.

नंतर त्यानें माझें नांव, गांव, शिक्षण, खेळ व इतर अनेक गोष्टींविषयीं चौकशी केली, व मीहि त्याला यथोचित उत्तरें दिलीं. मग टेबलावरील दोन्ही

कोपरे टेंकून, दोन्ही हातांचीं बोटें वांकवून त्यांच्यावर आपली हनुवटी ठेवून, किंचित् पुढें वांकून तो मला म्हणाला,

" मिस्टर पट्‌–फढवेर–पट्‌–" माझें नांव उच्चारण्याचा त्यानें चालविलेला प्रयत्न पाहून मला मनांतल्या मनांत हंसूं आलें.

शेवटीं नामोच्चाराची खटपट सोडून देऊन तो म्हणाला,

" तरुण माणसा, तूं मोठ्या योगायोगानें येथें आलास. आज आमच्या फर्मला तुझ्यासारख्या तरुण माणसाची गरज आहे. मी तुला घेतों. तुला दुकानाचा सारा इंग्रजी पत्रव्यवहार बघावा लागेल, आणि एखादे वेळीं गिऱ्हाइकांस माल दाखविण्याचेंहि काम तुला करावें लागेल. दुपारीं बारापासून रात्रीं सातपर्यंत तूं हजर राहिलें पाहिजेस. हें सारें तुला कबूल आहे ? "

" होय. यांपैकीं कशालाच माझी हरकत नाहीं. "

" ठीक आतां–तुझा–पगार–" टेबलावरील एक पेन्सिल उचलून ती आपल्या डाव्या हाताच्या अंगठ्याच्या नखावर आपटीत तो जवळजवळ आपल्याशींच पुटपुटला.

पण लगेच मनांत विचार येऊन त्यानें मला विचारलें,

" तुझें लग्न झालें आहे काय ? "

अरेरे ! हा प्रश्न माझ्या अंतःकरणाला फारच अप्रिय होता ! त्यानें माझें हृदय क्षणमात्र विव्हल केलें ! हा प्रश्न यानें विचारला नसता तर याचें चाललें नसतें काय !–माणिक ! काय तूं माझी ही दशा केलीस ?

घशाशीं आलेला आवंढा गिळीत मीं उत्तर दिलें,

" नाहीं. मी अविवाहित आहे. "

" ठीक. मग मी तुला सध्यां पाऊणशें रुपये पगार देतों. हा पगार तुला कमी वाटणार नाहीं अशी आशा आहे. अं !—"

" कबूल आहे. "

नंतर त्यानें मला दुकानाच्या पुढच्या भागांत नेलें, व माझें काम मला समजावून सांगण्यास प्रारंभ केला.

पण, माझें लक्ष त्याच्या बोलण्याकडे होतें कोठें ? एखाद्या कळसूत्री बाहुलीप्रमाणें त्याच्या बोलण्याकडे मी मान डोलावून हुंकार देत होतों. मॅनेजरच्या मघांच्या प्रश्नानें माझ्या मनांतील माणिकविषयींच्या विचारांना

जागें केलें होतें. तेच विचार अजून मनांत गोंधळ घालीत होते. माणिकचें प्रेम इतकें उथळ असेल अशी मला प्रथमच कल्पना कशी नाहीं आली ? केवळ पोकळ श्रीमंतीच्या भपक्याला भुलून आबासाहेबांच्या नादी लागण्या-इतकी माणिक वेडी कशी झाली ? मी एकदम इकडे निघून आल्यानंतर तिच्या मनांत पश्चात्ताप उत्पन्न झाला असेल काय ? तिला वाईट वाटलें असेल काय ? ती या क्षणीं काय करीत असेल ! कोणाशीं बोलत असेल ? मला एके काळीं अत्यंत परमप्रिय असलेले तिचे ते डोळे आणि—

मॅनेजरनें माझ्या खांद्याला डंवचून विचारलें,

" काय ?–कोठल्या विचारांत आहेस ?–समजलं ना सारं तुला ? "

त्याच्या बोलण्यांतील एक शब्ददेखील मीं नीटसा ऐकला नव्हता, मग सारें समजण्याची गोष्ट दूरच राहिली ! जणूं काय दृष्टीपुढील माणिकची मूर्ति दूर करण्यासाठीं मी उजव्या हातानें डोळे पुसल्यासारखें केलें, आणि मॅनेजरला म्हटलें, " हं. समजलं सारं. "

मॅनेजर तेथून जातांच पक्षी आपल्या अंगावरील पाणी झाडतांना अंग हलवितात त्याप्रमाणें मी जोरानें मस्तक हलविलें; आणि माणिकविषयींचे विचार दूर फेकून देण्याचा प्रयत्न केला. मनाला मीं म्हटलें—

माणिकला विसरलं पाहिजे !–संपलं–तें प्रकरण संपलं ! आयुष्याचं हें नवं प्रकरण सुरू होत आहे, अन् प्रकरणाच्या प्रारंभीं नायक एका जपानी दुकानांत नोकराच्या नात्यानं उभा आहे !

मीं एक सुस्कारा सोडला, हातांतील टोपी एका टेबलावर ठेवली आणि कामाला लागलों.

२

दुकानांत नोकरीला प्रारंभ केल्यापासून कांहीं नव्याच जगांत पाऊल टाकल्यासारखें मला वाटूं लागलें. पूर्वींचें तें विद्यार्थिदशेचें बेजबाबदार आयुष्य, त्यांतील नानाविध मौजा, खेळणें, बागडणें, सारें कांहीं पूर्वजन्मींच्या गोष्टींप्रमाणें एकदम विस्मृतीच्या अफाट अंधारांत दडून जाऊं लागलें; आणि नव्या नव्या गोष्टींच्या, विचारांच्या आणि अनुभवाच्या उभ्या आडव्या धाग्यांनीं जणू काय दुसऱ्याच जन्माच्या वस्त्राची वीण पडूं लागली. सकाळीं लगबगीनें

जेवून दुकानांत हजर होण्याची धडपड, दुकानांतील पत्रव्यवहार, दुकानांतील अनेकविध वस्तूंची माहिती, वारंवार येणाऱ्या गिऱ्हाइकाचे हास्ययुक्त चेहेरे, जपानी तरुणांच्या नव्या ओळखी, संध्याकाळीं दुकानांतून हॉटेलांत गेल्यावरचें जेवण, कधीं कधीं जपानी तरुणांबरोबर घालविलेल्या चैनीच्या रात्रीं, यांनीं माझें नवें आयुष्य तुडुंब भरून गेलें आणि वृंदावनच्या जहागिरदारांचा एकुलता एक जगदीश आणि त्याची ती माणिकविषयक प्रेमकथा अवनीतला-वरून साफ नाहींशी झाली कीं काय, असा माझा मलाच अनेक वेळां भ्रम उत्पन्न होऊं लागला.

पुष्कळदा रात्रीं अंथरुणावर विचार करतां करतां मी एकदम उठून बसे, आणि स्वतःचें अंग दोन्ही हातांनीं चाचपल्यासारखें करून मनाला प्रश्न करी,

" तो पूर्वींचा अन् हा आतांचा जगदीश एकच आहे काय ? "

नव्या आयुष्याच्या धांदलींत मी आकंठ बुडून गेलों होतों खरा !

रोज दुपारीं दीड वाजतां आमच्या दुकानांतील लोकांना मधली सुटी मिळत असे. दुकानांतील जपानी तरुणांशीं मी हंसून खेळून वागत असल्या-मुळें सर्वांशींच माझा साधारण स्नेह जमला होता; पण त्यांतल्या त्यांत नोगी नांवाच्या तरुणाशीं माझें विशेष रहस्य जमलें होतें. माझें ' पटवर्धन ' येवढें अवघड नांव दुकानांत कोणालाच उच्चारतां येत नसे व त्यामुळें ' पटवर्धन 'चें ' पॅट ' हें इंग्रजी पद्धतीवर आंखूड स्वरूप होऊन व ' पॅट 'चा ' पॅत ' असा जपानी अपभ्रंश होऊम, सर्वजण मला ' मिस्तर पॅत ' म्हणून हांक मारीत. मधल्या सुटींत आमच्या दुकानाशेजारच्या एका युरोपिअन हॉटेलांत चहा पिण्यास जावयाचा मीं क्रम ठेवला होता, आणि युरोपियन तऱ्हेचा चहा जपानी लोकांना फारसा आवडत नाहीं तरीदेखील नोगीला रोज आग्रह करून आपल्याबरोबर नेऊन नेऊन मीं त्याला आतां त्या चहाचा भक्त बनविला होता. त्याला आतां त्या चहाची इतकी चटक लागली होती, कीं रोज़ दिडाचा ठोका पडतांच तो माझ्या टेबलाजवळ येऊन आपल्या विचित्र इंग्रजींत म्हणे,

" मीस्तर पॅत्, चला ! चहाचा ठोका पडला ! "

आजहि रोजच्याप्रमाणें स्वारी डुलत डुलत हास्यवदनानें माझ्याजवळ आली, व रोजचें ठराविक वाक्य उच्चारून मजकडे पाहूं लागली.

" चल, आलों. " असें म्हणत मीं टेबलावरील कागद जरा व्यवस्थेनें लावले, व तो आणि मी मिळून दुकानाबाहेर पडलों.

रोजच्या ठरलेल्या हॉटेलांत ठरीव जागीं आम्ही जाऊन बसलों व परिचारक आमच्यासाठीं फराळाचें सामान आणावयासाठीं लगबगीनें आंत गेला.

माझ्या उजव्या बाजूला खिडकी होती ती हमरस्त्याला लागून होती. मी एकीकडे नोगीशीं गप्पा मारीत होतों व एकीकडे रस्त्यावरील रहदारीची मौज पहात होतों. दर दोन मिनिटाला नवी ट्रॅम येऊन थांबे, माणसांची चढउतर घाईघाईनें होई, आणि टण् टण् अशी बदसुराची घंटा वाजून ट्रॅम पुढें सरकूं लागे ! वर्तमानपत्रें, चिनॉय शेंग, चित्रें, अशा हरप्रकारच्या वस्तु विकणाऱ्या लहानमोठ्या मुलांनीं आपल्या आरोळ्यांनीं त्या जागेला बाजाराचें स्वरूप आणलें होतें ! ट्रॅमच्या दोन मिनिटांच्या मुक्कामांत चालणाऱ्या त्या व्यापाराकडे पाहून माझ्या मनाला मोठी मौज वाटली. एक आठ वर्षांचा पोऱ्या ' क्रॉनिकल ' असें ओरडत होता, व प्रत्येक ट्रॅमवर लगबगीनें दोन तीन तरी अंक खपवीत होता. त्याचें कौतुक वाटलें व दयाहि आली. बिचारा निराधार असेल म्हणून हा धंदा करीत असेल, किंवा बिचाऱ्याची आई काम करण्यास समर्थ नसेल, किंवा एखादी म्हातारी आजी याला बाळगून——

" मीस्तर पॅत् ! हा चहा आला ! "

नोगीनें माझ्या हाताला स्पर्श करून म्हटलेल्या त्या शब्दांनीं दचकून मी दृष्टि वळविली.

परिचारक टेबलावर चहादाणी, कप व फराळाचे पदार्थ ठेवीत होता.

परिचारकानें सर्व पदार्थांची नीट मांडणी केल्यावर आम्हीं कांटे-चमचे उचलले व सुरुवात केली. खातां खातां मीं नोगीला म्हटलें,

" नोगी, तुझ्या देशांत एकदा आलं पाहिजे गड्या ! "

" अलबत्, अलबत् ! केव्हां येतोस बोल; आमचा देश पाहून तूं अगदीं खूष होऊन जाशील. "

स्वदेशाविषयीं मनांत काठोकांठ भरलेला अभिमान त्या वेळीं त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट चमकत होता. त्याची थोडीशी चेष्टा करण्याची कल्पना मनांत येऊन मीं हसत हसत म्हटलें,

" तुझ्या देशांत यायचं माझ्या अगदीं जिवावर येईल बुवा ! "

" असं कां म्हणतोस ? " त्यानें विस्मयानें प्रश्न केला.

" अरे, तुझ्या देशांत आलं कीं, अहोरात्र बिनदुधाच्या चहाचा काढा घ्यावा लागणार ना ! तसल्या त्या काढ्यानं माझा अर्धा जीव नाहींसा होईल !"

माझी थट्टा कळून नोगी थोडासा हसला, व क्षणभरानें मला पुन्हा म्हणाला, " अरे चहाची ही एक गैरसोय मनांत येऊन तूं भितोस. पण, आमच्या जपानांतल्या एकंदर मौजांची तूं गणती केलीस तर ही गैरसोय तूं कधीं मनांतसुद्धां आणणार नाहींस ! आमच्या देशांतील सृष्टिसौंदर्य, लहान लहान डोंगर, छोटे छोटे खळखळणारे जलप्रवाह, ठेंगणीं ठुसकीं उबदार लाकडीं घरं, आणि सगळ्यांत विशेष म्हणजे ठिकठिकाणीं विजेसारख्या चमकणाऱ्या आमच्या सौंदर्यसंपन्न जपानी तरुणांगना—तूं वेडाच होऊन जाशील ! "

असें म्हणून अगदीं मनापासून हसूं आल्यामुळें त्यानें आपली अगोदरच रुंद असलेली जिव्हणी अधिकच विस्तृत केली, आणि माझ्याकडूनहि तसल्याच हास्याची अपेक्षा करीत आपले किलकिले तीक्ष्ण डोळे मजकडे लावले.

मीहि हसलों ! पण तें निराळ्या कारणानें- चपट्या नाकाच्या सुंदर जपानी अंगना पाहून मी वेडाच होईन अशी खात्री बाळगणाऱ्या त्याच्या देशाभिमानाचें मला जितकें कौतुक वाटलें तितकेंच हसूहि आलें. "अथवा," मीं मनाशीं म्हटलें, " जपानी ललनांवर मोहित होऊन मी वेडाच बनेन असं यानं म्हटलन् तें शब्दांची थोडी फिरवाफिरव करून खरंच ठरेल. त्या ललनांवर मोहित " होऊन " मी वेडाच " बनेन " असं म्हणण्याऐवजीं त्या ललनांवर मोहित " झालों तर " मी वेडाच " ठरेन " असं म्हटलं तर तें खरंच आहे. "

" कां मीस्टर पॅत् ! गप्प बसलास ? " माझी स्तब्धता पाहून नोगीनें विचारलें.

" नाहीं, तुझ्या त्या विजेसारख्या युवती कल्पनाचक्षूंपुढें चमकल्यामुळें एकदम अंधेरी येऊन कसंसंच झालं ! "

माझ्या या विनोदानें नोगी मोठ्यांदां हंसला.

फराळ संपल्यावर नोगीनें चहादाणी उचलली व दोन कप तयार कर-

ण्यास सुरुवात केली; मीं आपली सिगारेट पेटविली व नोगीच्या तोंडांतील सिगारेटच्या टोंकालाहि काडी लावली. एकीकडे सिगारेटचे झुरके ओढीत व एकीकडे चमच्यानें चहा ढवळीत मी उजव्या हाताच्या खिडकींतून रस्त्याकडे पाहात होतों.

" तुला आमचें दुकान कसं काय आवडतं ? " नोगीनें प्रश्न केला.

" फार आवडतं, " असं म्हणून चहाचा एक घोट घेतला, व कप तसाच हातांत धरून रस्त्याकडे पाहूं लागलों तों—

राधाकान्त ! ट्रॅमची वाट पाहात उभा असलेला राधाकान्त माझ्या दृष्टीस पडला !

चहाचा कप कसा तरी टेबलावर टाकून मी रस्त्याकडे धूम ठोकली. माझ्या कपांतील चहा नोगीच्या अंगावर उडाला व माझ्या त्या विचित्र कृतीनें आश्चर्यचकित होऊन जागच्या जागीं उभा राहून—

" मीस्तर पॅत् ! मीस्तर पॅत् ! " असें दोनदां नोगी ओरडला तें मीं ऐकलें.

मी धावत जाऊन राधाकान्त उभा होता त्या ठिकाठीं पोंचलों. इतक्यांत ट्रॅम आली व तो पुढें होऊन वींत बसूं लागला. विजेच्या गतीनें मी पुढें झालों आणि ट्रॅमच्या पायरीवर पाऊल ठेवणाऱ्या राधाकान्ताच्या खांद्याला धरून त्याला खालीं ओढलें व म्हटलें,

" राधाकान्त ! थांबा, थांबा ! "

अत्यंत विस्मयानें राधाकान्तनें मजकडे वळून पाहिलें. आपल्याला असें आडदांडपणानें खालीं ओढणारा जंगली इसम कोण आहे अशा विचारानें त्याच्या चेहऱ्यावर क्रोधाची छटा आली होती. पण, मी दृष्टीस पडतांच ती छटा नाहींशी झाली, व आश्चर्ययुक्त आनंदानें हसत माझ्याकडे पाहून तो उद्गारला, " काय ?–कोण ! जगदीश ! "

मी त्याच्या ऊद्गाराकडे विशेष लक्ष न देतां त्याला हाताला धरून आमच्या दुकानांत जवळजवळ ओढतच नेलें, त्याला माझ्या खुर्चीवर मिनिटभर बसावयास सांगून मी धांवतच मॅनेजरच्या खोलींत गेलों, धांपा टाकीत " मला अत्यंत जरूरीचं काम आहे. मी जाऊं काय ? उद्यां सकाळीं रोजच्या वेळेस येईन " येवढे शब्द तोंडावाटे कसेबसे काढले, त्यानें

परवानगी दर्शविणारी मानेची हालचाल करतांच तडक परत फिरलों, व मॅनेजरनें पुन्हां मला कायसा प्रश्न केला तिकडे लक्ष न देतां परत आपल्या खुर्चीपर्यंत पळत येऊन, राधाकान्ताचा हात पकडून म्हटलें, " चला ! आतां मी मोकळा आहें. "

माझ्या या वागण्याचें राधाकान्तला अत्यंत आश्चर्य वाटलें असल्यास नवल नाहीं. कांहीं न बोलतां तो डोळे विस्तृत करून माझ्याकडे नुसता पाहता होता. दुकानाबाहेर पडतांच त्यानं मला विचारलें, " कुठं जायचं ? "

" माझ्या खोलींत जाऊं. तिथं गेल्यावर साऱ्या गोष्टी संथपणें बोलूं. " असें मीं उत्तर देत आहे इतक्यांत ट्रॅम आली, व राधाकान्तासह ट्रॅममध्यें बसून मीं कंडक्टरपाशीं बोरीबंदरचीं दोन तिकिटें मागितलीं.

खोलींत गेल्यावर मीं राधाकान्ताला जरा बसावयास सांगितलें, आणि मॅनेजरकडे जाऊन स्पेशल चहाच्या दोन कपांची ऑर्डर दिली. खोलींत परत येतांच मीं आपल्या पलंगावर बसत राधाकान्ताला म्हटलें,

" हं. काय राधाकान्त, प्रकृति ठीक आहे ना ? "

" ठीक आहे. पण तुमची तब्येत ठीक दिसत नाहीं. अन् तुम्ही मुंबईत केव्हां आलांत, कां आलांत, हीं दुकानांत नोकरी कशासाठीं धरली ? या साऱ्या गोष्टींचं हें कोडं मला मघापासून उलगडत नाहीं. हें आहे तरी काय ? तुम्ही किती खराब झालां आहांत ! "

" मी इतका वाळलेला दिसतों आहे ? " त्याचें बोलणें खरें आहे असें माझ्या मनाला वाटत असूनहि तें खोडून काढण्याचा आविर्भाव आणून मीं विचारलें. " बरं, तें असो म्हणा ! तुम्ही भेटल्यामुळं माझा जीव कसा आज आनंदित झाला आहे ! हं. हा चहा आला चहा घेऊं ; जरा वेळ इथंच बसूं अन् मग संध्याकाळीं समुद्रावर हिंडायला जाऊन सुखदुःखाच्या गोष्टी पोटभर बोलूं. घ्या चहा. "

मी व राधाकान्त निघालों ते चर्चगेट स्टेशनच्या बाजूला गेलों. संध्याकाळच्या त्या वेळीं चर्चगेट स्टेशन माणसांनीं फुलून गेलेलें होतें. आम्ही स्टेशनच्या पलीकडे समुद्राच्या बाजूला जात होतों तेवढ्यांत चार लोकल गाड्या आल्या व माणसांनीं प्लॅटफॉर्म गजबजून गेलेला होता. तिकडे दुरून

पाहतांना लोकलमध्यें चढणाऱ्या व उतरणाऱ्या माणसांचा गलबला व प्लॅटफॉर्मवर उभ्या राहिलेल्या माणसांची कुजबूज ऐकून एखाद्या पोळ्याभोंवतीं घों घों करणाऱ्या माशांच्या थव्याची मला आठवण झाली.

शेवटीं, माणसांच्या गडबडीपासून अगदीं दूर आणि निवांत अशा ठिकाणीं आम्ही जाऊन बसलों. समुद्राच्या लाटांची मौज पाहात आम्ही कितीतरी वेळ बोलत बसलों होतों. माझी सारी हकीगत मीं राधाकान्ताला सांगितली व त्यानेंहि त्याची सारी हकीगत मला सांगितली. त्याचे परीक्षेचे पेपर चांगले गेले होते हें ऐकून मला आनंद झाला. परीक्षेनंतर एक महिनाभर मुंबईतच राहून रॉयल एशियाटिक लायब्ररींतील कांहीं दुर्मिळ पुस्तकें वाचून काढण्याची त्यानें आपल्या बापाकडून परवानगी मिळविली होती, व दोन प्रशस्त खोल्या घेऊन तो सँढर्स्ट ब्रिजच्या बाजूला राहात होता.

बोलतां बोलतां शेवटीं राधाकान्तानें मला विचारलें, " जगदीश, माणिकच्या लग्नाचा प्रश्न आतां अजिबात निकालांत निघाला आहे. मग आतां तुम्ही आईबापांना विनाकारण दुःखांत कां ठेवावं ? "

राधाकान्ताच्या प्रश्नानें माझ्या अंतःकरणांतील मर्मालाच स्पर्श केला. माझ्याहि मनांत आतांशीं हा प्रश्न फार येत असे, व आपण बाबांना व आईला निष्कारण कष्टी करीत आहों असें माझें मला अनेक वेळां वाटे. पण, माझा अभिमान जागृत झाला कीं त्या प्रश्नांची टोंचणी बंद होई. राधाकान्ताच्या प्रश्नानें घरची आठवण होऊन अस्पष्ट खेदाची लहर क्षणमात्र माझ्या हृदयांत येऊन गेली, पण लगेच ती दाबून मीं त्याला उत्तर दिलें.

" अं – तुमचं म्हणणं खरं आहे, पण–पण–असं पाहा, माणिकच्या मूर्खपणाची आणि स्वतःच्या अविचाराची कबुली पदरांत बांधून घरीं जायचं अन् – जरा मानहानीच नाहीं कां त्यांत ? – माझं मन घेत नाहीं खरं घरीं जायला–– "

" पण तुम्ही मुंबईत खुशाल आहांत इतकं तरी त्यांना एक पत्र धाडून कळवायला काय हरकत आहे ? "

" तेवढं कळवणं काय अन् सारं कळवणं काय एकच ! – नाहीं झालं वाटत धाडावंसं पत्र ! "

" हं. ! छे बुवा, हें कांहीं मला बरं वाटत नाहीं ! "

" बरं, बोलूं मग त्याबद्दल. चला, पाहिलीत का रात्र किती झाली ! पहिली पंगत साधली पाहिजे, उठा ! "

" खरंच, बोलण्याच्या भरांत किती वेळ गेला त्याचं मला भानच राहिलं नाहीं. "

आम्ही लगेच उठलों आणि झपाझप पावलें टाकूं लागलों. दोन तासांपूर्वी माणसांनीं गजबजलेलें चर्चगेट स्टेशन आतां अगदीं स्तब्ध झालें होतें. प्लॅटफॉर्मवर दोन चार माणसें रेंगाळत होतीं, समोरच्या रस्त्यानें एखादी मोटार मधूनच शांतपणें जात होती. शांत रस्ता, मोकळें स्टेशन आणि विजेच्या दिव्यांचा मात्र लखलखाट—असा तो देखावा मनाला कांहीं विलक्षणच वाटत होता. राधाकान्त चालतां चालतां मला म्हणाला,

' हंः ! जगदीश, येथें मघाशीं किती गर्दी होती अन् आतां जिकडे तिकडे काय भयाण झालं आहे ! जशी कांहीं मघांची सारी मंडळी जादूनं पार नाहींशी झाली ! "

मीं खालीं पाहात चालत जरा गंभीर स्वरानें म्हटलें,

" हं–अ ! आपणहि असेच केव्हांतरी नाहींसे होणार ! कधीं तर माझ्या मनांत अशी कल्पना येते कीं, या पृथ्वीच्या पाठीवर सारी मनुष्यजात जेव्हां पुसून काढली जाईल तेव्हां पृथ्वी किती भयाण दिसेल ! तिचं त्या वेळचं तें भयाण स्वरूप पाह्यला मिळेल तर–– "

इतक्यांत एक लोकलगाडी आपलें अजस्र ओझें ओढीत स्टेशनमध्यें शिरली, आणि तिच्या त्या धडधडाटांत माझे शब्द मलाच पुरतेंपणीं ऐकूं आले नाहीत.

३

आजचा सबंध रविवार मी राधाकान्ताच्या खोलींत घालवावयाचा असें आमचें दोघांचें मागील रविवारपासूनच ठरलें होतें. जेवण आटोपून खोलींत आल्यानंतर आम्हीं कांहीं वेळ गप्पा मारीत पडलों होतों. मग राधाकान्त लायब्ररींतून आणलेला बुद्धधर्माविषयींचा एक ग्रंथ वाचीत बसला, व मी हळुहळू झोंपीं गेलों. चार वाजल्यावर राधाकान्तनें मला उठवलें व चहा घ्यावयास म्हणून आम्ही बाहेर पडलों.

कटाक्ष टाकला, तो गृहस्थ दृष्टीस पडतांच जणूं काय त्याला पाहिजे तीच व्यक्ति दिसली अशा भावार्थानें त्यानें आपल्याशींच मान हालविल्यासारखें केलें आणि दुसऱ्या क्षणीं एखाद्या सावलीसारखा तो नाहींसा झाला.

त्या कोपऱ्यांतील मनुष्याला हें कांहींच दिसलें नाहीं. आपल्या विपुल केशभारांत डाव्या हाताचीं बोटें खोंचल्यासारखीं करून आणि डाव्या तळ-हातावर डोकें टेकून तो आपल्याच विचारांत मग्न होतासें दिसलें. त्याच्या पुढच्या चहाकडे त्याचें काडीइतकेंहि लक्ष नव्हतें. त्याभोंवतीं आतां हळू-हळू माशादेखील घोंगावूं लागल्या होत्या. पण त्यांना वारण्याचें त्याच्या मनांत एकवारसुद्धां आलें नाहीं. आम्ही मात्र द्विगुणित आश्चर्यानें त्याच्या-कडे पाहूं लागलों.

आमचे दुसऱ्यांदा मागविलेले चहाचे कपहि अर्धे रिकामे झाले तरी तो कोपऱ्यांतील गृहस्थ उठून जाण्याचें कांहींच चिन्ह दिसेना. तेव्हां राधाकान्त मला हसत विचारूं लागला,

" ती स्वारी अजूनहि हलेलसं वाटत नाहीं. आतां काय चहाची तिसरी आवृत्ति करणार कां काय ?—अं ? "

" नाहीं, तसं नाहीं." मीं हंसत उत्तर दिलें. " पण हा एकंदर प्रकार काय आहे तें समजलं पाहिजे. आपला हा चहा संपला तरीसुद्धां ही स्वारी जागेवरून—"

इतक्यांत त्या कोपऱ्यांतील मनुष्यानें हातावर टेकलेलें आपलें मस्तक वर उचललें व इकडे तिकडे कावऱ्याबावऱ्या नजरेनें पाहिलें. त्या पाहण्यानें त्याच्या मनाला बरें वाटलें असावें असें त्याच्या मुद्रेवरून दिसलें. त्यानें आपली टोपी डोक्यावर ठेवली, टेबलावर पडलेल्या चहाकडे पाहून तो स्वतःशींच किंचित् हसला, आणि तो खुर्चीवरून उठला. खोलीच्या दारा-पर्यंत जाऊन तेथें तो थबकला, हॉटेलच्या मोठ्या दारांतून दिसणाऱ्या रस्त्याच्या भागावर त्यानें एकदा नजर टाकली, व जावयास कांहीं हरकत नाहीं असें जणू काय स्वतःशीं म्हटल्याप्रमाणें मान हालवून तो पुढें झाला, व ' एक इसम तीन आणे ' म्हणून आंतून ओरडणाऱ्या पोऱ्याचा हिशोब ऐकून तितके पैसे देण्यासाठीं तो दाराजवळच्या टेबलाजवळ गेला.

आम्हीहि त्याच्या मागोमाग गेलों. आमचे चहाचे पैसे राधाकान्त देत

होता. तेवढ्यांत मी मॅनेजरजवळून एक चिरूट विकत घेतला. मॅनेजरनें एक चांगला चिरूट मला काढून देऊन आपल्याजवळची काड्याची पेटीहि पुढें केली. मीं हास्यवदन करून इंग्रजींत त्याचे आभार मानले, व काडी पेटवून चिरुटाचें टोंक नीट शिलगावूं लागलों. तोंच—

बाहेर रस्त्यावर कांहींतरी गडबड झाल्यासारखें मला वाटलें. मघांशीं कोपऱ्यांत बसलेला तो इसम हॉटेलबाहेर पडतांच कोणालासा पाहून धावत सुटला. त्याच्या मागोमाग मघांशीं दारांत डोकावलेला रुमालवाला गृहस्थहि पळालेला मीं ओझरता पाहिला, त्याच्या मागून एक शिपाई पळत गेलासें मला वाटलें, आणि "चोर" "कुठें आहे!" "धावा" "पकडा" अशा आरोळ्याहि माझ्या कानीं आल्या. मी तसाच हॉटेलच्या दारांतून रस्त्यावर धावत गेलों, राधाकान्तहि माझ्या पाठोपाठ आला, व हॉटेलचा मॅनेजरहि काय प्रकार आहे तें पाहण्यासाठीं म्हणून हॉटेलच्या दारांत येऊन उभा राहिला.

येवढ्या अवधींत रुमालवाल्या गृहस्थांनीं त्या इसमाला पकडलें होतें, पोलीसहि त्याच्याजवळ जाऊन पोंचला होता, व तमासगिरांचा लहानसा घोळका त्यांच्याभोंवतीं गोळा झाला होता.

मी व राधाकान्त लगबगीनें त्या गर्दींत जाऊन मिसळलों. माझ्यापुढील गृहस्थाच्या खांद्यावरून डोकावून त्या दोन इसमांकडे मी पाहूं लागलों. इतक्यांत रुमालवाल्या गृहस्थाचें तोंड माझ्या बाजूला वळलें, व तें पाहतांच एकदम आश्चर्यचकित होऊन मी उद्गारलों—

"हे आमचे दिवाणजी!"

माझे ते आश्चर्यपूर्ण उद्गार ऐकून राधाकान्त गोंधळून गेला, व माझ्याकडे वेड्यासारखा पाहूं लागला. मीं त्याचा उजवा हात पकडून गर्दींतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत म्हटलें,

"चला राधाकान्त, आतां इथें क्षणभरहि उभं राह्यचं नाहीं! चला-चला!"

माझ्या पहिल्या उद्गारांनीं आधींच आश्चर्यचकित झालेला राधाकान्त अधिकच गोंधळांत पडला, आपला हात माझ्या हातांतून काढून घेत त्यानें मला एकदम विचारलें—

" म्हणजे ? याचा अर्थ तरी काय ? असे एकदम तोंड फिरवून निघालांत कां ?—दिवाणजी कोण ?—"

" आमच्या घरचे – वृंदावनचे – दिवाणजी " मीं घाईघाईनें राधाकान्ताची समजूत पाडण्याच्या उद्देशानें म्हटलें. " त्यांच्या दृष्टीस मला पडतां उपयोगी नाहीं. त्यांनीं मला पाहिलं तर मी मुंबईत आहे हें घरीं तेव्हांच कळेल. चला, चला ! "

भुंवया वांकड्या करून राधाकान्तानें मजकडे क्षणभर चमत्कारिक नजरेनें पाहिलें. जणूं काय " तुम्हांला वेड तर नाहीं लागलं ? " असें तो मला विचारणार होता. नंतर कांहींतरी निश्चय केल्यासारखी मुद्रा करून तो माझा हात पकडून मला रोंखून धरीत म्हणाला,

" तें कांहीं नाहीं. मी नाहीं हें ऐकणार ! तुम्हांला दिवाणजींच्या दृष्टीस पडायचं नसेल तर मी पुढें होऊन त्यांना तुमच्याविषयीं सारं सांगतों ! घरच्या माणसांना उगीच दुःखांत ठेवायचं म्हणजे काय हें ! घरीं पत्र लिहा म्हणून मी रोज तुमच्या मागं लागलों असतांना तुम्ही माझं ऐकत नाहीं. आज हे दिवाणजी अचानक दिसले हें बरंच झालं म्हणायचं ! — अं हं ! मी नाहीं तुम्हांला निसटूं द्यायचा !—थांबा. "

असें म्हणून राधाकान्तानें माझा हात चांगला जोरानेंच पकडून ठेवला. त्याची पकड सोडून जाणें मला अशक्य होतें असें नाहीं; पण तसें केल्यानें तो एक रस्त्यांतील सीनच व्हावयाचा असें मनांत येऊन मी स्वस्थ उभा राहिलों.

दिवाणजींनीं आमचें हें बोलणें ऐकलें असणें शक्यच नव्हतें. ते आपल्याच कामांत पूर्ण गुंतले होते. ते शिपायाला सांगत होते,

" शिपाईबोवा, पकडा या इसमाला. मघांशीं मी गिरगांवच्या नाक्यावरून जात असतांना हा झपकन् मला अगदीं खेटून गेला, व लगेंच मी आपल्या अंगरख्याच्या खिशाला हात घालतों तों खिसाच नाहींसा झालेला मला आढळून आला. मागें वळून पाहतों तों हा इसम झपाझप पावलं टाकीत त्या हॉटेलांत शिरला. मीहि आंत शिरलों, तोच तो इसम म्हणून खात्री करून घेतली, अन् मग तुम्हांला बोलावून आणलं. पकडा याला. माझी खात्री आहे माझा पैशाचा बटवा याच्याजवळ आहे. त्या बटव्यांत

माझे तीनशे रुपये आहेत, कांहीं थोडेथोडके नाहींत. वृंदावनाहून मुद्दाम बराचसा बाजार करण्यासाठीं बाबासाहेबांनीं मला धाडलं आहे.— शिपाई-बोवा, पाहतां काय असें ?— पकडा त्याला ! ”

दिवाणजी बोलत असतांना माझी दृष्टि त्या फॅशनेबल माणसाकडे होती. मध्येंच दिवाणजींचें लक्ष चुकवून त्यानें शिपायाला कांहीं एक विचित्र खूण केल्यासारखें मला वाटलें. प्रथम मला वाटलें कीं व्यर्थ संशय आला. पण दिवाणजी इतकें ठांसून बोलत असूनहि शिपाईबोवांची स्वारी जेव्हां घुमेपणानें उभी राहिली तेव्हां माझ्या पहिल्या संशयाला जास्तच बळकटी आली.

शिपाई कांहींच हालचाल करीत नाहीं असें पाहून किंचित् आश्चर्यानें व रागानें मोठा स्वर काढून दिवाणजी म्हणाले,

“ शिपाईबोवा, तुम्ही पकडतां का नाहीं या इसमाला ? माझा तीनशें रुपयांचा ऐवज या माणसाजवळ या क्षणाला आहे, याबद्दल मला मुळींच शंका नाहीं. माझा बटवा कसा आहे त्याचं मी वर्णन देतों तुम्हांला पाहिजे तर. निघतो का नाहीं बघा तो याच्याजवळ ! घ्या, याची इथल्या इथें झडती घ्या ! ”

तरीहि शिपाईबोवा जागच्या जागींच उभे राहिले !

“ शिपाईबोवा, तुम्ही घेतां का नाहीं या इसमाचा झाडा ? ” दिवाणजींनीं शेवटीं मोठ्यांदा ओरडून विचारलें.

“ दादासाहेब, ” शिपाई गंभीर स्वरानें म्हणतों; “ तुम्ही म्हणतां तें सारं खरं. पन असं बगा तुम्ही जसं जंटलमन दिसताय त्येच्याहूनबी ह्ये दादा लई जंटलमन दिसत्यात. समजा, तुम्ही म्हणतां त्येपरमानं, ह्येच्या खिशाला म्यां हात घातला अन् काय बी बाहेर निगालं न्हाय, म्हंजी मग ? ”

असा प्रश्न करून त्यानें दिवाणजींकडे मोठ्या ऐटीनें पाहिलें, व आपली गोळी बरोबर लागू पडली असें वाटून दुप्पट ऐटीनें तो पुढें म्हणाला, “ मग लागल का माझ्या गरिबाच्या गळ्याला हिसका ! बेअब्रू केल्याबद्दल या दादांनीं माझा नंबर टिपून घेतला अन् तुमच्यावरबी न् माझ्यावरबी गुदरली फिर्याद, कीं तुमी बडी माणसं कशीबी जाल सुटून अन् माझी गरीबाची नोकरी जाईल झटक्याला ! ”

आपल्या म्हणण्यांतील जोर अधिक प्रस्थापित करण्यासाठीं त्यानें आजूबाजूला वळून पाहिलें, व एक दोन माणसांकडे ऐटीनें पाहात म्हटलें, "कां राव, खरं का खोटं ?"

दोन तीन 'रावां'नीं लगेंच आपलें धूम्रपान बंद करून, "तर, तर! बराबर हाये तुमचं म्हननं!" अशा शब्दांनीं शिपाईबोवांच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

आमचे दिवाणजी बिचारे गोंधळून गेले.

आतां माझ्याच्यानें राहवेना. मी दोन्ही हातांनीं लोकांना बाजूला सारीत गर्दींतून पुढें झालों, व दिवाणजींजवळ जाऊन त्यांना म्हटलें, "थांबा, दिवाणजी, घाबरूं नका!"

मला पाहतांच दिवाणजी दचकले, माझा उजवा हात दोन्ही हातांनीं पकडून ते म्हणाले, "काय!–कोण?–साहेब! छोटे साहेब!–चला, चला! आतां घरीं चला! बाबासाहेब, आईसाहेब, सारीं मंडळी—"

त्यांचें तें बोलणें त्या वेळीं आणखी वाढावें अशी माझी इच्छा नव्हती. त्यांना दाबून मीं म्हटलें, "तें जाऊं द्या. आधीं तुमचें हें काम करूं."

नंतर शिपायाकडे वळून मीं दरडावणीच्या स्वरानें म्हटलें, "शिपाईबोवा, तुम्हांला या इसमाचा झाडा घ्यायचा आहे का नाहीं? नसेल घ्यायचा तर तसं बोला म्हणजे तुमचा नंबर टिपून घेऊन या इसमाला घेऊन मी साहेबांकडे जातों. बोला काय तें!"

माझी गोळी नेमकी लागू पडली. स्वतःशीं कायसें पुटपुटत शिपाईबोवा पुढें झाले व त्या इसमाला म्हणाले, "दादा, तुमचे खिशे पाहूं द्या."

त्या इसमाच्या कोटाच्या आंतल्या खिशांत दिवाणजींच्या अंगरख्याचा कातरलेला खिसा जसाच्या तसा निघाला. तो पाहतांच भोंवतालीं जमलेल्या साऱ्या मंडळींनीं टाळ्या पिटल्या, व 'भले शाबास' असा ओरडा केला. मघाशीं शिपाईबोवांना भर देणारे 'राव' हि या ओरड्यांत मनापासून सामील झाले होते, नव्हे त्यांचा आवाज सर्वांच्या वर ऐकूं येत होता!

कांहीं वेळानें गर्दी नाहींशी होऊन शिपाईबोवांची स्वारी निघून गेल्यावर दिवाणजी माझ्याकडे वळून माझ्या दोन्ही खांद्यावर दोन्ही हात ठेवून म्हणाले, "छोटे साहेब, खुशाल आहांत ना?"

कांहींच न बोलतां मीं नुसती होकारार्थी मान हालविली. दिवाणजी पुन्हां म्हणाले, "आपली तब्येत ठीक आहेसं मला नाहीं वाटत. आपलं तोंड किती सुकलेलं दिसतं आहे, डोळे खोल गेले आहेत. छेः, छेः! आपली प्रकृति ठीक नाहीं. आपली भेट झाली हे देवाचे मोठे उपकारच झाले म्हणायचे! आईसाहेबांनीं आपल्यासाठीं अगदीं हाय घेतली आहे. त्यांच्या सांगण्यावरून मी मधें एकदां पुण्यास जाऊन आलों, पण तिथें आपला शोध लागेना. त्यामुळें आम्ही सारीच मंडळी चिंतेंत आहोंत. आईसाहेब तर—"

"आईची प्रकृति ठीक आहे ना?" मीं एकदम प्रश्न केला. दिवाणजींचें तें बोलणें ऐकून आजपर्यंत घरच्या माणसांविषयींचे जे विचार मीं निश्चयाचा बांध घालून दाबून ठेवले होते ते एकदम तो बांध फोडून बाहेर फुटले! माझें हृदय भरून आल्यासारखें झालें, कंठ दाटून आला आणि वरील प्रश्न माझ्या तोंडून पुरता बाहेर पडतो न पडतो तोंच दोन अश्रु माझ्या डोळ्यांतून निघून गालावरून ओघळले.

"आईसाहेबांची प्रकृति तशी ठीक आहे, त्यांना कांहीं होतं आहे असं नाहीं. पण आपल्याविषयीं विचार डोक्यांत सारखे घोळत असतात. आपल्या काळजीनं त्या अगदीं खंगून गेल्या आहेत. शांताबाईसुद्धां—सालस मुलगी आहे बिचारी—" असें म्हणून दिवाणजींनीं एक सुस्कारा सोडला व माझ्याकडे पाहिलें.

त्यांच्या त्या पाहण्यांत कोणता अर्थ भरला होता तें माझ्या ध्यानांत आल्यावांचून कसें राहील?

दिवाणजींनीं मला वृंदावनास चलण्याविषयीं कल्पनातीत आग्रह केला. राधाकान्ताच्या खोलींत आल्यानंतर तर त्यांनीं मला परोपरीनें विनंती केली. राधाकान्तनेंहि त्यांच्या म्हणण्याला पुनः पुन्हां दुजोरा दिला. पण मीं दिवाणजींच्या म्हणण्याला कबुली दिली नाहीं. इतकेंच नाहीं तर माणिकशीं विवाह न करतां आपण मुंबईत येऊन नोकरी धरली वगैरे एकहि गोष्ट मीं त्यांना सांगितली नाहीं. शेवटीं नाइलाज होऊन दिवाणजी निघून गेले. त्यांची ती त्या वेळची निराशेनें खिन्न झालेली मुद्रा पाहून माझ्या हृदयाला

पीळ पडला. पण मनांत अभिमानाचा पीळ त्याहूनहि दृढ होता, म्हणून मन घट्ट करून तो प्रसंग मीं सहन केला.

नंतर राधाकान्ताचा निरोप घेऊन मीं निघालों. ट्रॅममध्यें बसलों असतां-नाच माझें कपाळ भयंकर तापल्यासारखें मला वाटूं लागलें. घेरी येऊं लागली व अंगहि जास्त जास्त कढत होऊं लागलें. ट्रॅममधून उतरून हॉटेलच्या लिफ्टमध्यें बसतां बसतांच माझे तीनदां झोकांडे गेले. खोलींत जाऊन मी कसे बसे कपडे उतरले व अंथरुणावर अंग टाकलें. आतां तापानें अंग पुरें फणफणलें होतें, आणि डोकें तर एखाद्या तापलेल्या लोखंडी गोळ्याप्रमाणें तप्त आणि जड झालें होतें.

हॉटेलच्या त्या भाडोत्री वातावरणांत माझी शुश्रुषा कोण करणार ? ती रात्र मीं कशी काढली माझें मला माहीत ! किंबहुना माझें मलादेखील माहीत नाहीं. कारण त्या रात्रीं मी पुरा शुद्धीवर होतों कीं नाहीं कोण जाणे ! डोक्यांत विचारांचा नुसता भडका उडाला होता आणि मिटलेल्या डोळ्यांपुढें अशक्य कोटींतील प्रसंगहि थैमान घालीत होते. ती रात्र मीं घालविली म्हणण्यापेक्षां कशीतरी गेली हेंच खरें !

दुसऱ्या दिवशीं लायब्ररींतून परत जातांना राधाकान्त माझ्याकडे आला. माझी ती स्थिति पाहून त्याला आश्चर्य वाटलें. त्यानें ताबडतोब गिरगांवांत जाऊन डॉक्टर भडकमकरांना आणलें.

डॉक्टरांनीं पूर्ण तपासणी करून सांगितलें, " हा ब्रेन-फीव्हर आहे. डोक्यांत विचार भडकल्यामुळें ताप आलेला आहे. देतों औषध. "

चार दिवसांनीं माझा ताप उतरला. पण अशक्तता बरीच होती. माझ्या आग्रहावरून राधाकान्त माझ्याच खोलींत राहावयास आला होता. तो आल्यानें मला प्रेमळ संगति मिळाली. त्याच्याशीं बोलण्याचालण्यांत मनाची अस्वस्थता नाहींशी झाली. आणखी चार दिवस गेल्यावर मला पुष्कळच बरें वाटूं लागलें.

शेवटीं आज दुकानांत कामावर जावयाचें मी ठरविलें व राधाकान्तानेंहि जावयास संमति दिली. मी दुकानांतून परत येईपर्यंत राधाकान्तानें खोलींतच वाचीत बसावयाचें, व मग दोघांनीं मिळून गाडींत मलबार हिलवर

फिरावयास जावयाचें, असें ठरवून मीं खोली सोडली व गाडी करून दुकानांत गेलों.

मॅनेजरनें माझ्या तब्येतीची चवकशी केली व " तुला करवेल तितकंच काम तूं कर " असें मला सांगितलें. मी आपल्या टेबलाशीं येऊन बसलों, व दोन महत्त्वाचीं पत्रें आज रवाना करावयाचीं होतीं त्यांचे मसुदे तयार करूं लागलों.

मी दुसऱ्या पत्राच्या मसुद्यांतील शेवटचें वाक्य लिहीत होतों इतक्यांत नोगी घाईघाईनें माझ्या टेबलाजवळ आला, व निकडीच्या स्वरानें मला म्हणूं लागला,

" पॅत्, मीस्तर पॅत् ! ऊठ, ऊठ. तुला मॅनेजर बोलावीत आहेत. गंमत आहे, चल लवकर ! "

त्याच्याकडे आश्चर्यानें पाहात मीं म्हटलें, " वेड्या, मॅनेजर मला बोलावीत असतील तर कांहीं कामाला बोलावीत असतील. गंमत दाखवायाला कां ते मला बोलावतील ? हं:–वेडा––"

" अरे, मॅनेजर नाहीं तुला गंमत दाखविणार. ते तुला कामच सांगणार आहेत. पण तें काम करतांना तुला मोठी गंमत दिसणार आहे. " असें म्हणून नोगी क्षणभर माझ्याकडे पाहात थबकला, व मग पुन्हा एकदम मनापासून हंसत माझ्या पाठीवर थाप मारून म्हणाला.

" फार गंमत आहे ! पॅत्, अरे फार गंमत आहे ! "

कोणत्या गंमतीनें त्याला इतक्या गुदगुल्या होत होत्या तें मला मुळींच कळेना. मीं त्याला विचारलें, " काय, आहे तरी काय ? "

" सांगतोंच तर तुला सगळं. " असें म्हणून नोगीनें आपले चिमुकले डोळे मिचकावल्यासारखे केले, आणि पुढें तो सांगूं लागला, " हें बघ, मी नेहमींप्रमाणें रेशमी कापडाच्या स्टॉलवर उभा होतों. इतक्यांत दोन स्त्रिया अन् एक पुरुष दुकानांत शिरून माझ्या स्टॉलवर आलीं. तो पुरुष साहेबा-सारखा दिसत होता. पण त्या बायकांना पाहतांच जपानी बायका आल्या असें मला वाटलें. त्यांचा पेहराव थेट आमच्या जपानी बायकांसारखा होता. पण ती मंडळी जवळ येतांच त्या बायका जपानी नाहींतसं मीं ओळखलं. दोघीहि जपानी तऱ्हेचीं चिटं नेसल्या होत्या, आणि केसहि त्यांनीं जपानी

पद्धतीनंच बांधले होते, इतकेंच काय, त्यांनीं हातांत जपानी पंखेसुद्धां घेतले होते. पण त्या जवळ येतांक्षणींच मी समजलों, कीं त्या जपानी नाहींत. जपानी सौंदर्य कांहीं और असतं! त्याची नक्कल करणें शक्य नाहीं. बाकी या दोन स्त्रियाहि काळ्या असल्या तरी ठसकेदार आहेत हो! पण, त्यांनीं कितीहि हुबेहूब पोषाख केला तरी आम्हां जपानी तरुणांना त्या कशा फसविणार?––मीं तेव्हांच ओळखलं कीं ही सारी मंडळी आमच्या पॅत्-सारखी हिंदु आहेत.–बाकी, त्या दोघी मोठ्या खूबसुरत आहेत हो!–– ”

नोगीची स्वारी त्या स्त्रियांवर बहुत खूष झालेली दिसली. पण त्या स्त्रियांचा आणि माझ्या कामाचा संबंध काय तें मला अजून कळेना. म्हणून मीं नोगीला विचारलें, “ अरे, तें झालं. पण यांत माझं काम काय आहे तें सांग ना? ”

“ सांगतों, तेंच सांगतों! ” नोगी म्हणाला. “ ती सारी मंडळी माझ्या स्टॉलवर आली अन् कायसं सांगूं लागली. पण त्यांचं इंग्रजी मला कळेना अन् माझं बोलणं त्यांना समजेना. त्यांना कोणती वस्तु पाहिजे तें कांहीं केल्या माझ्या लक्षांत येईना. मीं नानाप्रकारच्या वस्तु त्यांच्यापुढें टाकल्या, पण त्यांना पाहिजे असलेली वस्तु त्यांत निघेना. पलीकडच्या स्टॉलवर मॅनेजर कायसें करीत उभे होते. ते हा घोंटाळा पाहून तिथें आले, पण त्यांच्याच्यानेंहि त्यांच्या मागण्याचा कांहीं उलगडा होईना. म्हणून शेवटीं मॅनेजरनीं तुला बोलावून आणायला सांगितलें मला. तुला त्या मंडळींचं म्हणणं तेव्हांच समजेल. चल, चल, मॅनेजर अन् ती मंडळी स्टॉलवर खोळंबली आहेत. ऊठ, चल! ”

नोगीनें सांगितलेल्या हकीगतीनें मला हंसूं आल्यावांचून राहिलें नाहीं. मीं टेबलावरील कागद व्यवस्थित आवरून ठेवले आणि “ हं चल ” असें म्हणून नोगीबरोबर निघालों.

आम्ही स्टॉलपासून अंतरावर असतांनाच मॅनेजर आम्हांला भेटला. तो मुद्दाम आमच्याकडे चालत आला होता, व मला पाहतांच तो म्हणाला,

“ मीस्तर पॅत्, ती तिकडे कांहीं हिंदु मंडळी आली आहेत त्यांना काय पाहिजे आहे तें समजून घेऊन त्यांना दे. शुः–आणखी हें बघ, तो मनुष्य चांगला श्रीमंत अन् हौशी दिसतो आहे; अन् त्याच्यांबरोबर असलेल्या दोन

स्त्रियांपैकीं एक त्याचें प्रेमपात्र आहे खास ! जी वस्तु त्यांना हवी असेल तिची किंमत चांगली तिपटीनीं वाढवून सांग बरं ! हं ! चल, मीहि येतोच तुझ्याबरोबर. ”

मी स्टॉलवर जाऊन पोंचलों तों ती मंडळी खालीं वांकून टेबलावर ठेवलेले रेशमी कापडाचे नमुने पाहण्यात गर्क झाली होती. मी गेल्याबरोबर “ हं, काय पाहिजे ? ”असें एकदम मराठींतच विचारलें.

माझा मराठी प्रश्न ऐकतांच तिघांनींहि दचकून माना वर केल्या, व माझ्यासमोरची स्त्री “ आम्हांला– ”असें कांहीं म्हणणार तोंच तिची माझी दृष्टादृष्ट झाली !

नखाशिखान्त जपानी पोशाख केलेली माणिक माझ्यासमोर उभी होती !

“ कोण ? – माणिक ? – काय हें ? ” असें मी म्हणत आहें तोंच मला विलक्षण घेरी आली. सारें दुकान गरर्कन् माझ्याभोंवतीं फिरल्यासारखें मला वाटलें, आणि मर्मभेद झाल्याप्रमाणें मीं एकदम टेबलावर डोकें टेकलें.

“ आयई ! – कोण ? जगदीश ! ” असें म्हणून माणिकनें किंचाळी फोडलेली मीं ऐकली.

त्यानंतर मॅनेजर, नोगी वगैरे मंडळींचे बूट घाईघाईनें वाजलेले तेवढे मी ऐकले. मग मला कांहींच ऐकूं येईनासें झालें ! एकदम सारें जग शांत, निःशब्द झाल्याचा मला भास झाला.

मला शुद्ध येऊन मीं डोळे उघडून पाहिलें तेव्हां मी आपल्या हॉटेल-मधील खोलींतील अंथरुणावर होतों. माझ्या पलंगाजवळच्या खुर्च्यांवर राधाकान्त, नोगी, मॅनेजर आणि डॉक्टर भडकमकर बसले होते. रात्र झालेली दिसत होती. माझ्या कपाळावर बर्फाची पिशवी ठेवली होती. अंगाची आग होत होती. मस्तकांत घाव बसत होते. हजारों एंजिनांनीं शिट्या फुंकाव्या असे आवाज कानांत घुमत होते. डोळ्यांपुढें उजेड असून अंधार असल्या-सारखें वाटत होतें.

मीं डोळे उघडून कण्हल्याबरोबर राधाकान्तानें आपला हात माझ्या कपाळावर ठेवला आणि स्नेहपूर्ण दृष्टीनें त्यानें माझ्याकडे पाहिलें.

मी येथें या स्थितींत कां आहे तें क्षणार्धांत माझ्या डोक्यांत आलें. दुपारीं दुकानांत पाहिलेलें दृश्य पुन्हां माझ्या दृष्टीसमोर उभें राहिलें, व मोठ्यानें कण्हून हुंदका देत मीं आपल्याशींच म्हटलें,

" शिव, शिव ! माणिक माणिक ! काय तुझा हा पोषाख अन् काय तुझं-हं अं ! कोणत्या थराला तूं जाणार आहेस ?—आबासाहेब, नीचा !—"

सर्व मंडळींनी मला आंवरून धरलें, व मी पुन्हां डोळे मिटून स्वस्थ पडलों.

कांहीं वेळानें त्या मंडळींचें बोलणें मला थोडें थोडें ऐकूं येऊं लागलें. डॉक्टर राधाकान्ताला हलक्या आवाजांत सांगत होते—

" छेः, छेः ! तें कांहीं नाहीं. तुम्ही ताबडतोब तार करून यांच्या आईबापांना बोलावून घ्या. "

प्रकरण दहावें

नवें अंकुर

१

सूर्याचें कोंवळें उन्ह अंगावर घेत आरामखुर्चीवर पडल्या पडल्या बाहेरच्या देखाव्यावर खिडकींतून दृष्टि टाकतांच आज कित्येक दिवस माझ्या मनाला वाटली नसेल अशी प्रसन्नता माझ्या अनुभवास आली. वृंदावनांतील आमच्या त्या घराच्या कोणत्याहि खोलींतून चांगलाच देखावा दिसत असे. पण त्यांतल्या त्यांत माझ्या खोलीच्या पूर्व बाजूच्या खिडकींतून सर्व ऋतूंत सृष्टिस्वरूप सारखेंच सुंदर दिसे. आमच्या बंगल्याच्या आवारांतील शिस्तीनें उगवलेले लहानमोठे वृक्ष, त्यांच्या पलीकडे गांवचा मुख्य रस्ता, त्याच्या पलीकडे शेतांची गर्दी, पलीकडे थोडीशी माळजमीन, आणि अगदीं शेवटीं डोंगर-टेकड्यांच्या रांगा अशा त्या देखाव्याचें स्वरूप जितकें उन्हाळ्यांत, तितकेंच पावसाळ्यांतहि मनोहर असे. पाहणाऱ्याच्या मनाला केव्हांहि आल्हाद देणारा तो देखावा आज मी किती तरी दिवसांनीं पाहत होतों. दहा बारा दिवसांच्या तापानें माझ्या दृष्टींत बरीच अशक्तता आली होती. उन्हाची तिरीप सहन करून बाहेरच्या देखाव्याकडे फार वेळ पाहण्याचा शीण मला सहन करवेना, पण दृष्टि देखाव्यावरून उठण्यास तयार असली तरी मनाला तेथेंच रेंगाळावेसें वाटत होतें. अर्ध्या उघड्या डोळ्यांनीं मी तो देखावा किती वेळ तरी पाहत होतों !

बाबांनीं मला वृंदावनास आणल्याला दोन दिवस झाले होते. राधाकान्ताची तार पोंचतांच आईला बरोबर घेऊन बाबा मुंबईस आले होते खरे; परंतु मला ताबडतोब वृंदावनास घेऊन जाणें त्या वेळीं अशक्य होतें. तापाच्या ऐन भरांत माझी जगाविषयीं सारी शुद्धबुद्ध नाहींशीं झालेली होती. बाबा

वृंदावनाहून आले केव्हां तेंसुद्धां मला मागाहून कळलें. त्यामुळें आठ दिवस हॉटेलांतच राहून माझी शुश्रूषा करणें आईला आणि बाबांना भाग पडलें. दोन चार दिवसांनंतर कोठें जरा जाणत्या नजरेनें मी जगाकडे पाहावयास लागलों. त्याच वेळीं मला आईकडून समजलें, कीं ज्या दिवशीं राधाकान्तानें माझ्याविषयीं वृंदावनास आमच्या घरीं तार पाठविली त्याच्या दुसऱ्याच दिवशीं त्याचे वडील अत्यंत आजारी असल्याची तार त्याच्या हातीं पडल्यावरून तो अलाहाबादला निघून गेला. त्याची व बाबांची गांठदेखील पडली नाहीं. तापाची ज्वाळा कमी प्रखर झाल्यानंतर जें जग माझ्या दृष्टीस पडलें त्या जगांत राधाकान्ताची मूर्ति कां दिसली नाहीं त्याचा मला त्या वेळीं उलगडा झाला.

तसल्याच दुसऱ्या एका प्रश्नाचा मनाशीं उलगडा करीत या वेळीं मी बाहेरच्या देखाव्याकडे पाहत होतों. काका, काकू व शान्ता ही मंडळी आज दोन दिवसांत एकदांदेखील माझ्या दृष्टीस कशीं पडलीं नाहींत ? माझा ताप मेंदूच्या त्रासामुळें उत्पन्न झालेला होता म्हणून माझ्याशीं विनाकारण कोणींच बोलूं नये असें डॉक्टरांनीं कटाक्षानें बजाविलें असल्यामुळें ही मंडळी माझ्याकडे आलीं नाहींत कीं काय ? पण हें जरा असंभवनीयच होतें. कारण डॉक्टरांनीं कितीहि बजाविलेलें असले तरी ही मंडळी घरचीच होती. माझ्याकडे येऊन नुसतें " कसं काय ! आतां बरं वाटतंय् ना ? " इतकें तरी मला विचारल्याखेरीज काकांच्या किंवा काकूंच्या जिवाला राहवलें नसतें आणि शान्ता तर सर्वांच्या आधीं माझ्या अंथरुणाजवळ येऊन बसावयाची. मग कोणींच कसें माझ्या नजरेसदेखील पडलें नाहीं ? कां ही सर्व मंडळी विलासगडला गेली होती ! कां शान्ताशीं विवाह करण्यास मीं संमति दिली नाहीं म्हणून ही सारी मंडळी माझ्यावर रागावली होती ?

" असंहि असेल, असंहि असेल ! " मीं मनाशीं म्हटलें, आणि तो विचार मनाला जरा त्रासदायक वाटल्यामुळें खिडकींतून बाहेर पाहण्याचं बंद करून मीं मान वळविली.

त्याच वेळीं आई खोलींत आली. खिडकीशेजारीं आरामखुर्चीवर मला बसलेला पाहून तिच्या मनाला समाधान झाल्यासारखें तिच्या चर्येवरून दिसलें. तिच्या मागोमाग माझ्यासाठीं चहा घेऊन आलेल्या आचाऱ्याला

तिनें सांगितलें, " तें धाकटं टेबल आरामखुर्चीजवळ मांडून त्याच्यावर ठेव चहा."

आचाऱ्यानें त्याप्रमाणें चहा ठेवला, आणि माझ्या समोरच्या साध्या खुर्चीवर आई बसली. मी चहा पीत असतांना ती माझ्या तोंडाकडे एकसारखी पाहत होती. चहा पिऊन झाल्यावर पेला टेबलावर ठेवून तोंड पुशीत मीं किंचित् हंसत आईला म्हटलें, " आतांचा चहा फारच चांगला झाला होता. बाळू आचाऱ्यानंच केला होता? मला नाहीं वाटत."

कांहींच न बोलतां आईनें नुसतें ' हं ' करून मान हालविली. मी पुन्हां विचारलें, " आई, तूं केला होतास होय चहा!"

" नाहीं रे." असें म्हणत आईनें लवंगा-वेलदोडे डाव्या हाताच्या तळव्यावर ठेवून हात माझ्यापुढें केला आणि म्हटलें, " घे."

मी थोडासा आश्चर्यचकित झालों. चहाविषयींच्या माझ्या साध्या प्रश्नाचें साधें सरळ उत्तर देण्याचें आई कां टाळीत होती मला समजेना. फिरून तोच प्रश्न विचारण्याचा विचार एकदां माझ्या मनांत आला. पण तो न विचारणेंच बरें असें लगेच वाटून मी आईच्या हातांतील एक लवंग व एक वेलदोडा घेऊन तोंडांत टाकला व चघळूं लागलों. माझ्या मनाची ती गोंधळलेली स्थिति आईनें ओळखली असावी. कारण, कांहींतरी बोलणें काढण्याच्या हेतूनें ती मला म्हणाली, " आज तुला जरा जास्त हुशारी वाटत आहेसं दिसतं आहे."

" हो. आज पुष्कळच बरं वाटतं आहे."

" पण, तूं वाळला आहेस किती हा जगदीश! एकदां तूं पुरता बरा होऊन पूर्वीसारखा चांगला दिसूं लागलास म्हणजे–" ती पुढें बोलली नाहीं. तेवढे शब्द उच्चारतांच तिचा कंठ दाटून आला.

तिच्या मनांतील मजविषयींच्या प्रेमाचा तो उमाळा पाहून माझेंहि हृदय कंपित झालें. तिच्या चेहऱ्यावर या वेळीं सूर्याचीं किरणें पडून तिच्या डोळ्यांत अर्धवट उभीं राहिलेलीं आसवें चमकलीं. हल्लीं तिचा चेहरा माझ्याविषयींच्या काळजीनें आधींच सुकलेला दिसत असे, आणि त्या चकाकणाऱ्या आसवांनीं त्या चेहऱ्यावरील चिंतेची छटा अधिकच प्रगट झाल्यासारखें मला त्या क्षणीं वाटलें. मीं तिला म्हटलें,

" मी वाळलेला दिसतों तर मी आजारी तरी आहे. पण तूं किती आतांशा खराब दिसतेस!—आई, तुला कांहीं होत बीत तर नाहीं ना? डॉक्टरांचं औषध कां नाहीं बरं तूं घेत?"

स्वतःचा शोक अंतःकरणाबाहेर प्रगट होऊं न देण्याचा स्त्रियांचा नेहमींचा प्रयत्न असतो, आणि तो दुसऱ्यांनीं ओळखला तरी तो कबूल करण्याचें त्यांच्या नेहमीं जिवावर येतें. या सर्वसाधारण नियमाचाच मला त्या वेळीं अनुभव आला. माझ्या त्या प्रश्नांतील मर्मच नाहींसें करण्यासारखें चेहऱ्यावर हास्य आणून आई मला म्हणाली,

" औषध कसलं घ्यायचं वेड्या! मला तसं काय होतं आहे? अन् आतां तूं घरीं परत आलास हेंच खरं औषध मला मिळालं! आतां एकदा तुझ्यावरचा इकडच्या मनांतला राग पुरता गेला अन् तूं आपल्या बायकोला इकडे आणलीस, कीं माझ्या मनाची सारी काळजी संपली!"

आईचे ते शब्द ऐकून मी एकदम चपापलों. " तूं आपल्या बायकोला इकडे आणलीस " असें म्हणाली याचा अर्थ काय? माझें माणिकशीं लग्न झालें असा आईचा समज होता कीं काय? आणि आईची तशी समजूत असेल तर बाबांची, सर्वांचीच तशी समजूत नसेल काय?

क्षणभर आश्चर्यानें भांबावून मीं स्तब्ध बसलों.

पण दुसऱ्याच क्षणीं तें आश्चर्य विरूनहि गेलें. आईची व इतर मंडळींचीं तशी समजूत होणें अगदीं साहजिक आहे असें माझ्या लक्षांत आलें. माणिकच्या वर्तनाचा तिटकारा आल्यामुळें मी पुणें सोडलें, मी मुंबईस येऊन नोकरी धरली, त्या मुंबईच्या दुकानांत माझी व माणिकची विलक्षण रीतीनें पुन्हां गांठ पडली, वगैरे वगैरे एकहि गोष्ट आईला किंवा इतरांना माहीत नसणें स्वाभाविक होतें. त्यांची व राधाकान्ताची गांठच पडली नसल्यामुळें त्या साऱ्या गोष्टी अज्ञात राहणें अपरिहार्य होतें. मागें दिवाणजी मला मुंबईत भेटले होते तेव्हां त्यांनाहि या गोष्टी मुळींच कळलेल्या नव्हत्या. मी मुंबईत एकाएकीं आजारी पडल्यामुळें आई व बाबा मुंबईत आले, व नंतर मला जरा बरें वाटूं लागल्यावर माझ्या संमतीनें त्यांनीं मला वृंदावनास आणलें, येवढ्यावरून माझ्या व माणिकच्या संबंधाविषयींची खरी स्थिति आमच्या घरीं कोणालाहि कळणें शक्यच नव्हतें. मग माझा व माणिकचा विवाह

होऊन चुकला आहे अशा समजुतींतच आई असल्यास त्यांत नवल तें काय !

अशा प्रकारें मी आपल्या मनाशीं स्वतःच्या आश्चर्याचें निवारण करीत असतांना आई माझ्या तोंडाकडे सारखी पाहात होती. मी कांहींच बोलत नाहीं असें पाहून ती पुढें म्हणाली,

" शान्ताचं अन् तुझं लग्न झालं असतं तर आम्हांला सगळ्यांनाच फार आनंद झाला असता पण योगायोग तसा नव्हता त्याला काय करायचं ? बाकी झालं यांतहि मला आनंदच आहे. तिकडच्या मनांत तुझ्याविषयीं अजून थोडी अढी आहे. पण एकदां तुझी बायको इथें येऊन साऱ्या गोष्टी सुरळीत झाल्या, कीं ती नाहींशी होईलसं वाटतं. "

खऱ्या हकीगतीचे दोनच शब्द सांगितले तर आईचा सारा भ्रम नाहींसा होईल असें ती बोलत असतांना मला सारखें वाटत होतें; पण काय सांगावयाचें व कसें सांगावयाचें तेंच मला कळेना, आणि माझें मौन कायमच राहिलें.

मी कांहीं न बोलतां स्तब्ध बसलों हें पाहून आई थोडी थांबली; पण लगेच तिच्या मनांत कांहीं विचार येऊन ती पुढें म्हणाली,

" खरं म्हणशील तर तुमचे एकमेकांवरचे राग नाहींसे होऊन तूं केव्हां घरीं परत येशील, अन् तुझी बायको केव्हां दृष्टीस पडेल असं मला झालं होतं. इतके दिवस मीं कसे काढले माझं मला माहीत. तूं आजारी पडल्याची तार आल्यावर आम्ही मुंबईला आलों तेव्हां हॉटेलांत तुझी बायको केव्हांहि कशी दिसली नाहीं ? अन् तूंहि तिची चवकशी कधींच कशी केली नाहींस, असं आश्चर्य मला सारखं वाटत होतं. पण ती बोलण्याची वेळ नव्हती म्हणून मी तेव्हां स्वस्थ बसलें. त्या वेळीं ती माहेरीं गेली होती कीं काय ? मला वाटतं--"

" पण आई-" तिला मध्येंच अडथळा करून मीं म्हटलें. माझे शब्द ऐकून तिनें आपलें बोलणें थांबविलें, आणि ते शब्द उच्चारल्यानंतर पुढें काय बोलावें तें सुचेनासें होऊन मीहि स्तब्ध बसलों. त्यामुळें दोघांचेंहि बोलणें बंद होऊन कांहीं वेळ एक प्रकारची विचित्र स्तब्धता उत्पन्न झाली. मीं आईकडे पाहिलें, पण तिच्या दृष्टीला दृष्टि मिळतांच मी खालीं पाहूं लागलों.

शेवटीं मनाचा हिय्या करून मीं म्हटलें, "पण आई, मला अजून बायकोच नाहीं, तर ती माहेरीं जाणार कोठून ? माझ्या--"

"म्हणजे ?– जगदीश, तूं हें म्हणतोस तरी काय ?" माझ्याकडे विस्तारलेल्या डोळ्यांनीं पाहात आश्चर्यातिरेकाने आई उद्गारली.

"आई, माझं लग्न झालेलं नाहीं." अर्धवट वर मान करून आईकडे पाहात मीं कसेंबसें म्हटलें.

कांहीं वेळ आई कांहींच बोलली नाहीं.

जरा वेळानें तिनें विचारलें, "मग–पण–माणिकशीं–लग्न--"

तिला वाक्य नीट पुरें करतां आलें नाहीं. पण तिच्या मनांत मला कोणता प्रश्न विचारावयाचा होता तें माझ्या ध्यानांत आलें. मीं म्हटलें, "तिचा माझा कांहीं संबंध नाहीं – तिची आठवण मला पार बुजवून टाकली पाहिजे – ती माझी कोणी नाहीं."

आईला जसा प्रश्न नीट विचारतां आला नाहीं तसेंच नीट उत्तर देतांना मलाहि वाक्य नीट जुळवितां येईना. शेवटीं कसेंबसें काय तें स्पष्ट सांगण्यासाठीं मीं पुन्हां म्हटलें—

"आई, तिचं माझं लग्न झालं नाहीं. होणार होतं – पण – पण काय झालं तें मग सांगेन एखाद्या वेळीं–माझं लग्न झालं नाहीं इतकं खरं !"

दोनच वाक्यें मी बोललों, पण तीं बोलतांना माझ्या हृदयाला इतका पीळ पडला आणि मेंदूला इतका ताण बसला, कीं डोकें भणभणल्यासारखें वाटूं लागून मी अगदीं स्तब्ध बसलों. माझ्या बोलण्यानें अत्यंत विस्मित झाल्यामुळें आईहि स्वस्थच बसली.

त्याच वेळीं रोजच्याप्रमाणें ताप पाहण्यासाठीं हातांत थर्मामिटर घेऊन बाबा खोलींत आले. ते जवळ येतांच मीं म्हटलें, "आजसुद्धां मुळींच ताप नाहीं. बाबांनीं थर्मामिटर लावून पाह्यची कांहीं जरूर नाहीं."

"ठीक, ठीक" असें म्हणून ते किंचित् हंसले व त्यानीं मान वळवून आईकडे पाहिलें. त्यांच्या हास्याला प्रत्युत्तर म्हणून हास्याची छटा वास्तविक आईच्या मुद्रेवर तत्क्षणीं दिसावयाची; पण तिचें मन आश्चर्यानें इतकें भांबावलें होतें कीं तिच्या तोंडावरची गंभीर छटा चट्कन् नाहींशी झाली नाहीं. बाबांनीं वळून माझ्याकडे पाहिलें. माझाहि चेहरा त्यांना गंभीर आणि

हास्यरहितच दिसला असावा. त्यांनीं क्षणभर गोंधळून आईकडे व माझ्याकडे पाहत विचारलें--

" पण तुम्हीं असे दोघं गंभीर चेहरे करून कां बसलां आहांत ! "

आम्ही दोघेंहि कांहींच न बोलतां स्वस्थ बसलों.

बाबा मग पुष्कळ वेळ बोलत बसले होते, व माणिकविषयींच्या निराशेची, मुंबईच्या नोकरीची, राधाकान्ताच्या मदतीची बहुतेक सारी हकीगत त्यांना मीं हळूहळू सांगितली. राधाकान्ताची हकीगत ऐकून आईला व बाबांना त्याच्या अकृत्रिम स्नेहाचें कौतुक वाटलें, व मुंबईस त्याची भेट झाली नाहीं याबद्दल दोघांनाहि हळहळ वाटली.

बाबा उठून गेल्यावर आईनें माझ्याकडे पाहिलें, व उसासा टाकून ती म्हणाली, " आज मला किती समाधान वाटत आहे म्हणून सांगूं !--बाकी तूं केव्हां तरी घरीं परत येऊन साऱ्या गोष्टी ठीक होणार असं माझं मन मला नेहमीं सांगत असे. पण तेंच मन म्हणे -- म्हण आहे ना, वैरीसुद्धां जें चिंतणार नाहीं तें आपलं मन चिंतीत असतं --कधीं कधीं मला वाटे काकू आपल्या लेकाला एका तऱ्हेनं अंतरल्या तशीच मीहि आपल्या मुलाला दुसऱ्या तऱ्हेनं अंतरणार का काय कोण जाणे ! "

बोलतां बोलतां आईच्या डोळ्याला पाणी आलें, पण गालावर उतरणारे अश्रु पदरानें पुसून टाकीत ती पुढें म्हणाली, " पण मला वाटलं तितकं माझं भाग्य सरलं नव्हतं ! आतां तूं लवकर अगदीं पुरता बरा हो म्हणजे झालं. आज तुझे काका अन् काकू इथें असते तर त्यांनादेखील कितीतरी आनंद झाला असता---- "

" खरंच आई, " मीं एकदम म्हटलें' " तूं आतां खोलींत आलीस त्या वेळी मी मनाशीं काका अन् काकूंच्याविषयीं मी विचार करीत होतों. आज दोन दिवसांत त्यांच्यापैकीं कोणीच कसं माझ्या दृष्टीस पडलं नाहीं, असं मी आश्चर्य करीत होतों. तुझ्या आतांच्या बोलण्यावरून थोडासा उलगडा झाला. काका अन काकू कुठें गांवाला गेलीं आहेत होय ? "

मीं तो प्रश्न विचारतांना शांताचें नांव गाळलें हें पाहून माझें मलाच त्या क्षणीं थोडेंसें आश्चर्य वाटलें. शांता कोठें आहे हें जाणण्याची उत्सुकता तर माझ्या मनांत फार होती. असें असून आईला प्रश्न करतांना माझ्या तोंडून

तिचें नांव सहजच बाहेर कां पडूं नये, याबद्दल माझा मलाच विस्मय वाटला. बाकी मी फक्त काका व काकूंची चवकशी केली तरी आईच्या उत्तरांत शांताचाहि उल्लेख येईल व माझ्या मनाचें समाधान होईल असें वाटून मी स्वस्थ बसलों.

" काका अन् काकू विलासगडला गेलीं आहेत. " आई म्हणाली, " तीन-हो, आज मंगळवार ना-? मग बरोबर तीन वारच झाले. विलासगडाहून एका मित्रांची त्यांना तार आली. त्यांनीं कोठल्याशा गिरणीचे वीस हजारांचे शेअर घेतलेले आहेत. ती गिरणी बुडायला टेकली आहे वाटतं ! तशी तार आल्याबरोबर ते गेले. त्यांचीं त्यानंतर दोन पत्रंहि इकडे आलीं होतीं. इतक्यांत कांहीं ते इकडे येतीलसं वाटत नाहीं. "

आईनें माझ्या मनाची अगदीं निराशा केली. शांता काकांच्याबरोबर गेली किंवा नाहीं तें तिच्या बोलण्यावरून मला कांहींच कळेना. मुद्दाम शांताविषयीं आईला प्रश्न करावा कीं नाहीं अशा शंकेनें मी एक क्षणभर घोंटाळलों. पण लगेच माझ्या घोंटाळणाऱ्या मनाला वेडें ठरवून मीं आईला विचारलें,

" शांता काकांच्याबरोबर गेली असेल ? "

" नाहीं. जायचं जायचं असं ती म्हणत होती. पण मींच तिला आग्रहानं ठेवून घेतली. तीहि गेली तर घरांत मला अगदीं ओकं ओकं वाटेल असं म्हणून मीं तिला राहून घेतली आणि ती राहिली. "

" काय म्हणतेस आई ? " तें ऐकून मीं आश्चर्यानें म्हटलें, " शांता येथें आहे ? आपल्या घरीं आहे ? अन् आज दोन दिवसांत ती माझ्याकडे एकदांदेखील आली नाहीं ? "

" तुझ्याकडे आली नाहीं; पण आम्हांला नसेल इतकी तुझ्या प्रकृतीची काळजी तिला आहे. तुझ्याकडे यावंसं तिच्या मनाला वाटेना अन् --पण आतां तसं कांहीं राहिलं नाहीं-आतां ती भेटेल तुला, आणखी— "

" म्हणजे ? " आईच्या तुटक बोलण्याचा कांहींच अर्थ न समजल्यामुळें मी उद्गारलों. " तूं काय म्हणालीस ? मला नाहीं कळलं तुझं बोलणं ! आतांपर्यंत शांता मला कां नाहीं भेटली, सांग ! "

" कळेल तुला आपोआप. पण आतां ती तुला भेटेल इतकं खास. "

" म्हणजे? मी नाहीं समजलों!" असें म्हणून मी आईकडे पाहत राहिलों. परंतु आई त्यावर कांहींच बोलली नाहीं.

त्या रात्रीं अंथरुणावर पडल्या पडल्या जेव्हां मी विचार करूं लागलों तेव्हां मला दिवसभर ज्या दोन गोष्टींचा उमज पडला नव्हता त्याचा उलगडा झाला. माझा व माणिकचा विवाह झाला आहे अशा समजुतींत इतरांप्रमाणेंच शांताहि असल्याकारणानें, माझी भेट घेण्याचें टाळावेंसें वाटूनच मी वृंदावनास घरीं आल्यापासून ती माझ्या समाचाराला आली नसावी असें मला आता खात्रीनें वाटलें; व त्याचप्रमाणें सकाळीं प्रथम " कोणीं चहा केला होता?" असा मीं प्रश्न केल्यावर आई कांहीं न बोलतां स्वस्थ राहिली याचेंहि कारण शांतानें चहा केलेला होता व माझ्याजवळ तिचा उल्लेख करण्याचें टाळण्याची आईची इच्छा होती हेंच असलें पाहिजे असेंहि मला वाटलें. माझा व माणिकचा विवाह झाला नाहीं ही गोष्ट आईकडून शांताला कळावयास वेळ लागणार नाहीं असा मीं माझ्या मनाशीं तर्क केला; आणि तें कळल्यानंतर आपल्या मनांतील अढी सोडून देऊन शांता माझ्याकडे न येण्याचा प्रयत्नहि बंद करील अशी मला आशा वाटली. पण माझें एक मन अशी आशा करण्यांत गुंतलें असतां दुसरें मन मला सांगूं लागलें, कीं शांताच्या मनांत अढी उत्पन्न होण्यास माझेंच वर्तन कारणीभूत झालेलें होतें, तर त्या अढीची तीव्रता कमी होण्यासारखी तिची माझ्याविषयींची वृत्ति होत आहे असें वाटतांच मींच आपण होऊन तिच्याशीं बोलण्याचा प्रसंग आणून ती अढी पार घालवावयास नको काय? माझ्या मनाला हें पटलें, आणि असला प्रसंग मुद्दाम कसा आणावयाचा व तो आल्यावर शांताशीं काय व कसें बोलावयाचें याचा विचार करतां करतांच त्या रात्रीं मला झोंप लागली.

रात्रीच्या विचाराला अनुसरूनच सकाळीं मी जरा लवकर उठलों आणि तोंड धुण्याचें पाणी ब्राह्मणानें आणलें तेव्हां त्याच्याबरोबर आईला निरोप पाठविला, कीं आज मला पुष्कळ हुशारी वाटत आहे तेव्हां सर्वांच्याबरोबर चहा घ्यावयास मी माजघरांतच येतों. मनांतील हेतु हा कीं, चहाच्या वेळीं शांता माजघरांत असेल व मग दोन दिवसांच्या अबोल्याचा बांध फुटून बोलण्याच्या प्रवाहाला कशीतरी वाट सांपडेल.

पण माजघरांत जाऊन पाटावर बसल्यावर पाहतों तों माझी निराशाच झाली. एकटी आईच तेथें माझी वाट पाहात बसली होती. मी आईला विचारलें, " अं ? आज बाबांना नाहीं चहा घ्यायचा ? "

" आज सकाळीं लवकर उठून शेतावर जाणं झालं. त्या वेळींच आज चहा झाला. "

" असं का ? मला कांहींच दाद नाहीं. आधींच मी उशिरा उठणारा अन् आतां तर काय आजारीपणामुळं वाटेल तितकी झोंप माफ आहे. तरी आज मुद्दाम लवकर उठलों, बरं का आई ? "

" उठलाहेस खरा आज लवकर ! " आई हंसून म्हणाली.

" अन् शांताहि दिसत नाहीं ? तिचाहि चहा झाला आहे का काय लवकर ? " मीं विचारलें.

" तिला चहा घ्यायचा आहे तर ! पण आज एकादशी म्हणून गड्या-कडून बागेंतल्या तुळशी आणण्यासाठीं ती मघांशींच मागीलदारीं गेली आहे. येईल आतां. पण तिच्यासाठीं थांबायचं कांहीं कारण नाहीं. तूं पी आपला चहा. "

शांतासाठीं थांबण्याचें कारण नाहीं असें आईला वाटत असलें तरी मला कोठें वाटत होतें ! मीं आईला म्हटलें, " नको, नको. थांबतों मी. मला तरी कसली घाई आहे. शिवाय शांता—"

मी पुढें बोलणार इतक्यांत हातांत फुलांनीं आणि तुळशीपत्रांनीं गच्च भरलेली परडी घेऊन शांतानें माजघरांत पाऊल टाकलें व येतांच आईला म्हटलें, " काकू, पुरतील ना इतकीं तुळशी—"

इतक्यांत मी तिच्या दृष्टीला पडलों आणि तिचा तो प्रश्न तसाच अपुरा राहिला. मी माजघरांत असेन अशी शांताची मुळींदेखील कल्पना असणें शक्य नव्हतें, व त्यामुळें मला पाहतांच ती दचकली. पण तें दचकणें तिच्या चेहऱ्यावर क्षणार्धपर्यंतच प्रतिबिंबित झालें. ती अर्धवट हंसली. मीहि अर्धवट हंसलों. " कसं काय ! " असा प्रश्न विचारण्याचा माझा हेतु होता. पण माझे ओंठ फक्त हलले, शब्द मुळींच उमटले नाहींत. तो अस्फुट प्रश्न शांतानेंहि जणूं काय ओळखला. तिच्या दृष्टींत जी चलबिचल झाली तींतच माझ्या प्रश्नाचें उत्तर मला सांपडलें.

आम्हां दोघांची ती संभ्रमित स्थिति आईच्या लक्षांत आली किंवा नाहीं कोण जाणे. ती शांताला म्हणाली, " रगड झालीं इतकीं तुळशीपत्रं. थांब, तूं बैस इथें. मी ही परडी देवघरांत नेऊन ठेवतें अन् बाळूनं अजून चहा कां आणला नाहीं तेंहि पाहतें. बैस तूं इथें. "

बोलतां बोलतां आई पाटावरून उठलीदेखील. शांताच्या हातांतून परडी घेऊन ती आंत गेली.

शांता एकटी भेटली, कीं तिच्याशीं काय बोलावयाचें आणि कसें बोलावयाचें याविषयीं मीं रात्रीं कितीतरी विचार करून ठेवला होता. पण आई आंत गेली आणि माजघरांत मी व शांताच राहून बोलावयाची वेळ आली तेव्हां ते सारे विचार पार वाफरून गेले. एकहि शब्द मला सुचेना. शांताहि कांहीं बोलेना. त्या वेळची ती मनःस्थिति फारच विचित्र होती.

शेवटीं घशाशीं आलेला आवंढा गिळण्यासाठीं खांकरून मीं शांताकडे न पाहतां म्हटलें, " शांता, तुझा माझ्यावर फारच राग असेल हें मला कळतं. तूं राग धरावास असंच वर्तन माझ्या हातून घडलं हेंहि मला समजतं. पण–पण–क्षमा कर यापेक्षां मी तरी काय म्हणूं ?–करशील ना क्षमा—"

" इश्श् ! क्षमा कसली मी— " एवढेच शब्द शांताच्या दाटून आलेल्या गळ्यांतून बाहेर पडले.

मीं वर मान करून पाहिलें तों ती पदरानें डोळे पुशीत होती.

" माझ्या मनांत— " मी पुढें बोलणार तोंच माजघरच्या उंबऱ्याशीं कपबशांचा आवाज झाला.

माझें बोलणें तसेंच राहिलें. शांतानें वर मान करून माझ्याकडे पाहिलें. आसवांनीं आर्द्र झालेली तिची नजर माझ्या नजरेला मिळाली. नेत्रमीलनाच्या त्या क्षणार्धांत एकमेकांच्या हजार शब्दांची ओळख आम्हांला—निदान मला तरी पटली.

२

" काय बाई, आभाळांत नुसते ढग फिरताहेत ! " आकाशाकडे पाहात आई म्हणाली. " पावसाचा एक थेंबसुद्धां पडेना ! यंदा शेतांची दशा तरी काय होणार कांहीं कळत नाहीं ! "

आई हें बोलली त्या वेळीं तिसऱ्या प्रहरच्या चहासाठीं मी, शांता व आई व्हरांड्यांत जमलों होतों. बाबा कांहीं कामानिमित्त मुंबईला गेले होते.

"बाकी आज पाऊस पडेलसं वाटतं." शांता ढगांकडे पाहात म्हणाली.

"छे: !" मीं म्हटलं. "हे सगळे ढग नुसते पांढरे फटक आहेत."

"पण मृगाचा पाऊस नेहमीं एकाएकीं कोसळतो म्हणतात !" शांता म्हणाली. "मला बाबांनीं एक संस्कृत सुभाषित शिकवलं होतं त्यांत श्रीमंत मनुष्याची बुद्धि चळली कीं मृगाच्या वृष्टीप्रमाणें दारिद्य त्याच्यावर एका क्षणांत कोसळतं अशी एक उपमा होती. मला आतां तो श्लोक नक्की आठवत नाहीं. काय बरं—'मतिभ्रष्टो भवेत्—' असाच कांहींतरी प्रारंभ होता त्या श्लोकाचा. छे ! नाहीं आठवत."

श्लोक आठवण्याचा प्रयत्न करण्यासाठीं तिनें डाव्या हाताचें मधलें बोट दोन्ही भिवयांच्या मधोमध ठेवलें आणि डोळे मिटले त्या वेळीं तिची मुद्रा फारच मनोहर दिसली. तिनें बोलणें संपवून माझ्याकडे पाहिलें तेव्हां मी तिच्याकडे जास्त निरखून पाहात आहे कीं काय अशी माझी मलाच शंका आली व मीं चटकन् दृष्टि वळविली.

"आतांशा सारं संस्कृत माझ्या स्मरणांतनं जात चाललं हो ! बाबा इथें असते तर ते मला बोलल्याशिवाय राहिले नसते बाई !" असें म्हणून ती किंचित् हंसली व आईकडे पाहूं लागली.

तिच्या एकंदर चर्येवरून श्लोक न आठवल्याबद्दल तिच्या मनाला वाईट वाटत होतें हें उघड दिसलें. तिचें हें हंसणें कृत्रिम होतें व मनांतील वाईट वाटणें लोकांनीं ओळखूं नये येवढाच त्या हंसण्यांत हेतु होता हें मीं तत्क्षणीं ओळखलें. तिच्या मनांतील तो खेद, आणि तोंडावरील तें हास्य यांनीं माझ्या मनांत अनेक विचार उत्पन्न केले. संस्कृत श्लोकांविषयींची तिची ती आस्था माणिकमध्यें होती काय ? आपल्या मनाला थोडा खेद झाला तरी त्यापासून इतरांना त्रास न व्हावा म्हणून तो लपविण्याचा प्रयत्न माणिकनें केला असता काय ? असे प्रश्न माझ्या मनांत उभे राहून जणूं काय त्या प्रश्नांचीं उत्तरें शोधण्यासाठींच शांताच्या तोंडाकडे एकसारखी टक लावून मी पाहात बसलों.

ब्राह्मणानें चहा आणला तेव्हां मी माझ्या विचारांतून जागा झालों.

चहा पितां पितां मघांचाच विषय काढून मीं शांताला म्हटलें, " बाकी तूं म्हणतेस त्या सुभाषितांतली उपमा कबूल केली तरी त्यावरून आज पाऊस पडेल असं नाहीं कांहीं सिद्ध होत."

" मी कुठें म्हणतें आहे सिद्ध होतं म्हणून ? पण मला आपलं वाटतं आज पाऊस पडेल. कां तें सांगतां येणार नाहीं. पण वाटतं खरं. "

" माझी खात्री आहे आज पाऊस पडायचा नाहीं. पैज लावायची आहे का ? "

" आमच्या जगदीशाची म्हणजे नेहमीं कांहीं झालं कीं पैज " आई मध्येंच म्हणाली, " पैज रे कसली येवढ्याशा गोष्टींत ! "

असें म्हणून आई हंसली व शांताहि हंसली.

चहा संपवून पेला खालीं ठेवीत मीं शांताकडे पाहात म्हटलें, " बरं पैजेचं जाऊं दे. पण आज पाऊस पडणार नाहीं याविषयीं माझी इतकी खात्री आहे, कीं आतां जरा वेळानें थोडें बाहेर हलके हलके फिरून यायचं मीं मनाशीं मघांपासूनच ठरवलं आहे. रोजच्यासारखं गाडींत न जातां आज जरा पायानंच लांब फिरायला जाण्याइतकी मला हुशारी वाटत आहे. "

" झालं, आतां तूं आपलं म्हणणं खरं करण्यासाठीं वाटेल तें करशील. " आई म्हणाली. " भारी हट्टी तुझा स्वभाव हो जगदीश ! "

आईच्या तोंडून तें वाक्य बाहेर पडावयास आणि आमची तिघांचीहि एकमेकांची दृष्टादृष्ट होण्यास एकच गांठ पडली. माणिकविषयीं मीं जें हट-वादीपणाचें वर्तन केलें होतें त्याचा आईच्या वाक्यांत न कळत उल्लेख झाल्यासारखें मला त्या क्षणीं वाटलें, व त्या दोघींच्याहि मनांत त्या वेळीं तीच कल्पना आली असावीसें त्यांच्या चेहऱ्यावरून दिसलें. कारण माझ्याकडे पाहतांच त्या दोघींनींहि आपली दृष्टि झटकन् दुसरीकडे फिरविली.

सर्वांनाच अप्रिय असलेली त्या वेळची ती मनोवृत्ति नाहींशी करण्याकरितां मीं आईला लगेच म्हटलें, " आई, आतां मी आपल्या स्वभावांतला हट-वादीपणा हळूहळू काढून टाकणार आहें हो ! मी केवळ हट्टानं आज फिरायला जायला निघालों आहे असं नाहीं कांहीं. मला खरंच आज बरीच शक्ति आल्यासारखं वाटत आहे. "

बोलतां बोलतां शांताकडे वळून मीं विचारलें, " येतेस का आज माझ्याबरोबर ? "

" जायचं असलं तर जरा लवकरच जाऊन या. " आई म्हणाली. " म्हणजे मग पाऊस आला न आला तरी कांहीं काळजी नाहीं. "

" चलायचं आहे का ? " मीं शांताला पुन्हा प्रश्न केला.

" हं, चला. "

लगेच आम्ही उठलों. मीं कपडे घातले, शांतानें नेसणें बदलून पोलकें घातलें, आणि आम्ही निघालों. आम्ही बंगल्याच्या पायऱ्या उतरत होतों तोंच आई आंतून ओरडून म्हणाली, " जगदीश ! अरे जगदीश ! एखादी छत्री तरी घ्यायची होतीस रे. आला पाऊस खरोखरीच म्हणजे मग ? "

" नको ग आई, कांहीं येत नाहीं पाऊस. " पायऱ्या उतरत मीं मोठ्यानें उत्तर दिलें.

" बघ बाबा. नाहीं तर येऊं दे पाऊस, अन् या भिजून घरीं. नुक्ताच कुठें हिंडा-फिरायला लागला आहेस तो अंथरूण धरशील ! " आईचे हे शब्द अर्धवट ऐकत आम्ही दोघें बंगल्याच्या फाटकाबाहेर पडलोंदेखील.

माझ्या अंगांत अजून पूर्वीइतकी शक्ति आली नव्हती; त्यामुळें आम्ही हलके हलकेच चाललों होतों. मोठ्या सडकेनें कांहीं वेळ चालल्यावर मीं शांताला म्हटलें,

" मोठा रस्ता सोडून या उजव्या हाताच्या बंधाऱ्यावरून जाऊं या. मोठा रस्ता रोज आहेच. तुला कसं वाटतं ? "

" हं, कबूल आहे. " म्हणून शांता माझ्याबरोबर वळली, व रस्ता टाकून आम्ही शेतांच्या आणि बागांच्या कडेकडेनें चालूं लागलों.

आभाळांत ढग आले होते तरी त्या वेळचा देखावा मनोहर होता. हत्तीसारख्या स्थूल देहाच्या शुभ्रवर्ण ढगांची पश्चिमेकडे गर्दी झाली होती. कापसांच्या अजस्र गठ्यांप्रमाणें एकावर एक रचलेल्या त्या ढगांमागें सूर्य जवळजवळ झांकल्यासारखा झाला होता. परंतु त्या ढगांच्या कडेकडेनें बाहेर पडणाऱ्या सूर्यकिरणांची शोभा मात्र त्यामुळें दुणावली होती. किरणांच्या तेजानें ढगांच्या कडा तळपत होत्या, आणि ढगांचे ते प्रचंड देह विजेच्या अलंकारांनीं वेष्टिल्याचा क्षणभर भास होत होता.

हातांतील काठी वर उचलून ढगांकडे दाखवीत मीं शांताला म्हटलें, “ तें बघ ! किती सुंदर देखावा आहे हा ! ”

थबकून वर मान करून शांता म्हणाली, “ खरंच ! सुंदर आहे. ”

“ एखादा कवि असता तर त्यानं या सौंदर्याचं बहारदार वर्णन केलं असतं, नाहीं ? ”

“ असता तर असं कशाला म्हणायला पाहिजे ! ” ढगांवर तशीच दृष्टि कायम ठेऊन शांता म्हणाली. “ आपल्या संस्कृत कवींनीं सूर्योदयाची अन् सूर्यास्ताचीं इतकीं विविध वर्णनं करून ठेवलीं आहेत, कीं कोणताहि प्रत्यक्ष देखावा पाहिला, कीं त्याला थोडं फार लागूं होणारं वर्णन चांगल्या पाठांतराच्या माणसाला सुचायला कांहीं हरकत नाहीं. ”

“ मग या देखाव्याचं एखादं वर्णन तुला आठवत असलं तर सांग पाहूं ! ” मीं म्हटलें.

“ इश्श ! ” ढगांवरची दृष्टि काढून माझ्याकडे पाहात हंसत शांता झटकन् उद्गारली. “ माझं इतकं पाठांतर आहे कीं काय ! बाबांनीं काय थोडं फार माझ्याकडून वाचून घेतलं आहे तेवढंच ! उलट कॉलेजांत शिकणारांनींच कितीतरी संस्कृत वाचलेलं असतं. ”

“ तें खरं आहे. पण— ” किंचित् थांबून मीं पुढें म्हटलें; “ एक तर मला पहिल्यापासूनच संस्कृताची गोडी कमी असल्यामुळें नेमलेल्या पुस्तकांपलीकडे मीं कधीं संस्कृत वाचलं नाहीं. बी. ए. च्या पहिल्या वर्षांत पुष्कळसं संस्कृत, विशेषतः उत्तररामचरित्र वाचायचं मीं मनाशीं ठरवलं होतं. इंटरची परीक्षा संपवून मुंबईहून वृंदावनास घरीं आलों तेव्हां येतांना उत्तररामचरित्राची एक प्रत मीं विकतदेखील आणली होती. पण—पण म्हणतात ना त्यांतली गत—गेल्या दीड दोन वर्षांत साऱ्याच गोष्टी विपरीत झाल्या ! ”

संस्कृत वाङ्मयासंबंधीं प्रथम बोलणें निघतां निघतां त्याला हें अकस्मात् निराळेंच वळण मिळालेलें पाहून माझें मलादेखील क्षणभर आश्चर्य वाटलें; शांताला तर तें वाटलें असलेंच पाहिजे. मागील दोन वर्षांच्या एकंदर हकीगतीची कल्पना मनांत येतांच माझ्या बोलण्यांत खिन्नतेची थोडी छटा आली. पुढें कांहींच न बोलतां मी स्वस्थ बसलों.

शांताहि स्तब्ध राहिली. गेल्या गोष्टींचा उल्लेख माझ्याकडून झाल्यावर

तिच्या व माझ्या मोडलेल्या विवाहाची स्मृति तिला होणें अगदीं साहजिक होतें. तीच आठवण तिच्या मनांत या वेळीं उभी राहिली असावीसें मला वाटलें. हळूच चोरट्या नजरेनें मीं तिच्या चेहऱ्याकडे झटकन् पाहिलें. तिची मुद्रा अतिशय गंभीर झाली होती.

कांहीं वेळ एकमेकांशीं कांहींच न बोलतां आम्ही वाटेनें चाललों होतों. उजव्या हातच्या एका बागेंत मोट चालली होती. तिच्या लांकडी चक्कीचा "कुंऊं, कुंऊं" असा किंचित् कर्कश आवाज ऐकूं येई, तो थांबल्यावर मोटभर पाणी कुंड्यांत पडलें, कीं त्याचा धो धो आवाज कानांवर पडे, आणि जरा वेळानें चक्कीची किरकिर पुन्हां सुरू होई, बागेंतील फुलझाडांचा मिश्र सुगंध सारखा नाकांत भरत होता. मधूनच बागेंत कोणीतरी कोणाशीं मोठ्यानें बोले तें कानांवर येई, आणि एखादे वेळीं एखादा दुसरा पक्षी बागेच्या गर्द झाडींतून पंखांचा फडफडाट करीत बाहेर पडून बाहेरच्या मोकळ्या हवेंत भरारी मारीत जातांना दृष्टीला दिसे.

स्तब्धतेनें तसेंच चालणें कांहीं वेळानें मला असह्य झालें. पुन्हां पूर्वींचाच विषय काढण्याच्या हेतूनें मीं शांताला विचारलें, "तूं वाचलं आहेस ना उत्तररामचरित्र?"

"हो. अन् मला तें फारच आवडलं आहे. मनाला एखादे वेळीं चैन पडेनासं झालं कीं त्यांतले श्लोक मी मनाशीं म्हणत बसते."

"तुला काकांची अन् काकूंची फार आठवण होत असेल?" मीं म्हटलें. "पण आमच्या घरीं तुला परक्यासारखं कां वाटतं?"

"इश्श्, असं नाहीं कांहीं." शांता मानेला किंचित् हिसडा देत म्हणाली. तिचें तोंड त्या वेळीं अगदीं गोरेंमोरें झालें होतें.

"मग?"

"प्रत्येक माणसाला कांहींतरी दुःखं असतातच ना?" शांता गंभीर चेहरा करून म्हणाली, "दुःखं नसलीं तर निदान दुःखाच्या आठवणी शिल्लक असतात. अन् त्या आठवणी आपण विवेकानं कितीहि दडपूं म्हटलं तरी आपले प्रयत्न व्यर्थ ठरतात."

कोणत्या दुःखदायक गोष्टीला उद्देशून शांता बोलत होती तें कळणं फारसं कठीण नव्हतं. तिचे ते करुण शब्द ऐकून माझ्या मनाची कालवाकालव

झाली. कांहींतरी बोलून तिचा तो दुःखावेग नाहींसा करावासें मला अतिशय वाटलें. पण काय बोलावें तें मला सुचेना.

जरा पुढें चालून गेल्यावर मीं तिला म्हटलें, "आपण दोघं मिळून रोज उत्तररामचरित्र वाचीत जाऊं. माझा वेळ तरी नीट जाईल. पत्ते कुटण्यापेक्षां कांहीं वाचलं तर बरं. वाचूं रोज; आहे तुला कबूल ?"

"अं–" जरा घोंटाळून शांता म्हणाली, "कबूल काय असायचं त्यांत ? पण मी आतां फार दिवस इथें राहणार नाहीं म्हणून जरा हें आहे. कालच मीं बाबांना पत्र लिहून विचारलं आहे, कीं केव्हां येऊं मी विलासगडला. काकूंना एकटं राहावं लागूं नये म्हणून मी राहिलें होतें. आतां कांहीं त्या एकट्या नाहींत. तेव्हां आतां जावं झालं."

"काय ! तूं जायचं म्हणतेस !" चालतां चालतां एकदम थबकून मीं तिला विचारलें.

मी थबकतांच तीहि उभी राहिली. पण ती कांहींच बोलली नाहीं.

मी पुढें म्हटलें, "पण आम्ही तुला जाऊनच दिलं नाहीं तर ?"

"म्हणजे !" किंचित् हंसत शांता म्हणाली.

"आमचं घर तुला नकोसं वाटतं का ? आमच्या घरांतलीच तूं होणार नाहींस का ?"

तो प्रश्न विचारतांच माझें सारें अंग रोमांचांनीं थरारलें. मी कांहीं भलतेंच बोललों कीं काय, अशा शंकेनें माझें मन कंपित झालें; आणि शांता काय उत्तर देईल अशा अनिश्चयपूर्ण उत्सुकतेनें माझें हृदय धडधडूं लागलें.

कांहीं वेळानें बंधाऱ्याच्या कडेलाच एक विहीर होती तिच्या मोटेच्या कट्ट्यावर आम्ही बसलों. तेथील मोट नुकतीच सोडल्यासारखी दिसत होती. थोड्या अंतरावर बागवानाचें बारकेंसें झोपडें होतें. झोंपड्याच्या बाहेरच्या बाजूची चार हात जागा सारवून साफ केलेली दिसत होती, आणि तेथें तीन लहान लहान उघडीं नागडीं मुलें खेळत होतीं. दोन कुत्रीं पुढील दोन पायांवर डोकें टेंकून किलकिल्या डोळ्यांनीं मुलांचें खेळणें पाहात होतीं आणि अर्धवट टवकारलेल्या कानांनीं त्यांचे बोबडे शब्द ऐकत होतीं. पलीकडे दोन कोंबड्या दाणे टिपीत आणि समाधानाचा 'कुकुकुकुकू' असा आवाज करीत हिंडत होत्या आणि त्यांच्यामागून त्यांचीं छोटीं छोटीं पिलें

चिंव चिंव करीत चिमुकल्या पायांनीं धांवत होतीं. झोंपडीच्या आंतील बाजूस कोणीतरी—बहुतकरून बागवानाची बायको—जात्यावर दळावयास बसली होती. तिचें तें खणखणीत आवाजांतील कुणबाऊ गाणें आम्हांला स्पष्ट ऐकूं येत होतें.

कांहीं वेळ आम्ही दोघेंहि तें दृश्य पाहण्यांत गुंग होऊन स्तब्ध बसलों होतों. नंतर शांता हलकेंच माझ्याकडे मान करून म्हणाली, " एका दृष्टीनें किती सुंदर संसार आहे हा ! "

" आहे खरंच, या गरिबीच्या चिमुकल्या संसारांत कांहीं अवर्णनीय सौंदर्य आहे खास ! त्यांत कांहीं संशय नाहीं. पण मला वाटतं प्रत्येक मनुष्याच्या संसाराच्या सौंदर्याविषयींच्या कल्पना कालांतरानं थोड्या फार पालटत असतात. माझंच पाहाना ? कांहीं दिवसांपूर्वी संसाराचं हें चित्र मला इतकं रमणीय कदाचित् वाटलं नसतं ! "

" माणसाच्या रुचि नेहमींच बदलत असतात. " शांता म्हणाली, " पण हा नियम लागूं करावयाचा म्हणजे काल अप्रिय वाटणारी गोष्ट जशी आज प्रिय होते त्याचप्रमाणें आज प्रिय असलेल्या वस्तु उद्यां अप्रिय होण्याचा पुष्कळ संभव आहे, नाहीं का ? "

शांताचें हें बोलणें मोठ्या चतुराईचें होतें व त्या बोलण्यांतील मर्महि माझ्या ध्यानांत आल्यावांचून राहिलें नाहीं. तें मर्म मीं ओळखलें आहे असें मुद्रेनें दाखवीत मीं म्हटलें, " हो, तत्त्वतः असा सिद्धान्त काढायला कांहीं हरकत नाहीं. पण गेल्या तीन चार महिन्यांत विचित्र अनुभवांचे माझ्या मेंदूवर असे कांहीं तडाखे बसले आहेत, कीं घाव मारून एखादी पाचर कायम बसवावी त्याप्रमाणें त्या तडाख्यांनीं जुन्या रुचीपैकीं बहुतेकांचा चुराडा उडून नव्या रुचींना मनांत कायमचं स्थान मिळालं आहे. मी आतां पुष्कळ शहाणपण शिकलों आहे. वेड्या बहकलेल्या मनाच्या आवडीनिवडी सारख्या बदलत असतील; पण शहाणपणाच्या आणि अनुभवाच्या टाकीनं तयार झालेली रुचि कायम टिकायला हरकत नाहीं. तुला कसं वाटतं ? "

" हं, बरोबर आहे. " असें हलकेच म्हणून शांतानें मंदस्मित केलें व ती पुढें म्हणाली, " मग आतां या नव्या कायम झालेल्या आवडीप्रमाणें एखाद्या बागवानाची मुलगी पाहून ठेवायला सांगितलं पाहिजे काकूंना ! "

" शांता ! " तिचा तो अनपेक्षित विनोद ऐकतांच मीं एकदम आवेगानें म्हटलें, " असली थट्टा—"

पण माझें वाक्य पुरें होण्यापूर्वींच एकाएकी अतिशय सोसाट्याचा वारा सुटला, पाचोळा आणि माती यांचे लोटच्या लोट उडवीत वाऱ्याची वावटळ आम्हीं बसलों होतों तेथपर्यंत आली, आणि आम्हां दोघांनाहि कांहीं वेळ तोंडें झांकून बसणें भाग पडलें. जरा वेळानें तोंडावरचा पदर दूर करीत शांता म्हणाली.

" बाई, बाई ! काय वारं हें ! अन् गार किती आहे ! "

" एकदम काय वारं सुटलं हें ! "

" अन् तें पाहिलं का ? " पश्चिम क्षितिजाकडे बोट दाखवीत शांता म्हणाली, " मघाचे पांढरे ढग नाहींसे होऊन किती काळेकुट्ट ढग जमले आहेत हे ! ती वीज चमकली ! "

" खरंच ! "

" माझं भविष्य खरं ठरणार अं ! " शांता हंसत म्हणाली.

इतक्यांत गडगडण्याचा आवाज झाला.

" चला उठा ! " मीं अर्धवट उठत म्हटलें. " माझं भविष्य खोटं ठरल्याची कबुली द्यायची माझ्यावर पाळी आली तरी चालेल; पण पावसांत सांपडून भिजायला नको. "

मी व शांता उठलों आणि चालूं लागलों.

इतक्यांत झोंपडीपुढें खेळणाऱ्या बागवानांच्या मुलांत रडारड झालेली आम्हीं ऐकली व म्हणून आम्ही थांबून मागें वळून पाहिलें.

वावटळीनें आणि गडगडाटानें तीं लहान लहान मुलें घाबरून जाऊन झोंपडींत पळत जात होतीं, व त्या धांदलींत सर्वांत लहान मूल ठेंच लागून पालथें पडलें होतें. त्यानें मोठी किंकाळी फोडली व तीं ऐकून पुढें गेलेलीं दोन मुलेंहि परत येऊन त्याच्याकडे पाहून रडावयास लागलीं.

" अरेरे ! " असें म्हणत शांता झटकन् पुढें झाली. मीहि तिच्या मागोमाग गेलों.

त्या पडलेल्या मुलाला शांतानें उचलून घेतलें. त्या मुलाची हनुवटी दुखावलीं होती व तीमधून रक्त वाहत होतें.

आंत मुलांच्या आईचें दळणें व गाणें झपाट्यानें चालू होतें. जात्याच्या घरघरीपुढें आणि स्वतःच्या खणखणणाऱ्या आवाजापुढें तिला बाहेरच्या गोंधळाची दाद असणें शक्यच नव्हतें.

आम्हांला पाहून तीं दुसरीं दोन मुलें चपापलीं व त्यांचें रडणें बंद झालें. शांतानें कडेवरच्या मुलाकडे पाहात म्हटलें, " बरंच रक्त येत आहे हो ! उगी बाळ, उगी ! "

नंतर माझ्याकडे वळून ती म्हणाली, " हातरुमाल आहे ना खिशांत ? झटकन् विहिरीवर जा अन् मोटेच्या कुंड्यांत पाणी असेल त्यांत रुमाल भिजवून आणा. लवकर ! ओ–उगी–अं–बाळ उगी ! "

मीं कोटाचे व विजारीचे सारे खिसे भराभर तपासून पाहिले, पण हात-रुमाल सांपडेना. हताश होऊन मीं म्हटलें, " च ! हातरुमाल नाहीं ! "

" शाबास ! आतां कसं ? उगी, उगी अं ! बाळ, उगी ! "

जरा वेळ शांता गोंधळली. रुमालाची उणीव कशी भरून काढावी तें न सुचल्यामुळें मीहि घोटाळलों.

पण क्षणार्धांत शांताच्या मनाचा कांहींतरी निश्चय झाल्यासारखा दिसला. " बरं, कांहीं हरकत नाहीं " असे अर्धस्फुट स्वरानें म्हणत तिनें झटकन् नेसत्या पातळाचा पदर डाव्या हातांत धरून उजव्या हातानें फाडला. फाडलेला तुकडा माझ्या हातांत देत ती म्हणाली, " जा, भिजवून आणा लवकर. "

मीं फडकें भिजवून आणलें व शांतानें त्या मुलाची हनुवटी स्वच्छ केली. माझ्याकडे पाहून हंसत ती म्हणाली, " पाहा, आमचं बायकांचंच वस्त्र ऐन वेळेला उपयोगाला आलं का नाहीं ? तुमचा पुरुषांचा हा विलायती पोषाख किती निरुपयोगी आहे ? "

कांहींच न बोलतां नुसतें हंसत मीं तिच्याकडे पाहिलें. मनांतील विचारच त्या वेळीं बोलून दाखवावयाचे असते तर ते कितीतरी होते. शांताच्या त्या एकंदर वर्तनानें माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला होता. तिच्या सदय हृदयाची मला पुरी साक्ष पटली होती, तिचा साधेपणा पाहून मला कौतुक वाटत होतें, आणि नेसतें पातळ फाडण्याच्या वेळची तिची आनंदी मुद्रा पाहून तिच्याविषयीं परमावधीचा आदर मला वाटूं लागला होता.

माझ्या मनानेंच मला प्रश्न विचारला, “ माणिकनें अशा स्थितींत आपलें पातळ फाडलें असतें काय ? ”

मी किती वेळ तरी विचार करीत शांताकडे टक लावून पाहात उभा राहिलों होतों. शेवटीं मीं मनाशीं म्हटलें, “ बायको असावी तर अशी असावी ! हें रत्न टाकून मीं मूर्खानें माणिकचा नाद धरला होता ! धिक्कार असो मला ! ”

इतक्यांत आकाशांत मोठी मेघगर्जना झाली, विजेचा क्षणिक लखलखाट झाला आणि मोठाले टपोरे थेंब जमिनीवर पडल्याचा आवाज होऊन आमच्या अंगावरहि शिंतोडे पडले.

“ हं. पाऊस आलाच, ” मीं तोंडावरील थेंब पुशीत शांताला म्हटलें. “ मला वाटतं आतां आपण या झोंपडींतच शिरूं. पावसांत भिजत घरीं जाण्यांत अर्थ नाहीं. ”

“ हो, हो. अन् या मुलालाहि त्याच्या आईच्या स्वाधीन केलं पाहिजे.” असें म्हणत शांता पुढें झाली आणि आम्ही दोघंहि झोंपडींत शिरलों.

बाहेर पावसाची जोराची वृष्टि सुरू झाली.

घरीं आल्यावर आई मला पुष्कळ बोलली. पण तिच्या नेहमींच्या स्वभावाला अनुसरून तिचें रागें भरणें फारच थोडा वेळपर्यंत टिकलें आणि जेवावयाच्या वेळेपर्यंत तर तिच्या रागाचा मागमूसहि उरला नाहीं.

पण जेवावयास पानावर बसल्यापासूनच मला हिंव भरल्यासारखी थंडी वाजूं लागली. अन्नावरची माझी वासना एकाएकीं नाहींशी झाली आणि मी भरलेलें ताट तसेंच टाकून खोलींत जाऊन निजलों. आई व शांता अगदीं घाबरून गेल्या. कितीहि पांघरूण घेतलें तरी माझ्या हिंवाचा जोर कमी होईना.

शेवटीं हिंव कमी व्हावयास लागून ताप भरूं लागला. हळूहळू ताप पुष्कळच भरला. आईनें गड्याला पाठवून डॉक्टरांना बोलावून आणलें तेव्हां माझ्या अंगांत चार डिग्री ताप होता. पुढें काय झालें त्याची मला शुद्धच राहिली नाहीं. तापाच्या भरांत भान विसरून मी अंथरुणावर अगदीं निपचित निजून होतों.

मी भानावर येऊन डोळे उघडले तेव्हां किती वाजले होते कोणास ठाऊक, पण बरीच रात्र झाली होती खास. कारण सगळीकडे अगदीं सामसूम असल्यासारखें मला वाटलें. थोडासा कानोसा देऊन ऐकलें तेव्हां पावसाच्या लहानशा सरीची बाहेरची झिमझिम तेवढी ऐकूं आली. खोलींत माझ्या उशागती लहान वात करून ठेवलेल्या दिव्याचा मंद प्रकाच पडला होता. भिंतीवरील घड्याळाची टकटक एकंदर शांततेमुळें अधिक मोठ्यानें झाल्यासारखी वाटत होती. अंथरुणाशेजारीं एका खुर्चीवर शांता कायसें वाचीत बसली होती. दिव्याचा प्रकाश तिच्या तोंडाच्या उजव्या अंगावर पडून तिचे आधींच रेखीव असलेले नाकडोळे अधिक रेखीव दिसत होते, व तिच्या मूळच्या गौरवर्णावर मनोहर तांबूस कांति आल्यासारखें वाटत होतें. मीं डोळे उघडलेले तिनें पाहिलें नाहीं. मी स्वस्थ निजलों आहे अशा समजुतीनं ती वाचण्यांत गर्क झाली होती. तापानें भारावलेले माझे डोळे पुरते उघडत नव्हते. पण तशा त्या अर्ध्या उघडलेल्या डोळ्यांनींच मी शांताच्या चेहऱ्याकडे पाहात राहिलों.

शेवटीं ‘ कर्रर्र टण् ! कर्रर्र टण् ! ’ असे दोन ठोके घड्याळांत वाजले व लगेच शांतानें पुस्तक मिटून माझ्याकडे पाहिलें.

मी जागा आहे असें पाहून तिला आश्चर्य वाटलेसें दिसलें, “ आतां बरं वाटतं आहे ना ? ” तिनें विचारलें.

“ ताप कमी झाला नाहीं मला वाटतं. ” मीं हलके हलके म्हटलें. “ अंगाची आग अजून होते आहे. ”

“ आतां हा डोझ घेतल्यावर उतरेल ताप. ” असें म्हणत तिनें टेबला-वरील औषधाची बाटली घेतली व कपानें माझ्या तोंडांत जपून औषध घालून संत्र्याची फोड सोलून जिभेवर ठेवली.

“ आई कुठें आहे ? ” संत्रें चघळीत मीं विचारलें.

औषधाची बाटली व कप परत टेबलावर ठेवून खुर्चीवर बसत शांता म्हणाली, “ दीड वाजेपर्यंत काकू बसल्या होत्या इथें. मग त्यांना फारच झोप यायला लागली तेव्हां जाऊन निजण्याचा मींच त्यांना फार आग्रह केला. त्या गेल्या अन् मी मग वाचीत बसलें. ”

“ काय वाचीत होतीस ? ”

" हरिभाऊ आपट्यांची ' मायेचा बाजार ' कादंबरी. "

" माझ्याहि आवडीची कादंबरी आहे ती. " मीं म्हटलें.

" माझ्याहि आवडींतली आहे ती कादंबरी. " शांता किंचित् हंसून म्हणाली. " मी ही तिसऱ्यांदा वाचतें आहे ती. पण तापांत फार बोलणं बरं नाहीं. स्वस्थ पडलं तर बरं वाटेल. "

" बरं " असें म्हणून मी किंचित् हंसलों व स्तब्ध बसलों, व मग शांताहि बराच वेळ कांहीं बोलली नाहीं.

शांताकडे पाहतां पाहतां मला काय वाटलें कोण जाणे, मी हळूच आपला डावा हात पुढें करून तिचा डावा हात आपल्या हातांत धरला.

" किती गार वाटतो आहे तुझा हात " मीं म्हटलें. " असा हात धरण्यानं बरं वाटतं आहे. "

मी हात धरल्याबरोबर शांता किंचित् चपापली. तिचा हात थोडासा कांपत होतासें मला वाटलें. तिनें हात माझ्या हातांतच राहूं दिला, पण माझ्याकडे न पाहतां मांडीवरील पुस्तकाकडे पाहत ती म्हणाली,

" बराच ताप आहे हो अंगांत ! "

कांहीं वेळ तसाच गेला. मी शांताकडे पाहात होतों. पण तिनें पुस्तकां-वरील दृष्टि काढून मजकडे एकदांहि पाहिलें नाहीं.

" शांता " तिचा हात किंचित् अधिक दाबून मी म्हटलें, " एकदां तुला दुःख दिलं त्याबद्दल माझ्याशीं तूं किती दिवस निष्ठुरता धरणार आहेस ? मी काय करूं म्हणजे माझ्या पश्चात्तापाची साक्ष तुला पटेल ? पूर्वीच्या पापानं मी तुला कायमचा अंतरणार आहे का ? माझ्याकडे एकदां पाहा अन् बोल."

शांता कांहींच बोलली नाहीं. तिच्या डोळ्यांत मात्र अश्रु चमकले आणि क्षणार्ध डोळ्यांच्या कांठावर थबकून ते गालावरून ओघळले. मनांतल्या मनांत कोंडलेल्या दुःखभारानें तिचा वक्षप्रदेश एकदां वर खालीं झाला. तिनें उसासा टाकला आणि डोळ्यांत सांठलेलीं आसवें बाहेर टाकण्यासाठीं दोन-तीनदां पापण्या हालविल्या.

" अरेरे, मीं तुला केवढं दुःख दिलं ! " मी सद्गदित स्वरानें म्हटलें, " पण शांता, मला क्षमा केलीस तर—"

माझें वाक्य पुरें होण्यापूर्वींच शांतानें झटकन् माझ्याकडे मान केली, निमिषार्धपर्यंत डंवरलेल्या डोळ्यांनीं माझ्याकडे करुण नजरेनें तिनें पाहिलें. आणि लगेच आपला उजवा पंजा माझ्या तोंडावर ठेवून ती म्हणाली, " च ! क्षमा कसली ? असलं बोलणं कशाला बरं हवं ? "

बोलतां बोलतां तिच्या डोळ्यांतून ओघळलेले अश्रुबिंदु टपकन् माझ्या गालांवर पडले. ती ते पुसूं लागली तेव्हां तिला थांबवून मीं म्हटलें, " नको, तें पुसूं नकोस. त्यांनीं माझ्या पापाचं क्षालन होऊन मी पवित्र तरी होईन ! "

" कांहीं तरी काय बोलणं ? "

" हें कांहींतरी बोलणं नाहीं, शांता ! " तिचा हात जवळ ओढीत मी म्हटलें. " हृदयाची भाषा तुझ्या हाताला समजत असली तर हात या हृदयावर ठेवून माझा पश्चात्ताप तूं बघ. "

असें म्हणून मीं तिचा हात दोन्ही हातांनीं धरला आणि हृदयाशीं घट्ट धरला. तिच्या हाताच्या दाबाखालीं माझें हृदय धडधड करीत होतें.

त्याच वेळीं घड्याळांत अडीच वाजून ठोका पडला " कर्रर्र टण ! "

प्रकरण अकरावें

अखेर धागा तुटला

१ माझें व शांताचें लग्न ठरल्याबद्दल सर्वांनाच आनंद झाला व सर्वांनींच तो आपापल्या परीनें व्यक्त केला; परंतु आई, बाबा, यांचे समाधानाचे उद्गार ऐकूनहि मला जो आनंद झाला नाहीं तो त्याविषयींच्या राधाकान्ताच्या पत्रानें मला वाटला. आमच्या विवाहाविषयींचें पत्र पंधरा दिवसांपूर्वीं मीं त्याला लिहिलें होतें, व आज आठ दिवस त्याच्या पत्राची मी रोज वाट पाहात होतों. पांच सहा दिवस वाट पाहूनहि पत्र येईना तेव्हां तर त्याचे वडील फारच आजारी आहेत कीं काय अशीहि शंका मला येऊं लागली होती. पण दुपारीं निजून उठतों तों एक पत्र माझ्या टेबलावर ठेवलेलें मला दिसलें. पत्रावरील पोस्टाचा छाप मी मोठ्या आतुरतेनें पाहिला, व तिकिटावर ‘ अलाहाबाद ’ असा इंग्रजी शिक्का दिसतांच आंतील मजकुराविषयीं मला फारच उत्कंठा वाटली. अधीरतेनें मीं पाकीट फोडलें आणि वाचूं लागलों. पत्र असें होतें :—

“ प्रिय मित्रवर्य—

“ तुमचें पत्र आठ दिवसांपूर्वींच मिळालें. पण बाबांची प्रकृति त्या वेळीं फारच बिघडलेली होती, आणि घाईघाईनें तुम्हांला दोन ओळी खरडण्यापेक्षां, जरा उशीर झाला तरी हरकत नाहीं पण सविस्तर पत्र लिहिणेंच अधिक बरें वाटल्यावरून ताबडतोब उत्तर धाडलें नाहीं. शेवटीं आज बाबांच्या प्रकृतीला बराच आराम असल्यामुळें सवडीनें पत्र लिहिणें शक्य झालें. दिरंगाईची माफी करालच.

" माझ्या नांवापुढें ' बी. ए. ऑनर्स ' अशी पदवी लावून लिहिलेल्या पत्त्याचें पहिलें पत्र तुम्हांकडून आलें हें आपल्या दोघांच्या स्नेहाला उचित असेंच झालें. माझ्या यशाबद्दल तुम्ही जो आनंद व्यक्त केला आहे त्याबद्दल मी आपला खरोखर फार आभारी आहें. परीक्षा संपली तेव्हांपासूनच मी पहिल्या वर्गांत येईन असें मला वाटत होतें. पण माझा नंबर येईल अशी माझी अपेक्षा नव्हती. ईश्वरी कृपेनें तो आला इतकेंच.

" तुम्ही माझ्याजवळ पेढे मागतां, पण आतां तुमच्याजवळच पेढे नकोत कां मागायला ? पण मी तुमच्यासारखा अधीर नाहीं. मात्र पेढ्यासाठीं मी उतावळा झालों नसलों तरी तुम्ही लिहिलेल्या बातमीनें झालेला आनंद केव्हां व्यक्त करीन असें मला झालें आहे. खरोखरच तुमच्या विवाहाचें ठरल्याचें वाचून जो आनंद झाला त्याला सीमा नाहीं. तुम्हां भावी वधूवरांचे नुक्तेच मुद्दाम काढविलेले फोटोग्राफ तुम्ही मला पाठविले हे तुमचे मजवर केवढें प्रेम ! एक महिन्यापूर्वी तुम्ही सारी मंडळी मुंबईस येऊन राहिलांत व तेव्हां-पासून तुमची प्रकृति पुष्कळ सुधारली आहे असें तुम्ही लिहितां. पण फोटोंत तुम्ही जरा वाळलेलेच दिसतां. तुमची नियोजित वधू मात्र नांवाप्रमाणेंच ' शांत ', बुद्धिमति आणि प्रेमळ असल्याची स्पष्ट साक्ष फोटोवरून पटत आहे. सध्यां आतां विवाहमुहूर्तच नसल्यामुळें तुमच्या विवाहाचा समारंभ पुढें ऑक्टोबरपर्यंत लांबला हें माझ्या दृष्टीनें चांगलेंच झालें. ताबडतोब विवाहसमारंभ होणार असता तर समा-रंभाला हजर राहण्याची इच्छा मनांतल्या मनांत दाबून ठेवावी लागली असती. कारण बाबांची प्रकृति आतां हलके हलके सुधारत आहे तरी त्यांना केवळ चाकरमाणसांच्या शुश्रूषेवर टाकून अलाहाबादे-बाहेर कोठेंहि जाणें आज मला शक्य नाहीं.

" तुमचें पत्र मुंबईहून लिहिलेलें पाहून मला प्रथम बरेंच आश्चर्य वाटलें. पण तुमच्या वडिलांच्या दुकानांतील इतर पातीदारांनीं कांहीं भानगडीचा व्यवहार केल्यामुळें त्यांना तीन चार महिने मुंबईस येऊन राहून ती भानगड निकालांत काढणें जरूरीचें वाटलें व

तुम्हांलाहि हळूहळू दुकानाचा कारभार समजून देण्याच्या इच्छेनें तुम्हां सर्वांनाच घेऊन ते मुंबईस येऊन राहिले वगैरे पुढचा मजकूर वाचल्यावर आश्चर्य नाहींसें झालें. ऑक्टोबरपर्यंत लग्नसमारंभ लांबल्यामुळें तुमची भावी वधू विलासगडला आपल्या वडलांकडे जाणार होती; पण आतां तेच पत्नीसह एका मित्राबरोबर यात्रेला जाऊन दोन महिन्यांनीं मुंबईस येणार असल्यामुळें तिचे तिकडे जाणें रहित झालें वगैरे मजकूर तुम्हीं लिहिला आहे तो वाचून तुम्हां दोघांतील परस्पर प्रेमाची पूर्ण कल्पना आली. विरहाचें संकट टळल्याबद्दल तुम्हांला झालेला आनंद तुमच्या प्रत्येक वाक्यांत पूर्ण प्रतिबिंबित झालेला आहे. तो मजकूर वाचतांना एखाद्या कादंबरीं-तील उताराच वाचत आल्यासारखें मला वाटलें. मला वाटतें तुमच्या सध्यांच्या अवस्थेंत ‘ रोमान्स ’ टाळणें कोणाहि तरुणाला अशक्य आहे. तुम्ही तसें लिहिल्याबद्दल मी तुम्हांला दोष मुळींच देत नाहीं. उलट असल्या गोष्टीदेखील सांगण्याइतकी सलगीची मैत्री तुम्ही माझ्याशीं ठेवतां याबद्दल मला अभिमान वाटतो. तुम्ही मला मुंबईस मौज करावयास बोलावतां खरें, पण बाबांना सोडून कोठेंच जाणें शक्य नाहीं हें वर लिहिलेंच आहे. आणि शिवाय “ दोघे म्हणजे संगत आणि तिघे म्हणजे गर्दी ” या अर्थाची इंग्रजी म्हण तुम्हांला माहीतच आहे. तुम्हां दोघांच्या मौजेंत मी मुंबईस येऊन कशाला उगीच गर्दी करूं ?

“ बी. ए. नंतर एल्‌एल्. बी. कडे जावयाची माझ्या मनाची केव्हांच इच्छा नव्हती व नाहीं. पण मीं वकील व्हावें असा आमच्या बाबांचा पहिल्यापासून फार आग्रह म्हणून स्वतःची आवड बाजूला ठेवून मुंबईस राहून एल्‌एल्. बी. च्या टर्म्स् भरण्याचा मीं बेत केला होता. पण बाबांच्या आकस्मिक दुखण्यानें तो बेत रहित झाला आहे. मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटींत बौद्ध धर्माविषयीं जे ग्रंथ मी वाचीत होतों ते अर्धवट वाचून होतात न होतात तोंच बाबांची तार आल्यामुळें त्यांचें वाचन तसेंच टाकून मला इकडे निघून यावें लागलें. ते ग्रंथ येथें मिळत नाहींत. वाचन पुरें झालें नाहीं म्हणून

जीव हळहळतो. पण त्याला इलाज नाहीं. सध्यां येथील युनिव्ह-र्सिटीच्या लायब्ररींतून आणलेले मॅक्स मुल्लरचे ग्रंथ सवड मिळेल त्या मानानें वाचीत असतों.

" माझी एकदां भेट व्हावी अशी तुमच्या वडिलांची, मातोश्रींची व भावी वधूचीहि फार इच्छा असल्याचें तुम्ही लिहितां त्यावरून येवढेंच दिसतें कीं, त्या सर्वांजवळ तुम्ही माझी मन मानेल तशी स्तुति करून ठेविली आहे. तुमच्या मुंबईच्या आजारीपणांत त्यांच्या भेटीचा योग येईल असें त्या वेळीं तार करतांना मला वाटलें होतें. पण तेव्हां मलाच इकडे ताबडतोब निघून यावें लागलें. असो. माझ्या नेहमींच्या श्रद्धेप्रमाणें मी इतकेंच म्हणतों कीं योगायोग असेल त्या वेळीं भेट झाल्यावांचून राहणार नाहीं. तुमच्या वडिलांस व मातोश्रीस माझे सांष्टांग प्रणिपात निवेदित करावे. तसेंच तुमच्या भावी वधूस-काय लिहावें बरें ?—अशा वेळीं वाटतें कीं, इंग्रजींत पत्र लिहिणें बरें. कारण आतां इंग्रजींत पत्र लिहीत असतों तर " My best wihses " असें चटकन् लिहून मोकळा झालों असतों. मला वाटतें आपल्या सामाजिक चालीरीति जसजशा बदलत आहेत तसतसे पत्र-लेखनांत व बोलण्यांत वापरण्याला योग्य असे नवे नवे मायने व शब्दप्रयोग आपण बनवून प्रचारांत आणले पाहिजेत. पण या घटकेला तरी कांहीं ' My best wishes ' या इंग्रजी शब्दप्रयोगांतील अर्थ ध्वनित करणारा मराठी प्रयोग मला सुचत नाहीं. पुढील पत्राच्या वेळेपर्यंत एखादा प्रयोग मनाशीं योजून ठेवीन.

" असो. पत्र बरेंच लांबलें. मुंबईस राहून मौज करीत आहांत; त्या मौजेंत प्रत्यक्ष भाग घेणें मला अशक्य असलें तरी निदान पत्रांत साद्यंत वर्णन लिहून तरी मला अंशतः त्या भागाचा उपभोग घेऊं द्या. भावी वधूला मुंबईचे अनंत देखावे दाखविण्यांत दंग होऊन गेलांत तरी माझी गरिबाची आठवण ठेवतां हेंच पुष्कळ आहे म्हणा ! पण सध्यां मुंबईस पावसाळा आहे. अकस्मात् कोसळणारा पाऊस पुष्कळदां तुमच्या कार्यक्रमावर विरजण घालीत असेल, नाहीं ?

" आतां अधिक लिहीत नाहीं. गुऱ्हाळ लांबतच चाललें. पण

हो ! एक महत्त्वाची गोष्ट लिहिण्याचा बेत केला होता ती राहिलीच ! मुंबईस आपण दोघे होतों तेव्हांच मी तुम्हांला या गोष्टीची आठवण करून देणार होतों. पण त्या वेळीं तुमचें मन जरा हळुवार झालेलें होतें म्हणून बोललों नाहीं. ती इतकीच कीं आतां तरी पत्रिकेवर तुमचा विश्वास बसला कीं नाहीं ? एकदोनदां तुमच्या पत्रिकेवरून मीं तुम्हांला म्हटलें होतें कीं माणिकशीं तुमचा विवाह होणें शक्य नाहीं. त्या वेळीं तुम्हीं माझ्या भविष्याची टर उडविली होती. आतां तरी माझें भविष्य पटलें कीं नाहीं ?

तुमचा स्नेहांकित

राधाकान्त "

तें पत्र एकदां वाचून माझें समाधान झालें नाहीं. मी तें पुन्हा दुसऱ्यांदा वाचूं लागलों. पण अर्धें पत्र वाचून झालें असेल नसेल इतक्यांत आईनें आंतील खोलींतून हांक मारली—

" जगदीश ! अरे जगदीश ! चहा घेणार ना ? "

" हो, हो ! आलोंच ग ! " असें मोठ्यानें ओरडून मीं पत्राचें वाचन पुरें केलें, पत्राची घडी करून पाकिटांत घातली, आणि चूळ भरून टाकण्यासाठीं टेबलावरील पाण्याचा तांब्या उचलून खिडकींत गेलों.

दुपारचे तीन वाजण्याचा सुमार, पण त्या वेळींदेखील लॅमिंग्टन रोडवर रहदारी कांहीं कमी नव्हती. " पों पों ! " असा इशारा देत मोटारी इकडून तिकडे धावत होत्या व चार पांच व्हिक्टोरियाहि रस्त्यावरून जात होत्या. समोरच्या छप्परावर चार पांच कावळे जमून कावकाव करीत बसले होते. दोन उघडीं नागडीं मुलें खालीं रस्त्यावर पतंग उडवीत होतीं. एक फेरीवाला कांदेबटाट्यांनीं भरलेली हातगाडी लोटीत ' कांदी S बटाटीSSये ' अशी कर्कश आरोळी मारीत होता, व डाव्या हातानें विडीचा तुकडा फुंकीत आजुबाजूच्या इमारतींतून कोणी गिऱ्हाईक हांक मारीत आहे कीं काय तें टेहळीत होता. इतक्यांत एक भली मोठी लॉरी धाड्धाड् करीत आली. त्या लॉरींत पन्नाससाठ मजूर कुदळी, खोरीं, घमेलीं घेऊन बसले होते. त्या अजस्र लॉरीच्या धडधडाटानें आमची बंगलीदेखील हदरल्या-सारखी झाली.

मीं दोन तीन चुळा भरून टाकल्या, टॉवेलनें तोंड पुसलें, आरशांत पाहून केंसावरून कंगवा फिरविला आणि आंतल्या खोलींत गेलों. आई व शांता गालिचावर बोलत बसल्या होत्या. मीं गालिचावर जाऊन बसतांच शांतानें जरा पलीकडे सरकल्यासारखें केलें. तिचें तें करणें पाहून मीं हंसलों.

" आमचें लग्न ठरल्यापासून आमच्या दोघांच्या वर्तनांत हें चालीरीतीचें कृत्रिम बंधन आपोआप कां उत्पन्न व्हावें ? " मीं मनाशीं म्हटलें.

शांताहि माझ्याकडे पाहून किंचित् हंसली. तिच्याहि मनांत तोच विचार आला कीं काय कोण जाणे !

" अजून अवकाश आहे होय ? " मीं आईकडे मान वळवून विचारलें.

" छेः ! उगंच पांच मिनिटं असेल असला तर. " आई म्हणाली.

" हें वाचायचं आहे का ? " हातांतील राधाकान्ताचें पत्र पुढें करून शांताकडे पाहात मी विचारलें.

" हं " येवढेंच म्हणून शांतानें होकारार्थी मान हालविली आणि मंद हास्य केलें.

पुन्हां कृत्रिम बंधनाचाच अनुभव आल्यामुळें मला पुन्हां हंसूं आलें. पण तें न दर्शवितां मी राधाकान्ताचें पत्र शांताकडे टाकलें. आमचा विवाह ठरण्यापूर्वीं मी व शांता आईच्या व बाबांच्यादेखतसुद्धां कितीतरी मोकळेपणानें वागत होतों. आम्ही एकमेकांस एकमेकांच्या नांवानें हांका मारीत होतों, पाहिजे तितकें बोलत होतों, आणि एकमेकांची थट्टामस्करी करतांनादेखील आम्हांला कसलाहि संकोच वाटत नव्हता. पण आतांशा शांता माझ्याशीं पूर्वींच्या मोकळेपणानें वागत नसे. बाकी तिला हंसतांना मी स्वतः त्या दोषांतून पूर्ण मुक्त नसल्याचा विचार माझ्या मनांत आल्यावांचून राहत नसे. शांताशीं बोलण्यांत पूर्वींइतका धीटपणा व मनाचा उघडपणा माझ्याकडून राहत नाहीं असें मलाच कितीदां तरी प्रत्यंतर आलें होतें. माझ्या पुरुषाच्या मनाची जर ही गोष्ट तर शांताच्या मनाचें काय आश्चर्य ? बोलून चालून तें स्त्रीचेंच मन होतें !

" कोणाचं पत्र रे ? " आईनें विचारलें.

" राधाकान्ताचं. "

" अरे, त्याला तूं मुंबईस बोलावणार आहेस ना ? " आईनें विचारलें.

" मीं त्याला लिहिलं होतं; " मीं सांगितलें, " पण आजच्या या पत्रांत त्यानं लिहिलं आहेन् कीं वडील आजारी असल्यामुळें सध्यां मला येणं शक्य नाहीं. "

इतक्यांत बाबा दुकानांतून परत आले, आईनें बाळूला त्यांच्यासाठीं आणखी एक कप चहा करावयाचें ओरडून सांगितलें. आणि बाबा आपल्या खोलींत जाऊन कपडे काढून आले. बाबा गालिचावर येऊन बसतांच शांता उठून उभी राहूं लागली. तें पाहून हंसत हंसत बाबा तिला म्हणाले;

" हं, हं ! बैस खालीं. उठून उभं राह्यचं काय कारण आहे ? " नंतर आईकडे वळून ते पुढें म्हणाले, " आतांशा पाहतों आहे, ही शांता एखाद्या सासुरवाशणीसारखी वागायला लागली आहे. पूर्वीं माझ्याशीं किती मोकळे-पणानं ही बोलत असे. पण आतां पाहातों तर अगदीं एखाद्या अस्सल सुनेसारखी ही माझ्याशीं वागूं लागली आहे ! पूर्वीं प्रत्यक्ष मुलीसारखी ही आमच्या घरांत वावरत असे तीच लग्न ठरल्यापासून अगदीं संकोचानं बोलं चालूं लागली आहे ! आम्ही पूर्वींचींच माणसं कायम आहोंत ना ? "

" हें म्हणणंहि खरं आहे ! " आई हंसत हंसत म्हणाली. " अन् तिचं वागणंहि कांहीं खोटं नाहीं. ती मुद्दाम असं वागते असं नाहीं कांहीं. आम्हां बायकांचे स्वभावधर्मच असे असतात ! ते पुरुषांना कळावयाचे नाहींत. "

आईचें तें शेवटचें वाक्य ऐकून आज दहा पंधरा दिवस माझ्या मनांत घोळणारा प्रश्न सुटल्यासारखें मला वाटलें. लग्न ठरल्यापासून शांता माझ्याशीं संकोचानें कां वागते, व माझ्या वर्तनाच्या पूर्वींच्या मोकळेपणांतहि किंचित् न्यूनता कां उत्पन्न झाली याचें मला कोडें पडलें होतें. पण आईच्या आतांच्या बोलण्यानें तें कोडें एकदम उलगडल्यासारखें झालें. स्त्री-पुरुषांचे मनोधर्म विलक्षण खरे ! सूर्याच्या किंवा चंद्राच्या दर्शनानें उमलणाऱ्या किंवा मिटणाऱ्या कमळाप्रमाणेंच स्त्री-पुरुषांच्या एकमेकांविषयींच्या भावना परिस्थितिभेदा-प्रमाणेंच पालटत असतात हेंच खरें !

बाळूनें चहा आणला. तो प्रत्येकापुढें कप ठेवीत असतां शांतानें आईच्या कानांत कायसें सांगितलें व दोघीहि थोड्याशा हंसल्या. चहाचा कप उचलून तोंडाला लावीत मीं विचारलें, " काय ग आई ? "

" कांहीं नाहीं. " चहाचा घोंट घेऊन आई म्हणाली. " तूं मागच्या शनिवारीं आम्हांला म्हणाला होतास ना, कीं पुढच्या शनिवारीं गुजराथी कंपनीच्या नवीन नाटकाला–काय बरं त्याचं नांव– "

" सुरसुंदरी ! "

" हो, तेंच. आम्हांला त्या नाटकाला घेऊन जायचं कबूल केलं होतंस ना ? त्याची आठवण करायला मला शांतानं सांगितलं. ती म्हणाली, " मागच्या दोन शनिवारांप्रमाणेंच हाहि शनिवार ' विसरलों ' या सदराखालीं जाणार असं दिसतं आहे ! "

" हो खरंच, अगदीं विसरत होतों मी ! " शांताकडे पाहात मीं पुढें हंसत म्हटलें. " बरी आठवण केलीस ! "

मी शांताकडे पाहून हंसत बोललों खरा, पण मनांतून मला तिचा राग आला होता. माझ्याशींच बोलून मला आठवण करावयाला तिला काय झालें होतें ? आईला आड करून बोलण्याचा परकेपणा तिनें काय म्हणून दाखवावा ? आतां एकटी सांपडली म्हणजे या कृत्रिम वागण्याबद्दल तिला चांगलेंच बोललें पाहिजे.

" मग तूं असं कर जगदीश " बाबा मला म्हणाले, " तुझी दुकानावर जायची वेळ झालीच आहे ? " तिकडे जाण्यापूर्वींच ' गेअटी ' थिएटरांत जाऊन तीन तिकिटें काढ, मी कांहीं आज येणार नाहीं. मला काल जागरणहि झालेलं आहे, अन् शिवाय तें नाटक मीं तीनदां पाहिलेलंहि आहे. " असें म्हणून ते आईकडे वळून म्हणाले, " तुम्ही दोघी मात्र अवश्य जा. विलक्षण सीनसीनरी आहे त्या नाटकांत. मग जगदीश ऊठ, ऊठ जा लवकर ! तुझा साहेबी जामानिमा व्हावयालाच दहा मिनिटं लागतील ! मग तिकिटं सरलीं म्हणजे पुन्हां पुढच्या शनिवारावर जाईल. "

" जातोंच " असें म्हणत मी उठलों व खोलींत जाऊन कपडे करूं लागलों. शांतानें पत्करलेला वेडेपणाचा संकोच कसा घालवावा याविषयींचा विचार माझ्या मनांत एकीकडे चालू होता, व एकीकडे आरशासमोर उभें राहून मी विजार घालीत होतों. नेकटायची गांठ बांधण्यासाठीं त्याचे दोन पदर पुढें मागें सरकून पाहात असतांहि स्त्रियांच्या नाजूक मनोधर्मांचाच विचार माझ्या मनांत सुरू होता, व त्या विचाराशीं थोडेंसें संबद्ध असे

कोल्हटकरांचें " सहज कशी खेळविते ललना " हें पद आठवून त्याचा पहिला चरण मी स्वतःशीं गुणगुणूं लागलों.

इतक्यांत शांताच खोलींत आली व म्हणाली, " हें पत्र घ्या परत. इथं टेबलावर ठेवूं का ? "

" हं ठेव. " नेकटायची गांठ मारून नीटनेटकी करीत मीं म्हटलें, व नंतर तिच्याकडे वळून विचारलें, " कसं काय वाटलं पत्र तुला ? "

" फारच छान लिहिलं आहे. " शांतानें हंसत उत्तर दिलें. " त्यांचीं पत्रं नेहमींच मजेदार असतात म्हणा. पण आजचं विशेष सुंदर आहे. "

" कां त्यांत तुझ्या फोटोची स्तुति आहे म्हणून वाटतं ? "

" इश्श, कांहींतरीचं ! "

" मग ? "

" आजचं हें पत्र मला फार आवडलं येवढं खरं. किती मोकळ्या मनानं लिहिल्यासारखं वाटतं ! " शांता म्हणाली.

" दुसऱ्यांच्या मनमोकळेपणाची तुला स्तुति करतां येते, पण स्वतःचा मोकळेपणा मात्र कमी करावासा वाटतो ना ? " मला जो विषय काढावयाचा होता त्याला तिच्या बोलण्यानें आयतीच संधि मिळालेली पाहतांच मीं विचारलें. " आतांशीं किती संकोचानं वागत असतेस तूं ! "

" काका तसं मघांशीं म्हणाले म्हणून बोलतां वाटतं असं ! " तें बोलणें थट्टेवारी नेण्याच्या हेतूनें शांता हंसत म्हणाली.

" बाबा म्हणाले म्हणून नव्हे ! खरोखरच तूं आतांशीं सासरीं वागल्यासारखं वागतेस. मघांचंच उदाहरण पाहा. नाटकाची आठवण करायला आईला मधें आड कशाला धरायला पाहिजे होतं ! माझ्याशींच कां नाहीं बोललीस ? पूर्वीं खास असं केलं नसतंस ! मी म्हणतों तें खोटं का ? "

शांता कांहींच न बोलतां उभी राहिली.

" आतां कां बोलत नाहींस ? " मीं पुन्हां म्हटलें.

" बोलायचं काय ! मी मुद्दाम कां करतें ? "

" मुद्दाम नाहीं—पण—अं—खरं सांगूं ? तूं माझी पत्नी होणार असलीस तरी प्रथम तूं माझी जिवलग मैत्रीण होतीस हें विसरूं नकोस म्हणजे झालं. "

जरा वेळ ती स्तब्ध राहिली व मीहि कांहीं बोललों नाहीं. मीं मग म्हटलें,

" काय ? बोल ना "

" बरं. नाहीं विसरणार " हंसण्याचा आविर्भाव आणून ती म्हणाली. पण हें हंसणें कृत्रिम होतें.

" एकदां खरं मनापासून हांस म्हणजे मी खरं समजेन. "

" इश्श्‌ ! " असें ती म्हणाली व या वेळीं तिला खरेंखुरें हंसू आलें व पुरत्या फुललेल्या शुभ्र गुलाबाच्या पाकळ्यांप्रमाणें तिची दंतपंक्ति माझ्या दृष्टीस पडली.

" अस्सं. माझ्या मनाचं समाधान झालं. " मीं म्हटलें, " बरं आतां जाऊं ना लवकर ? मी कोट घालतों तोंवर तूं माझी हॅट ब्रशानं साफसुफ करून दे. "

पोषाख आटपल्याबरोबर खोलीबाहेर येऊन " आई जातों ग " असें ओरडून सांगून मी बंगल्याबाहेर पडलों.

थिएटरांत जाऊन पाहतों तों फक्त पहिल्या रांगेंतील पांच सहा खुर्च्याच काय त्या राहिलेल्या होत्या. पण तिकिटें न घेतां परत जाणें शक्यच नव्हतें. आई व शांता फारच रागावल्या असत्या. त्यांतल्या त्यांत चांगल्या तीन खुर्च्यांचे नंबर पाहून मीं तिकिटें मागितलीं व पंधरा रुपये मोजून दिले. पैशाच्या पाकिटाच्या एका कप्प्यांत तिकिटें ठेवून दिलीं व मी थिएटरबाहेर पडलों. इतक्यांत कोणीतरी मागून येऊन माझ्या पाठीवर थाप मारली व म्हटलें,

" काय साहेब, लई दिवसामंदी दिसलें नाय ? "

मीं चपापून मागें वळून पाहिलें तो एक गुजराथी इसम माझ्याकडे पाहून हंसत होता. डोक्याला हंगेरीअन कॅप, कडक कॉलरचा सद्रा, त्याच्यावर चिटाचें जाकीट, त्याच्यावर गुंड्या मोकळ्या सोडलेला रेशमी लॉंग कोट, अतिशय पातळ तलम काळ्या किनारीचें धोतर, आणि पायांत पॉलिशनें चकाकणारा काळाभोर स्लीपर असा त्याचा पोषाख होता. पान खाऊन खाऊन त्याचे ओंठ व दांत तांबडे झालेले होते. त्या वेळीं तो हंसत असल्या- मुळें सोन्याच्या तारेनें गुंफलेले त्याचे कांहीं दांत स्पष्ट दिसत होते, व तंबाखूनें आलेल्या लाल रंगावर सोन्याच्या तारेची लकाकी अधिकच उठून दिसत होती. त्यानें डाव्या हातांत एक जळती सिगारेट व काड्याची पेटी धरलेली

होती, व त्याच्या डाव्या मनगटावर चटईच्या विणीचा पट्टा असलेलें सोनेरी चिमुकलें घड्याळ झळकत होतें. गुजराथी लोकांच्या नेहमींच्या संवयीला अनुसरून त्यानें आपल्या उजव्या हातांत धोतराच्या पुढच्या सोग्याचें टोंक उचलून धरलेलें होतें.

मीं त्याच्याकडे क्षणभर न्याहाळून पाहिलें, पण त्याची ओळख पटेना. माझी प्रश्नात्मक मुद्रा पाहून तो पुन्हां हंसला व म्हणाला, " वा साहेब, तमे ओळखबी इसरले काय ? "

पण त्यानें तो प्रश्न केला त्याच क्षणीं मीं त्याला ओळखलें. एम्पायर हॉटेलच्या शेजारच्या इमारतींत सिगारेट, चिरूट, विलायती तंबाखू, वगैरेंचें जें जंगी भपकेबाज दुकान होतें त्याचा हा मालक. याचें नांव मोहनभाई. पूर्वीं मी एम्पायर हॉटेलमध्यें राहत असतांना याच्यापासून पुष्कळ माल घेत असे, व कधीं कधीं याच्या दुकानांत जाऊन गप्पा मारीतदेखील बसत असे.

" वा वा ! ओळख कशी विसरेन ! मीं त्याला म्हटलें. " पण, मोहन-भाई, या वेळीं दुकान सोडून इकडे कोणीकडे ! "

" अरे हमी तो या कंपनीचा दरेक नाटक बघनार ना ! " सिगारेटचा झुरका मारून नाकावाटें धूर सोडीत मोहनभाई म्हणाला. " कंपनीचे सारे माणस आमच्या ओळखीचे हाय. बात करायला आलों होतों मॅनेजर-साहेबासंगे !—आं—पर हें काय जी ? तुमच्या तोंडामंदी सिगारेट नाहीं साहेब ? —घ्या ही घ्या." असें म्हणून त्यानें खिशांतून चांदीची डबी काढली व ती उघडून माझ्यापुढें धरली.

मी पूर्वींचा जगदीश असतों तर ताबडतोब मोठ्या आनंदानें त्यांतील एक सिगारेट उचलून पेटविली असती, पण मुंबईस येण्यापूर्वीं थोडे दिवस वृंदावनास असतांना एके दिवशीं पुन्हा कधींहि सिगारेट न ओढण्याबद्दल मीं शांताला वचन दिलें होतें आणि तेव्हांपासून आतांपर्यंत मीं तें वचन मोठ्या निश्चयानें पाळलेंहि होतें.

पण शांताला वचन दिलेलें असल्यामुळें मला सिगारेट घ्यावयाची नाहीं असें मोहनभाईला सांगणें माझ्या मनाला प्रशस्त वाटलें नाहीं. त्याला काय सबब सांगावी असा विचार करीत मीं क्षणभर गोंधळलों. मीं ताबडतोब सिगारेट घेतली नाहीं हें पाहून विस्मयाच्या स्वरानें मोहनभाई म्हणाला,

" आं ? हें काय साहेब ? तुमी सिगारेटला अनमान करते ?—फाल्तु सिगारेट नाहीं हां ! लई उंचीपैकीं हाय. टेस्ट तो बघा त्येची. "

आतां या मोहनला काय सांगावें ? त्या क्षणीं माझ्या मनांत असा विचार आला कीं न कचरतां खोटें बोलणाराच्या अंगीं मोठी समयसूचकता असल्यावांचून भागावयाचें नाहीं.

" नको मोहनभाई " मीं शेवटीं म्हटलें. " माझी जीभ अन् तोंड उष्णानं अगदीं सुजून गेलं आहे."

" हां जी ! त्ये बराबर," मान हालवीत आणि डबी परत घेत तो म्हणाला, " मला असा वाटला के तुम्ही सिगारेट सोडली बिडली तर नाय ! तुमचेसारखे अदमींनीं सिगारेटवर घुस्सा केला तो तिचा कसा व्हईल ? सोडली तो नाय ना !

आतां पुन्हां खोटें बोलणें भाग होतें. खरोखर खोट्यानें खोटें वाढत जातें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं !

" छे:, छे: ! " मीं म्हटलें. " सोडली नाहीं."

" ठीक, ए बात ठीक छे ! " मोहनभाई हंसत म्हणाला, " आतां तुम्ही कुठें निघाले ? "

दुकानावर जावयाचें आहे असें त्याला सांगण्यांत अर्थ नव्हता. कारण जपानी दुकानांत नोकरीला राहिलेला एक तरुण या नात्यानेंच मला तो ओळखीत होता. वृंदावनाच्या पटवर्धनांचा एकुलता एक मुलगा त्याला माहीत नव्हता. म्हणून पूर्वीची भूमिका कायम ठेवण्याच्या हेतूनें मीं म्हटलें,

" जरा गिरगांवांत काम आहे. तिकडं गेलं पाहिजे."

" वा साहेब, असा कुठें चालेल ? " माझा हात धरीत मोहनभाई म्हणाला, " लई दिसामंदी तुमी आमांला भेटलबी नाय आन् आतां आमच्या दुकानाला इतके नजीक येऊन तशेच जानार काय ? वा साहेब ! तें नहि चालेल. चला, चला. तुमाला गरम चहा आवडते ना ? ती देतों मंग तर खुष व्हाल कीं नाय ? उंची सिगारेटचा नवा स्टॉक आलेला हाय तोबी दावतो."

असें म्हणून त्यानें मला जवळजवळ ओढीतच आपल्याबरोबर चालावयास लावलें. दुकानावर जावयास थोडासा उशीर होणार हा विचार माझ्या

मनांत आला नाहीं असें नव्हे. पण तिकडे जाण्याची अगदीं अतिशय निकड होती असेंहि नसल्यामुळें मोहनभाईला अधिक जोराचा नकार मीं दिला नाहीं, व त्याच्याबरोबर चालूं लागलों.

दुकान जवळ होतें. दुकानांत गेल्याबरोबर मोहनभाईनें मला बसावयास खुर्ची दिली, बटन दाबून दिवा लावला व पंखा सुरू केला आणि शेजारच्या दुकानांतून ' स्पेशल चहा 'चे दोन कप आणावयास गड्याला धाडलें.

इतकें करून माझ्याकडे वळून तो म्हणाला, " वा साहेब ! आरामशीर बसा कीं तुमी. आतां चहा मंगावला हाय. पर चहा येई तों सिगारेटचे नवे सेंपल दावतों तुमांला. "

" बरं " इतकेंच म्हणून मीं खिशांतून हातरुमाल काढला आणि कपाळावरील घाम पुसला.

मोहन्भाईनें चटकन् सात आठ डबे माझ्यापुढें आणून टेबलावर ठेवले व एक एक डबा हातांत घेऊन त्याचें तो वर्णन करूं लागला. निरनिराळ्या प्रकारच्या सिगारेटचीं त्याचीं तीं व्यापारी कुशलतेनें खुलविलेलीं वर्णनें मीं मुकाट्यानें ऐकून घेतलीं. वर्णन संपल्यावर तो म्हणाला,

" काय साहेब, नुसता तोंडच्या शब्दामंदीं तुमाला काय समज पडल ? दरेक सेंपल ओढून पायला पायजे. आज तुमची जीभ आली बोलतां तवा इलाज नाय. "

" खरंच जीभ आली आहे. मला अगदीं ओढवत नाहीं. "

" फिकीर नाय. " मोहनभाई म्हणाला, " पर या दरेक सेंपलची मी तुमांला गेरंटी लिवून देतो ना, मग तर झाला ? कोनचा डब्बा तुमांला देऊं ? बोला. "

मला वाटलेंच होतें. शेवटीं सिगारेटचा एक डबा मोहनभाई आपल्या गळ्यांत बांधणार हें मीं पहिल्यापासून ओळखलें होतें. विजेचा दिवा, विजेचा पंखा, स्पेशल चहा आणि सिगारेटच्या गुणांची पाल्हाळीक वर्णनें या सर्वांचा अर्थ माझ्या ध्यानांत केव्हांच आला होता. मोहनभाई गुजराथी व्यापारी होता !

" हा डब्बा ठेवा, मी सांगतों. " मी कांहींच बोलत नाहीं असें पाहून तो म्हणाला, " सिगारेट फस्ट क्लास हय आन् दामबी फार नाय. अवघा त्रण रुपिया बे आना. "

तोंड आलें आहे असें सांगून मघांचा धूम्रपानाचा प्रसंग मीं टाळला. पण त्या सबबीनें आत्तांचें संकट टळणें शक्यच नव्हतें. सिगारेट सोडून दिली असेंहि आतां सांगणें शक्य नव्हतें. मुकाट्यानें डबा घेणें भागच होतें. सिगारेट सोडली असें प्रथमच मोहनभाईला सांगितलें असतें तर? तें न सांगतां खोटें बोलल्याबद्दल तीन रुपये दोन आण्यांचा भुर्दंड आतां भरण्यावांचून गत्यंतर नव्हतें असा विचार करून पैशाचें पाकीट काढण्यासाठीं मीं खिशांत हात घातला.

" वा साहेब ! " मीं पाकिट काढलेलें पाहून मोहनभाई हंसत म्हणतों, " पैशाची काय गर्दी ? तुमी आमची दुकानचे कायम गिऱ्हाइक. पैसे कुठें जातील ? उद्यां द्या ना लागल तर. "

" आहेत खिशांत मग कशाला उगीच उद्यां ? " असें म्हणून मीं पैसे टेबलावर ठेवले.

मोहनभाईनें डबा कागदांत बांधून माझ्याजवळ दिला. इतक्यांत चहा आला. तो पिऊन झाल्यावर हॅट डोक्यावर ठेवीत व उजव्या हातांत डबा घेत मीं म्हटलें, " अच्छा मोहनभाई, साहेबजी ? "

" अच्छा, साहेबजी ! दुकानावर लोभ ठेवा साहेब ! "

" अच्छा, अच्छा. " असें म्हणून मी बाहेर पडलों.

बोरीबंदरासमोरच्या नाक्यावर आलों तो ट्रॅम तयार नव्हती. सिगारेटचा तो डबा हातांत घेऊन रस्त्यांत उभें राहणें मला असह्य वाटूं लागलें. " शांता काय म्हणेल ! " " या डब्याला स्पर्श करणें तरी उचित आहे काय ? " " हा वचनभंग नव्हे काय ? " असे प्रश्न माझ्या मनाला सारखे टोंचीत होते.

शेवटीं मी वैतागलों, आणि आजूबाजूचे लोक काय म्हणतील याचा काडीमात्र विचार न करतां हातांतील तो डबा मीं भिरंदिशीं रस्त्यावर लांब फेंकून दिला. तितक्यांत आपल्या बिगुलाचा आवाज करीत एक मोटार तिकडून आली व तिच्या चाकाखालीं डबा सांपडला. मोटार पुढें गेली व तिच्या भारानें डब्याची दामटी वळलेली मला दिसली. त्या चिमटलेल्या डब्याकडेच मीं किती वेळ तरी पाहात होतों. इतक्यांत ट्रॅम आली. ट्रॅममध्यें चढून मीं खिडकींतून डोकावून त्या चपटी वळलेल्या डब्याकडे पुन्हां एकदां

पाहिलें. " ठीक झालं ! " असें पुटपुटून मीं एक सुस्कारा सोडला, व ट्रॅम चालू झाली.

२

' सुरसुंदरी ' खेळ फारच लोकप्रिय होता. आमच्या जागा रिझर्व्ह केलेल्या असल्यामुळें सुरुवातीच्या वेळेच्या पांच दहा मिनिटें आधीं आम्ही थिएटरांत गेलों. आईनें व शांतानें पूर्वी गुजराथी नाटक कधीं पाहिलें नव्हतें, त्यामुळें थिएटरांतील एकंदर देखावा त्यांना जरा विचित्रच वाटला. आणि नाहीं तरी हें खरेंच, कीं मराठी थिएटरांतील गलबला व गुजराथी थिएटरांतील गलबला सकृद्दर्शनीं सारखा वाटला तरी त्यांत कितीतरी भेद असतो. बारकाईनें पाहणाराच्या नजरेस तो भेद आल्यावांचून राहात नाहीं. मराठी थिएटरांतील प्रेक्षक वर्गांत सुशिक्षित लोकांचा भरणा बराच असतो. उलट गुजराथी थिएटरांत बकाली लोकच फार असतात, त्यामुळें तेथें प्रेक्षकांचा किलकिलाट फार मोठ्या प्रमाणावर चाललेला असतो. आरोळ्या, शिट्या यांचेंहि प्रमाण जास्त असतें. पानतंबाखूच्या पिचकाऱ्या आणि विडी, सिगारेट, चिरूट यांच्या धुराचे लोट अधिक चालू असतात, त्यामुळें थिएटरांत एक प्रकारचा कांहीं निराळाच दुर्गंध आल्यासारखें वाटत असतें. शिवाय पद्यावलि विकणाऱ्या पोऱ्यांची " चोपडी " अशी आरोळी, सोडालिंबू विकणाऱ्याचें " ड्युकनो थंडो " असें ओरडणें, आणि पंखा विकणाऱ्या छोकऱ्याचा " पवनवाला " असा घोगरा आवाज, या सर्वांचा कोलाहल भाषाभेदामुळें आपल्या कानाला विचित्र वाटल्याखेरीज राहात नाहीं.

तो गजबजाट पाहून शांता तर अगदीं नाखुष झालेली दिसली. मला ती म्हणाली, " अशीच कां बजबजपुरी असते नेहमीं गुजराथी थिएटरांतून ? "

" हं. नाटक सुरू होण्यापूर्वींपासून तो तें संपून नाटकगृह खलास होईपर्यंत तुला असेंच वाटेल. " मीं तिला म्हटलें " सारा दंगा अन् धांगडधिंगा असायचा या लोकांचा. "

इतक्यांत नाटक सुरू व्हावयाची इशारत देण्याकरितांच जणू काय पेटीवर बसलेल्या इसमानें खूप मोठ्या आवाजानें पेटीचे सूर काढले व तबलजीनेंहि तबल्या-डग्ग्यावर सपाटून जोरानें थापा मारल्या.

" अगबाई ! " शांता अंगावर शहारे आल्यासारखे करून म्हणाली, " हें काय राक्षसी वाजवणं ? जसं कांहीं अंगांत आलं आहे. आपल्या मराठी नाटकांत पेटी वाजली कीं कसं शांत वाटतं. "

मी पुढें कांहीं बोलणार तोंच पडदा वर गेला व नाटक सुरू झालें.

आईला व शांताला नाटकाचें कथानक मीं पूर्वींच समजावून सांगितलें होतें. पण प्रत्येक पात्राचें बोलणें त्यांना न समजल्यामुळें नाटकांतील संभाषणांत किंवा विनोदांत त्यांचें मन विशेष रमेना. तथापि पोषाख व देखावे यांच्या योगानें त्यांची पुष्कळच करमणूक होत होती व पहिल्या अंकांत दोन ट्रॅन्स्फरसीन असल्यामुळें तो अंक त्यांना मनोरंजक वाटला. दुसराहि अंक देखाव्यांच्या योगानें आम्हां सर्वांना चित्ताकर्षक असाच झाला. तो संपतांच " जरा बाहेर जाऊन येऊं का ! " असें मीं त्या दोघींना विचारलें. त्यांनीं संमति दर्शवितांच मीं आपली टोपी खुर्चीवर ठेवली आणि थिएटरबाहेर येऊन रस्त्यावर उभा राहिलों.

त्या वेळीं मध्यरात्रीचा सुमार झाला होता, " गेअटी " थिएटरच्या कोपऱ्यावर थोडीशी रहदारी असली तरी दिवसां असणाऱ्या रहदारीच्या मानानें शुकशुकाट असल्यासारखेंच वाटत होतें. उजव्या बाजूच्या रस्त्यावरील ट्रॅमवेची वाहतूक बंद होती. एखादी घोड्याची गाडी मध्येंच रस्त्यानें जाई किंवा बिगुल न वाजवितां एखादी मोटार संथपणानें गेलेली दिसे, व बोरीबंदरापुढच्या चौकांतील दिव्याच्या झगझगाटांत ती गाडी किंवा मोटार एकटीच जातांना पाहून मनाला कांहीं एका विचित्रच शुकशुकाटाचा अनुभव असल्यासारखें वाटे. कोपऱ्यावरील हॉटेलच्या दरवाजापाशीं असलेल्या पानपट्टीच्या दुकानांत दोन कोंकण्यांचें बोलणें चाललें होतें तें रात्रींच्या त्या शांत वेळीं बहुतेक स्पष्ट ऐकूं येत होतें, व त्या दोघांपैकीं जो म्हातारा होता तो चिलमीचा झुरका मारून ठसके देई तेव्हां त्याचें तें खोकणें त्या निःस्तब्ध वातावरणांत कर्णकटु भासे. थिएटरच्या दारासमोरच्या विस्तीर्ण मैदानावर या वेळीं एकहि माणूस दिसत नव्हतें. पश्चिमेकडून येणाऱ्या गार वाऱ्याची झुळुक अंगावरून गेली, कीं दूर देशांतून आलेल्या एखाद्या मित्राची ओझरती भेट झाल्यासारखें होऊन आनंद व उदासीनता यांचें विचित्र संमिश्रण मनांत उत्पन्न होई. अंधेऱ्या रात्री

असल्यामुळें वर आकाशांत तारकांचे ढीगच्या ढीग दिसत होते. समुद्राला त्या वेळीं भरती आली होती कीं काय कोण जाणें, पण किनाऱ्याला दगडांवर आपटणाऱ्या लाटांच्या गर्जनेचा अस्फुट ध्वनि लांब रणांगणावर उडालेल्या तोफांच्या आवाजाप्रमाणें ऐकूं येत होता. रस्त्यावरील ती शांतता, समोरचें तें विस्तीर्ण मोकळें मैदान, डोक्यावरचे ते अगणित तारकांचे तेजःपुंज समूह आणि डाव्या बाजूनें ऐकूं येणाऱ्या सागरवीचीचा गंभीर नाद, या सर्वांमुळें त्या क्षणीं एकाएकीं अनंतत्वाच्या कल्पनेचा माझ्या अंतःकरणाला स्पर्श झाल्यासारखें मला वाटलें. केवढी अफाट ही परमेश्वराची सृष्टि ! आणि किती क्षुद्र आम्ही माणसें ? किंवा क्षणभंगुर आमचें जीवित ! आम्ही केव्हां नाहींसे होऊं त्याचा काय नियम ? किंवा माझी प्रिय शांता किंवा पूर्वी प्रिय असलेली माणिक केव्हां—

छे ! पण असले अमंगल विचार करण्यांत काय अर्थ ?

असें मनाशीं म्हणून मी एकदम मान फिरवून थिएटरच्या दाराकडे वळलों. तितक्यांत आंत नाटकापैकीं एखादा भाग प्रेक्षकांना फार आवडला असावा, कारण टाळ्यांचा जंगी कडकडाट माझ्या कानीं पडला ! जणू काय क्षणापूर्वी माझ्या मनांत उभ्या राहिलेल्या विचारांची सत्यता दर्शविणाराच तो टाळ्यांचा कडकडाट होतासें मला वाटलें.

कांहींतरीच ! असले विचार करण्याची या वेळीं मला कोठली लहर आली होती कोणास ठाऊक !

मनावरची ती उदासीन छटा घालविण्यासाठीं पलीकडच्या स्टॉलवर जाऊन एक सोड्याची बाटली प्यावयाचा मीं विचार केला, व तेथें जाऊन दुकानदाराला म्हटलें,

" एक ड्यूकचा सोडा दे पाहूं."

पलीकडे एक गृहस्थ माझ्या अगोदर येऊन सोडा पीत उभा होता तो एकदम तोंडचा ग्लास दूर करून माझ्याकडे पाहात म्हणाला,

" ओहो ! कोण, जगदीश ? "

" अं ? कोण बाळासाहेब ? " मीहि त्याला ताबडतोब ओळखून उद्गारलों.

" किती अकल्पित भेट ही ! " ग्लास संपवून तो टेबलावर ठेवीत बाळासाहेब म्हणाला.

कॉलेजांत असतांना बाळासाहेब व आबासाहेब यांच्याविषयीं माझें मत मुळींच चांगलें नव्हतें. शेवटीं तर आबासाहेबाच्या नीचपणाचा अनुभव येऊनच मला मुंबईस यावें लागलें होतें, व त्यामुळें आबासाहेबाबरोबरच बाळासाहेबाविषयींहि माझें मन पार विटलें होतें. पण आज इतक्या दिवसांनीं बाळासाहेब असा अकस्मात् भेटल्यावर त्याच्याशीं कांहींच न बोलतां तुटून वागावेंसें माझ्या मनाला वाटेना. कालांतरानें इतर गोष्टींप्रमाणें माणसाच्या मनोवृत्तीहि नरमतात हेंच खरें ! मीं उलट बाळासाहेबाला म्हटलें,

" खरंच, फार दिवसांनीं झाली भेट. कशी काय तुमची बातमी ? ठीक आहे ना ? "

ग्लासांतील सोडा पीत पीत मीं त्याच्याकडे पाहिलें. माझा प्रश्न ऐकून त्याच्या चेहऱ्यांत कांहीं चलबिचल झाल्यासारखें मला वाटलें. क्षणभर त्यानें घोंटाळल्यासारखें केलें. मनांतील गोष्ट बोलावी किंवा बोलूं नये अशा गोंधळांत पडल्यासारखी त्याची चर्या बदलली. शेवटीं तो मला म्हणाला,

" खरं सांगावयाचं म्हणजे आमच्याकडील बातमी कांहीं फारशी ठीक नाहीं. आबासाहेबानं–माणिक—"

येवढेंच बोलून तो पुन्हा अडला व क्षणभर थबकून त्यानें विचित्र दृष्टीनें माझ्याकडे पाहिलें.

मला त्याच्या या विलक्षण वागण्याचा व बोलण्याचा कांहींच अर्थ कळेना. मी नुसता त्याच्याकडे आश्चर्यानें पाहात राहिलों.

" तुला कांहींच माहीत नाहीं का ? " बाळासाहेबानें मला विचारलें.

कोणत्या गोष्टीला उद्देशून त्यानें प्रश्न केला तें मला कळलें नाहीं. एकीकडे रिकामा ग्लास दुकानदाराला परत देत व एक आणेली टेबलावर ठेवीत मीं शून्य मनानें नुसतें म्हटलें,

" नाहीं. "

" मग जरा बाहेर चल. सगळ्याच गोष्टी तुला एकदां सांगायची माझी इच्छा आहे " म्हणून तो पुढें झाला.

मीहि एखाद्या मोहिनीला बळी पडलेल्या माणसाप्रमाणें त्याच्या मागोमाग बाहेर गेलों.

रस्त्यावर जाऊन पोंचतांच इकडे तिकडे नजर टाकून जवळ कोणी नाहीं अशी खात्री करून घेऊन बाळासाहेबानें मला विचारलें,

" या वेळीं माणिक कुठें असेलशी तुझी कल्पना आहे ? "

त्याच्या त्या विलक्षण प्रश्नानें मी अधिकच भांबावलों. मीं नुसतें म्हटलें,

" म्हणजे ?—मला काय माहीत ? "

" या वेळीं माणिक मृत्युशय्येवर पडलेली आहे. " बाळासाहेब माझ्याकडे पाहात म्हणाला.

" काय म्हणतोस ? " एकदम चरापून मी उद्गारलों व त्याचें मनगट झटकन् आपल्या हातांत पकडून धरलें.

" घाबरूं नकोस. "

" पण तूं हें काय सांगतोस ? माणिक—"

" हो, ती मृत्युशय्येवर पडलेली आहे. तुला सगळी हकीकत सांगतों, म्हणजे तुझं आश्चर्य कमी होईल. "

" सांग, लवकर सांग ! " त्याचें मनगट अधिकच घट्ट आंवळून धरीत मीं अधीरतेनें म्हटलें.

" सांगतों. " बाळासाहेब म्हणाला, " तूं मुंबईस निघून आल्यानंतर तिकडे काय काय झालं तुला कांहींच माहीत नाहीं का ? "

" नाहीं. "

" माणिकशीं लग्न करण्याची आबासाहेबाची फार इच्छा होती व माणिकच्याहि मनांत आबासाहेबाशीं लग्न करायचं होतं. त्यांचं दोघांचं एकमेकाकडे जाणं येणं नेहमीं चालू होतं. पुष्कळदां तीं दोघं मिळून मुंबईलादेखील आलीं. मीहि एकदोनदां त्यांच्याबरोबर मुंबईला आलों होतों. साऱ्या लोकांचा समज झाला होता, कीं या दोघांचं लग्न होणार. माणिकच्या वडिलांची व वडील बहिणीची त्या लग्नाला पूर्ण संमति होती. माणिक सरदारीण होणार म्हणून त्यांना आनंद वाटत होता. पण आबासाहेबानं आपल्या वडिलांना या बाबतींच कांहींच विचारलं नव्हतं. त्यांची संमति मिळण्याची त्याला खात्री नव्हती, अन् म्हणून ती गोष्ट त्यांच्याजवळ काढायला तो भीत होता. मी त्याला पुष्कळदां सांगितलं, कीं माणिकशीं तुझं संघट्टण अधिकाधिक होतं चाललं आहे तेव्हां तूं वडिलांचा रुकार लवकर घेऊन ठेव. पण त्यानें

माझ्या म्हणण्याकडे दुर्लक्ष केलं अन् वडिलांजवळ गोष्ट काढण्याचं तो लांबणीवर टाकूं लागला. शेवटीं—"

पुढचे शब्द उच्चारण्यापूर्वी तो थबकला, तो असा एकदम कां थांबला हें न कळून मीं नुसतें आश्चर्यानें त्याच्याकडे पाहून म्हटलें,

"हं–?"

"अं—अं-शेवटीं" कसें बोलावें तें मनाशीं जणू काय एकीकडे ठरवीत बाळासाहेब म्हणाला, "जें व्हायला नको होतं तेंच झालं. दोन तीन महिन्यांनीं माणिकला त्या गुप्त प्रकाराचा भार सहन करण्याची पाळी आली. आतां सारी मंडळी घाबरली. माणिकशीं आतां ताबडतोब लौकिक रीतीनं विवाह करण्यावांचून आबासाहेबाला सुटका नव्हती. आतां वडिलांना स्पष्ट विचारून त्यांचा रुकार मिळवण्याखेरीज त्याला गत्यंतर नव्हतं. पण आबासाहेबानं वडिलांजवळ ती गोष्ट काढल्याबरोबर त्याच्या वडिलांनीं त्याला घराबाहेर हांकून देण्याची तयारी दाखविली. सुधारकाच्या मुलीशीं लग्न करण्यास तयार होणारा कुलांगार माझ्या पोटीं कसा जन्मला, त्यापेक्षां मी निपुत्रिक कां राहिलों नाहीं, सरदार घराण्यांतल्या साऱ्या मुली मेल्या कीं काय, अशा तऱ्हेच्या क्रोधाविष्ट भाषणाचा त्यांनीं आबासाहेबावर नुसता भडिमार सुरू केला. आबासाहेबाचं सारं धैर्य विरघळलं. वडिलांच्या इच्छेविरुद्ध जाण्याची त्याची हिम्मत होईना. वडील आपल्या इस्टेटीचा वारसादेखील आपल्याकडून काढून घेतील अशी त्याला भीति होती. शेवटीं माणिकचा त्याग करण्याचं त्यानं ठरवलं. माणिकच्या वडिलांनीं त्याला भेटून फिर्याद करण्याचाहि धाक दाखविला. पण कोर्टांत प्रकरण गेलं तर त्यांत त्यांचीच जास्त बेअब्रू होती, त्यामुळं त्यांनीं तसं कांहीं केलं नाहीं. शेवटीं माणिकला त्यांनीं मुंबईस आणली अन् एका कुशल डॉक्टराकडून ऑपरेशन करवलं. पण दुर्दैवानं त्या ऑपरेशनच्या वेळीं डॉक्टरचा हात किंचित् हालला अन् माणिकला नाजूक जागीं इजा झाली. आज तीन वार झाले असतील त्या गोष्टीला. तिचं दुखणं रोज वाढतंच आहे. याच दुखण्यांत तिचा अंत होणार."

बाळासाहेबाचें बोलणें संपलें तरी किती वेळ मी त्याच्याकडे वेड्यासारखा पाहात उभाच होतों. माझ्या हातांत बाळासाहेबाचा हात आहे हें मला

साहीत असतांनादेखील मी एखाद्या ओसाड अरण्यांत भ्रमिष्टासारखा एकटाच उभा असल्यासारखा मला क्षणभर भास झाला. सर्व इंद्रियांच्या क्रिया जणूं काय त्या क्षणीं थांबल्या होत्या. मेंदू इतका सुंद झाला होता कीं त्याला कशाची जाणीवच होत नव्हती.

ती गैरशुद्धीची विचित्र स्थिति थोडा वेळ टिकली. त्या स्थितींतून जागा झाल्यावर मीं बाळासाहेबाचा हात सोडून दिला आणि--

" हं--अ !" असा मोठा सुस्कारा टाकला.

मीं त्रस्त मनानें केंसावरून डावा हात फिरविला. वाऱ्याची गार झुळूक उघड्या डोक्याला लागतांच वास्तविक मला बरें वाटावयास पाहिजे; पण त्या वायूचा शीत स्पर्श मला नकोसा वाटला. लगेच खिशांतला रुमाल काढून एखाद्या कागदाच्या कपट्याप्रमाणें दोन्ही हातांत त्याचा मी कुसकरा करूं लागलों.

माझ्या त्या कृति बाळासाहेबाला विचित्रच वाटल्या असाव्यात. माझ्याकडे पाहात तो स्वस्थ उभा राहिला.

क्षणभरानें हातरुमाल एकदम खिशांत ठेवीत वर मान करून मीं बाळासाहेबाला विचारलें,

" माणिकचा पत्ता तुला माहीत आहे ? "

" हो. सँढर्स्ट रोडवर विश्राम मॅनशन् म्हणून एक मोठी बंगली आहे. डॉ. भोसले त्या बंगलीचे मालक. त्यांच्या घरींच सध्यां माणिक--"

पुढचें त्याचें बोलणें ऐकावयास मी तेथें उभाच राहिलों नाहीं. " अरे पण थांब, जगदीश--" असें बाळासाहेबानें एक दोनदां ओरडून म्हटलेलें माझ्या कानावर आलें. पण मी परतलों नाहीं. मी जो वेगानें निघालों तों एकदम थिएटराच्या दारांत गेलों. तेथें पोंचतों तो स्टेजवर विलक्षणच देखावा चाललेला होता.

नाटकांतील नायिका मृत्युशय्येवर पडलेली असून तिचे आईबाप व तिच्या दासदासी तिच्या शय्येभोंवतीं उभ्या होत्या. मरणापूर्वीं एकदां आपल्या प्रियकराचें दर्शन व्हावें अशी तिची अंतकाळची इच्छा होती. पण तिचा प्रियकर समरांगणावर गेलेला होता. ती त्याच्या नांवाचा सारखा घोष करीत असतांना एकदम तो लढाईत मेल्याची बातमी घेऊन एक दूत आला,

व त्या दूताचे शब्द ऐकतांच तिनें त्याच्या नांवानें मोठी किंकाळी फोडली व आपल्या आईच्या गळ्याभोंवतीं मिठी मारली. तिचा प्राण गेला व तिचा आत्मा हा मृत्युलोक सोडून स्वर्गलोकीं गेल्याचा विलक्षण देखावा रंगभूमीवर दिसला.

त्या देखाव्याच्या वेळीं प्रेक्षकांच्या अंतःकरणांत विलक्षण शोकावेग उत्पन्न झाला. पुरुषांनीं आपले डोळे झांकले, व बायकांचे हुंदके ऐकूं आले. मीहि एखाद्या स्त्रीप्रमाणें अश्रु ढाळीत दरवाजाच्या उंबरठ्यावर उभा राहिलों.

त्यानंतर मी शांताशेजारीं खुर्चीवर जाऊन बसलों खरा; पण माझें नाटकाकडे बिलकुल लक्ष नव्हतें. दोन तीन वेळां आईनें मला कायसें विचारलें, पण तिच्या प्रश्नांस उत्तर देण्याऐवजीं मीं कांहींतरीच सांगितलें असावें. कारण माझीं तीं उत्तरें ऐकून तिनें आश्चर्य दाखविलें व शेवटीं तर विचारलें, "जगदीश, तुला झोंप आली आहे कीं काय फार? झोंपेंत बडबडल्यासारखं काय बोलतो आहेस?" शांतानेंहि दोन तीन वेळां मला गुजराथी पदांचा अर्थ विचारला व तिलाहि त्या वेळच्या माझ्या भ्रमिष्टपणाचें आश्चर्य वाटलें असावें. एकदां तिनें मला म्हटलें, "असं काय बोलणं हें!" पण मीं तिकडे लक्षच दिलें नाहीं. कांहीं वेळानें तिनें मला हलकेंच विचारलें, "डोकं बिकं का दुखतं आहे! मला नाहीं का सांगायचं?"

या प्रेमळ शब्दांचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. मी तिला हलक्या स्वरांत उत्तर दिलें, "न सांगायला काय झालं?—माझं डोकं खरंच या वेळीं भणभणत आहे. मी बाहेर गेलों होतों तेव्हां माणिकविषयीं अगदीं वाईट बातमी मला कळली. तेव्हांपासून—"

"माणिकविषयीं?—ती काय?"

"ती इथें मुंबईत आहे. फार आजारी आहे. केव्हां तिचा अंत होईल त्याचा नियम नाहीं. तेव्हां—"

"अगबाई! बाई!" डावा हात छातीवर दडपीत शांता उद्गारली. "काय, होतं आहे काय तरी त्यांना? कोणतं दुखणं—"

"हंः! दुखणं?–घरीं गेल्यावर सांगेन तुला सगळं."

शांताला माझ्या त्या बोलण्याचा कांहींच अर्थ कळला नाहीं. तो न कळणेंच स्वाभाविक होतें.

कांहीं वेळानें तिनें मला पुन्हां विचारलें, " त्यांचा पत्ता माहीत आहे का ? "

" हो. "

" मग आपण दोघं उद्यां त्यांना भेटायला जाऊं गडे. "

" तूं येणार तिच्याकडे ?– " मीं आश्चर्यानें तिच्याकडे पाहात विचारलें, " तूं येणार ? "

" हो. त्यांत येवढं आश्चर्य काय वाटलं ? " तिनें मला विचारलें.

" अं–कांहीं नाहीं. तूं शांता आहेस हें मी विसरलों. साध्या स्त्रीहून तुझी गोष्टच निराळी आहे. " येवढें म्हणून मी तिच्याकडे पाहात राहिलों.

ज्या माणिकमुळें एकदां तिला पराकाष्ठेचें दुःख सहन करावें लागलें होतें तिच्या दुखण्याची बातमी ऐकतांच विव्हल होणारी आणि तिला भेटण्यासाठीं उत्सुक होणारी ही शांता एखादी स्वर्गीय देवता तर नव्हे, अशा विस्मयानें मी शांताकडे किती वेळ तरी तसाच पाहात राहिलों.

३

दुसऱ्या दिवशीं दुपारीं तीन वाजण्याच्या सुमारास मी व शांता विश्राम मॅनूशनच्या फाटकापुढें गाडींतून उतरलों. आम्ही बंगलीच्या पायऱ्या चढून आंत गेलों तों व्हरांड्यांत एका बांकावर एक वयस्क गृहस्थ बसले होते. हेच डॉ. भोंसले असावेत असा मीं तर्क केला. आम्हांला पाहून त्यांनीं विचारलें, " कोण पाहिजे आहे ? "

" जोश्यांची मंडळी इथं आहेत ना ? " मीं विचारलें.

" होय. या, असे इकडून या. " असें म्हणून ते एका दारानें आंत शिरले व आम्हीहि त्यांच्या मागोमाग गेलों.

दोन तीन दालनें ओलांडून गेल्यावर एका खोलीच्या दारावर सोडलेले पडदे हातानें दूर करून डॉ. भोंसले आम्हांला म्हणाले,

" या, आंत या. "

आंतल्या मंडळींस उद्देशून ते म्हणाले, " ही मंडळी आली आहेत तुमच्याकडे. " —

आंत खोलींत पाय टाकतांना माझी छाती धडधडत होती. पूर्वीं ज्या

माणिकबरोबर अत्यंत आनंदाचे असे कांहीं दिवस घालविले, जिच्याशीं अनेक प्रेमाचीं हितगुजें केलीं, व जी कदाचित् आज माझी पत्नीहि व्हावयाची; त्याच माणिकला आज मी एखाद्या तिऱ्हाईत स्नेह्याप्रमाणें भेटणार या विचारानें मला कसेंसेंच होत होतें. मला पाहून माणिकला काय वाटेल, तिला आमच्या पूर्वींच्या प्रेममय दिवसांची आठवण होईल काय, माझ्या भेटीनें तिला आनंद होईल, कां उलट अधिक वाईटच वाटेल, अशा तर्कांच्या गोंधळानेंहि माझें चित्त बावरल्यासारखें झालें. खोलीचा उंबरा ओलांडण्या-पूर्वीं एक क्षणभर तर माझ्या मनांत असेंहि आलें कीं एकदम तसेंच परत फिरावें. पण ती विचारलहरी निमिषार्धच टिकली, व मीं शांताबरोबर खोलींत पाय टाकला.

आम्ही आंत शिरत होतों तोंच माणिकच्या पलंगाशेजारीं बसलेल्या मालतीबाईनीं अंमळ मोठ्यानें विचारलें, "कोण आहे?"

"मी आहें जगदीश पटवर्धन," मीं उत्तर दिलें.

माझें तें उत्तर ऐकतांच पलंगावर डोळे मिटून पडलेल्या माणिकनें एकदम डोळे उघडून माझ्याकडे पाहिलें. माझी तिची दृष्टादृष्ट झाल्याबरोबर क्षणभर तिनें माझ्याकडे निरखून पाहिलें. जणू काय खरोखरच मी तिच्या दृष्टीस पडलों कीं नाहीं अशी तिला शंका येऊन ती आपल्या मनाची खात्री करून घेत होती. पण ती स्थिर दृष्टि निमिषमात्रच टिकली. मीच तो आहे अशी तिची खात्री पटतांच तिनें झटकन् आपले डोळे मिटले आणि "अग आईग!" असें रडव्या स्वरानें उद्गारून ती स्फुंदून स्फुंदून रडूं लागली.

तें पाहून माझ्या काळजाचा थरकांप झाला. मी कसाबसा तिच्या उशापाशीं असलेल्या एका खुर्चीवर बसलों. शांता पलंगाजवळ तशीच उभी राहिली. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. मालतीबाईनींहि आपले डोळे पदरानें झांकले.

कांहीं वेळ तसाच गेला.

काय बोलावें किंवा काय करावें तें मला समजेना. त्या तिघींचें तें रडणें पाहून माझ्या अंतःकरणांतील शोकावेग मला असह्य झाला.

कांहीं वेळानें माणिकच्या रडण्याचा पहिला वेग ओसरला. तिनें हळूच डोळे उघडले, शांतानें पुढें होऊन आपल्या पदरानें तिचीं आंसवें पुसलीं.

माणिक शांताच्या चेहऱ्याकडे विस्मयानें पाहात होती. तिनें एकदां माझ्याकडे बघितलें व पुन्हां शांताकडे दृष्टि वळविली. आमच्या दोघांकडे आळीपाळीनें पाहतांना तिच्या मनांत काय विचार येत होते त्याचा तर्क करणें अवघड नव्हतें. माझी पत्नी याच समजुतीनें ती शांताकडे पाहात होती.

कांहीं वेळानें माणिकनें माझ्याकडे अगदीं टक लावून बघितलें आणि डोळ्यांनींच खूण करून मला जवळ बोलावीलें.

मी उठलों व अगदीं तिच्या तोंडाजवळ तोंड नेऊन म्हटलें,

" काय म्हणतेस ? "

" म्हणणार काय ?– कांहीं नाहीं ! " अगदीं हताश स्वरानें माणिक म्हणाली, " एकदां तुमची भेट व्हावी अशी मनाची फार इच्छा होती. देवानं ती पुरी केली. आतां मी सुखानं मरेन ! "

" असं अभद्र बोलूं नये, " असें म्हणत मीं तिच्या कपाळावर हात फिरविला. माणिकच्या तोंडून देवाचें नांव आलेलें पाहून मला जरा आश्चर्य वाटलें. पण दुःखाचा पीळ अंतःकरणाला बसला, कीं माणसाचें मन देवाकडे वळतें हा नेहमींचा नियम होय, हें लगेच मनांत येऊन मला माणिकची करुणा आली.

शांताकडे दृष्टि वळवून माणिक म्हणाली,

" अन् तुमचा – तुमचा तर मीं फारच मोठा अपराध केला आहे. तुम्ही मला क्षमा कराल का ? तुम्हांला मीं केवढं तरी दुःख दिलं ! अन्— " पुढें ती कांहीं बोलणार तों तिचा कंठ भरून आला आणि अश्रूंच्या भारानें दृष्टि थरथर कांपूं लागली. पण आसवें न पुसतां किंवा गळाहि साफ न करतां तिनें आपल्या शोकावेगाला पुरता वाव दिला. एखाद्या लहान मुलाप्रमाणें रडण्याचा गळा काढून ती स्फुंदत म्हणाली,

" अन्–साऱ्या स्त्रीजातीला मीं केवढा हा कलंक लावला ! माझ्या गैरवर्तनानं मी माझ्या आयुष्याचं मातेरं कसं करून घेतलं ! देवा, किती मी अविचारी, हतभागी, पापी ! देव मला कधीं पदरांत घेईल का हो ? "

शांतानें आपल्या हातानें तिचे अश्रु पुसले, व एखाद्या लहान मुलाप्रमाणें तिचें मस्तक दोन्ही हातांनीं कुरवाळीत ती म्हणाली,

" असा खेद करूं नाहीं ना बरं ! पश्चात्तापाच्या आगींत पाप टिकतच

नाहीं. आपल्याला ज्या क्षणीं पश्चात्ताप होतो त्याच क्षणीं पापं जळतात अन् देवाच्या दयेला आपण पात्र होतों. ”

शांताच्या चेहऱ्याकडे पाहात माणिक म्हणाली,

“ या कोरड्या तत्त्वज्ञानानं माझं समाधान व्हायचं नाहीं. मला अगदीं जवळ घेऊन मीं तुमची आहें असं मला सांगा. ”

“ हो, हो. तुम्ही माझ्याच आहांत बरं ! ” असें म्हणत शांतानें आपलें मस्तक तिच्या छातीवर ठेवलें.

दोघीजणीहि कांहीं वेळ अश्रु ढाळीत होत्या.

“ मी तुम्हांला ताई म्हणूं का ? ” माणिक म्हणाली.

“ मी आहेंच तुमची ताई ! ” शांता मस्तक तसेंच ठेवून म्हणाली.

“ ताई, मी या दुखण्यांतून उठलें म्हणजे मी तुमच्या घरीं राह्यला येईन अं ! मला आतां तोच एक आनंद उरला आहे. ”

“ हो, हो. तुम्ही लवकर बऱ्या व्हा. मग आपण सारीजण एकत्र राहूं अं ! ”

एकमेकींच्या हृदयाशीं हृदय लावून प्रेमभरानें एकमेकींशीं बोलणाऱ्या त्या दोघींचें तें चित्र विलक्षण होतें. तें पाहून मी व मालतीबाई इतकीं गहिंवरून गेलों, कीं आमच्या दोघांच्याहि तोंडून एकहि शब्द फुटेना.

त्यानंतर दोनच दिवसांनीं माणिकचें देहावसान झालें. माझ्या चरित्रांतील एक विलक्षण धागा अकस्मात् तुटून संपला! जुन्या प्रेमांकुराची पवित्र आठवण तेवढी शिल्लक राहिली.

प्रकरण बारावें

बिल्वपत्राची साक्ष

मी एकदम स्वप्नांत दचकून जागा झालों तों मला वाटलें बाहेर कोणीतरी दारावर थाप मारून हांक मारीत आहे. " पटवर्धन ! पटवर्धन ! "

छे ! नुसता भास ! त्या हांकादेखील माझ्या स्वप्नांतीलच एक भाग असल्या पाहिजेत असा विचार करून मी या कुशीवरचा त्या कुशीवर वळलों, अंगावर पातळ चादर ओढून घेतली, आणि गुडघे जवळ ओढून घेऊन पुन्हां निजलों.

पण पुन्हां हांक ऐकूं आली, " पटवर्धन ! "

या वेळीं हांक अधिक जोरानें व त्रासून मारल्यासारखें मला वाटलें. अंथरुणावरून उठून दाराकडे जात मीं विचारलें, " कोण आहे ? "

" तार आहे तुमच्या नांवाची ! "

' तार ' हे शब्द ऐकल्याबरोबर मी जरा चपापलों. लगबगीनें मीं अंगांत शर्ट चढविला, खोलींतील विजेच्या दिव्याचें बटण दाबलें, व पुढें झालों.

तारेच्या शिपायाच्या त्या हांका ऐकून आई व शांताहि जाग्या झाल्या होत्या. मीं दार उघडून शिपायाच्या हातून तारेचा कागद घेतों न घेतों तों त्याहि माझ्या शेजारीं येऊन उभ्या राहिल्या. आईनें जरा घाबऱ्या स्वरानें विचारलें, " कोणाची रे तार ? "

तारेच्या कागदावरील गांवाचें नांव प्रथम पाहतांच मी आश्चर्यचकित झालों. अर्धवट आईला उद्देशून व अर्धवट आपणाशींच मी उद्गारलों,

" अलाहाबाद !–राधाकान्ताची तार ! "

' अलाहाबाद ' हीं अक्षरें वाचून मला खरोखरच फार विस्मय वाटला.

राधाकान्ताची आज तार येईल अशी आमची कल्पना असणें शक्यच नव्हतें. कारण, आज सकाळींच दोन दिवसांपूर्वींच्या तारखेचें पत्र आलें होतें, त्यांत त्यानें वडिलांची प्रकृति एकाएकीं बिघडल्याचें लिहून कांहीं जरूरीचीं औषधें अलाहाबादला मिळत नव्हतीं तीं मुंबईस खरेदी करून तावडतोब पाठविण्याविषयीं बजाविलें होतें. त्याप्रमाणें मीं लगेच फोर्टमध्यें जाऊन साऱ्या औषधांच्या कंपन्या धुंडून औषधें घेऊन पाठविलींदेखील होतीं. असें असल्यामुळें ऐन मध्यरात्रीं जेव्हां तारेच्या शिपायानें आम्हांला हाक मारून जागें केलें, आणि तार फोडून पाहतांच तिच्यांत 'अलाहाबाद' हीं अक्षरें दिसलीं तेव्हां मी साहजिकपणेंच अत्यंत आश्चर्यचकित झालों.

राधाकान्तकडून अशी एकाएकीं तार आली त्याअर्थीं तिच्यांत कांहीं तरी वाईटच बातमी असणार अशा शंकेनें माझें मन व्यथित झालें.

"काय आहे तारेंत?" आईनें मला अधीरतेनें प्रश्न केला.

परंतु माझें तिच्या प्रश्नाकडे लक्ष नव्हतें. धडधडणाऱ्या हृदयानें मीं आधीं तारेंतील मजकुरावरून दृष्टि फिरविली.

Durgaprasad दुर्गाप्रसाद	died काल	last रात्रीं	night, वारले,
Radhakant राधाकान्त	turned त्या वेळेपासून	mad वेडा	since झाला
then. आहे.	Your आपण	immediate तावडतोब	presence येण्याचें
required. करावें.	Anxiously अगदीं	waiting. वाट पाहात आहोत.	Munim मुनीम

तार वाचून मी स्तंभितच झालों. तारेचा शिपाई पाहिल्याबरोबर ज्या बातमीची शंका मनांत आली तीच केवळ नव्हे तर तिच्याहूनहि अधिक दुःखदायक बातमी आलेली पाहून आश्चर्यानें व शोकानें मी विव्हल झालों.

राधाकान्ताला वेड? म्हणजे हें आहे तरी काय?

एखादें अकल्पित आणि भयंकर दृश्य दृष्टीस पडतांच जसें व्हावें तशी माझी त्या क्षणीं स्थिति पाहून आईनें प्रश्न केला, " काय आहे रे मजकूर ? "

" काय आहे तारेंत ? " शांतानेंहि अधीरतेनें विचारलें.

तो तारेचा कागद शांताच्या हातीं देऊन आईकडे वळून मीं म्हटलें, " राधाकान्ताचे वडील काल रात्रीं वारले—"

" हं शेवटीं—" उसासा टाकीत येवढेच शब्द आईनें उच्चारले.

" अन् शिवाय—अन् शिवाय राधाकान्ताला तेव्हांपासून वेड लागल्यासारखं झालं आहे. " मी कसेंबसें तें वाक्य बोललों.

तें ऐकतांच आई एकदम उद्गारली, " काय !—म्हणतोस तरी काय ? "

मी कांहीं वेळ स्तब्धच राहिलों. मग मीं शांताच्या हातांतील कागदाकडे अर्धवट नजर टाकीत आईला म्हटलें, " ही तार खुद्द राधाकान्तानें केलेली नाहीं. त्यांच्या घरच्या मुनीमाच्या हातची ही तार आहे. "

उजव्या हाताच्या मुठीवर डाव्या हाताचें कोपरें ठेवून डाव्या हाताच्या तळहातावर हनुवटी टेंकून सचिंत स्थितींत आई कांहीं वेळ तशीच उभी राहिली.

शांतानें तार वाचल्यावर कागद माझ्या हातांत परत दिला व दुःखपूर्ण सुस्कारा सोडीत तिनें मजकडे पाहिलें.

चोहोंकडे शांतता होती, व त्या शांत रस्त्यावरील शांत इमारतींत आम्ही तिघेहि कांहीं वेळ खिन्न मनानें स्तब्ध उभीं होतों. त्या वेळेची ती शांतता माझ्या मनाला एखाद्या स्मशानांतील निःशब्दतेप्रमाणें भासली. खोलींत उजेड असूनहि अंधार पसरल्यासारखें मला वाटलें. त्या अकल्पित दुर्वार्तेनें हृदय दडपून गेल्यामुळें आपण खोलींत नसून कोठें तरी अधांतरीं उभे आहोंत व खालीं खालीं पडत आहोंत असा मला भास झाला. मला किंचित् भीतीहि वाटलीं व मीं भेदरलेल्या स्वरानें एकदम हांक मारली, " आई ! "

माझ्यासमोर उभ्या असलेल्या आईनें तळहातावरून हनुवटी उचलली व शांतपणें माझ्याकडे पाहात विचारलें, " काय ? "

मी आपल्या क्षणिक भ्रमांतून व भीतींतून जागा झालों व आईकडे आणि शांताकडे पाहात अर्धवट आपल्याशींच म्हटलें, " काय हें भलतंच झालं ? "

अलाहाबादच्या स्टेशनच्या आवारांत शिरून बदलल्या रूळावरून खडाड् खाड् खडाड् असा आवाज करीत गाडी चालली तेव्हां माझ्या हृदयाची स्थिति विलक्षण झाली. तार मिळाली त्या दिवशीं मी मुंबईहून निघालों तेव्हांपासूनच मनाची स्वस्थता कशी पार नाहींशी झाली होती. नानाप्रकारचे तर्ककुतर्क मनांत येत होते. राधाकान्तासारख्या शांतवृत्तीच्या आणि समतोल विचाराच्या माणसास वेड लागावें हा प्रकार इतका असंभवनीय होता, कीं केवळ दुर्गाप्रसादांच्या मृत्यूनें तो घडून आला असेल हें मनाला शक्य वाटेना, आणि उलट त्या मृत्यूखेरीज दुसरें काय संकट राधाकान्तावर कोसळलें असेल त्याचाहि अदमास मनाला करतां येईना. त्यामुळें प्रवासाचा सबंध वेळ चिंतेंतच गेला. रात्रभर झोंप कशी ती आली नाहीं. नांवाला सेकंड क्लासच्या एका बर्थवर अंथरुणावर पडलों होतों. " भुकेला कोंडा अन् निजायला धोंडा " म्हणतात त्याच्या उलट " जिवाला चैन नाहीं तर जिलबींत चव नाहीं अन् गादींत झोंप नाहीं " याचें प्रत्यंतर मला पुरें आलें. अलाहाबाद स्टेशनच्या आवारांत गाडी शिरल्यावर तर, आतां आपल्यापुढें कोणत्या प्रकाराचें ताट वाढून ठेवलें आहे कोणास ठाऊक, अशा शंकेनें हृदय धडधडूं लागलें.

स्टेशनवर गाडी थांबल्याबरोबर मी खालीं उतरलों. एका हमालाकडून मी माझी वळकटी व बॅग खालीं काढून घेत होतों, इतक्यांत एक उतार-वयाचा गृहस्थ माझ्याजवळ आला व त्यानें दोन्ही हातांचा प्रणाम करून किंचित् खालीं लवून मोठ्या अदबीनें हिंदी भाषेंत मला विचारलें,

" आपण मुंबईहून आलां काय ? "

त्याची ती अदबी आणि ऐन उत्तरी ठसक्यांत उच्चारलेला त्याचा तो प्रश्न यांचा माझ्या मनावर एकदम परिणाम झाला. मीं त्याच्याकडे जरा निरखून पाहिलें. त्याच्या उतारवयाची साक्ष देणाऱ्या त्याच्या पांढऱ्या मिशामुळें त्याच्या धिप्पाड शरीराचा मूळ रुबाब उलट वाढल्यासारखा दिसत होता. त्याचा पोषाख अंमळ अव्यवस्थित आणि मळकटच होता. पण त्याचा भालप्रदेश विशाल होता आणि त्याच्या विस्तीर्ण डोळ्यांची दृष्टि तीक्ष्ण आणि भेदक होती. मीं उत्तर दिलें,

" होय. मी मुंबईहून आलों. "

" मग आपलं नांव–"

" जगदीश–"

" दुर्गाप्रसादांचा मी मुनीम. माझं नांव मोतीलाल. मींच आपल्याला तार केली. आपण येण्याची कृपा केली, आतां आम्हांला जरा धीर आला. चलावें. बाहेर गाडी तयार आहे."

त्याच्या अदबीच्या बोलण्यांत आकर्षकता होती; पण दुःखाच्या भाराखालीं त्याचें मन दडपलें होतें हें त्या अदबीच्या शब्दांतहि स्पष्टपणें व्यक्त होत होतें.

मोतीलालनें मला गाडींत बसविलें, माझें सामान काळजीपूर्वक कोचमनच्या पायापाशीं हमालाकडून ठेवून घेतलें, आणि मग माझ्यासमोरच्या जागीं बसून त्यानें गाडी हांकण्याविषयीं कोचमनला सांगितलें.

गाडी चालू झाल्यावर मीं म्हटलें,

" दुर्गाप्रसाद अगदीं अकस्मात् वारले ही मोठी दुःखाची गोष्ट होय. आणि राधाकान्ताच्या वेडाचं तर——"

मी कांहींतरी असा प्रारंभ करीन अशी मोतीलालची अपेक्षाच होतीसें दिसलें. माझ्या शब्दाचें निमित्त करून तो म्हणाला,

" महाराज, आमच्यावर हें केवढं अरिष्ट कोसळलं आहे हें आमचं आम्हांला माहीत. दुर्गाप्रसादांची प्रकृति उलटली होती खरी; पण असं कांहीं होईल असं कोणाच्या ध्यानीं मनीं सुद्धां नव्हतं. परवां दुपारपर्यंत त्यांच्या प्रकृतीचं मान ठीक होतं. नेहमींप्रमाणें दुपारीं दोन वाजतां त्यांनीं अर्धा पेला दूध अन् नंतर मुसंबीचा रस घेतला, अन् नंतर अर्धा तास राधाकान्तांनीं त्यांना तुलसीरामायण वाचून दाखविलं तेव्हां ते चांगले हुशारींत होते. पण नंतर काय झालं राम जाणे ! संध्याकाळीं तब्येत एकदम बिघडली. दोन तीन डॉक्टर ताबडतोब आले. पण प्रभु रामचंद्राच्या इच्छेपुढं आपल्या प्रयत्नांची मातब्बरी किती चालणार ? पण मनाला असं वाटतं प्रभूनं एका संकटांतून दुसरं संकट निर्माण नव्हतं करायचं——"

त्याचा गळा अगदीं गहिंवरानें दाटला आणि डोळे पुसण्यासाठीं त्यानें वस्त्राचा पदर वर केला.

" पण केवळ शोकानं राधाकान्ताला वेड लागलं ? " मीं हळूच

विचारलें. " राधाकान्ताचा स्वभाव इतका विकारवश असेलशी माझी नव्हती कल्पना ! "

" नुसत्या शोकानं नाहीं त्यांना वेड लागलं."

" नाहीं ! मग ? " मीं मोठ्या उत्सुकतेनें विचारलें.

" मरणापूर्वी वकील बोलावून घेऊन त्यांच्या व डॉक्टरांच्या समक्ष दुर्गाप्रसादांनीं आपल्या मृत्युपत्रावर सही केली. तें त्यांनीं आधीं कित्येक दिवस तयार करून ठेवलं होतं. पण सही नव्हती. त्या मृत्युपत्रांतला मजकूर कळल्यापासून राधाकान्त वेडे झाले आहेत. "

" म्हणजे ? असं काय होतं त्या मृत्पयुत्रांत ? " मीं विचारलें. " राधाकान्तासारख्या सुविद्य अन् सद्गुणी मुलाला दुर्गाप्रसादांनीं आपली सारी इस्टेट दिली नसेल अशी कादंबरीकारालाहि कल्पना करवायची नाहीं— "

" छेः ! छेः ! तसं नाहीं."

" मग ? बरं, इस्टेट मिळाली नाहीं तरी त्याचं दुःख मानण्याच्या कोटींतला राधाकान्त नव्हता."

" नाहीं, नाहीं ! तसंहि नाहीं."

" मग कसं ? "

" तुम्हीहि आश्चर्यानं वेडे व्हाल असा मजकूर त्या मृत्युपत्रांत होता. "

त्या बोलण्यानें माझें आश्चर्य फारच वाढलें. मीं अधीरतेनें म्हटलें, " म्हणजे ? म्हणतां काय तुम्ही ? "

" दुर्गाप्रसादांनीं त्या मृत्युपत्रांत लिहिलें कीं राधाकान्त हा माझा मुलगा नाहीं. सोळा वर्षांपूर्वी एका शेतकऱ्याला रेल्वेच्या लाइनीलगतच्या शेतांत हा सांपडला व त्याच्यापासून घेऊन मीं त्याचें माझ्या मुलाप्रमाणेंच लालनपालन केलें. तो मला माझ्या पोटच्या मुलाप्रमाणेंच आहे म्हणून माझी सारी इस्टेट मीं त्याच्या नांवें केली आहे. "

मी विस्मयानें स्तंभितच झालों. गाडीच्या हेलकाव्यानें झुकलेल्या शरीराकडेहि माझें लक्ष राहिलें नाहीं, व खिडकीच्या चौकटीवर माझें डोकें हापटलें. या जगांत काय केव्हां घडेल, आणि कधीं काय कळेल याचा नियम नाहीं. त्या क्षणीं मनाला विलक्षण गांभीर्य व औदासीन्य प्राप्त झालें. मी खिडकींतून वांकून बाहेर पाहिलें तों एका शांत ओसाड गल्लींतून

आमची गाडी जात होती. " जग असंच ओसाड अन् उदास आहे ! " मीं मनाशीं म्हटलें.

बंगल्यावर आम्ही पोंचण्याच्या जरा अगोदर मोतीलाल म्हणाला,

" आपणांस एक विनंती करावयाची आहे. "

मीं प्रश्नात्मक दृष्टीनें त्याच्याकडे पाहिलें.

" ती ही कीं, बंगल्यावर पोंचल्यावर आपण राधाकान्ताची भेट घ्यावयाची घाई करूं नका. त्यांना एखाद्या खोलींत कोंडून ठेवण्यापर्यंत त्यांच्या वेडाची मजल गेलेली नाहीं हें खरं; पण त्यांच्या खोलींतून आम्ही सहसा त्यांना बाहेर जाऊं देत नाहीं; आणि त्यांना कळणार नाहीं अशा खुबीनं त्यांच्यावर सारखा पहारा ठेवण्याची आम्हीं व्यवस्था केली आहे. तुम्ही आला आहांत ही गोष्टसुद्धां त्यांना एकदम सरळपणानं सांगणं शहाणपणाचं होणार नाहीं. कारण तुमचा त्यांचा कितीहि स्नेह असला तरी लहानशा कणाच्या वजनानं-देखील इकडे तिकडे होणाऱ्या जवाहिऱ्याच्या ताजव्याच्या कांट्याप्रमाणें त्यांचं मन झालं आहे. अशा स्थितींत तुम्ही आल्याचं ऐकल्यावर ते कसे वागतील त्याचा कांहीं अदमास बांधतां येत नाहीं. तेव्हां तुम्ही तोंडबिंड धुवा, दूध प्या, आरामशीर पडा, तंवर मी युक्तीनं त्यांना तुमच्याकडे आणतों; किंवा तसं बरं वाटलं तर तुम्हांला त्यांच्याकडे नेतों. माझ्या कसुरीबद्दल आपली मजवर इतराजी होणार नाहीं अशी आशा आहे. "

कोणतीहि गोष्ट मिठासपणानं बोलण्याची खरी लकब मोतीलालच्या अंगीं पूर्णपणें होतीसें दिसलें. मुनीमाच्या गादीवर बसावयाच्या अगदीं लायक माणूस दुर्गाप्रसादांनीं निवडला होता खचित. त्याच्या बोलण्यांतील ती जवाहिऱ्याच्या ताजव्याची उपमा मार्मिक तर होतीच, पण श्रीमान् माणसाच्या नोकराच्या तोंडीं ती फारच समर्पक दिसण्यासारखी होती. अशा प्रकारें मनांतल्या मनांत त्या इमानी मुनीमाच्या बोलण्याचालण्याचें चिकित्सापूर्वक निरीक्षण करीत मीं त्याला म्हटलें,

" छेः ! छेः ! यांत कसूर कसली ? आपलं म्हणणं अगदीं बरोबर आहे. "

आमचें हें बोलणें झाल्यावर थोड्याच वेळानें बंगला आला, आम्ही गाडीखालीं उतरलों, व मला माझी खोली दाखविण्यांत आली.

तोंड वगैरे धुऊन मी परत येतों तोंच मोतीलाल खोलींत आला. त्याच्या-

बरोबर एक स्वयंपाकी ब्राह्मण होता, व त्याच्या एका हातांत पुऱ्यांची ताटली व एका हातांत दुधानें कांठोकांठ भरलेलें उत्तरी पद्धतीचें एक उभटें चांदीचें मोठें पात्र होतें. मोतीलालनें ब्राह्मणाकडून ते दोन्ही पदार्थ एका टेबलावर ठेववले व मला म्हटलें,

" आमच्या बेदिलीमुळं आज आपल्या आदरातिथ्यांत आमच्या हातून खूप गलतीं होतील त्याची माफी असावी. थोडं दूध घ्यावं. मालक असतांना आपलं येणं वास्तविक व्हायला हवं होतं, पण प्रभूची इच्छा कांहीं निराळीच होती ! त्यानं या विचित्र वेळीं आपलं येणं घडवून आपलं. घ्या. आपण थकलेले असाल. आणखी पुरी, दूध आणवूं ? "

टेबलाजवळ जात मीं म्हटलें,

" आदरातिथ्याच्या औपचारिक प्रकाराविषयीं आपण उगीच काळजी करूं नये. मी परकेपणानं का इथं आलों ? "

मीं एक पुरी उचलली व ती मोडून तोंडांत घालीत दुधानें कांठोकांठ भरलेल्या त्या रौप्यपात्राकडे पाहिलें. खूपशी मलई केशरी दुधावर तरंगत होती, आणि बदामाच्या कांचोऱ्या, चारोळ्या आणि वेलचींची बरीचशी पूड यांचा थरच्या थर त्या मलईवर जमलेला होता. वास्तविक तें दूध म्हणजे अमृतासारखें गोड म्हणून कोणींहि प्राशन केलें असतें. पण चहाच्या संवयीनें विकृत झालेल्या माझ्या जिव्हेला तें आकर्षक वाटलें नाहीं. पण दूध नको म्हणून चहा मागणें प्रशस्त नव्हतें. दोन पुऱ्या खाल्ल्यावर मीं दुधाचें भांडें उचललें व दोन घोट प्यायलों.

त्या दोन घोटांची अमृतासारखी मधुर चव मी कधीं विसरणार नाहीं. मीं मनाशीं म्हटलें,

" अन् असें हें अमृत टाकून मी चहा मागणार होतों ! शांताला सोडून माणिक मला हवीशी वाटत होती त्यांतलंच हें ! केवळ मूर्खपणानं जगांतल्या कितीतरी अमृतांना मनुष्य स्वतःला पारखा करून घेत असतो ! "

माझें खाणें झाल्यावर मोतीलाल म्हणाला,

" आतां आपण आराम करा. मी त्यांच्याकडे जातों अन् त्यांचा कल कसा काय आहे तें पाहून आपली त्यांची भेट करवितों.

मीं आरामखुर्चीवर पडून दहा बारा मिनिटें झालीं असतील नसतील तोंच मोतीलाल मजकडे लगबगीनें आला, आणि हलक्या आवाजांत म्हणाला,

" चला, त्यांच्याकडे चला. तुम्ही आल्याचं मीं त्यांना सांगितलं नाहीं. पण ते सध्यां शांतपणानं एका आरामखुर्चीवर पडले आहेत, अन् अशा मनःस्थितींत त्यांनीं तुम्हांला पाहिलं तर बहुशः ते तुम्हांला ओळखतीलसं मला वाटतं. चला, मात्र त्यांच्याशीं बोलण्याचालण्यांत फार सावधपणा ठेवायला पाहिजे ! "

मी मोतीलालच्या मागोमाग चालूं लागलों.

राधाकान्ताच्या खोलींत आम्हीं गेलों तों राधाकान्त मोतीलालनें सांगितल्याप्रमाणें खुर्चीवर पडलेला नव्हता. दारासमोरच्या भिंतीला दुर्गाप्रसादांचा एक मोठा फोटो होता त्याकडे निरखून पाहात तो उभा होता. दाराकडे त्याची पाठ होती. आमची चाहूल लागतांच त्यानें दचकून मागें वळून पाहिलें.

त्याची माझी दृष्टादृष्ट झाली.

मीं किंचित् हंसल्यासारखें केलें व नमस्कार करण्यासाठीं मी हात वर करणार व " कसं काय ? " असें विचारणार तोंच—

राधाकान्ताची ती विलक्षण मुद्रा पाहून माझे हात जेथल्या तेथेंच राहिले आणि तोंडांतील शब्द ओठावरच थांबले.

तीव्र शोकामुळें माणसाच्या चेहऱ्यावर जें औदासीन्य येतें त्याची छाया तर राधाकान्ताच्या मुद्रेवर होतीच; पण त्याच्या दृष्टींत जो एक विलक्षण शून्यपणा आला होता त्यानेंच मी अधिक चपापलों. तो माझ्याकडे पाहात होता खरा; पण त्याच्या दृष्टीचा वेध माझ्यावर असण्यापेक्षां अंतराळींच कोठें तरी असल्यासारखें दिसत होतें. वेड्या मनुष्याचे हे वेधशून्य डोळेच सर्वांत भीतिप्रद असतात. मला तरी त्या क्षणीं राधाकान्ताचे डोळे पाहतांच भय वाटलें खरें; आणि कांहींच न बोलतां मी उभा राहिलों.

राधाकान्तानें कांहीं वेळ माझ्याकडे अगदीं निरखून पाहिलें. मध्येंच त्रासल्यासारखें करून त्यानें भुंवया चढविल्या आणि जरा वेळानें मनाशींच " हंः ! " असें करून त्यानें माझ्याकडे पाहावयाचें सोडून दिलें. तें पाहून मोतीलाल त्याला म्हणाला.

" ओळखलं ना आपण यांना ! आपले मुंबईचे स्नेही जगदीश—"

मोतीलालचें वाक्य पुरें होण्यापूर्वींच राधाकान्त एकदम मोठ्यानें हंसला व तितक्यांत एकाएकीं हंसावयाचा थांबला ! तो हंसला खरा; पण त्या हास्यांत आनंदाचें किंवा समाधानाचें माधुर्य अल्पांशानेंहि नव्हतें. आकाशांत

मेघांची गर्दी होऊन दिशा काळ्याकुट्ट झाल्या असतांना वादळाच्या ऐन थैमानांत कडाडणाऱ्या विजेचा प्रकाश जसा नेहमींच्या प्रकाशाप्रमाणें सुखदायी वाटण्याऐवजीं भीषण वाटतो, तद्वतच राधाकान्ताचें तें हंसणें ऐकून बरें वाटण्याऐवजीं कसेंसेंच वाटलें.

" तुम्ही ही मस्करी केव्हां बंद करणार ? " राधाकान्तानें मोतीलालकडे पाहून म्हटलें.

मोतीलालनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. असल्या प्रश्नाला तो काय उत्तर देणार ?

" हे जगदीश पटवर्धन काय ? " राधाकान्तानें जरा रागाच्या आविर्भावानें पुढें म्हटलें, " हं: ? खूप ! खूप ! गांवांतले डॉक्टर एकामागून एक धरून आणून प्रत्येकाला जगदीशचं सोंग देताहां काय ? हें सारं तुम्ही कां करताहां मला माहीत आहे ! स् ! या घराच्या पिंजऱ्यांत मला कां पकडता रे ! अरे, माझे आईबाप मला द्या ! जा ! जा ! त्या शेतकऱ्याला आणा आधीं ! —काय ? नाहीं जात ?–हा मग मीच चाललों तर—! "

असें म्हणत राधाकान्तानें दाराकडे एकदम धांव घेतल्यासारखें केलें. पण मी व मोतीलाल, दोघेंहि सावध होतों. आम्ही त्याला धरून ठेवलें.

आतां मात्र राधाकान्तावर जास्त सक्तीचा पहारा ठेवणें अगत्याचें होतें. मी मुद्दाम जाऊन सिव्हिल सर्जनला घेऊन आलों. त्यांचें म्हणणें पडलें कीं, राधाकान्ताला ताबडतोब वेड्याच्या इस्पितळांत पोंचविण्याची व्यवस्था करावी. पण तसें करणें माझ्या व मोतीलालच्या जिवावर आलें. इतक्या थराला अजून राधाकान्ताचें वेड गेलें नाहीं, दोन तीन दिवसांत त्याचें मन जरा शांत होईल असा आमचा विचार. त्यामुळें रात्रंदिवस नोकरांनीं राधाकान्ताच्या खोलींत पाहरा करीत बसावें असें ठरवून आम्ही अधिक भानगडींत पडलों नाहीं.

पहांटेचे अडीच किंवा तीन वाजले असतील. बंगल्यांतील मुख्य दिवाणखान्यालगतच माझी खोली असल्यामुळें तेथील मोठ्या घड्याळाचे प्रत्येक तासाचे ठोके मला ऐकूं येण्यासारखे होते; व ते मोजण्यातच मीं सारी रात्र घालविली होती. त्या परिस्थितींत आणि मनःस्थितींत झोप येणें शक्यच नव्हतें. राधाकान्ताची ही काय भलतीच दशा झाली, आणि याला आतां इलाज काय करावा हे प्रश्न मनापुढें सारखे उभे होते, आणि मुख्य रस्त्यानें

जातां जातां आजूबाजूच्या शेताभातांत शिरून थोडीशी हिरवळ खाणाऱ्या मोकाट जनावराप्रमाणें मन इतरहि अनेक विचारांत पुनः पुन्हा गुंते. विशेषतः राधाकान्त हा दुर्गाप्रसादांचा पोटचा मुलगा नसल्याच्या अद्‌भुत वार्तेविषयीं आश्चर्य करण्यांत माझें मन कितीदां तरी गुंग झालें. मनाच्या या अशा अवस्थेंत झोंप कसची येणार ?

पण मला वाटतें अडीच वाजण्याच्या सुमारास माझा किंचित् डोळा लागला असावा. कारण दोहोंचे ठोके मीं स्पष्टपणें ऐकले, पण अडीच वाजल्याचा एक ठोका मीं ऐकला नाहीं.

" किती वाजले कोणास ठाऊक ! " असें मनाशीं म्हणत मी या कुशीवरचा त्या कुशीवर झालों, आणि आतां झोंप आली तर पाहावी अशा इराद्यानें मीं पांघरूण व्यवस्थितपणें अंगावर ओढून घेतलें—

इतक्यांत—

" महाराज ! महाराज ! दार खोला ! " असें घाबऱ्या स्वरानें म्हणत कोणीतरी खोलीच्या दारावर दोन तीन थापा मारल्या.

तो मोतीलालचाच आवाज होता.

मी घाबरून झटकन् पांघरूण फेंकून उठलों आणि दार उघडलें.

" घात झाला ! राधाकान्त नाहींसे झाले ! आतां कसं काय करायचं ? " मोतीलाल धांपा टाकीत म्हणाला.

मी क्षणभर तसाच उभा राहिलों. माझी वाचाच नाहींशीं झाल्यासारखें मला वाटलें.

नंतर आवंढा गिळीत मी म्हटलें,

" इ-अ ! ठीक ! "

आठ दिवस राधाकान्ताचा शोध करण्याच्या प्रयत्नांची आम्हीं शिकस्त केली. पोलिसांत वर्दी दिली, शेंकडों रेल्वे स्टेशनांवर टेलिग्राम करून ठेवले, शेतवाड्यातून तपास काढावयास पांचपन्नास माणसें धाडलीं, आणि खुद्द अलाहाबादचा तर कोनाकोंपरा शोधून पाहिला. पण कांहीं—कांहीं उपयोग झाला नाहीं.

त्यानंतर अलाहाबादला मीं राहण्यांत कांहीं अर्थ नव्हता. मी मुंबईस परत जावयास निघालों तेव्हां मोतीलाल एखाद्या लहान मुलासारखा रडला. एखाद्या वडील माणसाप्रमाणें त्याची समजूत करणें मला भाग होतें. स्वतःचें

दुःख गिळून लोकाच्या शोकदग्ध अंतःकरणावर समजुतीचे चार फुंकर घालतां येणें हाच या जगाच्या व्यवहारांतील वडीलपणाचा अर्थ! आणि प्रत्येक माणूस स्वतःच्या दुःखप्रसंगावरून हा वडीलपणा थोडाफार शिकतोच. मी तरी तो शिकलों होतों खास.

२

राधाकान्ताच्या या हकीगतीनें कित्येक दिवस आमच्या कुटुंबावर खिन्नतेचें पटल आलें. पण या जगांत सारेंच नश्वर आहे. येथें व्यक्ति येतात आणि जातात त्याप्रमाणेंच सुखदुःखेंहि उत्पन्न होतात; आणि अंतःकरणाला कमी अधिक पीळ पाडून नाहींशीं होतात. नदीच्या पाण्यांत सांपडलेली गवताची काडी पात्रांतील एखाद्या भोंवऱ्याखालीं कांहीं वेळ गिरक्या घेते, त्यांतून निसटते, पुन्हा दुसऱ्या भोंवऱ्यांत सांपडते आणि थोड्या वेळानें पुन्हा त्यांतून सुटून पुढें जाते. तद्वतच या सृष्टीच्या ओघांत पडलेल्या जीवात्म्याचें आहे. सुखदुःखांच्या भोंवऱ्याभोंवतीं कांहीं काळ घुटमळणें आणि पुन्हा भवनदीच्या ओघाबरोबर पुढें जाणें हाच त्यांचा क्रम आहे. या क्रमानुसार राधाकान्ताचें दुःख कांहीं कालानें आम्हांस कमी तीव्र वाटूं लागलें असल्यास नवल नाहीं.

आज तर आमच्या मुंबईच्या घरांत आनंदच स्पष्टपणें पसरला होता. दोन दिवसांपूर्वीं बाबांना काकांचें पत्र आलें होतें. त्यांत त्यांनीं आपली यात्रा संपली असल्याचें व अमुक दिवशीं अमुक गाडीनें मुंबईस आपण पोंचणार असल्याचें लिहिलें होतें. त्या पत्राप्रमाणें पाहतां संध्याकाळीं साडेसहा वाजतां कुलाब्याच्या स्टेशनवर येऊन पोंचणाऱ्या पॅसेंजरनें काका व काकू आज येणार होतीं, व त्यामुळें सकाळपासून आमच्या घरांत आनंदाची गडबड उडाली होती.

आम्ही सर्वांनींच स्टेक्षनवर जावयाचें प्रथम ठरलें होतें. पण पेढीवर कांहीं आकस्मिक काम उद्भवल्यामुळें बाबांना संध्याकाळीं सवड होणार नाहींसें ठरलें, आणि दुपारीं बाळू आचारी तापानें अवचित पडल्यामुळें आईनेंहि घरींच राहण्याचें ठरविलें.

दुपारचा चहा झाल्यापासूनच स्टेशनवर जाण्याची माझी व शांताची धांदल सुरू झाली. वास्तविक साडेसहाच्या गाडीवर जाण्यासाठीं पांच सव्वापांचला निघालें तरी सहज चालण्यासारखें होतें. पण चार वाजून गेले नाहींत तोंच

शांतानें स्वतःचें नेसणें सवरणें पुरें केलें आणि निघण्याविषयीं माझ्यामागें तगादा लावला. शेवटीं मीं तिला थट्टेनें म्हटलें,

" असं काय अगदीं लहान मुलासारखं करतेस ? काका काय असे बारा वर्षांनीं येताहेत कीं काय ? "

" आई अन् बाबा येणार या कल्पनेनं मला काय होतंय् तें मला सांगतां येणं शक्य नाहीं. इतके दिवस मी त्यांच्यापासून दूर होतें पण मला कांहीं वाटलं नाहीं; पण आज त्यांची भेट होणार हें पाहून मात्र आतां एकेका घटकेचा उशीरहि सहन करवत नाहीं. "

" वेडी रे वेडी ! " असें म्हणून मी हातांतील पुस्तक पुन्हा वाचूं लागलों.

" हें काय ? " माझ्या त्या करण्यानें चिडून शांता म्हणाली, " पुरे झाली ना चेष्टा ! मी मदत करूं का पोशाख करायला ? "

असें म्हणून तिनें कपाटांतून माझा कोट काढून आणला व माझ्यापुढें धरला.

तिची अधिक चेष्टा करण्यांत अर्थ नव्हता.

मीं हंसत तिच्या हातून कोट घेतला व घातला आणि टोपी घालतां घालतांच खिडकीबाहेर डोकावून रस्त्यानें जाणाऱ्या एका गाडीवानाला " सत् ! " म्हणून खुणवून थांबविलें.

आईला विचारून आम्ही दोघें निघालों.

आम्ही कुलाब्याच्या स्टेशनवर पोंचलों तेव्हां सवापांच झाले होते.

" आतां तास सवातास इथें काय करायचं ? " मीं शांताकडे पाहात म्हटलें, " फार लवकर आलों आपण. "

" काढूं कसा तरी वेळ. " शांता म्हणाली. " पण घरीं मला मुळींच चैन पडलं नसतं. "

इतकें आमचें बोलणें होत आहे तों ज्या प्लॅटफॉर्मवर आमची गाडी यावयाची होती त्या प्लॅटफॉर्मजवळ आम्ही येऊन पोंचलों.

" गाडी वेळेवर येणार आहे कीं नाहीं पाहूं दे. " असें म्हणत प्लॅट-फॉर्मच्या तोंडाशीं असलेल्या फळ्याकडे मीं पाहिलें.

फळ्यावर खडूनें लिहिलें होतें :—

Train	Arrival Time	Expected
Gujarat Passenger	18–30	19–10

तें पाहतांच मी उद्गारलों,

" झालं ! गाडी पाऊण तास लेट ! पाहिलंस ! "

शांतानें वर मान करून फळ्याकडे पाहिलें.

" च्‌ ! काय मेलं ! " ती उद्गारली.

" आतां काय दोन तास इथें काढायचे ? " मीं म्हटलें.

" च्‌ ! " इतकेंच किंचित्‌ त्रासिकपणें उद्गारून शांता त्या फळ्याकडे पाहात उभी राहिली.

मग ती माझ्याकडे वळून म्हणाली,

" या गाड्यांचं अगदीं हें ठरलेलं आहे ! आपलीं कोणी माणसं यायचीं असलीं कीं गाडी लेट असायचीच !—आतां काय करावं बरं ? "

" तूं म्हणशील तसं. "

" घरीं जाऊन यायचं ? "

" चलायचं आहे ? माझी हरकत नाहीं. "

" अं— " असें म्हणून शांता क्षणभर तशीच उभी राहिली. तिच्या मनाचा कांहीं निश्चय होईना.

मी तिच्या उत्तराची वाट पाहत उभा राहिलों; इतक्यांत माझ्या मागून कोणी तरी खाड खाड बूट वाजवीत माझ्याकडे धांवत आल्यासारखें मला वाटलें. मीं मागें वळून पाहिलें तों तो इसम अगदीं माझ्या जवळ आला आणि हंसत माझ्यापुढें हात करून म्हणाला,

" Oh Jagadeesh ! Is it really you ? (ओहो ! जगदीश ? तूंच कां हा ?)"

मी त्याला ओळखलें.

" Who ? Cyril ? How glad to meet you ! (कोण ? सिरिल ? तुला पाहून मला किती आनंद झाला आहे म्हणून सांगूं !)"

असें म्हणत मीं त्याच्याशीं हस्तांदोलन केलें.

मी कॉलेजांत असतांना सिरिल रोबेनची व माझी मैत्री झाली होती. तो जातीनें ख्रिस्ती होता आणि त्याचें माझें कॉलेजहि एक नव्हतें. तो एंजिनिअरिंग कॉलेजांत होता. पण मी आमच्या कॉलेजांतील सर्वांत उत्तम टेनिस खेळणारा होतों त्याप्रमाणें तो त्याच्या कॉलेजांतील होता. त्यामुळें त्याची माझी बरीच दोस्ती जमली होती, व एकमेकांच्या खेळाबद्दल आम्हां दोघांनाहि साभिमान कौतुक वाटत असल्यामुळें आम्ही दोघे कॉलेजांत असेपर्यंत ती टिकलीहि होती.

जुन्या सहाध्यायाची भेट ही केव्हांहि आनंदाचीच असते; पण मामुली सहाध्यायी भेटण्यानें होणाऱ्या आनंदापेक्षां ज्याच्याशीं मनमोकळेपणाने पूर्व प्रसंगाच्या आठवणी काढून मजेनें बोलतां येईल असा सहाध्यायी भेटला म्हणजे होणारा आनंद शतपटीनें अधिक असतो.

" बोल, बोल ! आज आठ दहा महिन्यांनीं तूं भेटतो आहेस ! " सिरिल माझा हात दाबीत म्हणाला. " तुझी बातमी काय, सांग ! "

दहा महिन्यांची हकीगत दहा मिनिटांत सांगणें जितकें शक्य होतें तितकें मीं सांगितलें. त्याचीहि हकीगत मीं विचारली व ती त्यानेंहि थोडक्यांत सांगितली. तो एंजिनिअरिंगची परीक्षा पास होऊन मोठ्या खटपटीनें व वशिल्यानें त्यानें आरमारी खात्यांत एक मोठ्या पगाराची जागा मिळवली.

सिरिलनें बोलतां बोलतां दोनतीनदां शांताकडे प्रश्नात्मक दृष्टीनें पाहिलें म्हणून ती कोण तें मीं त्याला संक्षेपानें सांगितलें व आम्ही स्टेशनवर कशासाठीं आलों व गाडी लेट असल्यामुळें आम्ही रेल्वे कंपनीला शाप देत कशीं उभीं होतों तेंहि सांगितलें.

" मग ? आतां काय करणार ? " सिरिलनें विचारलें.

" ही म्हणेल तसं करायचं. "

" Look here (हें बघ.) जगदीश, तुम्हां दोघांची हरकत नसेल तर मी एक सुंदर कार्यक्रम सुचवितो. "

" हं ? काय ? "

" तुम्ही कुलाब्याचं Light house (दीपगृह) – कुलाब्याची दांडी म्हणतात – ती कधीं तिथें जाऊन पाहिली आहे ? "

" नाहीं. " शांताच्या व माझ्या, दोघांच्या वतीनें मीं उत्तर दिलें.

" शक्यच नाहीं. या लढाईच्या दिवसांत कोणालाच तिथें जाऊं देत नाहींत. "

" मग ? तुझं म्हणणं काय ? दाखवतोस का आम्हांला ? "

" तुमची इच्छा असेल तर. माझ्या नोकरीच्या कामापैकीं दर शनिवारीं दांडीवर जाऊन पाहणी करून येण्याचं एक काम आहे. मला तुम्हांला सहज नेतां येईल. यायचं आहे ? "

" काय ? चलायचं आहे ? " मीं शांताला विचारलें.

" पण–अं–गाडी सवासातला येईल. " अर्धवट रुकार देत व अर्धवट शंका काढीत शांता म्हणाली, व तिची शंका सिरिलपुढें मांडण्याच्या अर्थानें मीं त्याच्याकडे वळून पाहिलें.

" अंः ? त्याची काळजी नको. " सिरिल हंसत म्हणाला, " एक टॅक्सी करून आपण धक्क्यापर्यंत जाऊं. तेथें एक पडाव माझ्यासाठीं सरकारी हुकमानं तयार असतो. दांडीवर आपण पंधरा मिनिटांपेक्षां अधिक वेळ घालविणार नाहीं. साडेसहाला आपण धक्कयावर परत येऊं. मग मीं घरीं जाईन, तुम्ही इकडे या. पावणेसातच्या आंत तुम्ही इथें परत याल याविषयीं खात्री मीं देतों. Come along ! Don't be too thoughtful (चल रे ! इतका काय त्यांत विचार करतो आहेस ?) "

असें म्हणून सिरिलनें उजवा हात माझ्या डाव्या खांद्याखालून घालून मला जवळजवळ ओढलेंच.

इतकें झाल्यावर नाहीं म्हणणें शक्य नव्हतें. शिवाय आमची जावयाची इच्छा नव्हती असेंहि नाहीं. फक्त गाडीच्या वेळेच्या आंत परत स्टेशनवर येऊन पोंचण्याचीच आम्हांला काळजी होती, व ती मीं पुनः पुन्हा सिरिल-जवळ बोलून दाखवितांच तो हंसून म्हणाला,

" कमाल आहे ! पावणेसातला तुम्ही इथें परत याल याबद्दल मी आपल्या जिवाची पैज लावूं का ? "

ते त्याचे गमतीदार शब्द ऐकून आम्ही दोघेहि हंसलों, व तोहि हंसला. आम्ही धक्कयावर जाऊन पडावांत बसलों व पडाव चालू झाला न झाला तोंच पावसाचे टपोरे थेंब पडावयास प्रारंभ झाला, आणि ढगहि बरेच जमल्यासारखे दिसूं लागले.

" अगबाई ! पाऊस कोसळणार का काय ! " चिंतेच्या स्वरानें शांता म्हणाली.

" Don't worry ! (त्याची फिकीर करूं नका) " सिरिल म्हणाला.

" मुंबईच्या पावसाची सर अन् मुंबईच्या सट्टेबाजांची श्रीमंती दोन्ही सारख्या. एका क्षणीं गरजतील अन् दुसऱ्या क्षणीं ओसरतील ! "

ती त्याची उपमा ऐकून मीं व शांता हंसलों.

" अरे वा ! सिरिल ! तूं आतांशा टेनिस सोडून काव्याचा खेळ खेळायला लागला आहेससं दिसतं ! "

सिरिल मोठ्यांदा हंसला.

दांडीच्या इमारतींत पाहण्यासारखें जें कांहीं होतें तें आमचें पंधरा मिनिटांत पाहून झालें. तोंपर्यंत सिरिलनेंहि आपलें काम आटोपलें. आम्ही खालीं उतरण्याच्या बेतांत होतों इतक्यांत पडावाचा एक खलाशी वर आला आणि सिरिलला सलाम करून म्हणाला.

" साहेब, इतक्यांत निघतां नाहीं यायचं. "

" कां रे ? काय झालं ? "

" साहेब, पडावाच्या सुकाणूचा दांडा उचकटून तुटला आहे.

" काय ? "

" साहेब, तो रिपेर केल्याविना पडाव चालवणं बरं नाहीं. "

" मग ? "

" आपुन इथें बसा. बारक्या होडग्यांत बसून आम्ही दोघं धक्क्यावर जाऊन सरकारी मिस्त्रीला घेऊन येतों. "

" बरं. जा. आटप. " सिरिल म्हणाला.

" काय रे ? " मीं मध्येंच विचारलें, " किती वेळांत होईल पडाव तयार ?"

" त्याची नका फिकिर करूं साहेब ! " तो खलाशी थबकून म्हणाला, " आत्तां अर्धा पाऊण घंट्यांत सारी रिपेर होईल. "

" पाऊण घंट्यांत ! " मी उद्गारलों, " ठीक. "

त्या खलाशाला पाऊण तास म्हणजे थोडा अवधि वाटत होता. पण मला व शांताला पाऊण तासाची खोटी म्हणजे केवढा घोटाळा वाटण्यासारखा होता हें त्याला बिचाऱ्याला काय माहीत ! सिरिलकडे वळून मीं म्हटलें,

" वा ! चांगला घोटाळा झाला म्हणायचा ! "

" आपण कांहीं आतां गाडीच्या वेळेवर पोंचणं शक्य नाहीं ? च काय भलतंच झालं हें ! " शांता अगदीं रडव्या स्वरानें म्हणाली.

" भलतंच झालं खरं " मीं म्हटलें. " पण असा कांहीं अपघात होईल ही मला काय कल्पना ? "

" स्टेशनवर कोणीं न आलेलं पाहून आईला काय वाटेल ! "

" अन् बाबा माझ्यावर आज किती रागावतील ! छे छे ! अगदीं भलता गाढवपणा झाला. "

" अन या साऱ्या प्रकाराचा दोष माझ्यावर आहे " सिरिल म्हणाला. " तुम्ही माझ्यावर कितीहि रागावलांत तरी थोडं होईल. "

"तुला तरी काय कल्पना असलं काहीं होईल याची ?" सिरिलला मीं म्हटलं. इतक्यांत आकाशांत मोठ्यांदां मेघगर्जना झाली आणि सोसाट्याच्या वाऱ्याचा झोत दीपगृहाच्या स्तंभावर जोरानें " सूं " असा वाजून पूर्वेकडे वाहिला.

" ठीक ! आणखी वादळहि होणार का ! " सिरिल अर्धवट आपल्याशीं व अर्धवट मोठ्यानें म्हणाला, " छेः ! छेः ! तुम्हांला बरोबर आणण्याची बुद्धि मला कोठून झाली कोण जाणे ! माझ्या वर्तनाच्या लाजेनं मला तुमच्याकडे पाहवत सुद्धां नाहीं. "

" सिरिल ?" मीं त्याच्या खांद्यावर हात ठेवीत म्हटलें " असं बोलूं नाहीं देणार मी तुला ! झालं तें झालं. आतां तूं उगीच मनाला त्रास करून घेऊं नकोस."

" नेमानेम असतील तशा गोष्टी व्हायच्या ! " शांता म्हणाली, " याचा दोष आम्ही आपल्याला देणं शक्य नाहीं. "

आम्ही धक्क्यावर परत आलों तों सवासात झाले होते. पावसाची मुसळधार सुरू झाली होती. गाडी लवकर मिळेना.

कुलाब्याच्या स्टेशनवर आलों तों साडेसात वाजून गेले होते. गुजराथ पॅसेंजर येऊन, तिचे उतारू घरोघर जाऊन रिकामी गाडी मागें लोटण्यांतहि आली होती.

" आतां शक्य तितकं घरीं लवकर जाणं हाच उत्तम मार्ग, नाहीं ? " मीं म्हटलें.

" नाहीं तर काय ? "

आम्ही स्टेशनच्या बाहेर येऊन गाडींत बसलों. पाऊस जोरांत चालूच होता. गाडी चालू झाली इतक्यांत स्टेशनच्या कंदिलाच्या उजेडांत मला कायसें दिसलें व मीं एकदम ओरडून म्हटलें,

" कोण ! राधाकान्त ! ए गाडीवाला ? उभी कर ! उभी कर ! "

गाडी उभी राह्यची वाट न पहातां मीं एकदम गाडींतून उडी मारली, आणि तशा त्या मुसळधार पावसाला न जुमानतां मी धावलों.

हो ! माझा तर्क खरा होता !

स्टेशनसमोरच्या फुटपाथवर एका इमारतीच्या आसऱ्यानें राधाकान्त उभा होता.

तो पावसानें चिंब झाला होता.

त्याला एकदम मिठींत धरीत मीं म्हटलें,

" राधाकान्त ! राधाकान्त ! "

एखाद्या झोंपेंतून जागृत होणाऱ्या माणसाप्रमाणें राधाकान्तानें मजकडे पाहिलें व मग हलक्या स्वरांत म्हटलें,

" कोण ? जगदीश ? "

" हो, मीच तो. चल, चल. गाडींत चल आधीं. " असें म्हणत मीं त्याला आवेशानें एकदम एखाद्या लहान मुलासारखें उचललें व गाडी-कडे नेलें.

गाडींत राधाकान्ताला आणल्यावर मीं त्याचे कपडे काढले व माझा कोट त्याला घातला.

शांता या साऱ्या प्रकारानें विस्मित होऊन गेली होती. अर्थात् मीं ज्याला आणला तो राधाकान्त येवढें मीं तिला प्रथमच सांगितलें.

गाडी चालू झाल्यावर मीं राधाकान्तला म्हटलें,

" मला ओळखलंत ? "

" नाहीं तर ! " राधाकान्तानें हंसत उत्तर केलें.

पण एखाद्या गुप्त शाईशीं अक्षरें दिसूं लागावी तसें त्याचें हंसणें दिसलें.

त्याच्या वेडाचा यत्किंचित्‌ति उल्लेख करणें बरें नव्हे हें मला पुरें समजत होतें. पण मला राहवेना म्हणून मीं विचारलें,

" इथें कुठें तुम्ही होतां ? "

" काय जणं ! " कांहीं आठवल्यासारखें करीत कपाळावर उजव्या हाताची बोटें चोळीत तो पुटपुटला,

" तुम्ही कसे भेटलांत याचं मलाहि आश्चर्य वाटतं आहे ! मला खूप खूप झोंप लागली असावी ! मी जागा झालों तों मी भिजतों आहे येवढंच

मला समजलं ! मी कुठें होतों, केव्हां होतों – कांहींच कसं मला आठवत नाहीं ! च् ! काय झालं कोणास ठाऊक ! ”

मी मग अधिक बोललों नाहीं.

आम्ही घरीं पोंचलों तों काका-काकू आलेली होती व सारी मंडळी आमची काळजी करीतच बसली होती. वर पोंचल्याबरोबर मीं सारी हकीकत शक्य तितक्या थोड्या शब्दांत सांगितली. राधाकान्ताला पाहून सर्वांना आनंद झाला व त्या आनंदात स्टेशनवर हजर राहाण्यासंबंधीं आमच्या हातून झालेल्या चुकीची आठवण सर्वजण विसरून गेले.

बाबा, काका, मी व राधाकान्त पुढच्या दिवाणखान्यांत होतों व आंतल्या हॉलमध्यें आई, काकू व शांता बोलत होत्या. मीं राधाकान्ताला चांगलें धोतर नेसावयास आणून दिलें, आणि तें त्याचें नेसून झाल्यावर त्याला म्हटलें,

“ आतां तो माझा कोट काढा अंगांतून. हा शर्ट घाला. ”

“ ठीक. ” असें म्हणून राधाकान्तानें कोट काढला.

“ पण थांबा. शर्ट घालण्यापूर्वीं या टॉवेलनें अंग चोळून पुसा चांगलें. हा घ्या टॉवेल. ”

राधाकान्तानें टॉवेल घेतला व अंग पुसण्यास सुरवात केली.

काका एकीकडे बाबांशीं बोलत होते व एकीकडे आम्हां दोघांकडे पहात होते. मध्येंच राधाकान्ताकडे पाहतां पाहतां विस्मयानें चपापल्याप्रमाणें त्यांची मुद्रा बदलली असा मला भास झाला. पण तो भास नव्हता, कारण दुसऱ्या क्षणीं काका राधाकान्ताच्या उघड्या अंगाकडे, विशेषतः त्याच्या डाव्या दंडाकडे अधिकच निरखून पाहूं लागले. मी या प्रकाराचें मनाशीं आश्चर्य करीत आहे तोंच काका आपल्या बसल्या जागेवरून उठले. राधाकान्ताजवळ येऊन त्यांनीं त्याचा दंड निरखून पाहिला, व तो पाहतांच त्याच्या चेहऱ्याकडे दृष्टीची टक लावून ते उद्गारले,

“ हो ! खास ! देवा ! माझा तर्क खरा असेल का ? ”

मला हा प्रकार कांहींच कळेना.

राधाकान्तहि गोंधळून काकांकडे पाहूं लागला.

“ हो ! शंकाच नाहीं. ” राधाकान्ताचा दंड तसाच आपल्या हातीं ठेऊन काका पुन्हा उद्गारले व नंतर बाबांकडे वळून ते म्हणाले,

" गोविंदराव, इकडे या पाहू. "

काकांनीं अशी कांहीं विलक्षण स्वरानें हाक मारली, कीं ती ऐकतांच बाबा जागेवरून उठले व जवळ आले.

राधाकन्ताचा दंड बाबांना दाखवीत काका म्हणाले,

" हा आमचा रघुनाथ आहे असं नाहीं तुम्हांला वाटत ? चेहरा आज पंधरा सोळा वर्षांनीं ओळखणं शक्य नसलं तरी त्याचीहि ओळख मला पटते आहे. पण सगळ्यांत खात्रीची खूण म्हणजे डाव्या दंडावरचा हा काळा बिल्वपत्रासारखा डाग ! पाहिलांत ? "

" खरंच ! अण्णा ! " असें आश्चर्यानें उद्गारून बाबा काकांच्या व राधाकान्ताच्या चेहऱ्याकडे पहात उभे राहिले.

तें त्यांचें बोलणें ऐकून मी विस्मित झालों !

" आजच्या दिवसांत अद्‌भूत आश्चर्यंच सारखीं घडायचीं आहेत कीं काय ? " मीं मनाशीं म्हटलें, " राधाकान्ताचा पत्ता नव्हता तों तो अकस्मात् सांपडला ! त्यांचें वेड जादूच्या कांडीनें नाहींसें व्हावें तसें झालें !– अन् आतां राधाकान्त म्हणजे आमच्या शांताचा आज सोळा वर्षं हरवलेला भाऊ रघुनाथ असं ठरलं ! "

बाबांनीं ताबडतोब काकूंना, आईला व शांताला आंतून बोलावून आणलें. राधाकान्ताच्या दंडावरील बिल्वपत्र पाहतांच त्यांचीहि खात्री झाली कीं हाच रघुनाथ. शिवाय रघुनाथ सोळा वर्षांपूर्वीं रेल्वेच्या अपघातांत नाहींसा झाला होता आणि दुर्गाप्रसादांनीं जो राधाकान्त वाढविला तोहि रेल्वे लायनीजवळच्या एका शेतांत सोळा वर्षांपूर्वीं सांपडला होता, या गोष्टीचा इतका सुंदर मेळ बसत होता कीं राधाकान्त म्हणजेच काकांचा रघुनाथ याविषयीं नंतर शंकेला जागाच नव्हती !

काकांना व काकूंना आपला मुलगा परत मिळाला, शांताला भाऊ मिळाला, राधाकान्ताला आईबाप व बहीण भेटली, मला माझा परम स्नेही भेटला व अनपेक्षितपणें मेव्हणा मिळाला ! एका चिमुकल्या बिल्वत्रानें सर्वांचा हरवलेला आनंद परत आणून दिला ! त्या आनंदाचें वर्णन किती केलें तरी थोडेंच होईल !

३

माझें व शांताचें लग्न होऊन पांच सहा महिने झाल्या-नंतरची गोष्ट. आम्हीं सारीं मंडळी आमच्या वृंदावनाच्या घरीं होतों. या पांच महिन्यांत मीं वरील सर्व कादंबरी लिहून काढली व जसजशी लिहून झाली तसतशी शांता व रघुनाथ यांना ती वाचून दाखविली. हें शेवटचें प्रकरण वाचून दाखविल्यावर मी त्यांना विचारलें,

" आतां या कादंबरीला नांव काय द्यावं ! "

" नांव का ?—अं-काय बरं – " असें पुटपुटत रघूनाथ विचारांत पडला.

" माझ्या मनांत एक आलं आहे सुचवूं का ? " शांता म्हणाली.

" सांग, सांग. " मी म्हटलें.

" कुलाब्याची दांडी. "

" कुलाब्याची दांडी ? " त्या नांवाचा विचार करीत मी उद्गारलों.

" कारण, त्या दिवशीं जर आपण तुमच्या स्नेह्याबरोबर दांडी पाह्यला गेलों नसतों तर माझा दादा कांहीं आपल्याला मिळाला नसता."

" आणखीहि एका दृष्टीनें हें नांव योग्य होईल. " रघुनाथ म्हणाला.

" कोणत्या ? " मीं विचारलें.

" सांगूं ? रागावणार नाहींस ? "

" तुझ्या बोलण्याचा मला राग येईल का ? "

" गतवर्षीचं तुझं कॉलेजांतील आयुष्य आणि त्यानंतरची हकीगत म्हणजे तरुण विद्यार्थ्यांच्या मार्गांत कोणते धोके असतात व त्यामुळें केवढा नाश होण्याचा संभव असतो याचं एक नमुनेदार चित्रच आहे. कुलाब्याच्या दांडीमुळें जशी गलबतांना खडकाची सूचना मिळते तद्वत् तुझ्या हकीगतीची ही कादंबरी तरुण विद्यार्थ्यांना उद्बोधक होण्यासारखी आहे. "

* * *

श्रीमहाभारत,
श्रीरामायण,
श्रीकृष्णायन
आणि आतां
श्रीकर्णायन
गो. नी. दांडेकर
यांच्या शैलीदार
मधुर भाषेंत

कांहीं कादंबऱ्या

काळें पाणी
वि. दा. सावरकर

पद्मा
गो. नी. दांडेकर

वैजयंता
अलगूज
रानगंगा
चंदन
अण्णाभाऊ साठे

करंटा
डोंबाऱ्याचा खेळ
भाऊ पाध्ये

ज्ञानदा
प्रियदर्शन
चंद्रकान्त काकोडकर

पाप
श्री. ज. जोशी

राक्षस
रघुवीर सामंत

रान-पाणी
एक डोळा बोलतो आहे
श्रीपाद काळे

औट घटकेचा राजा
गांठ पडली ठका ठका
शान्ता शेळके

निरंजन
कुलाब्याची दांडी
ना. सी. फडके

रत्नदीप
सौभाग्य
सत्यबाला
प्रभातकुमार मुखोपाध्याय

कुलाब्याची दांडी
ना.सी.फडके